## <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>

### <u>मा.महापालिका सभा</u>
### <u>कार्यपत्रिका क्रमांक – ३३</u>
### <u>सभावृत्तांत</u>

<u>दिनांक – २०.७.२०१९</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै- २०१९ ची मासिक मा. महापालिका सभा शनिवार दिनांक २०.७.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.गोफणे अनुराधा  देविदास

२०) मा.बारसे प्रियांका प्रविण

२१) मा.अजित दामोदर गव्हाणे

२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२३) मा.लांडगे सारिका संतोष

२४) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२६) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२७) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२८) मा.फुगे भिमाबाई पोपट

२९) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

३०) मा.सावळे सिमा रविंद्र

३१) मा.लोंढे नम्रता योगेश

३२) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३३) मा.लांडे विक्रांत विलास

३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३५) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३७) मा.अनुराधा गणपत गोरखे

३८) मा.केशव हनुमंत घोळवे

३९) मा.मंगला अशोक कदम

४०) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४१) मा.अश्विनी भिमा बोबडे

४२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४३) मा.संजय बबन नेवाळे

४४) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४५) मा.भालेकर प्रविण महादेव

४६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४९) मा.घोलप कमल अनिल

५०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५१) मा.पवळे सुमनताई मधुकर

५२) मा.चिखले सचिन तुकाराम

५३) मा.जावेद रमजान शेख

५४) मा.यादव मीनल विशाल

५५) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५६) मा.प्रमोद कुटे

५७) मा.राजू मिसाळ

५८) मा.शैलजा अविनाश मोरे

५९) मा.बाबर शर्मिला राजू

६०) मा.अमित राजेंद्र गावडे

६१) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

६२) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६४) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६५) मा.ढाके नामदेव जनार्दन

६६) मा.करुणा शेखर चिंचवडे

६७) मा.भोईर सुरेश शिवाजी

६८) मा.अपर्णा निलेश डोके

६९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

७०) मा.गावडे राजेंद्र तानाजी

७१) मा.जयश्री वसंत गावडे

७२) मा.कोमल दिपक मेवानी

७३) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७४) मा.सुलक्षणा राजू धर

७५) मा.शाम गणपतराव लांडे

७६) मा.सुजाता सुनिल पालांडे

७७) मा.योगेश मंगलसेन बहल

७८) मा.कदम निकीता अर्जुन

७९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

८०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८२) मा.नढे विनोद जयवंत

८३) मा.पाडाळे निता विलास

८४) मा.काळे उषा दिलीप

८५) मा.कोकणे संतोष अंकुश

८६) मा.पवार मनिषा प्रमोद

८७) मा.बारणे अर्चना तानाजी

८८) मा.अभिषेक गोविंद बारणे

८९) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

९०) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

९१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९२) मा.बारणे माया संतोष

९३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९४) मा.दर्शले रेखा राजेश

९५) मा.कलाटे राहुल तानाजी

९६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९७) मा.कामठे तुषार गजानन

९८) मा.चोंधे आरती सुरेश

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४) मा.कुटे निर्मला संजय

१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.मुंढे उषा अंकुश

१०९) मा.कदम शशिकांत गणपत

११०) मा.लोखंडे चंदा राजू

१११) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११८) मा.नवनाथ दत्तू जगताप

११९) मा.संतोष बबन कांबळे

१२०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२३) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२४) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२७) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट-प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.पाटील - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, छत्तीसगडमधील विजापुर जिल्हयात नक्षलवाद्यांशी झालेल्या हल्ल्यात ३ जवान शहीद, पुण्यातील कोंढवा व आंबेगाव येथे भिंत कोसळून १५ मजुरांचे निधन, रत्नागिरी जिल्ह्यातील तिवरे धरण

फुटल्याने २४ जणांचे वाहून गेल्याने निधन, हिमाचल प्रदेशात इमारत कोसळून १३ जवानांचे निधन, मुंबईतील डोंगरी येथे इमारत कोसळून १० नागरिकांचे निधन तसेच शेषप्पा नाटेकर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर, मोहन रानडे जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि गोवा मुक्ती मोर्चाचे सेनानी पद्मश्री, राजा ढाले- दलित पँथरचे नेते, अर्णव शिवशंकर सोलबने या बालकाचे अपघाती निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी. तसेच आजची सभा गुरुवार दिनांक २५/७/२०१९ रोजी दु.१.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** आजची सभा गुरुवार दि.२५/७/२०१९ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

--------

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**
**कार्यपत्रिका क्रमांक – ३३**
**सभावृत्तांत**
**(दिनांक २०/७/२०१९ (दु.२.००) ची तहकूब सभा)**

दिनांक – २५.७.२०१९ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.७.२०१९ (दु.२.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक २५.७.२०१९ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर
२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.वसंत प्रभाकर बोराटे
९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२७) मा.सावळे सिमा रविंद्र

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३२) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३३) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३४) मा.अनुराधा गणपत गोरखे

३५) मा.केशव हनुमंत घोळवे

३६) मा.मंगला अशोक कदम

३७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.जावेद रमजान शेख

४९) मा.यादव मीनल विशाल

५०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५१) मा.प्रमोद कुटे

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा.बाबर शर्मिला राजू

५४) मा.अमित राजेंद्र गावडे

५५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५८) मा.ढाके नामदेव जनार्दन

५९) मा.करुणा शेखर चिंचवडे

६०) मा.भोईर सुरेश शिवाजी

६१) मा.अपर्णा निलेश डोके

६२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६४) मा.जयश्री वसंत गावडे

६५) मा.कोमल दिपक मेवानी

६६) मा.सुलक्षणा राजू धर

६७) मा.शाम गणपतराव लांडे

६८) मा.सुजाता सुनिल पालांडे

६९) मा.योगेश मंगलसेन बहल

७०) मा.कदम निकीता अर्जुन

७१) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७३) मा.पाडाळे निता विलास

७४) मा.काळे उषा दिलीप

७५) मा.कोकणे संतोष अंकुश

७६) मा.पवार मनिषा प्रमोद

७७) मा.बारणे अर्चना तानाजी

७८) मा.अभिषेक गोविंद बारणे

७९) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८०) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८२) मा.बारणे माया संतोष

८३) मा.दर्शले रेखा राजेश

८४) मा.कलाटे राहुल तानाजी

८५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८६) मा.कामठे तुषार गजानन

८७) मा.कस्पटे संदिप अरुण

८८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९०) मा.सुनिता हेमंत तापकीर

९१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९३) मा.कुटे निर्मला संजय

९४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९६) मा.आंगोळकर सागर सुनिल

९७) मा.मुंढे उषा अंकुश

९८) मा.कदम शशिकांत गणपत

९९) मा.लोखंडे चंदा राजू

१००) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०१) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०६) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०७) मा.संतोष बबन कांबळे

१०८) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१११) मा. वाबळे संजय मल्हारराव

११२) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११५) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.दुरगुडे, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.कुलकर्णी - कार्यकारी अभियंता, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी, मा.गोफणे-आरोग्याधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे शिक्षण समिती नेमणे-

(टिप – शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत)

(टिप – शिक्षण समितीच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक १ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे शिक्षण समिती नेमणे- विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा

महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या आहेत.

१) शिक्षण **समिती**- शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

(शिक्षण समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी-७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना-०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ – ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना – ०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधीपक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्या वतीने शिक्षण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनतापार्टी- ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- ०३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत शिक्षण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वाच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित आण्णा बोदाडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.लोखंडे चंदा राजू २) मा.सागर बाळासाहेब गवळी, ३) मा.गायकवाड निर्मला मनोज, ४) मा.पवार मनिषा प्रमोद, ५) मा.कदम शशिकांत गणपत, ६) मा.वैशाली जालिंदर

काळभोर, ७) मा.सुलक्षणा राजू धर, ८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव, ९) मा.दर्शले रेखा राजेश या पालिका सदस्यांच्या शिक्षण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणेत आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करणेत आले.

ठराव क्रमांक - ४२७ विषय क्रमांक - १

दिनांक – २५/७/२०१८ विभाग – मा.नगरसचिव

**<u>विशेष समिती</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील मा.शिक्षण समिती नेमण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे, तसेच

मा.शिक्षण समिती – मा.शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधीपक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.लोखंडे चंदा राजू २) मा.सागर बाळासाहेब गवळी, ३) मा.गायकवाड निर्मला मनोज, ४) मा.पवार मनिषा प्रमोद, ५) मा.कदम शशिकांत गणपत, ६) मा.वैशाली जालिंदर काळभोर, ७) मा.सुलक्षणा राजू धर, ८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव, ९) मा.दर्शले रेखा राजेश या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

-----

**विषय क्रमांक २)** मा.आशा धायगुडे-शेंडगे व मा.दर्शले रेखा राजेश यांनी मा.शहर सुधारणा समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असून मा.शहर सुधारणा समिती सदस्यत्वाच्या दोन जागा रिकाम्या झाल्या असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ चे. संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**मा.नगरसचिव –** विषय क्रमांक २ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.शहर सुधारणा समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.शहर सुधारणा समिती सदस्यत्वाच्या दोन जागा रिकाम्या झाल्या असल्याने सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे. मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर राजीनामा दिलेले मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे आहेत. १) मा.आशा धायगुडे–शेंडगे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी, २) मा.दर्शले रेखा राजेश पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीचे गटनेते तथा सभागृहनेता मा.एकनाथ पवार यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना गटनेते मा.राहूल कलाटे यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वांसमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.अण्णा बोदडे, यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे- १) मा.बाबर शर्मिला राजू, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी. २) मा.**ॲ**ड.भोसले सचिन सुरेश, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिवसेना.

ठराव क्रमांक -४२८ विषय क्रमांक – २

दिनांक – २५/७/२०१८ विभाग – मा.नगरसचिव

मा.आशा धायगुडे-शेंडगे व मा.दर्शले रेखा राजेश यांनी मा.शहर सुधारणा समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.शहर सुधारणा समिती सदस्यत्वाच्या दोन जागा रिकाम्या झाल्या असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.बाबर शर्मिला राजू, २) मा.ॲड.भोसले सचिन सुरेश या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

------

(नियुक्त समिती सदस्यांचा पुस्तक व फुल देवून सन्मान करणेत आला.)

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, पिंपळेगुरव येथील अत्याचार करुन खून केलेली अडीच वर्षीय चिमुकलीचे निधन, तसेच शीला दिक्षित - काँग्रेस (आय) पक्षाच्या जेष्ठ नेत्या व दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री, रामचंद्र पासवान - बिहारमधील लोकजनशक्ती पार्टीचे खासदार, मांगेराम गर्ग – दिल्ली भाजपाचे माजी अध्यक्ष, निर्मलाताई पुरंदरे-

मा.बाबासाहेब पुरंदरे यांच्या पत्नी, गणेश ढोरे – माजी स्विकृत सदस्य, हितेश मुलचंदानी-पिपरी, जिजाबाई कस्पटे –आदर्श माता, नर्मदा चिंचवडे- चिंचवडगाव, नथुबाई चिंचवडे-चिंचवडगांव, शाहूबाई निवृत्ती पलांडे - नगरसेविका हिराबाई घुले यांच्या मातोश्री, सदानंद गुरुजी- आदर्श व्यक्तीमत्व, यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहणेत यावी. देशाची राजधानी दिल्ली येथील शिला दिक्षीत या तीन टर्म मुख्यमंत्री होत्या त्यांच दु:खद निधन झालेल आहे तरी या सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी मी विनंती करतो.

**मा. बापु उर्फ शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.नगरसेवक. दोन दिवसापुर्वी काटेपिंपळे येथे एक दुर्दैवी घटना घडलेली आहे. याच्यामध्ये एका आडीच वर्षाच्या मुलीवरती अमानुष असा अत्याचार झाला, त्यात त्या मुलीचा दुर्दैवी अंत झाला. त्या नराधमाना कायदयाप्रमाणे फाशी होईलच. तरी माझी सभागृहाला विनंती आहे की त्या मुलीलाही सभागृहात श्रध्दांजली वाहावी.

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.
**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दिल्लीच्या तीन टर्म मुख्यमंत्री राहीलेल्या मा.शिला दिक्षीत यांच दु:खद निधन झालेल आहे, बापु काटेंच्या वॉर्डातील चिमुकलीला आताच श्रध्दांजली वाहीली या सर्व पार्श्वभूमीवर आजची सभा पुढील महीन्याच्या दि.२०/८/२०१९ पर्यंत तहकूब करावी अशी मी सुचना मांडते. त्याच बरोबर मा.शिला दिक्षीत सारख्या कर्तबगार आणि प्रशासनावर पकड असलेल्या माजी मुख्यमंत्री या आपल्याला सर्वाना सोडून गेलेल्या आहेत. त्यांना मी माझ्या भारतीय जनता पार्टीच्या वतीने माझ्या प्रभागाच्या वतीने अदरांजली वाहते आणि थांबते.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपळे सौदागर याठिकाणी दोन दिवसापुर्वी अत्यंत दुर्दैवी घटना घडलेली आहे. दोन दिवसापुर्वी जो त्या चिमुकलीवर अत्याचार झाला त्याचा मी निषेध व्यक्त करतो आणि त्याचप्रमाणे आदरनीय काँग्रेस नेत्या शिला दिक्षीत दिल्ली राज्याचे त्यांनी तीन वेळा मुख्यमंत्रीपद भूषविलं. त्याचप्रमाणे केरळ या राज्याचे राज्यपालपद त्यांनी भूषविलं. दिल्ली राज्याच्या दुसऱ्या

महीला मुख्यमंत्री म्हणून त्यांना मान मिळाला अशा शिला दिक्षीतांना मी माझ्या पक्षाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्याचप्रमाणे मा.महापौर साहेब, तुम्हांला एक विनंती करतो की आपल्या शहरामध्ये पोलीस आयुक्तालय नवीन झालेल आहे. दोन तीन दिवसापुर्वीच्या घटना पाहील्यातर काल पण पिंपरीतील व्यापा-यानी बंद पुकारला होता. एका मुलाला उचलल आणि आपल्या महापालिकेच्या मागे मारल. शहरातील गुन्हेगारीच प्रमाण जास्तीत जास्त वाढलेल आहे. कृपया या सभागृहाचा एक सदस्य म्हणून आपल्याला सांगतो की आपण लवकरात लवकर पुन्हा एकदा पोलीस आयुक्तांची भेट घ्यावी आणि कुठेतरी या शहरतील सर्व नागरीकांना मोकळा श्वास दयावा एवढ बोलून थांबतो, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच मान्यवरांना आपण श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. विशेषतः दत्ताकाका असतील किंवा पक्षनेते असतील यांनी सर्वानी माजी मुख्यमंत्री शिला दिक्षीत यांच्या दु:खद निधनाबद्दलचा प्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे. खरतर या वीस बावीस वर्षाच्या कालखंडामध्ये काम करत असताना आपण लहान कार्यकर्ते म्हणून ज्यावेळेस आपला समाजकारणामध्ये राजकारणामध्ये वावर असतो त्यावेळेस असे काही जे व्यक्तिमत्व असतात की त्यांनी त्यांच अविष्य, त्यांची जगण्याची पध्दत, त्यांची काम करण्याची पध्दत त्यांची दुरदृष्टी या सगळया गोष्टीं आपल्यासारख्या कार्यकर्त्यांना प्रेरणादायी असतात. मी असेल किंवा इथे बसलेले बाबू नायर असतील शिला दिक्षीत या पहील्या महीला मुख्यमंत्री म्हणून ज्यावेळेस आम्हांचा संबंध आला त्यावेळेस आमच्या डोळयासमोर एक महाराष्ट्रातील मुख्यमंत्री हे पद प्रत्येकाच्याच मनामध्ये असत. त्यांचा वावर, त्यांचा असलेला लवाजमा, त्यांची असलेली आजूबाजूला पध्दत किंवा सर्व संरक्षण, ते एक वेगळच दृष्य आपल्याला बघण्यासाठी असतं. आपल्या डोक्यात त्याचच असत की आपण एखादी साधी, सरळ, साधी राहणीमाण व उच्च विचारसरणीचे लोक जोपर्यंत पाहत नाही तोपर्यंत अपण त्याच माहोलमध्ये असतो की मुख्यमंत्री पद हे याच सर्वात असतं. आम्हांला अनुभव आला आणि त्यावेळेस मला इतका नितांत आदर वाटला त्या व्यक्ती विषयी की बाबू नायर आणि आम्ही दिल्ली येथे रेस्टॉरंट भवन आहे त्याठिकाणी साऊथ इंडीयन जेवण भेटत. त्यामुळे त्यावेळच्या या आठवणी ताज्या झाल्या. तेथे नाष्टा करायला दोन सुरक्षा रक्षक आणि त्यांची फॅमिली आणि मा.मुख्यमंत्री एवढेच पाच जण त्या गाडीतून आले. मी म्हणल मुख्यमंत्री येथे, त्यावेळेस त्यांना तेथे प्रश्न विचारला त्यावेळेस त्या म्हणाल्या की माझ्या शहरामध्ये मी जर असुरक्षीत

असेलतर माझे शहर कसकाय सुरक्षीत असेल. म्हणजे अशा व्यक्तिमत्वाची एखादी व्यक्ती गेल्यानंतर  त्या व्यक्तीची जाणीव ठेवून आपण आज येथे सभागृहामध्ये त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन आपण सभा तहकूब करत आहोत परंतु याच चिरकाल मनामध्ये, अंतकरणामध्ये साठून ठेवलेल्या आठवणी भविष्यात येणा-या नवीन पिढीसाठी असतील. याठिकाणी अनेक महीला भगीनी आहेत की त्यांच काही चरित्र असेल, पुस्तक असेलतर आपण जरुर वाचाव त्यातन आपल्या आयुष्याच्या वाटचालीसाठी एक मोठ ऑक्सिजन आपल्याला जगण्यासाठी नव्हेतर समाजमाध्यमातून काम करत असताना जे आदर्श व्यक्तिमत्व असतात तो एक एक क्षण जरी व्यतीत केलातरी आपल्या आयुष्याच सोनं झाल्याशिवाय राहत नसतं. परंतु त्याचबरोबर दुस-याही घटना शहरामध्ये घडत असताना मा.महापौर साहेब, मी आपल्याला त्या निमीत्ताने एक विनंती करतो, इथे आज प्रत्येकालाच बोलायच होत आणि घटना घडत चाललेल्या आहेत. आप्तकालीन ज्यावेळेस कोणतीही घटना घडत असते त्यावेळेस तो काही विषय अजेंडयावर नसतो. त्यावेळेस त्या विषयाला धरुन सर्वाची मत या सभागृहात त्यांनी व्यक्त केल्यानंतर ती ऐकूण घ्यायची आणि तुम्ही आमचे महापौर म्हणून शहराला दिशा देण्यासाठी किंवा ते प्रश्न सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करायचे असतात. जनरल बॉडी म्हणजे अजेंडयावरील विषय आणि उपसूचना नव्हेतर त्याही व्यतिरीक्त या शहरातील अनेक प्रश्न असतात त्या प्रश्नाला अनुसरुन प्रत्येक व्यक्तीला तुम्हांला पाच पाच नाहीतर दहा दहा तास ऐकायची वेळ आलीतर ती तुम्ही ऐका. आचारसंहिता लागायच्या आगोदर मी तुम्हांला सूचना करतो की या सभागृहामध्ये कोणाचे प्रश्न असतीलतर त्यासाठी एक विशेष सभा तुम्ही जनरल बॉडीच्या व्यतीरीक्त बोलवा. कारण हा आवाज म्हणजे शहरातील संपुर्ण सत्तावीस लाख नागरीकांचा आवाज होता. फार मोठा विकास केल्यान फार मोठी क्रांती होते असंही काही नाही. इथ आपल शहर आण्णासाहेब मगरांना देखील विसरलय की ज्यांनी या शहराची निर्मीती केलेली आहे. आण्णासाहेब मगर  नसतेतर पक्षनेते तुम्ही विदर्भात आणि आम्ही इथे चिंचवडमध्ये  ग्रामपंचायतीची निवडणूक लढवत बसलो असतो. आणि या युगपुरुषाला आपण विसरलेलो आहोत. आणि म्हणून फार विकास केल्यान फार मोठ राजकीय खेळयाकरण बनण्यापेक्षा आता शत्रुघ्न काटेंच्या, आमच्या नाना काटेंच्या परिसरात या घटना ज्या घडत असतात त्या काही ठरवून घडत नाहीत. की या महीन्याच्या तारखेला ही घटना घडणार आहे. पण त्या घडल्यानंतर त्यावर विचारमंथन करुन आपण सर्वानी सभागृहात एक होवून यावर मात करण्याच काम देखील आपणच या सभागृहाच्या माध्यमातून केलं पाहीजे. तरी

मी तुम्हांला विनंती करतो की शिला दिक्षीत यांच आदर्श व्यक्तीत्व डोळयासमोर ठेवून उच्च विचारसरणीने अतीशय साध राहील्यानंतर सुध्दा आपण उत्तम शिखरावर पोहचू शकतो असं एक व्यक्तीमत्व आपल्या आजूबाजूला होत असताना त्यांना श्रध्दांजली अर्पण करत असताना आपण देखील आपल्या सभागृहामध्ये एक नवीन पायंडा पाडावा की पक्षनेते, सर्व पक्षाचे गटनेते मिळून अशी काही ज्यावेळेस संकट येतात त्यावेळेस तुम्ही पहील जनरल बॉडीच्या अगोदर विचारमंथन करुन त्या पध्दतीने एक विशेष सभा बोलवावी अशी मी या सभागृहामध्ये श्रध्दांजली निमीत्ताने मागणी करतो, धन्यवाद.

**मा.मीनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उत्कृष्ठ नेत्या आणि माजी मुख्यमंत्री शिलाजी दिक्षीत यांना माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहते. त्याचबरोबर परवा जो छोटया आडीच वर्षाच्या मुलीच्या बाबतीत जो प्रकार घडला तो अत्यंत लाजीरवाणा असा आहे, भर दिवसा असा जो प्रकार घडतो त्याच्यामुळे परत एकदा पिंपरी चिंचवडच्या आणि सगळया भारतातल्या महीलांचा संरक्षणाचा प्रश्न जो आहे तो पुन्हा एकदा निर्माण झालेला आहे त्याच्यामुळे मी आयुक्त साहेबांना नंम्र विनंती करतो की तुम्ही पोलीस आयुक्तांशी बोलून त्यात आम्हांलाही सहभागी करुन घ्या आणि एखादी मिटींग लावून ज्या गुन्हेगारीच प्रमाण गेल्या दोन ते तीन महीन्यामध्ये वाढलेलं आहे ते खरच चिंताजनक आहे. त्याचबरोबर परवा वायसीएममध्ये जो प्रकार घडला माझ्या प्रभागातील दोन ज्येष्ठ व्यक्ती होत्या त्यांची डेडबॉडी हातात दयायला पुर्ण दिड दिवस लागला. वायसीएममध्ये कोणतेही पोलीस निरीक्षक तीथे पोस्टमार्टेम करण्यासाठी अव्हेलेबल नसल्यामुळे आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये ज्या पोलीस चौक्या आहेत, पोलीस स्टेशन्स आहेत तर प्रत्येक पोलीस स्टेशनचे दररोज दोन किंवा तीन पोलीस वायसीएमएला पोस्टमार्टेमच्यावेळेस अव्हेलेबल असतात. परंतु असा ब-याच वेळा प्रकार घडतो की पोलीसांच्या कमतरतेमुळे बॉडी तशाच ठेवाव्या लागतात. त्या दिवशी सहा बॉडी पेन्डीग असल्यामुळे पुर्ण वायसीएम हॉस्पिटल भरलेल होतं. माझ्या प्रभागातील दोन ज्येष्ठ व्यक्ती होत्या त्यांच्यासाठी लोकांना ताटकळत इतक्या वेळ थांबाव लागलं हे खरच चुकीच आहे. स्मार्ट सिटीकड आपण वाटचाल करतो आणि अशावेळी जर शेवटच्या क्षणाला माणसाना या गोष्टीसाठी जर थांबाव लागत असेलतर खरच त्याचा गांभीर्याने विचार केला गेला पाहीजे. त्याचबरोबर नवीन कायदयानुसार जेष्ठ, वय साठच्या पुढे ज्या व्यक्ती आहेत त्यांना पोस्टमार्टेमसाठी आदि नगरसेवकांची शिफारसही चालत होती पण आता त्यांना वायसीएमला पाठवायचा जो नाहक कायदा केलेला आहे. मा.महापौर साहेब, मी

तुम्हांला विनंती करते की तुम्ही राज्यशासनाशी बोलून हा कायदा कमी करावा किंवा ज्येष्ठांसाठी वायसीएम कडे न पाठवता आदि जो कायदा होता त्याप्रमाणे जर केलतर वायसीएमवर जो अनावश्यक लोढ येतो तोही कमी होईल, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री, शिला दिक्षीत की ज्यांनी तीन टर्म दिल्लीमध्ये कामकाज केलं त्यांन मी माझ्याकडून माझ्या पक्षाकडून श्रध्दांजली वाहते. तसेच शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या पत्नी निर्मलाताई पुरंदरे यांचही निधन झालेल आहे त्यांनाही श्रध्दांजली वाहावी. शत्रुघ्न काटे यांच्या प्रभागामध्ये जी घटना घडलेली आहे त्याचाही मी जाहीर निषेध करते. मा.महापौर साहेब, मला एक विनंती करायची आहे की, आपण सभागृहामध्ये आज निषेध करणार आहोत. फक्त निषेध करुन चालणार नाहीतर आज आपण जागोजागी जे कॅमेरे बसविलेले आहेत त्याच फुटेज आपल्याला मिळाल पाहीजे. कुठलीही घटना घडू दे म्हणजे आज तो माणूस सापडलेला असो किंवा नसो परंतु आज रोडवर काही ऍक्सिडेंट झाला किंवा कुठे काही घटना घडलीतर फुटेजवरुन आपल्याला ही माणस मिळतात. शहरामध्ये आपण ब-याच ठिकाणी कॅमेरे बसविलेले आहेत. स्थानिक लोकांनी सुध्दा व्यवस्थित कॅमेरे बसविलेले आहेत. त्या सगळयाच फुटेज हे पोलीस चौकीला गेलं पाहीजेत. बघा कुठेतरी एखादया घरामध्ये घटना घडते किंवा त्याच्या समोरच्या बाजूला घडते त्यावेळेस आपल्याला लगेच फुटेज मिळतं. परंतु अशी सामाजीक बांधीलकी धरुन अशी कुठली जर घटना घडत असेलतर त्याच फुटेज आपल्याला पटकन मिळणार नाही. परंतु अशा गोष्टीमध्ये आपल्याला हे फुटेज, आता बघा, कुठेतरी म्हणजे ती जागा सुध्दा अजीबात चांगली दिसत नाही अशा ठिकाणी त्या मुलीचा मृतदेह सापडलेला आहे. मग अशा ठिकाणी नेऊस्तोपर्यंत तेवढया रस्त्यावरुन कुठेतरी ती व्यक्ती आढळल्या गेली पाहीजे. म्हणजे पोलीस यंत्रणेला सुध्दा त्या गोष्टीचा हातभार लागेल. मा.महापौर साहेब, आपण आज चांगला निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे. की ज्या ज्या ठिकाणी शहरामध्ये कॅमेरे नसतील अशा ठिकाणी कॅमेरे लावा. एखाद कुठल काम कमी करा, आमच्या वॉर्डातल सुध्दा एखाद काम तुम्ही कमी केलतरी चालेल परंतु सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांवर प्रत्येक ठिकाणी कॅमेरे बसवा ही काळाजी गरज आहे. तरी प्रशासनाला या गोष्टीच्या सूचना कराव्यात. जेणेकरुन कुठेही कुठलीही घटना घडूदेत आपल्याला फुटेज मिळतील आणि पोलीस स्टेशनलाही बांधुन घ्याव या गोष्टीमध्ये, कारण काही ठिकाणचे कॅमेरे आहेत, जर तीथे चैन ओढण्याची घटना घडते, मुलीनां छेडण्याची घटना घडते त्यावेळेस

आपण पोलीस चौकीला म्हणलतर ते म्हणतात की कॅमेरा बंद आहे. ती या गोष्टीची पोलीसाना सुध्दा बांधीलकी केली पाहीजे. आपण आयुक्तालय करुन दिलं, कॉर्पोरेशनच्या प्रॉपटर्या त्यांना आपण देतो. ऍटोक्लस्टर दिलं, शाळा दिल्या, सगळया यंत्रणा त्यांना देतो. त्यांना गाडया नसतीलतर त्या सुध्दा आपण पुरवण्याची मनाची परिस्थिती ठेवतो. हे करत असताना पोलीसांची सुध्दा आपण एक मिटींग लावा आणि त्यांना सुध्दा समज देणं गरजेच आहे की जर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने तुम्हांला जर आम्ही एवढी यंत्रणा पुरवत असूतर तुम्ही सुध्दा दक्ष असणे गरजेच आहे. ज्यावेळेला अशा घटना घडतात की गरीब जरी आई असेलतर तीच्यावर आज काय बीतल असेल की तीच्या कुशीतून तो माणूस त्या मुलीला घेवून गेला आहे. तीची परिस्थिती बघीतल्यानंतर आता आश्विनीताई आणि आम्ही बोलत होतो की त्या मुलींची परिस्थिती इतकी भयानक होती असं पोलीस लोक सांगत होते, तर मग असं कृत्य करणा-यांना आपण सुध्दा ठराव करावा की जाहीर त्याला फाशी दयायला पाहीजे. अशा पध्दतीची मागणी सर्व पक्षाच्या वतीने कॉर्पोरेशनच्या वतीन जस आपण एखादयाच्या निषेधाच करतो किंवा एखादयाच्या कौतूकाच करतो तसं कॉर्पोरेशनमधुन जाहीर निषेध झाला पाहीजे. तसेच फार्स्ट कोर्टमधुन त्याची लवकरात लवकर सुनावणी होवून लवकरात लवकर त्याला शिक्षा झाली पाहीजे. तरी या गोष्टीचा मी जाहीर निषेध करते आणि लवकरात लवकर तो माणुस सापडावा व त्याला शिक्षा व्हावी याच्यासाठी प्रयत्न करावेत ही नंम्र विनंती.

**मा.झामाबाई बारणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपल्या सभागृहामध्ये दिल्लीच्या तीन वेळा मुख्यमंत्री झालेल्या शिलादेवी दिक्षीत यांना आपण आपल्या सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहीलेली आहे त्याचप्रमाणे आपल्या शहरात ज्या काही घटना घडलेल्या आहेत त्या अशा लाजीरवाण्या घटना घडू नयेत आणि अतीशय जीवाला पिळा पडण्यासारख असं शत्रुघ्न काटे यांच्या प्रभागामध्ये आडीच वर्षाच्या मुलीवर ही घटना घडलेली आहे. या घटनेचा निषेध याठिकाणी केलेला आहे. शिलाताई दिक्षीत यांच मी एक साधी कार्यकर्ती असल्यामुळे खरोखर मला एक अभिमान वाटतो की त्यांना श्रध्दांजली वाहायची मला मा.महापौर साहेब आपण संधी दिलेली आहे. पिंपरी चिंचवड शहराचे आयुक्त श्रीनिवास पाटील होते आणि तेच प्राधिकरणाचे अध्यक्ष होते. त्यावेळी शिला दिक्षीत, माजी मुख्यमंत्री आपल्या शहरात आल्या आणि त्यांच्याशी बोलायला, बसायचा योगायोग माझ्यासारख्या कार्यकतीला मिळाला. खरोखरच त्यांचा स्वभाव शांत आणि साधा होता.

त्यांची साधी राहणी आणि उच्च विचार होते. अशा महिला बरोबर मला योग आला. याठिकाणी मला सांगण्यास अभिमान वाटतो की श्रीनिवास पाटील साहेबांनी त्यांना सांगीतल की शेतकरी कुटूंबातील या महीला आहेत अशी त्यांनी ओळख करुन दिली. त्यांना सुध्दा आपुलकी वाटली की या शहरामध्ये सुध्दा राजकारणामध्ये शेतकरी कुटूंबामधल्या महीलेला बाहेर पडण्याची संधी मिळाली. मा.महापौर साहेब, आपल्या शहरामध्ये ज्या घटना घडलेल्या आहेत त्या घटना घडू नयेत. आता अनेक जणांनी सांगीतल की पोलीसांच सहकार्य पाहीजे, कॅमेरे पाहीजेत. तरी आपल्या महापौर कारकीर्दमध्ये ही एक चांगली गोष्ट करुन दाखवावी की शहरामध्ये अशा घटना घडू नयेत अशी मी आपल्याला विनंती करते आणि याठिकाणी मी माझ्या कुटूंबाच्या वतीने, प्रभागाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करते.

**मा. उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी माझ्या परिवाराच्या वतीने, वॉर्डाच्या वतीने शिलाताईला श्रध्दांजली वाहते. त्याच बरोबर पिंपळेसौदागर येथे आडीच वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाला त्यामध्ये तीचा मृत्यू झाला आणि खरोखर ही गुन्हेगारी खुपच बोकाळत चाललेली आहे. आपल्याकडे आयुक्तालय व्हाव, त्यांना जागा नाहीतर जागेची आपण सोय करुन दयावी पिंपरी चिंचवडकरानी त्यांच्या स्टाफला जागा, गाडया ही मदत पुरवून या शहरामध्ये त्यांच वास्तव्य केलेलं आहे. महीला आयोगाच्या अध्यक्षा सौ.विजयाताई रहाटकर या दोन दिवस कार्यक्रमाच्या निमीत्ताने आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये आल्या असताना, काल देखील निळूफुले नाटयगृह येथे सांगवीचा बचत गटाचा एक महीला मेळावा आयोजीत केला होता. त्यावेळेस त्यांना ही बातमी कळाली आणि येण्या अगोदर, आमदार लक्ष्मणभाऊ जगताप आणि विजयाताई या ती झालेली घटना त्याठिकाणी गेल्या. आणि त्याठिकाणी दु:खद झालेल्या व्यक्तीच्या घरातील लोकांचे त्यांनी सांत्वन केले. तसेच कडक मध्ये आदेश दिले की ज्यांनी कोणी गुन्हा केलेला आहे त्याला फाशीची शिक्षा झाली पाहीजे, त्यांला लवकरात लवकर पकडल पाहीजे. असे आदेश देत असताना कार्यक्रम झाल्यानंतर आम्ही देखील सर्व महीला त्याठिकाणी गेलो आणि तेथील वातावरण आम्ही पाहील. आयुक्त साहेब, खरतर बांधकामाचे ठिकठिकाणी काम चालू आहेत त्यासाठी आपण रितसर परवानगी देतो. त्या बिल्डरने आपल्याकडून रितसर परवानगी घेतल्यानंतर त्याला आपण जाब विचारला पाहीजे की तु किती एक्करामध्ये बिल्डींगच बांधकाम करणार आहे ती माहिती घेतल्यानंतर तो स्वत: काम करत नसतोतर गोरगरीब, कष्ट करणारे माणस त्याठिकाणी राबत असतात. आम्ही त्या जागेवर गेलो होतोतर ते आऊट

साईडला आणि पलीकडचा भाग इतका ओसाड होता की तो खुप ओसाड भाग आहे. त्या लोकांना राहण्यासाठी तेथे पऱ्याचे घर होते. आम्ही तीथल वास्तव्य त्यांच पाहीलं. त्यांच्या दाराचा अर्धा पत्रा असा वाकलेला होता. ही रात्रीची घटना घडलेली आहे. छत्तीसगडच ते कुटूंब आहे, आम्ही शेजारच्या महीलेला विचारलं. तीन आम्हांला सांगीतल की ताई याठिकाणी हे कुटूंब रात्रीच झोपलेल होतं, मुलीच्या आईला दिवसभर काबाडकष्ट करुन रात्रीची झोप लागून गेली आणि तीच्या शेजारी झोपलेली मुलगी तीला तो नराधम घेवून गेला. म्हणजे प्राणी जसे ओढून नेतात आणि हात्या करतात त्या प्रकारची घटना झाली. आज ते रहीवासी वस्तीत सुरक्षीत असते, त्यांची जर वस्तीत घर असती तर हा प्रकार घडला नसता. हा प्रकार घडला कसा कारण ती वस्ती जी होती ती आऊट साईडला होती. ओसाड असा भाग होता. जे कोणी बांधकाम करतात त्यांना असा आदेश दयावा की कॅमेरांचे फुटेज घेवून ते जमा करावेत. परंतु बांधकामावर आता असा आदेश दयावा की तुझी मोठी स्किम आहेत त्याठिकाणी कामगार लोक राहणारे आहेत, त्यांची राहण्याची सोय काय आहे. तसेच त्यांच्या संरक्षणासाठी ते कॅमेरे त्या बांधकामावर बसवले गेले पाहीजेत. म्हणजे अशा घटना घडल्यानंतर कुठेतरी आपल्याला बेस राहील. डिपार्टमेंट काम करतच नाही असा माझा आरोप नाही पण या घटना घडतात. त्याचबरोबर महापालिकेच्या मागच्या साईडला मुलचंदानी या मुलाचा खुण झाला ते सुध्दा अतीशय अन्यायकारक झालेल आहे. अशा प्राकरच्या घटना घडतात त्याला महापालीकेच सुध्दा काही कर्तव्य आहे, काही जबाबदा-या आहेत. असे प्रकार घडतात तरी एखादा बिल्डर आल्यानंतर त्याला आपण विचारावे की तुझा कामगार वर्ग कसा राहणार आहे. त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था केली का नाही. त्या छोटयाशा मुलीवर एवढा मोठा अत्याचार झालेला आहे म्हणजे हे परत कलयुग उतरलय की काय. आम्ही तीन चार महीला मिळून तेथे गेलेंलो होतो. तेथील वातावरण पाहील्यानंतर मन सुन्न असं झालं. तरी अशा घटना घडू नयेत म्हणून डिंपार्टमेंटला सुध्दा आपण सूचना कराव्यात. त्यांना आपण सुविधा दिलेल्या आहेत, बरीचशी मदत केलेली आहे. तरी आमच्या शहराच संरक्षण त्यांनी केल पाहीजे. जे गोरगरीब शहरात पोटासाठी आलेले आहेत त्यांच्या मुलाबाळांच्या अशा घटना घडत असतीलतर ते अतीशय चुकीच आहे. प्रत्येक महीना दोन महीन्यात काहीतरी घडत असतं. आपण गार्डन केल्या आहेत त्या कशा करीता केलेल्या आहेत की विरंगूळा व्हावा म्हणून केलेल्या आहेत. मन स्थिर झाल पाहीजे पण अशा ठिकाणी सुध्दा अशा घटना घडायला लागलेल्या आहेत. तरी मी आपल्याला विनंती करते की या झालेल्या घटनेला कुठेतरी आळा बसला पाहीजे

आणि माझ्या वतीने त्या मुलीला श्रध्दांजली वाहते. त्याच बरोबर स्विकृत सदस्य गणेश ढोरे यांना देखील श्रध्दांजली अर्पण करते आणि थांबते.

**मा.शितल काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शिलाताई दिक्षीत यांना मी माझ्या परिवाराच्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहते. तसेच आता येथे आदरणीय सर्वच नगरसेवकांनी ज्या लहान मुलीबद्दल बोलल ती माझ्या वॉर्डातील, पिंपळे सौदागर, माझ्या प्रभागातील मुलगी आहे. आज आपण स्मार्ट सिटीमध्ये पिंपळे सौदागरला घेतलं किंवा तीथ स्मार्ट करण्यासाठी किंवा तीथ डेव्हलप करण्यासाठी की जे ऑलरेडी डेव्हलप आहे तीथे आपण सर्वजण प्रयत्न करतो आणि अशा प्रभागामध्ये आज मुलगी सुरक्षीत नाही. आज ब-याच जणांना आपल्याला मुली आहेत. अशा छोटया मुलींवर चुकीची घटना घडत असेलतर आज आपल्या सोळा सतरा वर्षाच्या मुलीला जर आपण आज कॉर्पोरेशनला येत असेलतर आपली मुलगी क्लासला जात असेलतर आपण तीला दहा वेळा सांगत असतो की क्लासला पोहचल्यानंतर फोन कर किंवा घरी आल्यानंतर फोन कर. आता मिनलताई बोलल्या, मंगलाताई बोलल्या की कॅमेराची व्यवस्था झाली पाहीजे. एक लेबर कँप आहे तीथे आपण कॅमेरे बसवू शकत नाहीत. पण एक करु शकतो की पोलीसांबरोबर मिटींग घेवून कस झाल पाहीजे हे सांगू शकतो, त्याठिकाणी लिनीअर गार्डन आपण जे केलेल आहे तेथेही खुप चुकीचे प्रकार घडतात. संध्याकाळच्या वेळेला सिनीअर सिटीझन जर तेथे गेलेतर त्याठिकाणी मुल-मुली बसलेले असतात बरेचसे चुकीचे प्रकार तीथ चाललेले असतात. तरी अशा गोष्टीना आपण माझा प्रभाग, तुझा प्रभाग न करता किंवा पक्ष न बघता पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशा चुकीच्या गोष्टी घडल्या नाही पाहीजे. मा.महापौर साहेब, हे पिंपरी चिंचवडचे प्रथम नागरीक आहेत, आयुक्त साहेब आपण आहात, मुलींच्या बाबतीमध्ये असे चुकीचे प्रकार घडता कामा नये. आज पिंपरी चिंचवडमध्ये मुलींची किंवा महीलांची सुरक्षा परत एकदा ऐरणीवर आलेली आहे. कारण एकदा एखादया नराधमाला जर चांगली शिक्षा झाली, इतकी वाईट शिक्षा झाली पाहीजे की परत अशी घटना घडली नाही पाहिजे. आज चांगल्या घरच्या मुलीवर असा अत्याचार झालातर आपण सगळे जण गोंधळ घालू किंवा तेथे जावुन प्रेशर देवू पण आज जर सर्वसामान्य कामगाराच्या मुलीवरती अशी घटना घडलीतर त्या माणसान काय करायचं, त्यांनी कुणाकड जायचं. तरी आपण सर्वानी ही गोष्ट गांभीर्याने घेतली पाहीजे. पोलीस काम करतात त्यांच्यावरती आपण

जर व्यवस्थित नियंत्रण ठेवल आणि त्यांना जर आदेश दिलेतर नक्कीच या गोष्टीला आळा बसेल. मला बोलण्यास संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शिला दिक्षीत यांना मी आमच्या परिवाराच्या वतीने व प्र.क्र.१७ च्या वतीने तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने आदरांजली मी वाहतो. तसेच आमचे सहकारी नगरसेवक बापू, व नाना यांच्या प्रभागात जी दुर्घटना घडली त्या दुर्घटनेतील चिमूरडीला श्रध्दांजली वाहतो. व आदरांजली व श्रध्दांजली हे आपले कर्तव्य आहे ते कर्तव्य आपण पार पाडत असताना आपल्या जबाबदारीला कुठेतरी विसर पडतोय का असा प्रश्न मनामध्ये उपस्थित होतो. आजची ही महासभा आपण पुढच्या महीन्यात २० तारखेपर्यंत न घेता शहरामध्ये खुप गंभीर प्रश्न आहेत त्या प्रश्नावरती सभागृहामध्ये चर्चा होणं गरजेच आहे याच आपण भान ठेवून ही सभा याच महीन्यामध्ये तीन चार दिवसात घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वानी चर्चा केली की शहरात कशा घटना घडतात. याठिकाण यादव ताईनी सांगीतल, मंगलाताईनी सांगीतल, माईनी सांगीतल, काटेताईनी सांगीतल की कुठेतरी शहरात महीलांची सुरक्षा देखील ऐरणीवर आली. एका आडीच वर्षाच्या चिमुरडीच अपहरण करुन तीच्यावर अमानुष असा अत्याचार झाला आहे त्या अत्याचारा बद्दल मी निषेध करतो. आमच्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहतो आणि मा.महापौर साहेब, आपल लक्ष वेधु इच्छितो की, आपल्या शहरामध्ये दिनेश मुलचंदानी पिंपरी, निलेश खैराणी सांगवी, मयुर वडमारे वाकड आणि एक अनोळखी हिंजवडीत देखील मृत्यू सापडलेला आहे. म्हणजे कुठेतरी एका बाजुला चिमुरडया मुलीच्या संरक्षणाचा प्रश्न असताना शहरात गुन्हेगारी खुप टोकाला गेलेली आहे. शहरात दिवसाआड खुण होत असतीलतर शहराची सुरक्षा कुठे गेली. एका चिमुरडीवर अमानुष असा अत्याचार, तरुणांचे खुण कुठल्या दिशेला हे शहर चालल आहे. भाऊसाहेबांनी सुध्दा सांगीतल आहे की शहरामध्ये खुप विवीध प्रश्न आहेत त्याच्यावर महासभा घ्या. मा.महापौर साहेब, सचिनन देखील आता सांगीतल की शहरात असंख्य प्रश्न आहेत, कुठतरी शहर कच-यात गेल आहे. म्हणजे आपण श्रध्दांजली वाहत असताना आपल्या जबाबदारीच सुध्दा भान ठेवल पाहीजे. ही महापालिका सभा आपण वीस तारखेला घेणार आहोत ती लवकरात लवकर घ्यावी. पक्षनेते शहरातील कच-यावर तुम्ही चर्चा करा, शहरात गंभीर प्रश्न आहेत जे लोकांना रोज भेडसावतात त्यासाठी एक विशेष सभा घ्यावी नाहीतर ही सभा आपण लवकरात लवकर

घ्यावी. त्या मुलीवर अमानुष अत्याचार झाला आहे त्या नराधमाला शिक्षा मिळण्यासाठी आयुक्त साहेब आपण सर्व महीलांसह एक प्रतिनिधी म्हणून आपण स्वतः पोलीस आयुक्तांची भेट घ्या. हे शहर कुठल्या दिशेला चालल आहे, एका बाजुला आपण सर्व सुविधा पुरवतो दुस या बाजुला परवाच तुम्ही सीसीटिव्हीचा देखील मुद्दा घेतलेला आहे. या गोष्टीकडे आताजर गांभीर्याने नाही पाहीलतर हे शहर वाढत आहे. पाच ते सहा लाख लोकसंख्येवरुन पंचवीस लाख लोकसंख्येवर जाऊन पोहचल आहे आणि असं असताना जर शहरात सुरक्षेचा प्रश्न असेलतर निश्चितच ही खेदजनक बाब आहे. मी आपणा सर्वाच्या वतीने निषेध करतो की अशा नराधमाला लवकरात लवकर शिक्षा काय मिळेल यादृष्टिने देखील आपण प्रयत्न करावेत. मा.महापौर साहेब, मी पुन्हा एकदा आपल्या निदर्शनास आणतो की आता उपमहापौरांनी देखील सुचना मांडली आहे की शहर अक्षरशः कच-यात गेलं. अशा गंभीर प्रश्नावर एकदातरी सभागृहात चर्चा झाली पाहीजे. आपण पाच दिवसापुर्वी ही सभा तहकूब केली आज देखील अपण सभा तहकूब करतो. तरी आपण ही सभा पुढच्या वीस तारखेपर्यंत तहकूब न करता लवकरात लवकर घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शिला दिक्षीत यांच निधन आणि कालच्या घटनेच्या संदर्भामध्ये चिमुरडीच ज्या पध्दतीन तीच निधन झाल, खरतर या दोन्ही घटनाबाबत श्रध्दांजली वाहून सभा तहकूब करण्याचा निर्णय करत आलेलो आहे. मला अस वाटतय की शिलाताई बद्दल भाऊसाहेबांनी आठवणी सांगीतल्या. आदरणीय झामाताई त्यांच्याबद्दल बोलल्या. एक उतूंग व्यक्तिमत्व होतं. आणि राहूलदादा तुम्ही ज्या पध्दतीने सांगीतल की अशी काही परिस्थिती नव्हती की खरतर या सगळया मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करुन सभेच कामकाज चालवण्याची आमचीही मानसीकताही होती. त्यामुळ आपल्या मनामध्ये ही शंका नको की आम्ही वेळ काढून आजची सभा उदया करतोय, त्याच्याबद्दलच काहीतरी करतोय, अशाबद्दलची शंभर टक्के परिस्थिती नाही. विरोधी पक्षनेते असतील, सगळया गटनेत्यांना सभा चालू होण्याच्या अगोदर ज्यावेळेस म्हणल होतं की श्रध्दांजली सभा आपण तासाभरामध्ये तहकूब करुन पुन्हा चालऊ शकतो. आपल्यालाही सगळयांना कल्पना आहे की, पुन्हा हे नको आम्हांला म्हणायला की तुमच्या पार्टीचा एखादा नेता निधन झाल्याच्यानंतर, मला वाटत कुणीतरी सांगीतल एखादी महीला या देशामध्ये पंधरा वर्षे सातत्याने एखादया राज्याच मुख्यमंत्रीपद सांभाळू शकते. खरतर त्यांच वयाच्या चौ-याऐंशी वर्षी, तसा जर विचार केलातर काल परवापर्यंत त्यांचे

निधन होण्याच्या अगोदर पंधरा दिवसापुर्वी त्यांना दिल्ली काँग्रेसच पण अध्यक्ष केलं. म्हणजे एका कर्तूत्वान महीलेच्या संदर्भामध्ये भारतीय जनता पार्टीची महापालिकेत सत्ता आहे आणि त्या काँग्रेसच्या नेत्या होत्या म्हणून तुम्ही श्रध्दांजलीसाठी सभा तहकूब का करत नाहीत अशा पध्दतीचा आरोपही होऊ नये आणि मला खात्री होती आज खरतर शहरामध्ये ज्या पध्दतीन आजचा मोर्चा असेल कच-याच्या संदर्भात किंवा अजून काही असेलतर या सगळया गोष्टीच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये चर्चा होण्याच्या संदर्भामध्ये आमची निश्चित मानसीकता आणि ती तयारी पण आहे. पण खरतर सभेचे संकेत आहेत की आपल्या सभागृहाच सगळया पक्षाच्या नेत्यांच मत घेतल पाहीजे. त्यामुळे मा.महापौर साहेब, मी तुम्हांला विनंती करतो वीस तारखेपर्यंतही थांबायची गरज नाही. शिला दिक्षीत असतील, कालच्या घटनेच्या संदर्भामध्ये, लॉ ऍण्ड ऑर्डरच्या संदर्भामध्ये सगळयांनी भाषण केलं की या शहरामध्ये आयुक्तालय झाल आणि अशा पध्दतीच्या घटना घडत आहेत. मंगलाताईनी खुप चांगली सूचना केली की आपण सीसीटीव्ही कॅमेरे या शहरामधल्या सगळया ठिकाणी लावले गेले पाहीजेत. ताई, मला असं वाटतय की या शहरामध्ये स्मार्ट सिटीमध्ये आपला समावेश झाल्यामुळे कुणाच्या प्रभागामधला निधी कमी न करता आपण वेगवेगळया ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील, अजून दोनशे चारशे ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज भासलीतर तीही बसवण्यासाठी आपण कमी करु नका की ज्यामुळ पोलीसांनाही गुन्हेगार शोधायला मदत होईल. ज्या चिमुरडीवरती अत्याचार झाले ते कुणाच्या प्रभागामध्ये झाले, म्हणजे आता बोलल गेल ते खरं आहे, की एखादया ठिकाणी स्मार्ट सिटीमध्ये एखादा भाग आला म्हणजे अशा विकृत मनोवृत्तीचे लोक, माजी सभागृहाच्या माध्यमातून तुम्हांला विनंती आहे की दोन वर्षाच्या, वर्षाच्या, सहा महीन्याच्या चिमुरडीवर अत्याचार करुन अशाप्रकारच्या हात्या होतात ही एक विकृती आहे. ही विकृती संपवण्यासाठी खरतर महापालिकेच्या माध्यमातून असेल अशा ठिकाणी अशा वर्गामध्ये अशा पध्दतीच्या जास्तीत जास्त घटना घडतात, मला असं वाटत की महिला आणि बालकल्याण समितीच्या माध्यमातून अशा विकृत मेन्टॅलीटीला आपण कुठतरी परावृत्त केल पाहीजे. कुठतरी त्यांना चांगल्यापैकी समज दिली पाहीजे. अशा ठिकाणी लोकप्रबोधनाचे कार्यक्रम घेवून अशा पध्दतीच्या दुर्दैवी घटना या शहरामध्ये पुन्हा घडणार नाहीत यासाठी खरतर आपण काम करण्याची गरज आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला मी विनंती करतो की या सभागृहामध्ये या सगळया मान्यवरांना आपण श्रध्दांजली अर्पण करुन या पुढच्या काळामध्ये पुढची जी

सर्वसाधारण सभा आहे ही वीस तारखेच्या अगोदर जरी घेतलीतरी चालेल, आजही म्हणल की आज तहकूब करुन आणि पुन्हा चालवायची तर पुन्हा वर्तमानपत्रामध्ये येईल की भारतीय जनता पार्टी सभा तहकूब करते अशा पध्दतीची आमची मानसीकता नाही. मा.महापौर साहेब, आपण लवकरात लवकर ही सभा तहकूब करुन ऑगष्टच्या पहील्या आठवडयात ही सभा घेवून सगळयांना श्रध्दांजली वहावी अशा प्रकारची मी विनंती करतो.

**मा.सीमा सावळे-** मा.महापौर साहेब, आजची सभा मंगळवार दि.६/८/२०१९ रोजी दु.१.०० पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडते.

**मा.सचिन चिखले –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्व नगरसेवक, नगरसेवीका, शहरामध्ये घडलेल्या या दु:खद घटना आणि त्याचबरोबर नगरसदस्यांच्या भावना लक्षात घेवून लवकरात लवकर पोलीस आयुक्तांबरोबर बैठक बोलावून या शहराच्या सुरक्षीततेसाठी म्हणून आपण लवकरच चांगला निर्णय त्याठिकाणी घेवू. शहरामध्ये कॅमेरे बसवण्यासाठी नवीन बजेटमध्ये तरतूद आहे ती टेंडर प्रोसिजर लवकरात लवकर आपण मार्गी लावू. शहरामध्ये आवश्यक त्याठिकाणी लवकरात लवकर संपुर्ण कॅमेरे बसवले जातील. शहराच्या सुरक्षिततेसाठी म्हणून ज्या ज्या नगरसेवकांनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या त्या संदर्भात तातडीची बैठक सीपी साहेबांबरोबर घेवून आपण निर्णय घेऊ. शहराची डेव्हलपमेंट पाहता ब-याच ठिकाणी बांधकाम व्यावसायीकांच बांधकाम चालू आहे यासाठी आयुक्त साहेबांना मी सुचना करतो की ज्याठिकाणी बांधकाम चालू आहे त्याठिकाणी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी म्हणून प्रत्येक बांधकामधारकांनी बांधकामाच्या ठिकाणी कॅमेरे लावावेत हे त्यांना आपण बंधनकारक कराव. त्याच बरोबर सर्वांचे आभार मानून आजची सभा मंगळवार दिनांक ६/८/२०१९ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ३३**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/७/२०१९ व दि.२५/७/२०१९ ची तहकूब सभा)**

दिनांक – ६.८.२०१९ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२५.७.२०१९ (दु.१.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक ६.८.२०१९ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.दत्तात्रय बाबूराव साने

३) मा.सारीका शिवाजी सस्ते

४) मा.वसंत प्रभाकर बोराटे

५) मा.गायकवाड निर्मला मनोज

६) मा.बारसे प्रियांका प्रविण

७) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

८) मा.लांडगे रवि लक्ष्मण

९) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१०) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

११) मा.केशव हनुमंत घोळवे

१२) मा.अश्विनी भिमा बोबडे

१३) मा.संजय बबन नेवाळे

१४) मा.भालेकर प्रविण महादेव

१५) मा.पवळे सुमनताई मधुकर

१६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

१७) मा.शैलजा अविनाश मोरे

१८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

१९) मा.ढाके नामदेव जनार्दन

२०) मा.करुणा शेखर चिंचवडे

२१) मा.अपर्णा निलेश डोके

२२) मा.बारणे अर्चना तानाजी

२३) मा.निलेश हिरामण बारणे

२४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

२५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

२६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

२७) मा.नवनाथ दत्तू जगताप

२८) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

२९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

३०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.वाघमारे, मा.इंदलकर- सहा.आयुक्त, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी सभागृहात आवश्यक गणसंख्ये नसल्याने आजची सभा मंगळवार दि. २०/८/२०१९ रोजी दु.१.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** गणसंख्येअभावी आजची सभा मंगळवार दि.२०/८/२०१९ रोजी दु.१.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

**(राहुल गुलाब जाधव)**

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ३३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/७/२०१९ व दि.२५/७/२०१९, दि.६/८/२०१९ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २०.८.२०१९</u> <u>वेळ – दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.६.८.२०१९ (दु.१.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक २०.८.२०१९ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.गीता सुशिल मंचरकर

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.केशव हनुमंत घोळवे

३७) मा.मंगला अशोक कदम

३८) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.पवळे सुमनताई मधुकर

४८) मा.चिखले सचिन तुकाराम

४९) मा.जावेद रमजान शेख

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६२) मा.करुणा शेखर चिंचवडे

६३) मा.भोईर सुरेश शिवाजी

६४) मा.अपर्णा निलेश डोके

६५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६६) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६७) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६८) मा.जयश्री वसंत गावडे

६९) मा.कोमल दिपक मेवानी

७०) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७१) मा.सुलक्षणा राजू धर

७२) मा.शाम गणपतराव लांडे

७३) मा.सुजाता सुनिल पालांडे

७४) मा.योगेश मंगलसेन बहल

७५) मा.कदम निकीता अर्जुन

७६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७९) मा.पाडाळे निता विलास

८०) मा.काळे उषा दिलीप

८१) मा.कोकणे संतोष अंकुश

८२) मा.पवार मनिषा प्रमोद

८३) मा.बारणे अर्चना तानाजी

८४) मा.अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८६) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८७) मा.बारणे माया संतोष

८८) मा.निलेश हिरामण बारणे

८९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९०) मा.दर्शले रेखा राजेश

९१) मा.कलाटे राहुल तानाजी

९२) मा.ममता विनायक गायकवाड

९३) मा.कामठे तुषार गजानन

९४) मा.चौंधे आरती सुरेश

९५) मा.कस्पटे संदिप अरुण

९६) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९७) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९८) मा.सुनिता हेमंत तापकीर

९९) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१००) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०१) मा.कुटे निर्मला संजय

१०२) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०३) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०४) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०५) मा.मुंढे उषा अंकुश

१०६) मा.लोखंडे चंदा राजू

१०७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१११) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११२) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११३) मा.नवनाथ दत्तू जगताप

११४) मा.संतोष बबन कांबळे

११५) मा.सोनवणे शारदा हिरेन

११६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११७) मा. वाबळे संजय मल्हारराव

११८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२१) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.वाघमारे- सहा.आयुक्त, मा.लडकत - कार्यकारी अभियंता, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी, मा.गोफणे-आरोग्याधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, सुषमा स्वराज-माजी केंद्रीय परराष्ट्रमंत्री, दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री भाजपच्या ज्येष्ठ नेत्या, जयपाल रेड्डी- कॉंग्रेस (आय) नेते माजी केंद्रीय मंत्री, पारुबाई खंडू झिंजुर्डे – पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबनराव झिंजुर्डे यांच्या मातोश्री, सुरेश ज्ञानेश्वर तापकीर- सौ.विनया तापकीर नगरसदस्या यांचे सासरे, कांताबाई बाराहते – माजी नगरसेवक शरद बाराहते यांच्या पत्नी, जयश्री रमाकांत गावडे – श्री.राजेंद्र गावडे नगरसेवक यांची चुलती, चिंतामण सबाजी गावडे- पिंपरी चिंचवड महापालिका उद्यान विभागातील कर्मचारी, जगन्नाथ मिश्रा – बिहारचे माजी मुख्यमंत्री, के.व्ही.जर्नादनन - सी.एम.एस.चे संस्थापक, शकुंतला मोरे, लक्ष्मीबाई मोरे, दत्तात्रय कस्पटे यांचे दु:खद निधन

झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी. तसेच आजची सभा बुधवार दिनांक २१/८/२०१९ रोजी दु.१.३० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** आजची सभा बुधवार दि.२१/८/२०१९ रोजी दुपारी १.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

--------

(राहुल गुलाब जाधव)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ३३**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/७/२०१९, दि.२५/७/२०१९, दि.६/८/२०१९ व दि.२०/८/२०१९ (दु.१.००) ची तहकूब सभा)**

दिनांक – २१.८.२०१९ वेळ – दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.८.२०१९ (दु.१.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक २१.८.२०१९ रोजी दुपारी १.३० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२२) मा.फुगे भिमाबाई पोपट

२३) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२४) मा.सावळे सिमा रविंद्र

२५) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२६) मा.लांडे विक्रांत विलास

२७) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२९) मा.अनुराधा गणपत गोरखे

३०) मा.केशव हनुमंत घोळवे

३१) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३२) मा.अश्विनी भिमा बोबडे

३३) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३४) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३५) मा.भालेकर प्रविण महादेव

३६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४०) मा.पवळे सुमनताई मधुकर

४१) मा.चिखले सचिन तुकाराम

४२) मा.जावेद रमजान शेख

४३) मा.यादव मीनल विशाल

४४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४५) मा.प्रमोद कुटे

४६) मा.राजू मिसाळ

४७) मा.शैलजा अविनाश मोरे

४८) मा.बाबर शर्मिला राजू

४९) मा.अमित राजेंद्र गावडे

५०) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५३) मा.ढाके नामदेव जनार्दन

५४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५५) मा.करुणा शेखर चिंचवडे

५६) मा.अपर्णा निलेश डोके

५७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५९) मा.जयश्री वसंत गावडे

६०) मा.कोमल दिपक मेवानी

६१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६२) मा.सुलक्षणा राजू धर

६३) मा.शाम गणपतराव लांडे

६४) मा.सुजाता सुनिल पालांडे

६५) मा.कदम निकीता अर्जुन

६६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६८) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६९) मा.नढे विनोद जयवंत

७०) मा.पाडाळे निता विलास

७१) मा.काळे उषा दिलीप

७२) मा.कोकणे संतोष अंकुश

७३) मा.पवार मनिषा प्रमोद

७४) मा.बारणे अर्चना तानाजी

७५) मा.अभिषेक गोविंद बारणे

७६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७७) मा.बारणे माया संतोष

७८) मा.निलेश हिरामण बारणे

७९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८०) मा.दर्शले रेखा राजेश

८१) मा.कलाटे राहुल तानाजी

८२) मा.कामठे तुषार गजानन

८३) मा.चोंधे आरती सुरेश

८४) मा.कस्पटे संदिप अरुण

८५) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८६) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८७) मा.सुनिता हेमंत तापकीर

८८) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८९) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९०) मा.कुटे निर्मला संजय

९१) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९२) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९३) मा.आंगोळकर सागर सुनिल

९४) मा.कदम शशिकांत गणपत

९५) मा.लोखंडे चंदा राजू

९६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१००) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०१) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०२) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०३) मा.संतोष बबन कांबळे

१०४) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०५) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११०) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.वाघमारे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.पुजारी, मा.मोरे, मा.पवार, मा.देशमुख, मा.वाघुंडे - कार्यकारी अभियंता, मा.दगडे- पशुवैदयकीय अधिकारी, मा.गोफणे- आरोग्य अधिकारी, मा.वस्ते, मा.बहुरे-प्रशासन अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी, मा.माने- लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महापालिकेतील काही कर्मचारी सातारा, सांगली, कोल्हापूर भागामधील पुरग्रस्तांच्या मदतीसाठी गेले व तेथील पुरग्रस्ताना मदत केली आहे. अशा सर्व अग्निशमन विभागातील सर्व कर्मचा-यांचा महापालिकेच्या वतीने सन्मान करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

(सांगली, कोल्हापूर येथील पुरग्रस्तांना महापालिकेतील अग्निशमन विभागातील कर्मचारी व पिंपरी चिंचवड शहरातील विवीध सेवाभावी संस्थेच्या प्रतिनिधीनी उत्कृष्ठ मदत केल्याबद्दल तसेच सुर्या हॉस्पिटलचे वाहनचालक यांचा मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.सर्व गटनेते व मा.सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच मा.महापौर- मा.राहूल जाधव यांनी सुध्दा या टिमच्या बरोबर सहभागी होवून पुरग्रस्ताना मदत केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.)

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमतः आजच्या या सर्वसाधारण सभेमध्ये गेल्या अनेक वर्षापासून जम्मू-काश्मिर मधील ३७० कलम आणि ३५ अ कलम हे दोन्ही कलम राज्य सभेमधुन आणि लोकसभा संसदमधुन आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रभाईजी मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा आणि आपल्या देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार सन्मा. अजितजी डोवाल आणि त्यांच सर्व केंद्रीय मंत्रीमंडळ यांनी गेल्या अनेक वर्षापासूनचा जो प्रलंबीत प्रश्न होता काश्मिर मधील कलम ३७० आणि ३५ अ हे हाटवल त्याबद्दल मी या सभागृहाच्या वतीने त्यांच्या संपुर्ण टिमच या सभागृहामध्ये अभिनंदन करतो. मा.महापौर साहेब, भारतीय जनता पार्टी आणि पुर्वीचा जनसंघ यांचा हा अजेन्डा होता. १९५३ मध्ये कै.डॉ.श्री.श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी एल्गार पुकारला. "एक देश मे दो प्रधान और दो निशान नही चलेंगे" हा अजेन्डा घेवून काश्मिरमध्ये ते उपोषणाला बसले परंतु काश्मिरमधुन परत येत असताना रेल्वेमध्ये त्यांची हात्या झाली. गेल्या सत्तर वर्षामध्ये एका अर्थान हा जो काही जम्मु-काश्मिरचा भाग आहे, आपण गेल्या सत्तर वर्षामध्ये राज्यामधील सर्व जनतेच्या पैशावरती त्या राज्याला पोसण्याच काम आपण सर्वजण करत होतो आणि ते संकट या कलमाच्या माध्यमातून आज आपल्याला मुक्त झालेल दिसतंय. खर म्हणजे नेमक ३५ अ कलम काय आहे व ३७० कलम काय आहे. आपले केंद्रीय गृहमंत्री यांनी ३८ हजार अतिरीक्त सुरक्षा दलाच्या जवानांना त्याठिकाणी तैनात केलं. काश्मिर मधील पर्यटकांना काश्मिर त्याठिकाणाहून सोडण्याच आवाहन करण्यात आलं. दहशतवादी हाल्ला होणार असल्याच कारण त्याठिकाणी देण्यात आलं आणि ख-या अर्थाने त्याठिकाणच राजकारण ढवळून निघालं. मा.महापौर साहेब, ३५ अ कलमाच्या संदर्भात मी उल्लेख करणार आहे, आपले तत्कालीन पंतप्रधान पंडीतजी नेहरु आणि शेख अब्दूल्ला यांच्या दिल्लीत १९५२ मध्ये झालेल्या करारानुसार राज्यघटनेतील काही तरतूदी राष्ट्रपतींच्या आदेशाने १९५४ मध्ये करण्यात आल्या आणि ते कलम ३५ अ राज्यघटनेमध्ये समाविष्ट करण्यात आले. जम्मू-काश्मिर या राज्याला स्वतःची राज्यघटना असून ती १९५६ मध्ये तयार करण्यात आली. त्यामध्ये महाराजा हरिसिंह यांच्या काळातील कायमस्वरुपी नागरीकांची व्याख्या परत आणण्यात आली. त्यानुसार १९११ पासून राज्यात जन्मलेले किंवा स्थायीक झालेल सर्व नागरीक किंवा संबंधित तारखेपासून दहा वर्षाहून अधिक काळ कायदेशीर मार्गाने स्थावर मालमत्ता धारण केलेले नागरीक यांचा यामध्ये समावेश होता. त्याशिवाय जम्मु-काश्मिरमधुन स्थलांतर केलेले सर्व नागरीक, त्यामध्ये पाकिस्तानात स्थलांतरीत झालेले

नागरीकही येतील हा राज्याचा विषय असेल स्थलांतरीतांच्या पुढील दोन पिढयातील वंशजाचाही याच्यात समावेश असेल. अशाप्रकारच ३५ अ कलम होतं. ते ३५ अ कलम याठिकाणी हाटवण्यात आलेलं आहे. त्याबद्दल पुन्हा एकदा मी केंद्रीय मंत्रीमंडळ अमीत शहा आणि आदरणीय मोदी साहेबांच याठिकाणी अभिनंदन करतो. तसेच ३७० कलम काय आहे, शेख अब्दुल्ला यांच्या संदिग्ध भुमीकेमुळे तसेच देशातील तत्कालीन पंतप्रधान नेहरु संयुक्त राष्ट्रामध्ये गेलेले असल्यामुळे या कलमाची आणि काश्मिर भारतात यावे यासाठी काय पाऊले उचलावीत असा पेच त्यावेळेला निर्माण झाला होता. अशावेळेला सरदार वल्लाभाई पटेल यांनी ईन्सट्रूमेंट ऑफ ऍक्सेशन अर्थात सामीलनामा ही संकल्पना त्यावेळेला मांडण्यात आली आणि या पेचातून यशस्वी तोडगा काढला. काश्मिरी जनतेचे काही अधिकार अबाधित ठेवत तसेच त्यांच्या सार्वमताची हामी देत काश्मिर भारतात सामील झाले. सदर कलमाच्या अधिकार क्षेत्रात वेळोवेळी बदल झाले मात्र भारतीय संविधानातील नागरीकत्व, मुलभूत हाक्क आणि राज्यातील उच्च न्यायालयाची कार्यकक्षा, निवडणूक प्रक्रीया आदि बाबी काही अपवादात्मक तरतूदीद्वारे या राज्यास लागू होतात. राष्ट्रपती संसद यांचे अधिकार, निवडणूक आयोगाची कार्यपध्दती, महालेखापालाचे कार्यक्षेत्र कॅग, सर्वोच्च न्यायालयाची अधिकार व्याप्ती याबाबी भारताच्या मुळ राज्यघटनेत जशा आहेत तशा स्थितीत काश्मिरलाही लागू होतात. मात्र राज्यलोकसेवा, राज्याअंतर्गत आणीबाणी लागू करणे, राज्याच्या सिमामध्ये बदल करणे, राज्याच्या धोरणाची मर्गदर्शक तत्वे, असे राज्यघटनेतील मुद्दे काश्मिरला जशाचे-तसे लागू होत नव्हते. अशा मुद्दंयाचा अवलंब करण्यापुर्वी काश्मिरच्या राज्य विधानसभेची सहमती घेणे अनिवार्य होते. अशा या कलमाच्या माध्यमामधुन ख-या अर्थाने आपली सुटका झालेली आहे. ३५ अ कलम आहे ते कशामुळे झाल, कशामुळे चर्चेत आलं. मा.महापौर साहेब, वी द सिटीझन स्वयंसेवी संस्थेने २०१४ मध्ये या कलमाला आवाहन देणारी याचिका दाखल केली होती. कलम ३६८ अंतर्गत सुधारनाद्वारे हे कलम राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले नसल्याचे सांगून याचिकाकर्त्यांनी त्याला विरोध केला आहे. संसदेसमोर हे कलम मांडण्यात आले नाही. तसेच ते तातडीने लागू करण्यात आल्याचा दावाही त्या संस्थेने केला आहे. गेल्या महीन्यात सुप्रिम कोर्टात दुसऱ्या एका प्रकरणात दोन काश्मिरी महीलांनी म्हणणे मांडले आणि या कलमाला ख-या अर्थाने चर्चेला सुरवात झाली. मा.महापौर साहेब, या कलमाला विरोध का होत होता, तर ३५ अ कलम रद्द झाल्यास जम्मु-काश्मिरची स्वायतत्ता लोप पावेल अशा पध्दतीच वातावरण संपुर्ण देशामध्ये करण्यात आलेलं होतं. त्या राज्यामध्ये

करण्यात आलेलं होतं. अशी भीती राजकीय पक्ष आणि फुटीरतावादी संघटनेना वाटत होती. कलम रद्द झाल्यास मुस्लिम बहूसंख्य असलेल्या या राज्यात सामाजीक बदल होतील असंही त्यांना याठिकाणी वाटत होतं. काश्मिरचा करार सर्वोच्च स्वायत्तेवर आधारीत असल्याचे राज्यातील राजकीय पक्षाचे म्हणणे आहे. ३५ अ रद्द झाल्यास राज्यात हिंदू धर्मीयांचे लोंढे येतील असाही त्याठिकाणी समज फुटीरतावादी व्यक्त करत होते. परंतु जम्मू काश्मिरमध्ये गेल्या ७० वर्षात सामाजीक स्थितीत फरक पडलेला नाही असंही त्याठिकाणी सांगीतल जात होत. राज्यातील जम्मू भागात हिंदू बहुसंख्य आहेत तर लडाखमध्ये बौध्द धार्मीक मोठया संख्येने आहेत. त्याना खो-यात संपती खरेदी करण्याचा तसेच स्थायीक होण्याचा अधिकार आहे, अशा स्वरुपाच याठिकाणी सांगण्यात येत होत. या सगळया गोष्टी करत असताना हे ३७० आणि ३५ अ कलम रद्द झाल्याच्या नंतर संपुर्ण देशामध्ये आज जे चित्र निर्माण झालेलं आहे की हा भारताचा अविभाज्य घटक आहे. मगाशी म्हणल्याप्रमाणे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीनी सांगीतल की “एक देश मे दो प्रधान और दो निशान नही चलेंगे” याचा अर्थ असा आहे की आता आपण बघीतल असेल की १५ ऑगष्टला गावांगावामध्ये त्याठिकाणी झेंडावंदन झाल आणि तीरंग्याचा त्याठिकाणी सन्मान केला गेला, मला असं वाटत की हा आपल्या सगळयाच्या दृष्टिने गौरवाचा भाग आहे. राज्यघटनेमधील हे कलम हाटवल्यानंतर काश्मिरमध्ये काय काय बदल होणार आहे ते सांगण्याचा मी प्रयत्न करतो. राज्यातील वेगळी राज्यघटना संपुष्टात आलेली आहे. काश्मिरचा स्वतंत्र झेंडाही या माध्यमातून रद्द झालेला आहे. मगाशी सांगीत्याप्रमाणे जम्मु-काश्मिरमध्ये तीरंगा हा १५ ऑगष्टला फडकवला गेलेला आहे. काश्मिरमधील लोकांचे दुहेरी नागरीकत्व संपुष्टात येणार आहे. कलम ३७० नुसार जम्मु-काश्मिरमधील निवडणूकीत केवळ त्याच राज्यातील नागरीकांना मतदानाचा अधिकार होता, इतर राज्याचे नागरीक त्याठिकाणी मतदानही करु शकत नव्हते आणि निवडणूकीलाही उभे राहू शकत नव्हते. केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर भारतातील कुठलाही नागरीक त्याठिकाणी नागरीकत्व घेवून त्याठिकाणी मतदान करु शकतो आणि उमेदवारही होवू शकतो. असं हे कलम रद्द झाल्यामुळे होवू शकतं. जम्मु काश्मिर हे आता वेगळे राज्य राहणार नसुन ते केंद्रशासीत प्रदेश होईल. जम्मू-काश्मिर हा विधानसभा असणारा केंद्रशासीत प्रदेश असणार आहे. भारतीय सांसद यापुढे कश्मिरसाठीही सर्वोच्च असेल. भारताची राज्यघटना या प्रदेशाला पुर्णपणे लागू होईल आणि यानंतर जम्मु-काश्मिरची वेगळी राज्यघटना नसेल. लडाख याचे विभाजन होवून तो केंद्रशासीत प्रदेश बनला. मात्र इथे

विधानसभा असणार नाही. इथला प्रशासकीय कारभार चंदीगड प्रमाणे चालणार आहे. जम्मु-काश्मिरमध्ये माहितीचा अधिकार कायदा त्याठिकाणी सीजीए लागू होणार आहे. भारतीयांना काश्मिरमधील संपत्ती खरेदी करण्याचा आणि काश्मिरमध्ये गुंतवणूक करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. राज्याच्या कायदयात केंद्रसरकारला हास्तक्षेपही करता येणार आहे. कोणताही भारतीय नागरीक जम्मू-काश्मिरमध्ये नोकरी करु शकणार आहे. म्हणजे मा.महापौर साहेब, आपण जर बघीतल असेलतर एवढा मोठा सुजलाम सुफलाम असा हा काश्मिरचा प्रदेश होता परंतु त्याठिकाणी आम्ही पर्यटक म्हणून फिरायला जात होतो त्यावेळेला आमच्या मनामध्ये एक भीतीच वातावरण होतं. येणा-या काळामध्ये त्याठिकाणी चांगली चांगली लोक गुंतवणूक करतील, जगामध्ये जम्मु-काश्मिर हे पर्यटन बनेल आणि त्याठिकाणी घाटीमध्ये असणा-या नागरीकांना, तरुणाना त्याठिकाणी रोजगार मिळणार आहे. असे अनेक विषय याठिकाणी सांगता येतील. असा हा ऐतिहासीक निर्णय जो ख-या अर्थाने, जम्मू काश्मिरमध्ये भारतीयांनी रक्त ओतल, ख-या अर्थान डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीनी त्याठिकाणी आपला एल्गार पुकारला आणि अनेक आहूती काश्मिर भारतामध्ये येण्यासाठी दिल्या त्यांना ख-या अर्थान हे व्यर्थ न हो बलीदान असा हा ऐतिहासीक निर्णय याठिकाणी झालेला आहे. पुन्हा मी आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी, केंद्रीय गृहमंत्री आदरणीय अमीतजी शहा ज्यांनी भारतीय जनता पार्टीच्या अजेन्डयामध्येच हा विषय घेतला होता. त्यांनी पहील्या सभागृहामध्ये हे ३७० आणि ३५ अ कलम रद्द केलेल आहे. जे बोललं ते करतात अशाप्रकारची ही भारतीय जनता पार्टी आहे. सर्वसमान्यांना, सर्व घटकांना कुठल्याप्रकारचा भेदभाव न करता सर्वांना बरोबर घेवून जाणार हे भारतीय जनता पार्टीच सरकार आहे त्यांच आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजितजी डोवाल साहेब आणि त्यांच्या संपुर्ण टिमच याठिकाणी सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो, धन्यवाद.

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच याठिकाणी धारा ३७० आणि ३५ अ रद्दबातल कलमाबाबत नामदेव ढाके यांनी विस्तृत माहिती दिलेली आहे. या अनुषंगाने काही घोषणा देणार आहे आपण त्याला साथ दयायची आहे. खरोखरच सोमवार ५ ऑगष्ट हा देशातल्या ईतीहासातील सुवर्ण अक्षराने लिहीणारा हा दिवस अस म्हणलतर वावग ठरणार नाही. त्यादिवशी ख-या अर्थाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वप्नातील आखंड भारत त्याच बरोबर स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ.शामाप्रसाद मुखर्जी, पंडीत दिनदयाल उपाध्याय, डॉ.हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांच्या स्वप्नातील भारत कशा

पध्दतीने पुढ आणला पाहीजे आणि साकारला गेला पाहीजे याबाबत दुर्गम्य ईच्छशक्ती, आथक आणि निरंतर आणि निकोप प्रयत्न असतीलतर नथींग ईज इम्पॉसिबल याप्रमाणे ५ ऑगष्ट रोजी आपल्या देशाचे ख-या अर्थाने अभ्यासू आणि लढाऊ या देशाला ख-या अर्थाने महासत्तेकडे घेवून जाणारे असे प्रधानमंत्री आदरणीय नरेंद्रभाई मोदी त्याचबरोबर कैंद्रिय गृहमंत्री झाल्यानंतर जे सत्तर वर्षात होवू शकल नाही ते सत्तर दिवसाच्या आतमध्ये ज्यांनी करुन दाखवल असे कैंद्रीय गृहमंत्री अमीतभाई शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समितीचे अजितजी डोवाल साहेब त्याचबरोबर कैंद्रीय मंत्रीमंडळ यांनी ख-या अर्थाने जम्मू आणि काश्मिर एकाच देशामध्ये एक देश एक निशाण आणि एक कायदा या तत्वाप्रमाणे ख-या अर्थाने त्यादिवशी धारा ३७० आणि ३५ अ रद्द करुन या देशाला ख-या अर्थाने परमवैभवाकडे नेण्याच कार्य त्यांनी केलेल आहे. आताच आपण पाहतो गेली सत्तर वर्षामध्ये जम्मू आणि काश्मिर आपण पाहील तर या भारत देशाचा स्वर्ग असे म्हणलतर वावग ठरणार नाही. अनेकजण बाहेर देशामध्ये जातात तो आपला स्वर्ग याठिकाणी असून सुध्दा सत्तर वर्ष रखडत राहीलेला आहे आणि त्यामुळ गेली सत्तर वर्षामध्ये अनेक सरकारे आली गेली, परंतु अतीशय गंभीर अशा प्रश्नाकड कोणीही लक्ष दिलेलं नाही की जे मोदी सरकार यांनी आता केलं. आपण पाहतो की गेली सत्तर वर्षामध्ये ४२ जणांचे प्राण त्याठिकाणी गेलेल आहेत. अतीशय भयंकर अशी घटना म्हणून त्या घटनेकड पहाव लागेल. सर्वात महत्वाच म्हणजे जम्मु आणि काश्मिरमध्ये देशाच्या वतीने एका माणसामागे कैंद्रसरकार संपुर्ण देशातल्या, राज्यातल्या लोकांमागे तीन हजार वर्षाला खर्च येतो. परंतु काश्मिरच्या माणसावर चौदा हजारापेक्षा जास्त प्रतीवर्ष खर्च येतो. आपल्यापेक्षा तीन चार पट जास्त खर्च होवून सुध्दा त्यांच्या मनामध्ये भारता विरोधी सतत कारवाया करणं, फुटीरतावादी कारवाया करणं, पत्थरबाजी करणं असं विष त्यांच्या मनामध्ये सातत्यान राहीलं आणि ते टाळण्यासाठी ख-या अर्थाने आपण जर पाहीलतर आज नाही परंतु मोदी साहेब ज्यावेळेस काहीही नव्हते, कुठल्याही पदावर नव्हते त्यावेळेस १९९२ साली काश्मिर याठिकाणच्या लाल चौकामध्ये जाऊन त्याठिकाणी तीरंगा फडकवण्याच साहस पहील त्यांनी आणि मनोहर जोशी साहेबांनी केलेलं आहे. खरोखरच यातून आपल्या लक्षात येतं की राष्ट्रभक्ती कशी असते हे त्यांच्याकडून शिकण्यासारख आहे. आपण पाहत आहोत की सत्तावीस वर्षानंतर ख-या अर्थाने आताच्या १५ ऑगष्ट रोजी लालचौक ते लालकिल्ला असा तीरंगा अतीशय चांगल्या पध्दतीने आणि सन्मानपुर्वक त्याठिकाणी बहरलेला आहे. खरोखरच त्यांच्या माध्यमातून जम्मू आणि काश्मिर या

परिसरामध्ये जी शांतता त्याठिकाणी आता प्रस्थापित करण्याच कार्य सुरु झालेलं आहे हे खरोखरच अतीशय वंदनीय आहे. नामदेवरावानी आताच केंद्रसरकारचा, मोदीसाहेबांचा, शहा साहेबांचा, अजीतजी डोवाल साहेबांच्या अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे. मी त्यामध्ये अजून ॲड करतो, वाढ करतो ख-या अर्थाने मोदी साहेबांना याठिकाणी भारतरत्न पुरस्कार देवून त्यांचा सन्मान करावा असा मी ठराव याठिकाणी मांडत आहे. खरोखरच आजपर्यंत जम्मू आणि काश्मिर या घाटी क्षेत्रामध्ये आतंकवाद कसा वाढेल, फुटीरतावादी कशी वाढेल आणि ख-या अर्थाने त्या ठिकाणच्या जनतेच नुकसान कस करता येईल, त्यांचे हालहाल कसे करता येतील हे त्याठिकाणच्या सरकारानी काम केलं. म्हणून आपण जर पाहीलतर जम्मू आणि काश्मिर सत्तर वर्षे फक्त तीन परिवारामध्येच वाटला गेलेला होता आणि त्यांची धारणा होती की आमच्याच बापाची ही मालमत्ता आहे. हे जे राज्य आहे हे आमच आहे आणि आम्हीच हे चालवणार हे कोणीही बदलू शकत नाही अशी त्यांची धारणा होती. तुम्ही जर पाहीलतर गुलाम नबी आझाद यांच वक्तव्य, फारुक अब्दुल्ला, शेख आब्दुल्ला यांची वक्तव्य जर तुम्ही पाहीलतर तुमच्या लक्षात येईल की प्रचंड प्रकारची सत्तेची मुजोरी आलेली होती आणि ती मोडीत काढण्याच अतीशय महान असं कार्य मोदी साहेबांनी ख-या अर्थाने त्याठिकाणी केलेलं आहे. मला अजून याठिकाणी अवर्जून सांगवस वाटत की आपण जर यात्रेला काश्मिरला गेलोतर तेथे सुरक्षीत जातो असे नाही. त्याठिकाणच्या शिक्षणच्या समस्या अतीशय भीषण आहेत. त्याठिकाणच्या आरोग्याच्या समस्या अतीशय भीषण आहेत. अशा परिस्थितीमध्ये एवढा पैसा जावून देखील त्याठिकाणी कसलीही विचारणा होत नसायची. त्याठिकाणी २००५ ते २०१५ या कारकीर्दीमध्ये पाच लाख कोटी रुपये सरकारच्या वतीने त्या राज्यामध्ये गेलेले आहेत परंतु त्याचा हिशोब जर मागीतलातर तो देण्याची सुध्दा त्यामध्ये तशी तरतूद नव्हती. त्याची चौकशी करणं हेतर दुरच. अशा भयानक परिस्थितीमध्ये जम्मूकाश्मिर आणि त्याठिकाणची जनता तेथे वावरत होती. हे गेली सत्तर वर्षे त्यांनी सहन केलेलं आहे. आणि काही मंडळीच्या जीवावर या तीन परिवारांने तेथील जनतेचे आतोनात हाल केलेले आहेत आणि म्हणून त्यांना सुध्दा त्यातून मुक्त करण्याच आपण अतीशय महान कार्य आपल्या केंद्रीय मंत्रीमंडळानी आणि मोदी साहेबांनी अतीशय चांगल्या पध्दतीने केलेलं आहे. मला खात्री आहे की जसं आपण म्हणतो जगाचा ताज म्हणजे स्वित्झर्लंड तस पुढच्या काळामध्ये जगाचा ताज म्हणजे काश्मिर हे नावारुपाला आणल्या शिवाय प्रधानमंत्री राहणार नाहीत असा मला विश्वास वाटतो. त्याठिकाणच्या नागरीकांचे काही प्रश्न असतील, रोजगारीचे

प्रश्न असतील, आरोग्याचे प्रश्न असतील, शिक्षणाचे प्रश्न असतील, उदयोजकांचे प्रश्न असतील, व्यापारी वर्गाचे प्रश्न असतील या सर्वावरचे उत्तर म्हणजे ख-या अर्थाने धारा ३७० आणि ३५ अ हाटवण हेच अतीशय महत्वाच होतं. राज्यसभेमध्ये ज्यावेळेस हा विषय आणला त्यावेळेस आपल्या बरोबर आपल्या विरोधी पक्षाची जी मंडळी होती त्यांचा पाठींबा कधीच आपल्याला नव्हता त्या मंडळीनी सुध्दा त्याठिकाणी पाठींबा दिला. ख-या अर्थाने आखंड भारत आणि सार्वभौम भारत हा निर्माण झाला पाहीजे. ख-या अर्थाने जे पुर्वीच स्वप्न होत ते ख-या अर्थाने याठिकाणी पुर्णत्वास गेल असं वाटतं. मला खात्री आहे आपले प्रधानमंत्री, केंद्रीय गृहमंत्री आणि सल्लागार समितीचे प्रमुख अजीतजी डोवाल साहेब पुढील काळामध्ये जम्मू आणि काश्मिर या विभागाला ख-या अर्थाने स्वित्झर्लंड बनवल्याशिवाय राहणार नाहीत असा मी विश्वास व्यक्त करतो. सर्वात महत्वाच म्हणजे की जम्मू आणि काश्मिर धारा ३७० आणि ३५ अ हाटवल्यानंतर सर्वात जास्त दु:ख जर कोणाला झाल असेलतर ज्यांनी आयुष्यभर पाकिस्तान्यांची बाजू घेतली पाकिस्तान्यांसाठी त्यांनी काम केलं त्यांना खुप दु:ख झालेल आहे त्यांना त्रास झालेला आहे. आणि म्हणून जम्मू आणि काश्मिरमध्ये ख-या अर्थाने ज्यावेळेस चांगल सुशासन आणण्याचा प्रयत्न केला त्याचा सर्वात जास्त पाकीस्तानच्या इम्रानखानला दुखन झालेल आहे, त्रास झालेला आहे. त्यांना आता भीती वाटायला लागलेली आहे की पीओके हा आता पीओके राहीलेला नसून आयओके झालेला आहे. पुढच्या काळात मोदी साहेब आणि ख-या अर्थाने अमित शहा आणि डोवाल साहेब हे लाहोर आणि कराची सुध्दा भारतामध्ये घेतल्याशिवाय राहणार नाहीत अशी भीती त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. आणि म्हणून आपण खरोखरच या आखंड भारताचे साक्षीदार आहोत. मा.महापौर साहेब मला आनंद वाटतो की चार तारखेला मला आपले खासदार आदरनीय साबळे साहेब आणि केंद्रीय कामगार मंत्री संतोषजी गंगवार साहेब यांनी ख-या अर्थाने कामगारांच्या धोरणाच्या अनुषंगाने, काही कायदयामध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने रविवारी बोलवल होतं. त्यादिवशी सोमवारी योगायोगाने राज्यसभेमध्ये उपस्थित राहण्याचा आणि त्याठिकाणचे अभिनंदनाचे भाषण ऐकण्याचे भाग्य ख-या अर्थाने मला मिळालं. सोमवारी राज्यसभा आणि मंगळवारी लोकसभा त्यामुळ स्वतंत्र्य ज्यावेळेस देशाला मिळालं त्यावेळेस माझा जन्मही नव्हता. परंतु आखंड भारताला ज्यावेळेस स्वातंत्र्य मिळाल त्यावेळेस त्या संसदेमधला साक्षीदार बनण्याच भाग्य मला मिळालं. पुन:श्च एकदा आपले पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी आणि गृहमंत्री अमितजी शहा आणि त्यांच्या मंत्रीमंडळाच मी अभिनंदन करतो आणि

आदरनीय प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी यांना भारतरत्न पुरस्कार देवून त्यांना सन्मानीत कराव असा ठराव मी याठिकाणी मांडतो तो आपण मंजूर करावा.

**मा.थोरात ज्ञानदेव-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच मांडलेल्या ठरावाला माझ अनुमोदन आहे. मा.महापौर साहेब, भारताला स्वातंत्र होवून ७२ वर्षे झाले आहेत. पण या काँग्रेस सरकारने फक्त स्वत:च्या मताच राजकारण करत गरीब लोक हे गरीबच राहीले पाहीजेत, शिक्षणापासून वंचीत राहीले पाहीजेत हे त्यांनी धोरण केलं. गरीबी हाटाव हा एकच नारा त्यांनी दिला. जर तुम्ही गरीबी हाटाव हा नारा देत होता तर ७० वर्षे झोपले होते का. या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रभाई मोदी त्यांनी जो ठराव मांडला तो आम्ही तीन विषय हे लोकसभेपुढे घेवून आलो होतो. त्यातला हा पहीला होता ३७० कलम आणि ३५ अ. जसं बोलले तसं वागले हे आमचे नरेंद्रभाई मोदी. भारतीय जनता पार्टीने जो ठराव दिला तो एकमताने मंजूर केला. काँग्रेसने जे आरोप केले की मोदीनी ५६ इंचाची छाती दाखवली, ५६ इंचाची छाती दाखवली ती आम्ही ७० दिवसाच्या आत ५६ इंचाची छाती काय आहे ती दाखवून दिली आणि ३७० कलम रद्द केलं. या देशाची दुफळी झाली होती आणि काही समाजाला प्रत्येकाला वेगवेगळ ठरवण्यात आलं होतं या काँग्रेस सरकारनी. त्यानंतर हा निर्णय मोदी सरकारन घेतला. आमच्या ज्या माता भगीनी होत्या, मुस्लिम भगिनी होत्या त्यांच्यासाठी हा तलाकचा विषय होता. तो सुध्दा राज्यसभेत, लोकसभेत पेन्डीग विषय होता. तो सुध्दा मोदी सरकारनी एकमताने पास करुन दिला तेच ज्यांची ५६ इंची छाती आहे ते मोदीजी साहेब. राजकारण बाजूला ठेवून ३७० कलमाचा निर्णय घेतला तो अमीतभाई शहा आणि मोदीजी यांनी चांगला निर्णय घेतला आहे त्यांचे मी अभिनंदन करतो तसेच आमचे मित्र केशव घोळवे यांनी जो ठराव मांडला की या देशाचे पंतप्रधान मोदीसाहेब यांना भारतरत्न देवून त्यांचा सन्मान करावा त्याला सुध्दा मी अनुमोदन देतो आणि थांबतो.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या तीन पिढया भारतीय जनता पार्टीच आमच कुटूंब काम करतय मला सार्थ अभिमान आहे आणि अहंकार आहे की मी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता आहे. “एक देश मे दो प्रधान और दो निशान नही चलेंगे” हा विषय घेवून भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी या देशात नारा दिला आणि त्यांच बलीदान त्याठिकाणी गेलं. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमीतभाई शहा आणि त्यांची संपुर्ण टिम यांनी हे बलीदान व्यर्थ जाऊ दिलं नाही आणि ३७० कलम, ३५ अ रद्द करुन वन नेशन वन लॉ हे लागू केलं. मी

नरेंद्रभाई मोदी आणि अमित शहा तसेच त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकार्याच, राज्यसभेत व लोकसभेत ज्यांनी ज्यांनी या ठरावाच्या बाजूने मतदान केल त्या सर्व राष्ट्रभक्त खासदारांच मनापासून याठिकाणी अभिनंदन करतो. आज याठिकाणी आपले सर्व नगरसेवक या अभिनंदन ठरावावर बोलतात. ३७० कलम हा किती भयानक आहे, याच्याबाबतीत कितीही बोलल तर एक इतीहास घडलेला आहे हे ब-यापैकी माझ्या आदिच्या वक्त्यांनी सांगीतल. आपण भारतात राहतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच एक पुस्तक आहे त्यात त्यांनी उल्लेख केला की ज्यावेळेस शेख अब्दुल्ला यांनी काश्मिरला विशेष दर्जा देण्याची मागणी केली त्यावेळेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्टपणे नकार दिला. ते असे त्यावेळी म्हणाले की, तुमच अस म्हणण आहे का की भारतान तुमच रक्षण कराव, रस्ते बांधावे व लोकांना धान्य दयाव हेच तुम्हांला म्हणायच का, हीच तुमची मागणी आहे का. अशा पध्दतीनं डॉ.बाबासाहेब अंबेडकर यांनी या ३७० कलमला आणि काश्मिरमध्ये जे सौर्वभौमत्वाची मागणी केली होती त्याला विरोध केला होता. परंतु काँग्रेस पक्षानी जाणुनबूजून हा प्रश्न युनोपुढे नेऊन ठेवला आणि सत्तर दशका पासून हा प्रश्न प्रलंबीत राहीला. आज हा प्रश्न नरेंद्रभाई मोदी यांनी सोडवला आणि जगाला ठणकावून सांगीतल की ही भारताची अंतर्गत बाब आहे. काही पाकिस्तानधार्जीण्य खासदार म्हणाले हा प्रश्न आपल्या देशातला थोडाच आहे. मगाशी सांगीतल ते बरोबर आहे की काही पाकिस्तानधार्जीण्य लोकांच्या पोटात दुखतय. कारण त्यांना आयुष्यभर मतांच राजकारण करायच होतं. त्यांना या देशातला मुस्लिम बांधव हा कधी कळलाच नाही की जो या भारता सोबत आहे. मा.नरेंद्रभाई मोदी यांना जो भारतरत्न देण्याचा ठराव याठिकाणी मांडला गेला त्याला मी अनुमोदन देतो. आणि ३७० वे कलम आणि ३५ अ या देशाला आखंड करण्याच काम नरेंद्रभाई मोदी यांच्या सरकारन केलेल आहे त्या नरेंद्रभाई मोदी सरकारच मी मनापासून अभिनंदन करतो, थांबतो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.राजू बनसोडे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज जो निर्णय घेतला धारा ३७० आणि ३५ अ मी या सरकारच मनापासून अभिनंदन करतो. अभिनंदन करत असताना आज काश्मिरच्या विषयावर बोलत आहे पण पिंपरी चिंचवड शहराच्या विषयावरही बोलण महत्वाच आहे. आज पाण्याचा प्रश्न एवढा गंभीर होत चाललेला आहे, आरोग्याचा प्रश्न आहे त्याच्याबद्दल आपण दुर्लक्ष करत चाललो आहोत. तुम्ही या विषयावर महत्वाची भूमीका घ्या. लोक आम्हांला वॉर्डात बसू देत नाहीत. पाण्याचा विषय लवकरात लवकर मार्गी लावावा अशी विनंती आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज खरोखर मला स्वत:ला अभिमान आहे की मी भारतीय जनता पार्टीची कार्यकर्ती आहे. ज्या पध्दतीन आज पंतप्रधान नरेंद्र मोदीजी असतील, गृहमंत्री अमितजी शहा असतील आणि पुर्ण भारतीय जनता पार्टीची टीम असेल ती ज्या पध्दतीने निर्णय घेते त्या निर्णयच खरोखर यथोचित स्वागत करण्यासारख कालची क्रमप्राप्त गोष्ट आहे. माझ वाचन भरपूर आहे मला ब-याचशा गोष्टी वाचनामुळे कळतात. पण ज्यावेळेला ३७० कलम हाटल त्यावेळेला २ ऑगष्टला थाम गावामध्ये होते ते थाम गाव सगळयात शेवटच गाव आहे लेह लड्डाख मधल. त्या थाम गावामधली २५ घरापैकी १५० लोक तेथे राहतात आणि त्याच्या पलीकडल्या साईडला पीओके आहे. ज्यावेळेला आम्ही सगळेजण ते पाहत होतो त्यावेळेला मनामध्ये अशी गोष्ट आली की हे पीओके आपल आहे आणि हे आपल्या देशामध्ये आल पाहीजे. आणि त्याच दिवशी २ ऑगष्टला पंतप्रधान नरेंद्र मोदीजीनी ऍडव्हायझरी डिक्लेअर केली. ऍडव्हायझरी डिक्लेअर केली आणि त्यावेळेला असं वाटल की जम्मूमधुन पर्यटकांना परत पाठवल जात, नेमक काय घडणार आणि त्याच दिवशी सकाळी काय झाल की आपण ३७० कलम आणि ३५ अ हाटवल. त्याचवेळेला वाटल की ८ ऑगष्टला आज आपण ख-या अर्थान स्वातंत्र झालो. प्रत्येकवेळेला आपल्याला वाटत होत की भारत हा स्वतंत्र देश आहे अगदी आम्ही प्रतीज्ञा घेत होतो त्यावेळेला सर्वसामान्य लोकांना माझ्यासारख्या लोकांना सुध्दा माहित नव्हतं की आपल्या देशामध्ये दोन राष्ट्रध्वज आहेत, दोन संविधान आहेत, विधानसभेचे निर्णय वेगवेगळया पध्दतीने होतात, राष्ट्रपती राजवट तीथे करता येत नाही, आणीबाणी करता येत नाही. असे विषय असताना भारतामधुन टॅक्सेशनच्या माध्यमातून जमा होणारा पैसा हा जम्मू-काश्मिरमध्ये पाठवत होतो. पण त्या पध्दतीने तेथील प्रगती व विकास या सत्तर वर्षामध्ये खरोखर झाला नव्हता. ज्यावेळेला हे चालू होत त्यावेळेला मी स्वत: तेथे हजर होते त्यावेळेला झालेला जो उत्सव आहे तो मला वाटत न भूतो न भविष्यती असा होता. कारण त्यांना स्वत:लाच वाटल की आज आपण ख-या अर्थान स्वातंत्र झालो. मी प्रथमत: माझा प्रभाग क्रमांक २० असेल, समस्त पीसीएमसी मधुन मी नरेंद्र मोदीजीना मनापासून धन्यवाद देतो. आमच्या माऊलीनी पण एक विषय मांडला तीहेरी तलाख खरोखरच सर्व जातीधर्माच्या महीलांना तो कायदा असण हा खुप अविभाज्य घटक याच्यातला आहे. पण तो मुस्लिम समाजाच्या सख्याना, माझ्या मैत्रिनीना त्या पध्दतीने तो विषय नव्हता. कुठलीही गोष्ट झाली की फक्त तलाख, तलाख, तलाख असं तीन वेळा म्हणल्यानंतर कुठूनही त्यांना तलाख मिळत

होता. त्यासाठी सुध्दा भारतीय जनता पार्टीन जो चांगला निर्णय घेतला त्याबद्दल खरोखरच आमच्या नारी जातीकडून, महीला वर्गाकडून मी त्यांच अभिनंदन करते आणि असेच चांगले निर्णय आम्हांला यापध्दतीने याच्या पुढेही नेतील ही मी ईश्वर चरणी प्रार्थना करते आणि थांबते, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारत देशाच नाक म्हणल जात ते जम्मु-काश्मिर. आज ख-या अर्थाने तेथील नागरीकांनीही श्वास सोडला की भारतदेशामध्ये आज गेली सात दशक त्यांच्यावर जे अन्याय होत होते ते थांबवण्याचे काम आज आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीनी आज हे ३७० व कलम, या कलमाच्या माध्यमातून ते हाटवण्याच काम केलेलं आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीची ख-या अर्थाने ५६ इंचाची छाती ही त्यांनी दाखवून दिलेली आहे. आज नरेंद्रजीभाई मोदींच्या माध्यमातून ज्या ज्या मित्र पक्षानी आणि ज्यांनी भारत देशावर ख-या अर्थाने ज्या खासदारानी प्रेम केलं त्यांनी जे समर्थन केले त्यांचही मी मनापासून स्वागत करतो. कारण की आज गेली ७० वर्षे आपल्या भारतीय सेनेनी त्यांचे बलीदान दिलं आहे त्यांनाही याठिकाणी ख-या अर्थाने अभिवादन करणे गरजेचे आहे. हे सांगून आज आपल्या भारतीय जनता पार्टीने मोठी कामगिरी करुन दाखवली त्याबद्दल मी स्वागत करुन नरेंद्र भाई मोदींचा आमच्या सहकारी मित्रांनी जो ठराव मांडला आहे त्यांना भारतरत्न पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात याव त्याला मी अनुमोदन देतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ३७० कलम संदर्भात जो क्रांतीकारी निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाच्या संदर्भात आम्ही देखील मनापासून अभिनंदन करतो. एक बर झाल त्या निमीत्तानं ढाके, घोळवे यांनी जी माहिती सांगीतली इतिहासाची ती कदाचित सांगीतली नसतीतर पिंपरी चिंचवड या माहिती पासून वंचित राहील असंत. कारण खुप सविस्तर खोलवर विचार सांगीतले आणि घोळवे यांच मी अभिनंदन करतो, त्यांना शुभेच्छा देण्यासाठी पुढील वेळेस अमर साबळेंच्या जागी त्यांची राज्यसभेवर निवड करावी अशी देखील मी मागणी करतो. याठिकाणी लोकशाहीमध्ये प्रत्येक कालखंडामध्ये त्या त्यानुसार ते ते निर्णय होत असतात. एखादा निर्णय चांगला झालातर त्या निर्णयाच्या संदर्भात समर्थन करत असताना मागील निर्णय कसे वाईट आहेत हे सांगण मात्र उचित नाही. इतीहास आपल्या शब्दातून आपण बदलू शकत नाहीत इतीहास लिखीत असतो. इतीहास कधीच कोणी खोडू शकत नाही. आणि म्हणून आपण बोलत असताना सत्तर

वर्षात काही झाल नाही, सत्तर वर्षात काही झाल नाही. आदरनीय लोकनेते अटलबिहारी वाजपेयी यांचा देखील या सत्तर वर्षामध्ये सहा वर्षाचा कालखंड होता कदाचित तो तरी मायनस करा. हे सर्व घडत असताना एखादी क्रांती होती, मला असं वाटत की अशा जर विषयावर बोलायचच असेलतर आणि विरोधकांची परिक्षाच बघायचीच असेलतर एक स्पेशल आणि विशेष सभा घ्यावी. त्यात आपण वैचारीक देखील कराव, इतीहासातल्या पुराव्यासहीत. हा क्रांतीकारी निर्णय झाला त्याच आख्खा देश स्वागत करते. आम्ही विरोध करुन आमची उंची आहे त्यात कमी करु शकत नाही. एक व्यक्ती जर चांगली असेलतर दुसरी वाईट आहे हे कस आपण सिध्द करु शकता. इतीहास तोडणार आहेत. काश्मिर बद्दल बोलत आहात त्या काश्मिरच भारत देश स्वातंत्र झाल्यानंतर इंग्रजानी ज्यावेळेस पाकीस्तानची विभागणी केल्यानंतर पाचशे देशामध्ये संस्थानीक होते, स्वातंत्र झाल्यानंतर. देश स्वातंत्र झाल्यानंतर मराठवाडा स्वातंत्र झालेला आहे. हैद्राबाद नंतर स्वातंत्र झालेला आहे. गोवा नंतर स्वातंत्र झालेला आहे. दिव-दमन असेल, अंदमान असेल स्वागतच आहेनां तुम्ही चांगल काम करता म्हणून तुम्ही सत्तेवर आहेत. याचा अर्थ बाकीचे सगळे नालायक होते अशातल काही कारण नाही, कारण की इतीहास माफ करणार नाही. या देशामध्ये टाचणी पासून ते अंतरळात चालणारी यानाची निर्मीती याच सत्तर वर्षात देशामध्ये झालेली आहे. पिंपरी चिंचवड चाळीस वर्षापुर्वी काय होतं. मी दुरुस्ती करतो आपण सर्वजण मोदी साहेबांना भारतरत्न देता तो विभागून दया अमीत शहा आणि मोदी साहेब या दोघानांही दया. पण हे सगळ होत असतांना या भारत देशामध्ये विभागणी झाल्यानंतर जम्मू काश्मिरचा हरी सिंह नावाचा हिंदू राजा होता. देशाची अंतर्गत लढाई करायची का हे देश पहीले वेगळे करायचे अशा परिस्थितीमध्ये, मनस्थितीमध्ये देश होता. त्या परिस्थितीमध्ये देशातील अंतर्गत लढय्या आपण नंतर करु, नंतर संस्थानीक हे स्वातंत्र करु, देशामध्ये त्यांना विलीन करु तोपर्यंत आता हे विषय पुर्ण मिटवून टाका अशा परिस्थितीमध्ये होते. ४० लाख कोटीचा देश होता. आणि कोटीच्या कोटी हे दारिद्रय रेषेखाली होते, काहीही पिकत नव्हतं, काहीही होत नव्हतं. त्यावेळेस सैन्याची समृध्दतता ही सत्तर वर्षातच झाली. यानाची निर्मीती देखील सत्तर वर्षातच झालेली आहे. याच्यामध्ये तुमचे प्रश्न तुम्ही निर्माण केले म्हणून मी तुम्हांला उत्तर देतो. तुम्हांला विरोध करत नाही. विरोध करण्याची ही जागा पण नाही. पण हे सर्व विषय होत असताना बाकी सगळे बलीदान गेलेले लोक आहेत त्यांच्या बद्दल तुमची काय अपेक्षा आहे. ७० वर्षामध्ये भारत देशाच्या स्वातंञ्यासाठी ज्यांनी बलीदान केलं ते बलीदान तुम्ही कांऊट करणार नाही.

यांच कौतूक करत असताना त्यांना तुम्ही कोणत्या पध्दतीने हिनवणार आहात. पंजाबच्या सुवर्ण मंदीरात जाऊन कारवाई करणा-या इंदिराजी गांधी, आटलजीनी म्हणल्याप्रमाण या रनरागीनी दुर्गा इंदीराजी गांधी यांची काही घरगूती वादातून हात्या झालेली नाही. जागेच्या वादातून हात्या झालेली नाही. राजीव गांधीची सुध्दा जागेच्या वादातून हात्या झालेली नाही. श्रीलंकेमध्ये शांतीसेना पाठवली आणि श्रीलंकेमध्ये आपण शांतीसेना पाठवली नसतीतर चीन त्यांच्या मदतीला आल असतं आणि त्या पध्दतीने चीनने हाळू हाळू आपल्या सिमा काबीज करण्याच्या दृष्टिकोनातून पावल टाकली असती म्हणून शांती सेना पाठवली त्याच प्रायश्चित काय केल त्यांची हात्या झाली. पंजाबमध्ये खलीस्तानवादी सुवर्ण मंदीरामध्ये कारवाई करायची कशी, धार्मीक आंदोलन होईल या पार्श्वभूमीवर इंदीराजीन देश पहीला मानला, त्यांची हात्या झाली मग सत्तर वर्षात काहीच झाल नाही, त्यांची हात्या अशीच झाली. माझी विनंती आहे तुमच कौतूक तुम्ही करुन घ्या, तुम्ही खुप मोठी माणस आहात. या सगळया परिस्थितीच भान ठेवून फक्त इतीहासाच विद्रूपीकरण करु नका. तुम्ही जरी विद्रूपीकरण केलतरी इतीहास काही खोटा ठरणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरीवर झाला, झालाच आहेनां. त्यामुळ या सगळया पध्दतीच भान ठेवून बोलताना आपण कशा पध्दतीने बोलतो, कारण तुमच कोणीतरी ऐकत असतं. तुम्ही देशाच सांगत असताना ज्या आण्णासाहेब मगर यांनी या शहराची निर्मीती केली त्यांना सुध्दा लोक विसरलेत मग तुमच आमच काय घेवून बसलात. हा विषय घेत असताना खिलाडूवृत्तीने घ्या, हा विषय खरच चांगला झालेला आहे आम्ही अभिनंदन करतो. पण विद्रूपीकरण करु नका कारण काय आहे की देशाचा इतीहास कोणी खोडू शकणार नाही. कारण आम्ही सुध्दा इतीहासाची पान कधी कधी उलगडतो. पण अर्धवट डलगडून आपल्या सगळयाचच वैचारीक नुकसान करण्यामध्ये काही अर्थ नाही. पुन्हा एकदा दुरुस्ती करा की भारतरत्न देत असताना नरेंद्रभाई मोदीं बरोबर अमीत शहा यांच देखील जॉईट नाव घ्या अशी राष्ट्रवदीच्या वतीने मी मागणी करतो असा दुजाभाव करु नका. अमीत शहा आमचे नेते आहेत ते गृहमंत्री आहेत, कणखर गृहमंत्री आहेत त्यांना असं वेगळ करु नका त्यांच्या पासून कायम अजून त्याच पध्दतीन बरोबर राहू दया. आम्ही तुम्हांला शुभेच्छा देतो, असंच काम करत रहा. आता मुळ मुदयावर येवून शहराच्या प्रश्नावर बोलू यात अशी मागणी करतो, धन्यवाद.

**मा.अश्विनी बोबडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मोदीजीनी जे केल ते सुवर्णअक्षरा मध्येच लिहील जाणार आहे. 'न भूतो ना भविष्यति'.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभागृह सुरु झाले, सुरवातीलाच ३५ अ आणि ३७० कलम रद्द झाल्याचा हा ऐतीहासीक निर्णयाचे आज आपण सगळेजणच साक्षीदार आहोत. हा सुवर्ण क्षण या देशामध्ये घडत असताना, ऐतीहासीक निर्णय घेत असताना देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी असतील त्यांनी घेतलेला हा निर्णय अत्यंत कौतूकास्पद आहे, त्यांच मी माझ्या प्रभागाच्या वतीने, माझ्या वतीने आपल्या महानगरपालिकेच्या वतीने मला वाटत विरोधी पक्ष सुध्दा आपल्या बरोबर आहे या ऐतीहासीक निर्णयाचे सगळेजण साक्षीदार आहोत या सगळयाच भूषण, समाधान, अभिमान निश्चितपणे आहे याची खात्री बाळगून त्यांच्या सगळयाच्या वतीने अभिनंदन करते. ख-या अर्थाने हा ऐतीहासीक निर्णय घेत असताना मनोमन समाधान याच होतं की एक भारत देश म्हणून आपण एकत्र म्हणतो आणि त्या भारत देशामध्ये येथून मागे दुसरा ध्वज त्या काश्मिरमध्ये आपण फडकवत होतो, तो मात्र आता बंद होणार आहे याच मात्र मनोमन समाधान आहे. ज्या ज्यावेळेला विदयार्थी विचारायचे, शाळेत बोलणं व्हायचं की आपण तेथे दुसरा ध्वज का लावतो. त्याच कारण सांगताना सुध्दा जीभ रेटायची नाही परंतु ती चर्चाच बंद झाली आणि आखंड देशातले एक स्वप्न कुठेतरी साकारताना आपण दिसायला लागलो. हा ऐतिहासीक निर्णय आहे का तर निश्चितपणे ऐतिहासीक निर्णय आहे. मगाशी भाऊसाहेब म्हणाले की हा निर्णय घेत असताना अटल बिहारी वाजपेयी यांच एक स्वप्न होत त्यांना सुध्दा नाकारुन चालणार नाही, अटल बिहारी वाजपेयी यांनी जी कविता लिहीली होती ‘ऐ देश सिर्फ देश नही एक महापुरुष हैं, इसमे काश्मिर हमारा मस्तक हैं.’ आणि ख-या अर्थाने आमची आन-बान-शान काश्मिर आहे. काश्मिर हा आमच्या भारताचा अविभाज्य भाग आहे. अस अनेकदा अनेक नेत्यांनी सांगीतल. सगळयांची भावना होती की हे दोन कलम रद्द व्हावेत आणि ती ख-या अर्थाने मांडण्याची संधी सन्मा.नरेंद्रजी मोदी यांना मिळाली. आणि त्यामुळे आज सगळाच देश विरोधी पक्ष जरी असलातरी ते मनोमन सुखावलेले आहेत. निश्चितपणे सर्वानी याठिकाणी नरेंद्रजी मोदी यांच अभिनंदन सुध्दा केलेलं आहे. त्या कलमासहीत येत्या भविष्यकाळा मध्ये देखील आपल्या देशाच्या पंतप्रधानाच्या माध्यमातून निश्चितपणे देशहिताचे चांगले चांगले निर्णय घेतले जातील अशी खात्री आणि सदिच्छा व्यक्त करुन थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच सर्व माझ्या सहकार्यांनी ३७० कलम रद्द केल्याबद्दल शुभेच्छा दिलेल्या आहेत. मी माझ्या पक्षाच्या वतीने

त्याचप्रमाणे आदरणीय राजसाहेबांच्या वतीने मनापासून खुप खुप शुभेच्छा देतो. एकाच देशामध्ये राहून ज्या राज्यामध्ये दोन झेंडे होते त्यातला एक झेंडा आता आपण पुन्हा एकदा स्वाभिमानानी आपला तीरंगा झेंडा काश्मिरमध्ये फडकवणार आहोत. दुसरी एक गोष्ट अशी की सर्व राज्यातील लोक त्याठिकाणी आता व्यावसाय करु शकतात. खरेदी विक्री करु शकतात. त्याचप्रमाणे भारतातील इतरही नागरीक तेथे राहून मतदान करु शकतात आणि आपला एक प्रमुख हाक्क त्याठिकाणी बजाऊ शकतात. जेवढ कौतूक कराव तेवढ कमीच आहे कारण की असंख्य तेथे सैनिक असतील, असंख्य त्या ठिकाणी झालेल्या लढाय्या असतील, अनेक आपले सैनिक त्याठिकाणी हुतात्म्य झालेले आहेत. त्यांना एकप्रकारे हि दिलेली श्रध्दांजली म्हणलेतरी ते वावगे ठरणार नाही. त्याचप्रमाणे असंख्य अशा घटना जरी भारत आखंड असता तरी सगळयाच्या मनामध्ये जम्मू-काश्मिर विषयी एक खंत होती ती आदरनीय नरेंद्रजी मोदी आणि अमितभाई शहा यांनी पुर्ण केली आहे. आज आपल्या सभागृहाच्या वतीने त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरवासीयांच्या वतीने पुन्हा एकदा आदरनीय नरेंद्र भाई मोदी आणि अमितभाई शहा यांच अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाच सुध्दा मी अभिनंदन करतो. वर्षभरामध्ये एक गोष्ट पाहीलीतर संपुर्ण अर्थव्यवस्था सातव्या क्रमांकावर आलेली आहे. ऍटोमोबाईल इन्डस्ट्री असेल, उदयोगनगरी असेल, रोजगार असेल, एक मोठा प्रश्न समोर उभा आहे. वर्षभरामध्ये पाहीलतर ११० कोटी लोकांचा रोजगार गेलेला आहे. हे होत असताना भारतीय जनता पार्टीन लोकांच्या ज्या मुलभूत गरजा आहेत याच्याकड सुध्दा जातीन लक्ष दिल पाहीजे असं मला वाटत. पिंपरी चिंचवडमध्ये जर का आपण पाहीलतर टेल्को कंपनी असेल, महिंद्रा कंपनी असेल दोन दोन शिफ्ट बंद केलेल्या आहेत व लाखो लोकांचा रोजगार हा गेलेला आहे. ३७० आणि तीहेरी तलाक हे मंजूर झालेल आहे त्याबद्दल मनापासून हार्दीक अभिनंदन. व्यवस्था सुधारण्याची अवश्यकता आहे ती रुळावर आणली पाहीजे अशी अपेक्षा करतो आणि थांबतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमतः या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रभाई मोदी आणि मा.अमितभाई शहा यांचे मनापासून अभिनंदन करते आणि आभारही मानते. या देशातले ३७० कलम काश्मिरमधून हाटवण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले आणि त्यामध्ये त्यांना जे यश मिळालं ते दैदीप्यमान असं यश मिळालं. सत्ताधा-याकडून आपण काय अपेक्षा करु शकतात तर अशा वेगवेगळया प्रकारचे निर्णय जे देशाला हितकारक ठरतील असे निर्णय त्यांनी घेतले. हे निर्णय घेत असताना या भारत देशाच्या

जनतेने ज्या प्रकारचा विश्वास भारतीय जनता पार्टीवरती टाकला, संपुर्ण देशामध्ये एक हाती सत्ता दिली आणि सत्ताधारी म्हणून जे शक्य झाल त्यामुळ संपुर्ण भारतीय जनतेच सुध्दा मी मनापासून आभार मानते. ३७० कलमावरती याठिकाणी अनेक माझ्या बंधुनी वेगवेगळया भावना व्यक्त केलेल्या आहेत. ३७० कलम आणि ३५ अ हाटवल्यानंतर जो दहशतवाद काश्मिरमध्ये वारंवार आपल्या सैनिकाच्या विरोधात आपल्याला दिसत होता आणि अनेक फैरी त्याठिकाणी मारल्या गेल्या. भाऊसाहेब आपण मगाशी म्हणालात की त्यांचा आपण उल्लेख करणार आहोत की नाही करणार. ख-या अर्थाने भारतीय जनता पार्टीने त्या सैनिकांचच मुल्यमापन याठिकाणी केलेलं आहे त्यांच्याच शौर्याला आम्ही सलाम केलेला आहे आणि या सलामासाठी या सभागृहानी आता जे काही नवीन सदस्य बोलत असताना जी काही हाशी मस्करी होते, टिंगलटवाळीचा हा विषय नाही. संपुर्ण देश अशा वेगळया प्रक्रीयेतून जात असताना देशाला एका देशामध्ये दोन विधान, दोन संविधान नही चलेंगे, दो झेंडा नही चलेंगा याच्यासाठी अनेक लोकांनी आहूती दिलेल्या आहेत. अनेक माझ्या आया-बहीणी विधवा झालेल्या आहेत. त्यांना कुठेतरी न्याय मिळावा म्हणून ३७० कलम रद्द करण्याचा आपण सर्वानी निर्णय घेतलेला आहे. संपुर्ण देश पाठीशी उभा आहे. कोणाच्या मनात किन्तू परंतु अजीबात नाही. आज त्या ठिकाणी दहशतवाद जाणार म्हणजे नेमक काय होणार. माझ्यासारखा असेल किंवा तुमच्या सारखा असेल ज्याला कोणला त्याठिकाणी व्यावसाय करायची ईच्छा असेल, यापुर्वी कोणी तीथ व्यावसाय करु शकत नव्हता. आता जाऊन आपण व्यावसाय करु शकतो. आमच्या सारख्या त्याठिकाणच्या ज्या भगीनी आहेत त्यांच्या नावावर सातबारा नव्हता. कधी कुठल्या जागेच्या कागदावर त्यांच नाव येत नव्हतं, आज ते येणार आहे. ख-या अर्थान स्वातंत्र्य तीथल्या लोकांना मिळाल आहे आणि म्हणून आपण या कलमाच या गोष्टीच स्वागत निश्चितपणे केल पाहीजे. देशाच्या पुढ याच्यापेक्षाही अनेक समस्या आहेत. अनेक गोष्टी पुढे वाढून ठेवलेल्या आहेत याच्यावर सुध्दा बोलल गेलं पाहीजे. परंतु ज्यावेळेस टिंगलटवाळी करुन बोलल जातं ते योग्य नाही. आणि आपण सगळयांनीच याठिकाणी मा.पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांना भारतरत्न देण्याची जी शिफारस केलेली आहे ती स्वागतार्ह आहे. ज्यांनी काम केल त्यांना शाबासकी पण दिली पाहीजे आणि संपुर्ण देश ज्या प्रकारचा एकवटला होता आणि ज्या प्रकारे देशानी समर्थन दिलं, जल्लोष झाला तो जल्लोष सुध्दा आपण नाकारु शकत नाहीत. त्याला सुध्दा आपण संपुर्ण देशानी डोक्यावर घेतल आहे. जी काय तेथे राजकीय उलाथापालथ होते त्याच्यावर सुध्दा अगदी बारीक लक्ष ठेवून आहेत

मा.नरेंद्रभाई मोदी आणि मा.अमितजी शहा. या दोघाना परत एकदा मनापासून सुयश चिंतीते, यांना दिर्घ आयुष्याची मी कामना करते. त्याठिकाणी अनेक माझे बंधुभगिनी बळी गेलेल आहेत अनेक देशी विदेशी पत्रकारांना त्याठिकाणी गोळया घालून ठार मारण्यात येत होतं त्या सगळयांना मी मनापासून याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करते आणि जे ३७० कलम आणि ३५ अ हाटवल त्याबद्दल मी मनापासून त्यांना सलाम करते. त्याचबरोबर माझ्या ज्या मुस्लिम भगिनी आहेत, ट्रिपल तलाक वरती ज्याप्रकारचा निर्णय या सरकारने घेतला त्या सरकारच सुध्दा मनापासून महीला म्हणून निश्चितपणे अभिनंदन करते. मला खुप अभिमान वाटतो की मी भारतीय जनता पार्टीची नगरसेवीका आहे. ज्या ज्यावेळेस मी अनेक महीलांच्या पुढे जाते त्यावेळेस अशाप्रकारच 'आतापासून काही संबंध नाही' हे जर का एखादया महीलेला ऐकाव लागत असेल तर ते किती दुर्दैवी आणि किती आघात करणार असू शकतं आणि त्यातून सुध्दा मुक्तता दिलेली आहे. त्यामुळ आम्ही या देशाची लोकशाही माननारे नागरीक आहोत त्यामुळे या सगळया निर्णयाचे मनापासून स्वागत करते. परत एकदा  या सर्व नेत्यांच मी मनापासून स्वागत करते, थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.  आज खरच चांगला विषय याठिकाणी मांडलेला आहे. धारा ३७० आणि ३५ अ हे हाटवण्याच काम २ ऑगष्ट रोजी या देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी आणि त्यांच्या टिमनी केलं. मी देखील या सभागृहाच्या वतीने त्यांच अभिनंदन करतो. माझ्या पक्षाची देखील भूमीका गेल्या अनेक वर्षापासून आदरनीय बाळासाहेब ठाकरे त्यांच जे स्वप्न होतं, ते देखील आज नरेंद्रभाई मोदींना अनेक आशिर्वाद देत असतील. डॉ.श्यामाप्रसाद, वीर सावरकर, अटल बिहारीजी वाजपेयी यांनी गेली चाळीस पन्नास वर्षे हे कलम हाटवण्यासाठी एक संघर्ष केला. परंतु जस भाऊसाहेबांनी सांगीतल की मागच्या कुठल्या पंतप्रधानाना दोष नाही देणार. परंतु हे करण्याची डेअरींग आदरनीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजीनी केली. मागचे पाच वर्षे देखील आपण वाट पाहत होतो. हे कलम कधी जाणार, राममंदीर कधी होणार. कमाल नागरी कायदा कधी त्या देशात लागू होणार. परंतु हे करण्याच धाडस कुठेतरी आपल्याला नेतृत्व पाहीजे होतं. त्यांनी एनडीएच्या माध्यमातून आज संपुर्ण भारत देशात सर्व पक्षाना बरोबर घेवून हे कलम लादण्याच काम या भारत देशात केलं ते निश्चितच या देशातल्या नागरीकांसाठी ती अभिमानाची गोष्ट आहे. आज जम्मू-काश्मिरचा जर विचार केलातर जम्मु-काश्मिरमध्ये तीथले स्थानिक आज संपुर्ण भारतभरात आहेत. उध्दव ठाकरे साहेबांची कुठ सभा असली की

काश्मिरी लोक नेहमी असतात. आम्ही कुतूहलाने सुरवातीला त्यांना विचारयचो की तुम्ही का तर ते म्हणाले या भारत देशाच राज तो काँग्निझंटचा सीईओ आहे याच पुर्ण श्रेय आदरनीय बाळासाहेब ठाकरेना आहे, आदरनीय आटलजीना आहे. मी त्यांना विचारलतर ते म्हणाले की ज्यावेळेस देशात आणि महाराष्ट्रात युतीच सरकार होतं त्या काळात एक ठराव केला गेला की प्रत्येक ईंजिनीअरींग कॉलेजमध्ये आडीच टक्के जागा या काश्मिरी पंडीतानाच दयायच्या. व जो काश्मिरमध्येच राहतो त्यालाच दयायच्या. त्याच्यामुळे आज असंख्य काश्मिरी मुलं हे चांगल्या पोस्टवर काम करतात. आज देखील त्यांच्या तेथे विवीध उदयोगधंदे येतील. चांगल्या चांगल्या संस्था येतील आणि तिथ काश्मिरी लोकांच जीवनमान उंचावेल अशाप्रकारच काम या देशात नरेंद्रभाई मोदी आणि अमित शाह यांच्या टिमन केल आहे. या सभागृहात जो ठराव मांडला गेला की त्यांना भारतरत्न दयावा त्याला मी देखील या सभागृहात माझ्या पक्षाच्या वतीने, पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या वतीने मा.महापौरांना विनंती करतो की आपण अशाप्रकारचा ठराव निश्चितपणे पारीत करावा. जेणेकरुन गेली सत्तर वर्षे जे स्वप्न त्या सर्व नागरीकांनी पाहीलं ते पुर्ण होईल. ही तर सुरवात आहे आता समान नागरी कायदा देखील होईल आणि आता पाकव्याप्त काश्मिर देखील येईल. मग कुठेतरी हे करत असताना पंतप्रधानावर लोकांचा विश्वास वाढला की आता आपले सर्व स्वप्न पुर्ण होतील. राममंदीर होईल, समान नागरी कायदा लागु होईल आणि कुठेतरी हा देश या जाती व्यवस्थेत वाटलेला आहे, कुठेतरी त्याला अस्थैर्य आहे. ३७० कलम रद्द झाल कुठेतरी हे सर्व एका रुटमध्ये येण्याच काम या देशात होईल आणि निश्चितच भविष्यात पुढच्या पिढयांना जे आपण मागे सत्तर वर्षे भांडत आलो होतो तो कुठेतरी हा एक एक विषय बंद हाईल. हा देश कुठेतरी आर्थीक महासत्तेच्या दिशेनी पुढच पाऊल ठेवेल. मी पुन्हा एकदा नरेंद्रभाई मोदींच आणि त्यांच्या टिमला धन्यवाद देतो, आभार व्यक्त करतो. आणि मा.महापौरांना विनंती करतो की जो आता ठराव मांडलेला आहे तो सर्वांच्या सम्मतीने पारीत करावा, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर ३७० आणि ३५ अ च्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये जो विषय आणला आणि या विषयाला ज्यांनी ज्यांनी अनुमोदन दिलं, समर्थन दिलं त्या सगळया देशभक्तांच मी मनापासून अभिनंदन करतो. कधी कधी मला मनापासून या सभागृहामध्ये आल्यानंतर, भाऊसाहेब मला तुमच थोडस आश्चर्य वाटतं आणि मी पहील्या दिवसापासून या सभागृहात म्हणतो की भाऊसाहेब माझे नेते

आहेत. मी माझ्या एका सहकार्याला म्हणल की पाकिस्तानचा विषय किंवा काश्मिरचा विषय हा एका भारतीय जनता पार्टीचा विषय नाही. ठिक आहे की नवीन नवीन नगरसेवकांनी एखादया विषयामध्ये, जोशामध्ये ३७० कलमाच असेल, नरेंद्रभाई असेल, अमितभाईंच असेल त्या देशप्रेमाच्या भावनेन आपल मत व्यक्त केलं. मी माझ्या डोळयानी ज्यावेळेस संसदेमधल चित्र बघत होतो आणि जी परिस्थिती होती म्हणजे सोनिया गांधी ज्या पध्दतीने बसल्या होत्या त्यांच्या शेजारी विरोधी पक्षनेते बसले होते त्यांची भाषण बघत होतो. या सभागृहामध्ये मला अस कधी कधी वाटल नव्हत म्हणजे मला माहित आहे की पिंपरी चिंचवड शहराचे प्रश्न सुध्दा तेवढेच महत्वाचे आहेत तर देशाच्या संदर्भामधला सत्तर वर्षापासूनचा जो  निर्णय आहे तो मा.पंतप्रधान नरेंद्रभाई मोदींच्या सरकारनी खरतर सोडवला आणि मला असं वाटतय की पिंपरी चिंचवडच्या सुध्दा नागरीकांना त्याच्याबद्दलचा प्रचंड अभिमान आहे आणि आनंद आहे. काश्मीर भारतामध्ये म्हणजे स्वातंञ्याच्या नंतर ज्या पध्दतीने सगळयांनी सांगीतल की एक संविधान एक निशाण, दोन दोन निशाण ज्या पध्दतीने होते खरतर या गोष्टींच्या संदर्भामध्ये तरी राजकीय व्यासपीठ करायलाच नको होतं. इंद्राजींच्या बद्दल भाऊसाहेब बोलले. खलीस्तानवादयांच्यामध्ये ज्यावेळेस कारवाई केली, शांतीसेनेच्या संदर्भामध्ये ज्यावेळेस राजीव गांधीनी शांतीसेना पाठवली. मला असं वाटतय की त्यावेळेच्या विरोधी पक्षामध्ये असणा-या अटलजीसारख्या नेत्यांनी त्या नेत्यांच कौतूकच केलनां, अभिनंदन केल. परंतु आजची परिस्थिती बघीतलीतर खरतर एखादा विषय देशाच्या संदर्भातील असेलतर सगळयांनीच त्याच कौतूक केल पाहीजे. मी आल्या आल्या सभागृहात सांगीतल की भाऊसाहेब तुमची गोची करण्यासाठी आम्ही हा विषय सभागृहात आणला नाही. तुम्हीतर सगळया विषयामध्ये हात वर करता. सगळया विषयावर तुम्ही बोलता. मला बघायच होतं, या सभागृहामधल्या माझ्या पिंपरी चिंचवड शहरामधल्या नगरसेवकांना, कारण पक्षाचा नाही लक्षात ठेवा, किती नगरसेवक कलम ३७० रद्द केल्याच्यानंतर मा.पंतप्रधानाच कौतूक करतात, खरतर मी ज्योतीराधित्यांच अभिनंदन करतो. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री यांचे मी अभिनंदन करतो. पक्ष एका बाजुला, देशप्रेम एका बाजुला. आपण या देशामध्ये राहतो, शहरातील पाण्याचा प्रश्न आहे हे मला माहिती आहे, त्याच्यावर आम्ही चर्चा करायला आज दहा तास त्याच्यावर चर्चा करा त्याच्यापासून आम्ही दुर नाही जाणार. पण हा विषय या देशाच्या स्वाभिमानतेचा आहे, आत्मीयतेचा विषय आहे, देशाच्या प्रतिष्ठेचा विषय आहे. सत्तर वर्षामध्ये का नाही केल भाऊसाहेब माहिती आहे अपल्याला. आजही हा विषय

राज्यसभेमध्ये ज्या पध्दतीने आम्हांला बहुमताचा आकडा गाठू अशा पध्दतीची अपेक्षा होती. आदरनीय अटल बिहारी वाजपेयींच्या काळामध्ये आम्हांला काठावर बहुमत होतं. राज्यसभेमध्ये बहुमत नव्हतं, त्यावेळेसही केल असतं. खरतर आपण इतीहासही बदलू शकत नाही, माझ्या भाषणानी इतीहास बदलणार नाही. पण एक वस्तुस्थिती आहे की ज्या माझ्या नवीन नगरसेवकांनी तोडक्या मोडक्या भाषेमध्ये देशप्रेमाबद्दलच आपल कर्तव्य केल ते खर आहेनां. काश्मीरचा प्रश्न कुणामुळे रेंगाळत राहीला, ज्या पध्दतीने या देशावर लादला गेला ते आपल्याला माहिती आहे. पाकिस्तानमध्ये जायच का काश्मीरमध्ये रहायच हा मुद्दा सोडून दया पण ज्यांनी हा प्रश्न केला तो देशाला माहित आहे आणि भाऊसाहेब तुम्हांलाही माहिती आहे सगळया सभागृहामध्ये. ज्या दिवशी ३७० कलमाच्या बाबतीत राज्यसभेमधला पहीला निर्णय झाला, या देशामधल्या काही, नव्यान्नव टक्के लोकांनी आनंद व्यक्त केला. पहील्यांदा आम्हांला १५ ऑगष्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र मिळालं. कदाचित ते स्वातंञ्याच बघायला आपण खुप लहान आहोत परंतु काश्मीरच्या संदर्भामधल ३७० वे कलमाचा ज्या दिवशी निर्णय झाला, मला वाटते की आपल्या पिढीतल्या लोकांनी ख-या अर्थान स्वातंत्र झाला अशा पध्दतीने साजरा केला. या संदर्भामध्ये मतमतांतर असलीच नाही पाहीजे. मी खरतर राज्यसभेमधल्या त्या सर्व खासदारांच अभिनंदन करु का वॉकआऊट करु, ही परिस्थिती आहे लक्षात ठेवा. म्हणजे सोनीया गांधीच स्टेटमेंट असेल किंवा अजीत रंजनची त्यावेळेसची प्रतिक्रीया असेल. भारताने त्याठिकाणी एकदेश, एक निशाण, एक संविधान हा जो निर्णय एखादया संसदेच्या सभागृहामध्ये होतोय आणि त्या पध्दतीने खरतर पाकीस्तानला साजेशी भूमीका खरतर काँग्रेसच्या आणि बाकी पक्षाच्या लोकांनी घेतली नसती, लाज वाटण्यासारख आहे लक्षात ठेवा. या देशामध्ये आपण राहातो, या देशाच्या संसदेमध्ये जावुन आपण बसलो, या देशाची सर्वोच्च संसद या देशाचे कायदे बनवते आणि या कायदयाच्या माध्यमातून हा देश चालतो आणि म्हणून आपण अशा गोष्टीचही खरतर मनापासून अभिनंदन करायलाही शिकल पाहीजे. पण दुर्दैवान याठिकाणी प्रत्येक गोष्टीमध्ये राजकारण करुन एखादा चांगला विषय, अमित भाईना दया, नरेंद्रभाईना दया वाटून अशा पध्दतीचा देशाच्या संदर्भामधल अशा टिंगलटवाळी करणं योग्य नाही, देशाच्या संदर्भामधला देश सोडून मला नाही वाटत की कुठला विषय महत्वाचा आहे, कुठलाच विषय महत्वाचा नाही. देशाच्या संदर्भामधला हा निर्णय जो केंद्रशासनाने केला त्या सरकारच अभिनंदन करत असताना मध्येच काहीतरी पिलू टाकायच, विषयाला बगल मारायची. माजी खरतर या सभागृहाच्या माध्यमातून नामदेवराव,

केशवराव मी मनापासून अभिनंदन करतो. सिमाताई मी तुमचही अभिनंदन करतो. या सभागृहाच्या माध्यमातून ज्यांनी ज्यांनी या सभागृहामधल्या सगळया देशभक्तांनी आपण मनापासून मा.नरेंदभाई मोदीजींच असेल, अमितभाईच असेल, अजीत डोवाल यांच असेल मनापासून आपण सगळयांनी अभिनंदन केलं पाहीजे. भाऊसाहेब आपण इंद्राजींच नाव घेतलं, या सभागृहामध्ये त्यांच तैलचित्र आहे, राजीवजींच नाव घेतल त्यांच तैलचित्र आहे. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच या सभागृहात तैलचित्र नाही. म्हणजे सावरकरांच बलीदान, श्यामाप्रसादांच बलीदान या देशासाठी अनेक स्वातंञ्यासाठी लढलेल्या किंवा स्वातंञ्यानंतर या देशाच्या इतीहासातील लढलेल्या अनेकांच बलीदान आपण विसरणार आहोत का. या निमीत्तान या सभागृहाच्या माध्यमातून हा जो विषय नामदेवराव तुम्ही मांडला त्या विषयाला मी अनुमोदन देतो. मा.महापौर साहेब, अशा पध्दतीचे देशभक्तीचे विषय या सभागृहाच्या माध्यमातून करत असताना या शहरामधल्या पिढीला देशभक्तीच प्रेम आपल्याला दाखवण्यासाठी आपण सगळयांनी ख-या अर्थाने प्रयत्न करण्याची गरज आहे. या निमीत्तान मी नरेंद्रभाई मोदींच, अमितभाईच खूप खूप अभिनंदन करतो आणि ज्या ज्या कार्यकर्त्यांनी या विषयाला संबोधीत केलं, अनुमोदन दिलं त्यांचही मनापासून आभार मानतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ३७० कलम रद्द झाल्याबद्दल मी सरकारच अभिनंदन करतो. आमच्या देखील पक्षाच्या नगरसेवकांनी अभिनंदन केलेलं आहे. अभिनंदन नक्की कराव पण इतीहासाला सुध्दा विसरुन चालू नये. तरी मी राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने ३७० कलम रद्द केल त्याच स्वागत करतो अभिनंदन करतो. मा.महापौर साहेब, आता आपण पिंपरी चिंचवड शहराचा पाणी प्रश्न असेल किंवा आरोग्याचा प्रश्न असेल त्याच्याकडे लक्ष देवून ही सभा सुरवात करावी.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अभिनंदन करताना सुध्दा मनामध्ये काही शल्य असत सुध्दा. जेंव्हा आम्ही नगरसेवक बनतो त्यावेळेला ज्या नागरीकांच्या मुलभूत गरजा आहेत त्या देणे क्रमप्राप्त असतं. जेंव्हा पाऊस पडतो, धरण भरुण वाहतात लोकांची प्रतीक्रीया अशी आहे पुरग्रस्त परिस्थिती आली आणि त्यावेळेला आपण सर्वजण मिळून म्हणजे अधिकारी वर्ग ठरवतो. आम्ही नगरसेवक असो, आमचे महापौर असो, आमचे विरोधी पक्षनेते असो, सत्तारुढ पक्षनेते असो प्रत्येकाला अस वाटतय की वॉर्डातील नागरीकांना रोज पाणी मिळाल पाहीजे आणि व्यवस्थित दाबाने पुरेस पाणी मिळाल

पाहीजे. पण आताची दहा ते पंधरा दिवसाची परिस्थिती जर पाहीलीतर पिंपरी चिंचवड महापालिकेचे पाणीपुरवठयाची जी परिस्थिती आहे ती अतीशय बीकट अशी परिस्थिती आहे. आज आम्ही नागरीकांचे दोन ते आडीच हजार फोन पाच ते दहा दिवसामध्ये घेतो की पाणी नाही ताई, पाणी नाही ताई, पाणी नाही ताई आणि त्यावेळेला आम्हांला वेगळया पध्दतीने निर्णय घ्यावे लागतात, ही कुचंबना आमची अधिका-यांनी केली. आज आयुक्तांना मला सांगायच आहे की आयुक्त साहेब तुम्हांला तुमचे अधिकारी फसवतात. तुमच्या कुठल्या अधिका-यांनी तुम्हांला व्यवस्थित परिस्थिती सांगीतली नाही की पाणीपुरवठयाची परिस्थिती काय आहे. आज आम्ही मागणी केली रोज पाणीपुरवठा पाहीजे, आमच्या नागरीकांची मागणी आहे रोज पाणीपुरवठा पाहीजे. आम्ही मागणी करणार, आमच्या नागरीकांना रोज पाणीपुरवठा देण्याची जबाबदारी आमची आहे, तुमची आहे. पण त्यावेळेला जेव्हा आमची मागणी असेल, जेंव्हा तुम्ही निर्णय घेता की रोज पाणी आम्ही कोठा भरु शकतो तेव्हा तुमच्या अधिका-यांनी टेक्निकल बाबी सांगायला नको. तुम्ही २४X७ ची व्हल्गना करता, प्रत्येक नागरीकाला २४ तास पाणी देणार म्हणून तुम्ही सांगता. आज धरण वाहून चालली आहेत, ४८० एमएलडी पाणी तुम्ही घेता, ४०० एमएलडी पाणीजर तुम्हांला दिवसभर देता येत नसेलतर तुमच्या अधिका-यांनी आमच्या सर्व नगरसेवकांचा भूलभूलैय्या का करावा. कुठल्या पध्दतीने पाणी तुम्ही देवू शकता का नाही देवू शकता या टेक्निकली बाबी आज मला तांबे यांना विचारायच्या आहेत. तांबेनी मला उत्तर असं दिल तुमचा वॉर्ड मला माहिती नाही. मी ग्रॅव्हेटी ईजिनीअर आहे. मीतर ग्रॅव्हेटी ईजिनीअर कुठला आहे म्हणून कधी बघीतलेल नाही. ग्रॅव्हेटी ईजिनीअर नावाची काही पोस्ट आहे का हे आयुक्त साहेब तुम्ही आम्हांला सांगा. या पध्दतीची उत्तर रामदास तांबेनी आम्हांला दयावीत. आज माझ्या वॉर्डातील जे.ई.गर्जे असतील, डेप्यूटी दवंडे असतील, एक्झिक्यूटीव्ह पवार असतील मी त्यांना धन्यवाद देणार आहे. त्यांना शाबासकीची मी थाप देणार आहे. कारण माझ्या वॉर्डामध्ये पाच ते सहा दिवस ग्राऊंड लेव्हलला ते तीघेजण काम करत होते. पण तांबे असतील, निकम असतील यांनी एक दिवस सुध्दा असा विचार केला नाही की वॉर्डामध्ये काय परिस्थिती आहे म्हणून. मोर्चा घेवून तुमच्याकडे महीला येतात किंवा एखादी महिला आम्हांला फोन करुन सांगते की ताई तुमच्या घरामध्ये पाणी भरायला येवू का आम्ही त्यावेळेला आमची परिस्थिती काय असेल हे आयुक्त साहेब तुम्ही आम्हांला सांगा. आज पिंपरी चिंचवड मधला पाणीपुरवठा एवढा विस्कळीत होण्याच कारण काय. पहीली परिस्थिती आपल्याकडे चांगली होती, आपण चांगल्या पध्दतीने

ती हाताळत होतो. पण या दहा ते पंधरा दिवसामध्ये पुर्ण पीसीएमसीला पाण्याने नष्ट करुन टाकल. कुठल्याही पक्षाच्या नगरसेवकांना विचारा, सकाळी ४ वाजल्यापासून रात्री २ वाजेपर्यंत आम्ही फक्त फोन घेतो. पाणी का आल नाही, आम्हांला उत्तर आहेच दुस-या मजल्यावर पाणी येणार नाही, पहील्या मजल्यावर येणार नाही. आम्ही पहील्या आणि दुस-या मजल्यावर पाणी मागतच नाही. पण आम्हांला जे तुम्ही १३५ ली. पाणी परहेड म्हणता तेवढ पण देवू शकत नाहीततर शंभर लि. तरी पाणी दया आम्हांला. पत्येक नागरीकांचा जो हाक्क आहे तो मुलभूत हाक्क तरी दिला पाहीजे. याच्यामध्ये नगरसेवकांची कुंचबना का. कारण प्रत्येक नागरीक हा नगरसेवकांनाच विचारणार आहे. मला तांबेनी उत्तर पहील्यांदी दयायच. तांबेना जर ही टेक्निकली परिस्थिती माहिती होतीतर त्यांनी आयुक्तांची फसवणूक का केली, आमची फसवणूक का केली आणि का सांगीतल की आम्ही प्रत्येक दिवशी पाणी देवू म्हणून. आज आठ प्रभाग आहेत आठ प्रभागामध्ये तीन टँकर आहेत, ही कुठली गोष्ट आहे. हा कुठल्या पध्दतीने पाणीपुरवठा करणार आहात तुम्ही. एकाच माणसाला सगळे काम दिलीत. माझ्या वॉर्डात ३२ व्हॉल्व्ह आहेत, ३२ व्हॉल्व्ह कुठल्या पध्दतीने हॅण्डल करायचे हे माझ्या जे.ई.ला कळत नाहीत. नगरसेवकांना विश्वासात घेवून तुम्ही कुठले निर्णय घेता का. नगरसेवकांना विचारल पाहीजेनां. जेव्हा आपली चर्चा झाली तेव्हा तुम्ही म्हणाले टेलला पाणी नाही. दयानां तुम्ही पाणी, पण ज्या गोष्टीमध्ये जिथे व्यवस्थीत पाणीपुरवठा होतो तो विस्कळीत करण्याचा अधिकार आयुक्त साहेब तुमच्या अधिका-याना दिलाय का. तुमच्या अधिका-यानी आम्हांला का विश्वासात घेतल नाही की आम्ही पाणीपुरवठा करु शकत नाही. प्रत्येकवेळेला आम्ही रोज वेगवेगळया बातम्या वाचतो. त्यादिवशी सकाळ पेपरमध्ये बातमी वाचली की लोकांना सवय लागावी एक दिवसाआड पाणी म्हणून आम्ही एकदिवसा आड पाणी देण्याचा प्रयत्न करतो. हे उत्तर आहे तुमच. आयुक्त साहेब पुन्हा सांगते की तुमचे अधिकारी तुम्हांला फसवतात. तुम्हांला व्यवस्थित माहिती दिली जात नाही. तुम्हांला मिसगाईड केल जात. या प्रकरणामध्ये तांबेना तुम्ही निष्काषीत करा ही माझी मागणी असेल. त्यांनी यापध्दतीने त्यांच जे कॉन्ट्रॅक्ट आणि त्यांच जे साठलोट आहेनां त्याची पहील्यांदा आम्हांला माहिती दया. जोपर्यंत ही सगळी माहिती मिळत नाही तोपर्यंत त्यांना या पदावरुन हाटवून कॉर्पोरेशनमध्ये कुठलही पद देवू नये एवढी मी तुम्हांला विनंती करते.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एवढी महत्वाची बैठक होत असताना एक पण प्रशासकीय अधिकारी दिसत नाही. आयुक्त

साहेब आपल या प्रशासनावर कंट्रोल आहे का. प्रशासनाच असं जर कॅज्यूअल ऍप्रोच असेलतर मा.महापौर साहेब, आपण पहीले आयुक्तांना आदेश दयावेत, सर्व प्रशासकीय अधिकारी येईपर्यंत सभा थांबवावी. मा.महापौर साहेब, आयुक्तांना विचाराव की याठिकाणी प्रशासकीय अधिकारी का नाहीत. फक्त आठ ते नऊ लोक आहेत. ते का आले नाही याबाबतीत आजच त्यांना नोटीस दयावी. शिवाय त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दया. आयुक्त साहेबांनी खुलासा दयावा की येथे प्रशासकीय अधिकारी का उपस्थित नाहीत.

**मा.महापौर -** संबंधित सर्व विभागाचे अधिकारी व कार्यकारी अभियंता या सर्वांनी सभागृहा मध्ये येवून बसाव.

**मा.संगीता (नानी) ताम्हांणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज सहा महीने झाले मी पाणीप्रश्नावर दोनवेळा पत्र दिलेल आहे. त्यावेळेला मी नागरीकांना सांगत होते की आपल्या धरणात पाणी नाही पाणी दिवसाआड केलेलं आहे त्यामुळे पाणी कमी प्रेशरनी येणार आहे. आता पाऊस पडलेला आहे धरण भरलेली आहेत, एवढ पाणी वाहते आहे आणि लोकांना पाणी भेटत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आम्ही काल पण आयुक्त साहेबांना भेटलो होतो, संपुर्ण प्रभाग क्र. १२ मध्ये दुपारी येणार पाणी संध्याकाळी १०, ११, १२ ला कधी पण सोडतात. सकाळी ७ ला येणार पाणी दुपारी १२, १, २, ३ ला येते त्याचा काही टाईमींगच नाही. ज्यावेळेस पणी येत ते पहाटे ३ वाजता पाणी येतं आणि ६ वा. पाणी जातं. मग पाणी भरायच कसं. ज्यावेळेस लोकांचा झोपेचा टाईम असतो त्यावेळेस यांचा पाणी सोडण्याचा टाईमींग असतो. आम्ही ज्यावेळेस अधिका-यांना फोन करतो त्यावेळेस लडकत साहेब फोन उचलत नाहीत. एकमेव फक्त गायकवाड साहेब आमचे फोन उचलतात, मग आम्ही हा प्रश्न सांगायचा कुणाला. अधिकारी फोन उचलत नसतीलतर प्रभागातील लोक नगरसेवकांकडेच येणारनां आणि आम्ही अधिका-यांना सांगणार. अधिकारी फोन उचलत नाहीततर मग ते कुणाला सांगायच. २४X७ च काम नसत केलतरी चालल असतं. कारण आमच्या प्रभागामध्ये २४X७ ची इतकी वाईट स्थिती केलेली आहे की एवढी लोक त्याला त्रासलेली आहेत. आम्हांला तुम्ही एवढच सांगाव की पाणी कधी सोडणार, किती वाजता सोडणार आणि या पाण्याला टाईमींग आहे का नाही ते सुध्दा सांगा, एवढच मी सांगते आणि थांबते.

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सगळयांचा हा ज्वलंत प्रश्न आहे. देशाचे जे काश्मीर विषयी प्रश्न निकाली लागले ते तर आहेच. पण हे जास्ती

आहे. माझ्या काही प्रतिनीधीनां घेवून मी चार-पाच दिवसापूर्वी हार्डीकरांची भेट घेतली होती. माझा विषय असा आहे पिंपरी चिंचवड शहराचा पाणीप्रश्न हा ज्वलंत प्रश्न निर्माण झालेला आहे आणि त्याला कारणीभूत फक्त प्रशासन आणि प्रशासनाचे नियोजनशुन्यता आहे. वास्तविक लोकसंख्यावाढीचे नियोजन पुर्वी पन्नास वर्षासाठी मागील दहा वर्षापुर्वीच व्हायला हवे होते. वाईट या गोष्टीचे वाटते की आमच्यावर टँकर लॉबींचा संबंध जोडला जातो. सर्वाना एक विनंती आहे की एकजूटीने या प्रश्नावर तोडगा काढता येईल. माझ्या प्रभागात कित्येक ठिकाणी करंगळी एवढी धार येते. वैयक्तीक आहेत त्यांना सुध्दा कधी कधी पाण्याची व्यवस्था करावी लागते. सोसायटयांना तर रोज टँकर आवश्यक आहेत. प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी तातडीने ऍक्शन प्लॅन तयार करावा. सर्वाना दोन तास का होईना पण पुर्ण प्रेशरनी पाणी दयावे. तसेच माझा दुसरा विषय सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. आपण कुत्र्यांना पकडून नसबंदी करुन सोडून देतो व त्यातील काही कुत्रे पिसाळलेले असतात किंवा खुप रागीट असतात. रोज शहराबाहेर कुत्रे चावण्याच्या तीन चार घटना घडत असतात. माझी एवढीच विनंती आहे की अशा कुत्र्यांसाठी शहराबाहेर वेगळी व्यवस्था करुन त्यांचा सांभाळ पालिकेनी करावा व मनुष्य जिवीत हानी वाचवावी. हार्डीकरजी आपल्याला आम्ही भेटलो हातो, आमच्या प्रभागात खरोखरच करंगळी एवढी धार आहे. आपले अधिकारी काय करतात की आम्ही रेडींग घ्यायला गेलो २ हजार ली. पाणी पडते पण आमच एकच म्हणण आहे की पाणी चार आणि पाच तास देण्यापेक्षा दिड किंवा दोन तास दया परंतु ते प्रेशरनी दया. आतापर्यंत आपण म्हणतो की एकजूटीने ईथे रहाव. पाण्याच्या विषयी जे एक दोन मजली कुटूंब राहातात त्यांच्या घरी सुध्दा भांडण व्हायला लागले आहेत. एक बाई तर माझ्याकडे रडत आली. ती हार्डीकरांना सुध्दा भेटली होती. ती म्हणाली माझी सासू कळशी घेवून पडली. खरच गांभीर्याने विचार करावा. तुम्ही जेव्हा विषय मांडाल तेव्हा सुध्दा आम्ही शांत राहू. हा आपल्या शहराचा विषय आहे फक्त माझ्या एकटया प्रभागाचा विषय नाही. परवा मी हार्डीकरांना फोन केला, मा.महापौरांना सुध्दा फोन केला होता. म्हणजे माझ्यासारखी व्यक्ती रडते म्हणजे तुम्ही समजून घ्या की हा किती ज्वलंत प्रश्न आहे. मला रडायला आल मी अनुपला, माझ्या मुलाला म्हणले की तू उगच मला चुकीने इथे बसवलं. जर मी सत्तेत नसतेतर मी विरोधक म्हणून मोर्चा आणला असता. मला रडायला आलं मी म्हणाले अनुप माझा आजची आज हा राजिनामा घे. मला हे अस जमणार नाही. मी सत्तेत आहे म्हणून मी फक्त भेटू शकते, विनंती करु शकते. अधिका-यांना सुध्दा मी विनंती करते पण अधिकारी वर्ग

वेळोवेळी टोलवाटोलवीचे उत्तर देतात. लोक रडून राहीलेत आमच्याकडे. सकाळी पाच वाजल्यापासून फोन येतात. मी हार्डीकरांना म्हणल आम्हांला जगण मुश्किल झालं. पण आम्ही सत्तेत असल्यामुळे आमच सॅण्डविच झाल आहे. सत्तेत राहून मी बोलू शकत नाही. पण ही पुर्णपणे प्रशासनाची चुक आहे. हार्डीकरजी तुम्हांला विश्वास वाटत नसेल मी परवा तुम्हांला म्हणले की काही गोष्टी मी तुम्हांला फोन वर बोलणार आहे. मी तेव्हा बोलले नाही आता बोलते की तुमचे अधिकारी खरोखरच सुजाता ताईनी म्हणल्याप्रमाणे तुम्हांला फसवत आहेत आणि आम्हांला सुध्दा फसवत आहेत. आम्ही विचारलतर म्हणतात नाही, माझ्याकडे रिडींग आहे. करंगळी एवढी धार असते एवढच मला म्हणायच आहे. माझ्या बोलण्यानी कुणाचे मन दुखावली गेली असतीलतर क्षमा असावी पण खरच याविषयी निर्णय घ्या. नाहीतर मी खरंच सांगते सत्तेत असून सुध्दा विरोधक म्हणून मोर्चा काढणार आहे. आता मी चाळीस लोक आणले हार्डीकरजी चाळीस नाहीतर चार हजार लोक माझे प्रतिनिधी म्हणून येतील आणि तेथील जे अधिकारी आहेत त्यांना मी घरातून निघण मुश्किल करुन देईल एवढ मी सांगते आणि विनंती करते.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २४X७ ची योजना २०१६ पासून अंमलात आली. ख-या अर्थाने ती योजना पाण्यामध्ये गेलेली आहे. सांगायच तात्पर्य म्हणजे गेल्या महीनामध्ये आपल्याकडे १६८ तासामध्ये चांगल्या प्रकरचा पाऊस झाला. आपण निर्णय घेतला की दिवसातून एक दिवसा आड पाणीपुरवठा होता तो रेग्यूलर करण्यात यावा. कारण की धरणामध्ये पाण्याचा मुबलक साठा झालेला आहे. ते ओव्हरफ्लो झाल्यामुळे त्याच्यातून पाणी सुध्दा सोडण्यात येत आहे. त्यामुळे आपण जो निर्णय घेतला त्याबद्दल आयुक्तांच, महापौरांच स्वागत करण्यात येत आहे. पण पुढे आठ दिवसातच त्याची अंमलबजावणी होती ना होती तोच पुढे आपण त्याबाबत एक चुकीचा निर्णय घेत आहोत की त्यामध्ये हास्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद करण्याच काम आपण करत आहोत. पुढे बारा महीने जायचे आहेत. आज ही चार महीने पाऊस चांगल्या पध्दतीने होत असून प्रशासनाचा विस्कळीत पणा, ढिसाळ कारभार पाहीला मिळत आहे. आपण रेग्यूलर पाणी दिलतर पाईपलाईनमध्ये पाणी जास्ती प्रमाणात लागू शकतं. जर एक दिवसाआड दिलतर पाण्याचा सोर्स त्यामध्ये वाढत नाही. माझ्या परिसरामध्ये औदयोगीक नगरी आहे गुरुवारी पाणी बंदचा दिवस ठेवला आहे. शितलबाग, गव्हाणे वस्ती हा उंचवटा आहे. त्याठिकाणी सर्व सोसायटया आहेत त्याठिकाणच्या पाण्याची टाकीची लाईट गेलीतर त्यांना गुरुवारच्या दिवशी

पाणी मिळतच नाही. तरी त्याबाबत आपण काही निर्णय घेतलेला आहे का. त्याठिकाणी आपण नगरसेवकांशी काही चर्चा केलेली आहे का. गुरुवारी लाईट जर गेलीतर नागरीकांची आपण काय सोय करु शकतो. तुमच्याकड पाणी आल नाहीतर तुम्ही कारण सांगता की जनसेट बंद झाला, जनसेटमध्ये डिझेल नाही. अशी उडवाउडवीची उत्तर आपल्या प्रशासनाचे अधिकारी देत असतात. पण नागरीकांचा हा विस्कळीतपणा कधी दुर करणार आहोत. अधिकारी वर्ग गेली दहा दहा, वीस वीस वर्षे तेथे काम करतात पण त्यांना आजपर्यंत त्याठिकाणी रेग्युलर पाण्याची सोय करता आली नाही. जी २४X७ ची योजना आलेली आहे आज गेली साडेतीन वर्षामध्ये माझ्या प्रभागामध्ये अवघ दहा टक्के काम झालेल आहे. नागपूर शहरामध्ये जी योजना शंभर टक्के सक्सेस झालेली आहे. आज आपण दिरंगाई का करत आहोत साडेतीन वर्षामध्ये ही २४X७ ची योजनामध्ये प्रशासन का सक्षमपणे काम करत नाही. नागरीकांना वेठीस धरण्याच काम करत आहोत. कारण की लाईट आणि पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असून नागरीकांना त्याचा उपयोग चांगल्या पध्दतीने व्हायला पाहीजे. आपण जर बील भरली नाहीतर त्वरीत आपण कनेक्शन कट करण्यासाठी लोक पाठवतो. जी लापर्वाही आज प्रशासनाकडून होत आहे त्याच्या बाबत मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपण याठिकाणी निर्णय घ्यावा की सुरळीत पाणीपुरवठा जेणेकरुन लोकांना दोनच तास पाणी दया पण ते प्रेशरने असाव आणि रेग्युलराईज पाणी असाव एवढीच माझी विनंती आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, आज श्रावणमासामध्ये सर्वाना उपवास असतात त्यातून हा मोकाट कुत्र्यांचा सुळसूळाट भोसरीमध्येच नाहीतर संपुर्ण शहरामध्ये आहे हे आताच आमच्या माजी उपमहापौर मोरे ताईनी सांगीतल आहे. त्याचप्रमाणे मोकाट जनावराबाबत सुध्दा आपण काय प्रतिबंध करणार आहोत. त्याबाबत मा.आयुक्त साहेबांनी निर्णय घ्यायला पाहीजे. कारण की मोकाट कुत्रे आणि मोकाट जनावरांचा आपण पुर्वी कोंडवाडा करत होतो. ते आज याठिकाणी पहायला मिळत नाही. मोकाट जनावर एवढया मोठया प्रमाणात झालेली आहेत की पावसामुळ शेण पडलेल असतं व त्या माध्यमातून गाडयांचे अपघात होतात. त्यास प्रशासनाला जबाबदार धरल पाहीजे. तरी याचा आपण त्वरीत निर्णय लावावा, धन्यवाद.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपला एक दिवसा आड पाणीपुरवठा होता ते लोकांना मान्य असताना आपण रेग्यूलर पाणी केलं. ठिक आहे आम्हांला पण मान्य आहे परंतु लोकांना तीन तीन दिवस जर पाणी पिण्यासाठी मिळत नसेलतर त्या लोकांनी काय करायचं. २४X७ काम करणारा कोण ठेकेदार असेल, जुने

लोखंडी पाईप आहेत ते काढायचे आणि विकायचे त्याच्यासाठी त्यांनी ते काम चालू केलेलं आहे. तुम्ही २४X७ च जे काम करता त्यामुळे लोकांचे कनेक्शन तुटलेले आहेत त्यांचे कनेक्शन्स नीट करुन दयायचतर लांबच पण जे पाणी आता होतं ते पाणी पण बंद आणि आपल्या अधिका-यांना फोन करुन विचारणा केलीतर आपले अधिकारी म्हणतात की आता रात्रभर आम्ही पाण्यातच काम करतो, आता आम्ही घरी आलो, ताई येईल पाणी आज. आयुक्त साहेब माणसाच्या ज्या मुलभूत गरजा आहेत त्या जर आपण पुर्ण करु शकत नसूतर तुमच्या या अधिका-यांना काय करायचं. सगळया नगरसेवकांच्या वॉर्डातली तीच परिस्थिती आहे. पाऊस एवढा झाला, धरण वाहून चाललीत. एवढे सगळे व्यवस्थित असताना आपण पाणी का देवू  शकत नाहीत. ज्यावेळेस आपल दिवसाआड पाणी होत त्यावेळेस आपण देवू शकत होतो. आता रेग्युलर पाणी झाल, ज्या लोकांना टाक्या आहेत त्या लोकांच मान्य आहे परंतु ज्यांना पाईपात पाणी आहे त्यांनी काय करायचं, चार-चार, पाच-पाच दिवस जर पाणी येत नसेलतर. कालपर्यंत ठिक होतं तुम्ही म्हणाले आज पासून होईल. आज ठिक आहे पण काही भागामध्ये आजपासून पाणी नाही. काही लोकांना माहित नाही की आजपासून पाणी येणार नाही ते. आपण जे टँकर देतो त्या टँकरची आपल्याला तशी सुविधाच नाही, तुमची लोक सांगतात की आपण टँकर देतच नाहीत. मग हे बाकीचे टेंडर वगैरे तुम्ही करता त्यापेक्षा लोकांना पाण्याच एखाद टेंडर केलतर लोकांना कमीत कमी पाणीतरी प्यायला मिळेल. तुमचे वॉलमेन जे आहेत ते सगळी नात्यागोत्यातच आहेत का हो. आता ताई म्हणल्या पाणी सोडायला पण तोच माणूस, कच-याच्या गाडीवर पण तोच माणूस, सिक्युरीटी पण तोच हे असं सगळ चालत त्याच्याकड कोणी लक्ष देत नाहीत. साहेब तुम्ही म्हणाला होतात आजपासून पाण्याचा प्रश्न सुरळीत होईल. आज सुरळीत होणार नाही तुम्हांला तुमचे अधिकारी सगळे फसवतात. तुम्हांला एक उत्तर देतात आम्हांला एक उत्तर देतात. जे.ई.च वेगळ उत्तर, पाणी सोडणाराच वेगळ उत्तर. नक्की कोणाच काय साटलोट आहे ते आम्हांलातरी नाही कळलं. आयुक्त साहेब तुम्ही माहिती घेवून आम्हांला सगळयांना समाधान कारक पिण्यापुरत तरी पाणी दया. आम्ही तुमच्याकड दुसरी कुठली मागणी करत नाहीत. आज पाण्यावर सगळे बोलणार आहेत. तांबे साहेबांनी माहिती दयावी की तुम्ही अशी शहराची अवस्था का केली, कच-यासारखी पाण्याची अवस्था केली. तांबे साहेबांना काम जमत नसेलतर त्यांचा चार्ज दुस-या कुणाला पण दयावा. त्यांची चौकशी करावी का पाण्याचा प्रॉब्लेम आहे ते का सॉल्व्ह करु शकत नाहीत, खोटी उत्तर का देतात, खोट का ते बोलतात.

कॉन्ट्रॅक्टरच आणि त्यांच काही साटलोट असेलतर मला माहित नाही. माणूस ज्यावेळेस पुर्ण असा तळतळीने बोलतो त्यावेळेस त्या माणसाला त्रास होतो. तुम्हांला आम्ही जर बोललोतर तुम्हांला वाईट वाटत पण आम्हांला आमच्याकडे किती लोक येवून रोज काय बोलतात ते आमची आम्हांला माहिती आहे ते आम्ही तुम्हांला नाही सांगू शकत. परंतु आम्ही एवढया तळतळीन बोलतो त्याच्या मागच कारण सुध्दा तसच असणार. तुम्हांला हे चुकीचे उत्तर देतात आणि या चुकीच्या उत्तरांमुळ तुम्ही या अधिका-यांवर काहीतरी कारवाई करा.

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरोखरच पाण्याचा प्रश्न ज्वलंत प्रश्न आहे. आता जे सुजाताताईनी सांगीतल ते खरच आहे की आयुक्तांना अधिकारी फसवेगीरीच करत आहेत. माझ्याकडे दोन पाण्याच्या टाईमींग आहेत एक पाच ते आठ आणि नंतर आठ ते दहा. माझ्या प्रभागामध्ये नौकरदार महीला वर्ग खुप आहे आणि त्यांना कधी कधी सात वाजता सुध्दा जायला लागतं. त्यामुळ आठ वाजता पाणी आल्यावर ते कधी भरणार. सकाळी सात ते दहा पर्यंत पाणी दिलंतर बरे होईल. संध्याकाळी सुध्दा आकरा वाजता पाणी येतं त्यावेळेस लोकांची झोपायची वेळ असते. प्राधिकरणामध्ये ज्येष्ठ नागरीक खुप आहेत आणि तेथे पाण्याचा प्रश्न खुप ज्वलंत आहे. पाणी भरण्यासाठी लोकांना रात्री आकरा बारा वाजेपर्यंत जागाव लागतं. तरी दोन प्रकारे पाणी देण्यापेक्षा एकाच्यामध्येच करा से.नं. २४ येथे शाळा आहे तेथे सकाळी पाच ते आठ पर्यंत पाणी येतं आणि शाळा दहा वाजता उघडली जाते. त्यामुळ त्या लोकांना पाणी मिळत नाही. टँकर मागीतलतर टँकर सुध्दा लवकर मिळत नाही. तीन-तीन, चार-चार तास टँकर मिळत नाही एवढ बोलून माझे दोन शब्द संपविते.

**मिनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्व नगरसेवक येथे खुप कष्ट करुन, खुप मेहनत करुन, जीवच रान करुन येथे आलेले आहेत. या सभागृहात बसणं सोप नाही त्याच्यामुळे प्रत्यकानी आपल्या जबाबदारीच भान ठेवल पाहीजे. कुठलीही महीला आपल म्हणण मांडते त्यावेळेस तुमच कर्तव्य आहे की ते शांत पणे ऐकल पाहीजे. आपण जर दुस-याच ऐकू शकत नाहीतर सभागृहातल कामही चांगल्या प्रकारे करु शकत नाही त्याच्यामुळे माझी सगळयांना विनंती आहे की कुठलीही महीला बोलताना शांतपणे तीच म्हणण ऐकूण घेतल पाहीजे. त्याचबरोबर मा.महापौर साहेब, आपण जेव्हा स्मार्ट सिटीकडे वाटचाल करतो आणि पुरस्थिती असतांनाही पिंपरी चिंचवड्यर आठवडयातून एक दिवस पाणी बंद करणे अशी वेळ येते. हे सगळयाच उत्तर आहे ते म्हणजे अधिकारी वर्गाची नामुष्की

आहे. त्यांना कुठलही काम जमत नाही. आयुक्त साहेब आम्ही नवीन नगरसेवक आहोत आम्हांला काहीच कळत नाही. तुमच्या इतपत तर ज्ञान आम्हांला बिलकूल नाही. तुम्ही आयएएस झालेला आहात. पहील्यांदा एक दिवस पाणीपुरवठा बंद करतो किंवा या आदि पाणीपुरवठाच होत नव्हता का असे प्रश्न उदभवलेले आहेत त्याच्यामुळे खरच खुप विचीत्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. एवढ तीकड धरण भरलेलं असताना अधिका-यांना जर आम्ही विचारल आज पाणी का येत नाही तर अधिकारी वर्ग सकाळी पाच वाजता मॅसेज टाकतो की दररोज वेगवेगळे कारण देतात. मॅसेज टाकून सगळे अधिकारी वर्ग फोन बंद करतात. लडकत साहेबांना मी स्वतः भरपूर वेळा फोन केला. परवा त्यांनी चार दिवसातून एकदा फोन उचलला. त्यांनाही माहिती नव्हत की आमच्या प्रभागात आठ पंधरा दिवस इतक्या अडचणी होत्या, ते म्हणाले की विचारुन सांगतो. ज्येष्ठ अधिका-याकडून जर अशी उत्तर मिळत असतीलतर आम्ही सर्वसामान्याना काय उत्तर दयायची. लोक आम्हांला विचारतात की का ताई पाणी येत नाही. एकवेळेस कारण ठिक आहे दोन वेळेस कारण ठिक आहे दररोज हे अधिकारी वर्ग नवीन कारण देतांत. म्हणजे आयुक्त साहेब तुम्हांला हे चुकीची माहिती देतात का. या अधिका-यांची तुम्ही एक मिटींग घ्या. खरंच ते तुम्हांला बरोबर माहिती देतात का नाही कारण त्यांच्यामुळे तुमच नाव खराब होत आहे आणि स्मार्ट सिटीकडे वाटचाल करताना आपल्या पिंपरी चिंचवडच नाव खराब होतं. कच-याचाही प्रश्न तसाच आहे, कच-यासाठी आपण आता प्रत्येक घरास ६० रुपये चार्जेस करतो. एवढा प्रॉपर्टी टॅक्स आहे मग कुठल्या हाक्काने तुम्ही साठ रुपये मागता. या गोष्टींचा अधिकारी वर्गाला आणि आयुक्तं साहेबांना गांभीर्याने विचार करायला लागेल. आम्ही एकीकडे चांगल्या गोष्टींचा जेव्हा सपोर्ट करतो तेव्हा खरच आम्हांला नामुष्की येते की प्रभागामध्ये उत्तर काय दयायची. सकाळी आमचा पाणीपुरवठा दोन भागामध्ये होतो, सकाळी सहाचे टाईमींग असतं ते बारा वाजता पाणी सोडतात. आणि अधिकारी वर्ग दर आर्धा तासाला सांगतात आता पाणी येईल नऊला पाणी येईल, दहाला पाणी येईल असे बारा एक पर्यंत सगळयांना खेळवतात, टाईमपास करतात. आम्हांला काही कामधंदे नाहीत का की त्यांना फोन करुन विचारायचं. एकदा मॅसेज टाकला की फोन बंद करुन ठेवणार नंतर पाणी बाराला येऊ की एकला येऊ त्यांचा काही संबंध नाही. ही कुठली पध्दत आहे आम्ही जर टॅंकर मागीतलेतर मग हे टॅंकर लॉबीसाठी सगळ चालले आहे का असेही प्रश्न उदभवले जातात. त्याच्यामुळे आयुक्त साहेब तुम्ही खरच आता गांभीर्याने घ्या. आम्ही आताच आडीच ते तीन वर्ष झाले नगरसेवक झालो आहोत

त्यात फक्त सहाच महीने आम्हांला पाण्याचा प्रश्न आला नसेल. नाहीतर पाण्याचा प्रश्न आडीच वर्षे येतो. पिंपरी चिंचवड शहर ग्रामपंचायतीचा भाग आहे की काय असं वाटायला लागल आहे. याच्यामुळ मी खरंच नंम्र विनंती करते जेव्हा आम्ही मोर्चा आणतो तेव्हा तुम्ही आमच्यावर गुन्हे दाखल करता. म्हणजे आम्ही गप्प बसून सगळयांची बोलणी खायची का याच्यासाठी आम्हांला नागरीकांनी निवडून दिले आहे का. आयुक्त साहेबांना कडून कुठल्याही गोष्टीचा आम्हांला रिप्लाय मिळत नाही. परत महीला मोर्चा घेवून रस्त्यावर उतरल्यातर त्याला जबाबदार पण तुम्हीच आसणार.

**मा.प्रविण भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर पाणीप्रश्न हा गंभीर प्रश्न आहे. कारण सकाळी उठल्यानंतर पाण्यानीच सुरवात होत असते, पिंपरी चिंचवड शहरातच हा पाणी प्रश्न आहे. माझ्या प्रभागामध्ये सकाळपासून तीन टाईम पाणीपुरवठा होतो. आमच्या प्रभागामध्ये सर्व कामगार वर्ग राहतो, महिला कामगार कामाला जातात, पुरुष कामगारही कामाला जातात. महिलांना कार्यक्रम असतो तो शाळेतील मुल आणायचा. आपल्याला पाण्याचा टाईमींग ठरवून दिलेला आहे त्या टाईमींगपेक्षा तीन तीन तास पाणी लेट येतं. त्याच्यामुळ लोकांना पाण्यासाठी दांडी मारुन थांबाव लागत. पाण्याचा गंभीर प्रश्न आहे की रोज महिलांचे आम्हांला दोनशे फोन येतात. मध्यंतरी माझा पाण्यामुळ ब्लडप्रेशर वाढला होता. रोज फोन येतात सकाळ पासून त्यांना उत्तर दयाव लागत. आम्हांला तुम्ही एक कॅसेट तयार करुन दया. तीच कॅसेट लोकांना ऐकवीत जाऊ. आपण आता 24X7 ची योजना चालू केलेली आहे. 24X7 च जे काम केलेलं आहेना ते सुध्दा पाण्यात गेलेलं आहे. मा.महापौर साहेब, हा गंभीर प्रश्न आहे कारण की रोजच आमच्याकडे महीलांचे ग्रूपची ग्रूप येतात मीतर ऑफिसवर सुध्दा जात नाही कारण रोज काय सांगव. त्याच्यामुळे हा पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा. कारण आम्ही पुर्ण एकदम रेडझोनमध्ये आहेत. कारण पहील्यापासून आमचा शास्तीकराचा सुध्दा विषय आहे. शास्तीकर विषयावर सुध्दा मी बोलतो. आम्ही आयुक्त साहेबांना भेटलो होतो ते म्हणाले तुमची शास्ती वगैरे काही कमी होणार नाही. परंतु माझी एक ईच्छा आहे की आमच्या रेडझोन भागातील जो काही रेग्युलर टॅक्स आहे त्याच्यासाठी आपण एक ठराव करावा. जो काही रेग्यूलर टॅक्स आहे तो आम्ही भरु अशी मी आपणाला मागणी करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल मनापासून आभार मानतो आणि थांबतो.

**मा.संतोष कोकणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वच नगरसेवकांनी पाण्याचा पाढा वाचून दाखवला आहे, माझी दुसरी काही अपेक्षा नाही, तीच अपेक्षा आहे. काळेवाडी परिसरामध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा होत होता त्यावेळेस पाणी प्रेशरनी येत होतं. आता पाण्याची परिस्थिती एवढी गंभीर आहे की मा.महापौर साहेब, मी तुम्हांला फोटो दाखवतो एक चिमुरडी मुलगी ग्लासाने पाणी हांडयामध्ये भरते. दिवसभर ते कुटूंब पाण्यावरच असते. रात्री दिडला पाणी सोडल जातं आख्खी काळेवाडी जागे असते. रात्री दिडला पाणी सोडल्यानंतर लोकांनी झोपायच कधी आणि कामावर जायच कधी. कस करणार तुम्ही आम्हांला सांगा. आयुक्त साहेबांची आम्ही सर्वानी काल भेट घेतली. मा.महापौर साहेब, तुम्ही सर्व वॉर्डामधील परिस्थिती बघावी. पाण्यासाठी लोकांना खुप झगडाव लागतं. जर ही परिस्थिती दोन चार दिवसामध्ये सुधारली नाहीतर काळेवाडीकरांच्या वतीने महापालिकेवरती हांडा मोर्चा नेण्यात येईल याची आयुक्त साहेब आपण दखल घ्यावी आणि पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मी विनंती करतो, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मा.महापौर साहेब, आपल आभार.

**मा.स्वाती उर्फ (माई) काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझा प्रभाग क्रमांक ३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी गेले आडीच वर्षे झाले मला पाण्याच्या बाबतीत त्रास होतो. माझा स्लम ऐरीया आहे ७० टक्के झोपडपट्टी माझ्या वॉर्डात आहे. गेले आडीच वर्षे त्रास होतो आणि या पंधरा दिवसाततर खुपच त्रास व्हायला लागला आहे. सोसायटीची लोक परवा दिवशी आयुक्त साहेब तुमच्याकडे घेवून आली होती. काल परत आमचे सगळे नगरसेवक तुम्हांला भेटायला आले होते. आठ दिवस झाले सोसायटीची कधी आडचण नव्हती पण पंधरा दिवस झाले सोसायटीच्या लोकांच्या आंघोळी सुध्दा होत नाहीत. त्यांना टॉयलेटला सुध्दा पाणी नाही, पुरुष मंडळी बाहेर जाऊ शकतात पण लेडीज कुठे जाणार, लहान मुल कुठ जाणार. इतकी बिकट परिस्थिती झालेली आहे, दापोडी एकतर शेवटच टोक आहे. रात्रीच्या बारा साडे बारा वाजता महीला माझ्याकडे मोर्चा घेवून येतात. सकाळी उठल्यापासून रात्रीच्या साडेआकरा बारा वाजेपर्यंत त्यांचे फोन असतात. त्यांना आम्ही काय उत्तर दयायचं. वरुण पाणी कमी का येते म्हणतात का कमी येते. कधी गुरव पिंपळे वरुन पाणी कमी येते, कधी पिंपळे सौदागरमधुन पाणी कमी येते. पाणी वेळेवर येत नाही, सहाच पाणी नऊला येते नऊच पाणी बारा- एक वाजता येते. माझ्या वॉर्डातील लोक दिवसभर कामाला जातात. पाण्याच टाईमींग साडे नऊ, साडेआकरा, साडेबारा हा कुठला

टाईमींग आहे. कधी साडेबाराला येते कधी दिडला येते कधी दोनला येते. ती पण वरुन पाणी आलतर ते वेळेवर सोडल जातं. वेळेवर पाणी येत नाही आणि इतक कमी पाणी येतं जिथ पाणी येत तीथ ते प्रेशर खुप कमी असतो. महीलांच्या बाबतीत इतक्या शिव्या खाव्या लागतात. सारखा पाण्याचाच विषय असतो अक्षरशः झोपडपट्टीतील लोक आंगावर येतात. अधिकारी तर तीथ फिरु शकत नाही. मी फोन करुन आयुक्त साहेबांना पण सांगते की पाण्याचा कसा प्रॉब्लेम चाललेला आहे. ज्येष्ठ नागरीकांना मी काय उत्तर देणार. सोसायटीच्या लोकांना काय उत्तर देणार. या पंधरा दिवसात खुप त्रास व्हायला लागलेला आहे. झोपडपट्टी ऐरीयामध्ये इतके कनेक्शन्स आहेत त्याकडे तुम्ही का लक्ष देत नाहीत. आरपार कनेक्शन मारलेले आहेत, प्रत्येकवेळेस तुम्ही सांगता आम्ही झोपडपट्टीत जाणार नाहीत, का जाणार नाहीत. झोपडपट्टीतल्या लोकांना आम्हीच तोंड दयायची का. तीथल्या महीला प्रत्येक वेळेस मोर्चा घेवून येतात. मागच्यावेळेस आमच्या वरती गुन्हा दाखल झाला. दोनवेळा आम्ही आंदोलन केल, आमच्यावर गुन्हा दाखल करुन काय केलं. आम्ही त्याला तोंड देतो, अधिका-यांवर का नाही केला. आम्ही आंदोलन केल काही चुकीच करतो का. लोकांसाठी आंदोलन केलं. लोकांचा मोठा प्रश्न असल्यामुळे आम्ही आंदोलन केलेलं आहे. तरी परत आम्हांला रस्त्यावर उतरायची वेळ आणू देवू नका. नाहीतर परत परत आंदोलन केल जाईल याची लवकरात लवकर मा.महपौर साहेब, मा.आयुक्त साहेब तुम्ही दखल घ्यावी, ही विनंती.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाणीपुरवठा हा महीलांचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. त्याच्यासाठी आपण आपल्या स्तरावर काहीतरी निर्देश दयावेत. अधिका-यांना कितीही फोन केलेतरी ते उचलत नाहीत. उचललेतर सांगतात मॅडम बघतो आणि तुम्हांला सांगातो. पाणी सोडायच आणि बंद करायच हे शेडयुल कोणी ठरवलय. अधिका-यांनी ठरवलय का. त्यांना विचारलतर सांगतात की पाणी चोरी, पाणी गळती ही कारण आता नको. तुम्ही आता कारणं बदलाना. त्याच्यावरती तुम्ही काहीतरी अभ्यास करा. आपल्या स्तरावर आपण अधिका-यानां निर्देश दयावेत. पाणी प्रेशरने आणि वेळेवर सोडाव आणि पाणी कपात सांगीतलेली रद्द करावी आणि नागरीकांना दिलासा दयावा, धन्यवाद.

**मा.निता पाडाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्तांना मी परवाच्या दिवशी फोन केला होता की काळेवाडीचा गेल्या आडीच वर्षापासून प्रॉब्लेम आहे. काळेवाडीत एका भागात ठिक पाणी आलेल असेलतर दुस-या भागात पाणी आलेल नसतं. मी पक्षनेत्यांकड गेले होते, महापौर साहेब, तुमच्याकडे सुध्दा मी सांगीतल पण काही उपयोग

झालेला नाही. आयुक्त साहेब सांगतात काळेवाडी सखल भाग आहे त्याच्यामुळे एवढा काही पाण्याचा प्रॉब्लेम नाही. आयुक्त साहेब, तुम्ही सांगतात काळेवाडीत अनधिकृत नळकनेक्शन आहेत, अनधिकृत बांधकाम आहेत हीच उत्तर प्रत्येक वेळेस काळेवाडीकरांना आलेली आहेत. असं का बाकीच्या वॉर्डात अनधिकृत बांधकाम नाहीत का, अनधिकृत नळकनेक्शन नाहीत का. सगळया वॉर्डामध्ये तेच चाललेल आहे. तुम्ही मागेतर डायरेक्ट म्हणाले की काळेवाडीतून मला उत्पन्न मिळत नाही म्हणून मी काळेवाडीला निधी देवू शकत नाही. आयएएस अधिका-यांनी हे बोलणं पुर्णपणे चुकीच होतं. त्यावेळेस माझ्या बरोबर नगरसेवक सुध्दा होते. ममता गायकवाड स्टॅण्डीकच्या माजी चेअरमन त्यांचे पती सुध्दा होते. हे उत्तर तुमच्याकडून अपेक्षीत नव्हत आयुक्त साहेब. तेव्हा पासून मला बोलण्याची संधी दया म्हणून मी प्रत्येक जीबीला हात वर करते परंतु एकदाही बोलण्याची संधी दिली नाही. का अशी उत्तर आमच्या काळेवाडीकरांच्या अधिपत्याला येतात. तुम्ही हे बोलण पुर्णपणे चुकीच होतं. चिखली असेल असा कोणताही वॉर्ड घ्या त्या वॉर्डात दोनशे-तीनशे कोटीची काम चाललेली आहेत. खरच त्या वॉर्डातून तुम्हांला तेवढ उत्पन्न मिळतं का. या गोष्टीवर मी तुमचा आणि प्रशासनाचा निषेध करते. प्रत्येकवेळेस काळेवाडीला वाळीत टाकलय. कोणती काम तुम्ही काळेवाडीत केलेत. शेजारचा प्रत्येक वॉर्ड बघा, तुम्ही रहाटणी घ्या, थेरगाव घ्या, पिंपरी घ्या प्रत्येक वॉर्डमध्ये तुम्ही किती बजेट देता आणि काळेवाडीला किती देता हे आम्हांला दाखवून दया. पाण्याच्या प्रश्नासाठी आतापर्यंत मी तुमच्याकडे शंभर वेळा आले असेल पण कधीच काळेवाडीच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. आजजर ज्योतीबा नगरला व्यवस्थित पाणी असेलतर आदर्शनगरला पाणी एकदम कमी, आदर्शनगरला व्यवस्थीत आलतर विजयनगरला पाणी नाही, म्हणजे हा काय खेळ आहे. आता पंधरा दिवसापासून तुम्ही दोन तासच पाणी दयायच ठरवलयं. परंतु पाणी लोकांना पाऊण तास ते एक तासच मिळतय. आता चार वाजता पाणी सुटलना तर पाऊणेपाचला आदर्शनगरला पाणी येतं आणि पाऊणेसहाला ते पाणी बंद होतं, ते पण एकदम लो प्रेशरन पाणी येतं. तुमच्या जे.ई.ला विचारलतर हो ताई, बघतो ताई अस उत्तर असतात. तुमच्या अधिका-यांना आमच्या बरोबर वॉर्डामध्ये फिरण्याची लाज वाटते की काय ते पण कळत नाही. आम्ही पाहीलय, आम्ही चेक केलय हे तुमच्या अधिका-यांची उत्तर आहेत. तांबे साहेबांना तर कधीही फोन केलातर मी पाहून सांगतो, पाहून करतो असे उत्तर असतात. परत त्यांचा फोनच येत नाही की ताई तुमची ही समस्या सॉल्व्ह झाली म्हणून. आमच्या वॉर्डातून टॅक्स दहा कोटीच्या वरती असेल तुम्ही चेक करा. आम्ही म्हणत नाहीत

की आमच्या वॉर्डाला शंभर कोटी दया किंवा दोनशे कोटी दया. पाणीपुरवठा ही मुलभूत गरज आहे. ती सूध्दा तुमच्याकडून पुर्ण केली जात नाही. आज वॉर्ड पाहीलातर सगळा खड्डेमय वॉर्ड आहे. पेव्हींग ब्लॉकच काम जर सांगीतलना अधिका-यांना तर हो मॅडम ऑगष्टच्या पहील्या आठवडयात वर्कऑर्डर होणार मग काम होणार. पेव्हींग ब्लॉकची काम सुध्दा आमच्या वॉर्डामध्ये होत नाहीत. मी तुमच्याकडे पेव्हींग ब्लॉकच्या कामासाठी आली होती त्याच्यानंतर किती काम पेव्हींग ब्लॉक रिपेअरींगची केली ते तुम्ही विचारा. एकही काम केलेल नाही. आम्ही काही रोज चारही नगरसेवकांनी लोकांच्या शिव्या खायच्या का. आयुक्त साहेब तुम्ही याचा विचार केला पाहीजे. अमृतचा ठेकेदार आहे त्यांनी फक्त आठ महीन्यापासून लाईन टाकत गेला. त्याच काम होत का नाही की लाईन टाकल्यानंतर त्वरीत कनेक्शन्स करायचे. माझ्या वॉर्डात भारत कॉलनी आहे तेथे अक्षरश: गंभीर परिस्थिती आहे गेल्या नऊ महीन्यापासून. लाईन टाकली परंतु कनेक्शन दयायला तो अमृतवाला म्हणतो पाणीच नाहीतर कनेक्शन देवू कसं, ही उत्तर अमृतवाल्यांची आहेत. मी प्रत्येकवेळेस जे.ई.ला तेथे घेवून जाते बघा पाणी दया पण काही सुध्दा नाही साहेब. ब्ल्यू लाईनमधल्या आमच्या आडीचशे ती तीनशे फाईल आलेल्या आहेत. मी एक वर्षे त्या फाईलचा फॉलोअप तांबे साहेबांकड केला. ते म्हणाले मॅडम आपल्याला विषय कराव लागेल, पालीकेच धोरण ठरवाव लागेल, शेवटी तुमच्याकड आल्याच्यानंतर त्यांच्याकड फॉलोअप केल्यावर त्यांनी तीन महीन्यानी तुमच्याकड तो विषय ठेवला. मला वाटत एक ते दोन महीन्यापुर्वी तुमची सही झाली. परंतु अजूनही त्या लोकांचे कनेक्शन केलेले नाहीत. का तर आपल्या नागरीकांच्या फाईल फक्त शंभर ते दोनशे रुपयासाठी आडवायच्या का. हे आपल प्रशासन आहे का, काहीतरी चिरीमीरी त्यांना दिलीच गेली पाहीजे त्या शिवाय आपल्या फाईलवर कोणतीच सहीच होत नाही. आयुक्त साहेब, कनेक्शन एखादया क्वालनीच केलं आणि दोन तीन फाईल असतीलतर चार चार वेळा मला फोन करावा लागतो. पटकन फाईलवरती सहया करा आणि कनेक्शन मंजूर करानां. एकदा त्या क्वालीनीतून कनेक्शन्स होवून गेलतर परत अमृतवाले लोकं तिथे कनेक्शन करायला येत नाहीत. फोन करायला पाहीजे का नाही पाहीजे परंतु आपल्या प्रशासनाची मानसीकताच नाही की फटाफट काम करुन मोकळ करायचे. टॅक्सची नोंद करायला जरी माणुस थेरगावच्या ऑफिसला आलानां अक्षरश: तीन लोकांच्या फाईल होत्या टॅक्सच्या नोंद करण्यासाठीच्या, मी साहेबांकडे गेले डायरेक्ट त्या माणसाकडे चार चार रुपयाची मागणी केली. मी साहेबांना भेटले साहेबांसमोर लोक उभी केली. दुस-याच दिवशी

त्या अधिका-याची बदली करुन टाकली. मी साहेबांना म्हणाले या माणसाला मी पकडून देईल तर दुस-या दिवशी लगेच बदली करुन टाकली. का आपल्या पालीकेत फक्त पैसे घेवूनच काम करायच असं ठरवलं आहे का प्रशासनाने. हे कुठतरी थांबल पाहीजे, आज पाण्याचा विषय गंभीर आहे. डिसेंबर २०१७ ला काळेवाडीतील विजयनगरच्या पाण्याच्या टाकीच भूमिपूजन झाल आहे. आडीच वर्षे झाले परत आपण रिटेंडर केल आहे. रिटेंडर करुनही वर्षे झाल आहे. अजूनही पाण्याच्या टाकीच तीथ काम चालू झालेल नाही. मागे मी विचारलतर काय सांगीतल की मॅडम त्या जागेवर आपण पाईप ठेवले होते ते जळाले त्याचा इन्शूरन्स होईपर्यंत ते पाईप तसेच ठेवायला लागणार आहेत आपल्याला आणि त्याच्यानंतर पाण्याच्या टाकीच काम चालू करणार आहोत. विमा कंपनी पाईप किती जळाले आहेत हे पाहण्यासाठी दोन महीन्यानी येते का. कारण तुमचे अधिकारी कसे शोधतात. ॲक्सीडेंट झाल्यानंतर विमा कंपनीचा माणूस किमान आठ दिवसात आपली गाडी पहायला येतो. तसे हे अमृतवाल्याचे पाईप पाहीला पंधरा दिवसाततरी आला असेलनां. इन्शूरन्सचे लोक येतात त्याच्यामुळे ते पाईप हालवता येत नाहीत त्यामुळे आपल्याला पाण्याच्या टाकीच काम करता येत नाही. ही उत्तर आहेत, तांबे साहेबांना विचारा साहेब, मी तर मागे सभागृहात बोलले होते की त्यांचे तांबे आडनाव बदलून गोडबोले आडनाव ठेवा. त्यांच्या केबीनला कोणताही ठेकेदार गेला आणि तेजर एखादया ठेकेदाराच्या फाईलवर सहीजर करत असतीलनातर ती फाईल बाजूला ठेवून ते आपल्याकड गधीच बघणार नाहीत. त्यांच ते काम पुर्ण करुन मग आपल्याला बोलणार. कारण की ठेकेदारांच्या पहील्या फाईली झाल्या पाहीजेतना. नगरसेवक काय देतात त्यांना. नगरसेवक फक्त बोलतात. तांबे साहेबांना तुम्ही ब प्रभाग दिला असेल, ग प्रभाकगात दिलं असेल अजूनही काही भाग असतील मला माहित नाही. विचाराना नगरसेवकांना महिलेच्या मिटींगला तांबे साहेब तुमच्याकडे येतात का. आज आडीच वर्षे झाले आहेत, मी तर म्हणते तांबे साहेब तीनवेळातरी आले का महिलेंच्या मिटींगला. प्रभागाच्या मिटींगला आम्ही जातो आम्हांला काही कामच नसतात म्हणून आम्ही टाईमपास करायला जातोत का एकमेकांशी गप्पा मारायला. आयुक्त साहेब तुम्ही आठवडयातून एक दिवस पाणी बंद केलं. ठिक आहे, तुम्ही म्हणाले की आपल्या वाकड भागात सोसायटया वाढलेल्या आहेत त्यामुळे तीकडे पाणी दयाव लागेल. ठिक आहे दयायला पाहीजेनां. तो नागरीकांचा हाक्क आहे त्यांना पाणी हे मिळालच पाहीजे. त्याबद्दल आमच काहीच म्हणण नाही. तुम्ही सांगीतल एक दिवस पाणी कपात केलीतर वाकड भागात आपण पाणी देवू शकू ते सुध्दा आम्हां सगळया नगरसेवकांना मान्य

आहे एक दिवस पाणीपुरवठा बंद करण्याचा. परंतु आयुक्त साहेब, आज नढेनगर भागात, कोकणेनगर भागात, राजवडेनगर भागात एक थेंब सुध्दा पाणी आलं नाही. सकाळी साबळे साहेब, रोकडे साहेब फिरत होते, पण काही नाही कुठतरी चोकअप झाल असेल, आम्ही पाहतो, करतो असे उत्तर असतात. आज टँकर मागीतला त्यांनी दिला का विचारा. आता सुध्दा मला किती तरी फोन आलेले आहेत की ताई टँकरतरी पाठवानां आम्हांला पिण्यालातरी पाणी दया. परवा पाणी आलेल होत त्याच्यावर काल नाही, आज नाही काय करायच आयुक्त साहेब. प्रत्येक नगरसेवकांकडून लिहून घ्या की काय प्रॉब्लेम आहेत काय नाहीत. फक्त रस्ते खोदत जायच आणि लाईन टाकत जायच्या तो अमृतवाला काही पालिकेचा जावाई करुन ठेवतात की काय ते पण मला कळत नाही. आयुक्त साहेब हे कुठेतरी थांबल पाहीजे. त्याचप्रमाणे आता आपला स्वातंत्र दिन झाला. १५ ऑगष्ट आयुक्त साहेब आम्ही झेंडावंदनला पालिकेच्या शाळेत गेलो होतो परंतु तेथे असं जाणवल की मुलांना अजून सुध्दा रेनकोट वाटले नाहीत असं मला तीथ निदर्शनास आलं. मला इतक वाईट वाटल की आज आम्ही इंग्रजी मेडीयमच्या सुध्दा शाळेत झेंडावंदनला गेलो होतो आयुकत साहेब, आपल्या पालिकेच्या मुलांना अक्षरशाः सॉक्स आणि बुटॅ सुध्दा नव्हते आणि तेच इंग्लीश मेडीअमच्या शाळेमध्ये ज्यावेळेस आम्ही झेंडावंदनला गेलो इतके टिपटॉप टेबल होते म्हणजे शुज, सॉक्स सगळे कपडे वगैरे व्यवस्थित होते. आयुक्त साहेब आपण एवढा पैसा खर्च करतो मग महापालिकेच्या मुलांना का निकृष्ट प्रकारचे साहीत्य दिल जातं. त्या मुलांना पाहील्यानंतर सुध्दा वाटत असेलना की त्यांना सगळ व्यवस्थित आहे. स्वातंञ्य दिनाला सुध्दा सॉक्स असतील, बुट असतील, बॅग असतील बॅगतर इतक्या निकृष्ट दर्जाच्या दिल्यात की काय त्या ठेकेदाराशी कस साठलोट केल तेच काही कळत नाही. शिक्षणाधिका-यांना बोलावून विचारा या कसल्या बॅग आहेत त्या. एकतर माझ्या घराजवळ शाळा आहे परंतु मुल अशी भीजत यायची मी मुलांना विचारल आरे रेनकोट नाही मिळाले का, तर ते म्हणायचे नाही मिळाले, बाई म्हणतात की तीकडन रेनकोट आल्यावर देऊ. तरी ही व्यवस्था आपण लवकरात लवकर करावी हीच माझी विनंती आहे आणि काळेवाडीचा पाण्याचा प्रश्न हा आडीच वर्षापासून आहे तो येत्या पंधरा दिवसाततरी आपण सोडवाल, आपण नक्कीच काम कराल, एवढ बोलून थांबते, धन्यवाद.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज पाण्याबद्दलचा जो विषय चालू आहे सर्वच महीला भगीनी तळमळीने बोलतात. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर

चांगला निर्णय घ्यावा. आज आमच्या सांगवीमध्ये प्रभाग क्र. ३२ मध्ये २४X७ च काम चालू आहे. २४X७ चा जो कोणी ठेकेदार आहे त्याला एकदा सगळया नगरसेवकां समोर आणून तो ठेकेदार कोण आहे तो पाहीला मिळाला पाहीजे. तो सगळयांच्या प्रभागामध्ये २४X७ च काम करतो, तो सगळ खोदून जातो, पाण्याची गळती सोडून जातो. जिथ जिथ त्यांनी खोदकाम केलेल आहे ते कुठलच काम रिपेअर न करता ब्लॉक काढलेले बसवत नाहीत तसेच सोडून जातो. जेव्हा त्यांच्या माणसाना आम्ही फोन लावतो तेव्हा एकदम उडवाउडवीचे आणि एकदम फालतू उत्तर देतात. तो ठेकेदार कोण आहे तो पहीला शोधा. तो अशा पध्दतीने जर काम करत असेलतर हे आपल्या शहरासाठी धोकादायक आहे. त्यानी जेवढे २४X७ चे कनेक्शन मारलेतना त्याच्यापैकी मी तुम्हांला ठामपणे सांगतो की २० ते ३० टक्केतरी कनेक्शनला गळती लागलेली आहे. काही विचारलतर त्याचे उडवाउडवीची उत्तर असतात. त्याच्या कामागराला विचारलतर ते म्हणतात या साहेबांशी बोला, त्या साहेबांशी बोला. प्रत्येकवेळेस उडवाउडवीची उत्तर आहेत. काहीही विचारलतर तो ठेकेदार प्रत्येकवेळेस उडवाउडवीची उत्तर देतो. मला अस कळल आहे की त्यानी सबकॉन्ट्रॅक्ट दिलेल आहे. सबकॉन्ट्रॅक्टर कोण आहे तेही माहित नाही, कामाला कुठल्याही पध्दतीची क्वॉलीटी नाही. आज महीला भगीनी ज्या तळतळीनी बोलत होत्या त्याबाबत खरच पाण्याचा प्रश्न खुप मोठा आहे. आणि चिल्लाळ साहेब आहेत त्यांच्या बदलीच मी तांबे साहेबांना कित्येक दिवस झाल सांगतो. चिल्लाळ साहेबांना आडीच वर्षापासून मी कनेक्शन्स दयायला सांगतो त्याना पस्तीस कनेक्शन्स दयायला सांगीतले होते त्यातले फक्त दहाच कनेक्शन त्यांनी मंजूर केलेले आहेत बाकीचे कनेक्शन्स अजून त्या चिल्लाळने मंजूर केलेले नाहीत. पैसे घेतल्याशिवाय चिल्लाळ कनेक्शन्स मंजूर करत नाही. अशा पध्दतीची ट्रिटमेंट चुकीची आहे. तांबे साहेब तुम्ही माझ्या ऑफिसला आलेला होतात त्यावेळेस सांगीतले होते की दोन ते तीन दिवसात यांची बदली करतो. आज जवळ जवळ महीना झालेला आहे तरी तुम्ही त्यांची बदली अजून केलेली नाही. तरी त्यांची बदली त्वरीत करावी. आमच्याकडे दुसरा विषय म्हणजे डुकरांचा सुळसूळाट झालेला आहे. काही दिवसानी असं होईल की माणस कमी आणि डुकर जास्त होतील. डुकरानी आमच्या सांगवीमध्ये एवढ घाणीच साम्राज्य केलेल आहे की प्रत्येकवेळेस दगडे साहेबांना फोन केला की ते म्हणतात हो उदया उचलतो, परवा उचलतो. एकही अजून डूकर उचललेल नाही आमच्याकडे एवढी घाण झालेली आहे. दगडे साहेबांनी पाच सहा दिवसात डुकर नाही उचललीतर शंभर टक्के त्यांच्या घरी आणून सोडणार. तरी याचा विचार करावा.

दगडे साहेबांना बोलावून घ्यावे आणि याच्यावरती त्वरीत मार्ग काढावा मला बोलण्याची संधी दिली, धन्यवाद.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच ब्रीदवाक्य आहे ‘‘कटिबध्दा जनहिताय’’ या ब्रीदवाक्यानुसार आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे नागरीक राहतात त्यांना लाईट, पाणी, रस्ता आणि ड्रेनेज ही व्यवस्था अगदी व्यवस्थीत दिली पाहीजे. परंतु याचा विसर आपल्या प्रशासनाला पडलेला दिसतो. सर्वात प्रथम आम्ही निवडून आलो तेव्हा दोन वेळा पाणी होतं. दोनवेळेसच एक वेळेवर आणलं. एकवेळेसच आता दिवसा आड केलं. आता परत निर्णय घेतला आहे की आठवडयातून एक दिवस पाणी येणार नाही. आपल्याला या शहराची लोकसंख्या माहिती आहे त्याप्रमाणे आपण नियोजन केल पाहीजे, तुम्ही प्रशासक म्हणून येथे आलेला आहात. मग आपण कुठेतरी कमी पडतात हे निश्चितच आहे. २४X७ ही योजना राबवली गेलेली आहे, जर तुम्ही आठवडयातून एक दिवस पाणी देणार नाहीत तर ही योजना राबवलीच कशाला. ठेकेदारासाठी राबवली का ही योजना, बरं ती राबवलीतर पुर्ण व्यवस्थीत केलेली आहे का. जिथे जिथे कनेक्शन्स झालेले आहेत तीथे पाणी लिकेजेस होतय. पाण्याच आपल्याला पुढच नियोजन करायचतर मग हे लिक होणार पाणी दिसत नाही का. आठ दिवसापुर्वी मी लडकत साहेबांना फोन केला होता, जसं मिनलताई म्हणाल्या तसच मला उत्तर दिलेलं आहे. मी चौकशी करतो तुम्हांला पाणी आलेल नाही का. पवनानगर भागात कायम पाण्याची ओरड आहे. केशवनगर भागात कायम पाण्याची ओरड आहे. भीमनगर भागातल्या कालच वीस ते पंचवीस लेडीज माझ्या ऑफिसला आल्या होत्या. मी आयुक्त साहेबांशी, तांबे साहेबांशी बोलणं करुन दिलं होत. याचा खुलासा व्हायला पाहीजे, पाणी कुठेतरी मुरतंय. आपल्या शहराच पाणी दुसरीकड कुठ वळवायच आहे का ते तरी तुम्ही सांगाव. आपल्या शहराच्या लोकसंख्येनुसार आपण तेवढ पाणी उचलताय हे तुम्ही सांगीतलेलं आहे. मग पाणी जातय कुठ. लोकसंख्येनुसार पाणी उचललय तर ते तेवढ पुरल पाहीजे. ज्येष्ठ नागरीकांचा साठ वर्षे वयाच्या पुढे स्मशान दाखला बंद केलेला आहे. साळवी साहेबांचा फोन बंद होता म्हणून मी साहेब तुम्हांला फोन केला. तुम्ही सांगीतल मी त्यांना फोन करायला सांगतो, त्यांचा मला फोन आला त्यानंतर त्यांनी सांगीतल तुम्ही डॉक्टरांकडे जा त्यांच्याशी बोलतो. जेव्हा साळवे साहेब बोलले तेव्हा त्या डॉक्टरांनी सर्टिफिकेट दयायच मान्य केलेलं आहे. ९० वय वर्षे व ज्येष्ठ नागरीक आहेत, ज्येष्ठ स्वातंत्र सैनीक होते. पहाटे चारला ते गेलेले आहेत व एक

वाजेपर्यंत कोणीही डॉक्टर सर्टिफिकेट दयायला तयार नाहीत. तीथ डेडबॉडी बघायची वेळ येते याच्यावर काहीतरी मार्ग काढला पाहीजे. तुम्ही म्हणता डॉक्टरांच सर्टिफिकेट पाहीजेतर तुम्ही तस शहरातल्या सगळया डॉक्टरानां पत्र पाठवा, धन्यवाद.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहराच्या पाण्याचा प्रश्न बिकट आहे. आता सर्वांनी पाण्याचा प्रश्न मांडलेला आहे. पाण्याचा प्रश्न खरच गंभीर आहे, कारण आमचा दापोडी असो, नवी सांगवी, जूनी सांगवी, गुरव पिंपळ हा शेवटचा टप्पा आहे आणि रावेत पासून हे पाणी सुटत आणि ते खाली येईपर्यंत तो वॉल दाबल्या जातो. अधिका-यांना मी प्रश्न विचारला होता की आमचा प्रभाग हा शेवटचा आहे प्रभाग क्र. ३१, ३२ आणि ३० तर आम्हांला पाणी लेट का येतं तर ते म्हणाले वॉल दाबल्या जातो. निकम साहेब होते त्यांना विचारल की आमचा प्रभाग हा शेवटचा आहे आम्हांला कमी पाणी येतं तर निकम साहेब सहज आम्हांला म्हणतात की तो वॉल दाबला जातो. मग निकम साहेब नौकरी करतात का असा वॉल कुणालाही दाबायला लावतात. आता माजी उपमहापौर ताई म्हणाल्या की राजिनामा दयावासा वाटतो. आयुक्त साहेब आम्हांला लोक पाण्यासाठी सकाळपासून एवढ सतावतातना की पाणी नाही आलं, पाणी नाही आलं, डोक येड होवून जातं. पण आयुक्त साहेब तुम्ही चांगल काम करतात पण तुमच्या खालचे अधिकारी एकदम चुकीच काम करतात. आज पुढारी पेपरला आलय तुमच्या अधिका-याची काय दशा आहे हे अख्या शहराला कळालं की तुमचा अधिकारी काय करतो. आम्हांला लोक कशासाठी निवडून देतात की लोकांना चांगली सेवा मिळण्यासाठी. मग आम्ही या सेवा देण्यासाठी तूमच्याकड या मागण्या करतो. काल निकम साहेबांना मी बोललो निकम साहेबांनी हसण्यावर घालवलं. आमच्या ताई येथून त्याग करुन गेल्या आहेत, लोकांनी आम्हांला निवडून दिल आहे ते लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी. आमच्यासारखा तुमच्या अधिका-यापुढे येवून प्रश्न मांडेल तो राजिनामा देणार नाही. अक्षरशः तुमची लोक पाण्यासाठी रडावत्यात. दुसरे नगरसेवक राजिनामा देण्यासाठी आलेले नाहीत. आयुक्त साहेब तुम्ही पुर्ण पाणीपुरवठयावर कारवाई करा. आम्ही लोकांना सेवा देण्यासाठी निवडून आलेलो आहेत. आमच्या महापौरांनी पाणी डबल दयायला सुरवात केली तेवढयात तुमच्या अधिका-यांनी काढल, पंपींग बंद, पंपींग बंद. गरीब शहरात जावुन बघा यावर्षीच्या पाण्याची काय परिस्थिती आहे. कधी पंपींग बंद होत नाही, कधी लाईट जात नाही. आम्हांला या सभागृहात येवून आडीच वर्ष झालं, आम्ही नगरसेवकांच ऐकतो आमच्या पक्षनेत्यांच ऐकतो, त्यांचे भाषण ऐकतो. आम्ही स्थानिक लेव्हलला काम

करतो. आपल्या या शहराची बेकार परिस्थिती आहे हे गांभीर्याने घ्यावे. आम्ही नवीन नगरसेवक असलोतरी आम्हांला पुर्ण कळतय की खाली परिस्थिती काय चाललेली आहे. आताच माझे मित्र हर्षल ढोरे यांनी सांगीतल आहे २४X७ किंवा अमृत योजनेची परिस्थिती बघा. जशी कुत्रे खोदतात तशा पध्दतीने प्रत्येक जागी खोदलेल आहे. आहो म्हणले जूनी लाईन होती ती बरी होती नवीन लाईन कशाला टाकली. आम्ही टाक्यावर जातो, आम्हांला एकवीस एमएलडी पाणी येतं, त्याच्यातल सात एमएलडी दिसतच नाही. दोन टाक्या भरतात साडेसात एमएलडी कुठ गायब होत पाणी. काल विरोधी पक्षावाले म्हणले टँकरवाल्याला देता की काय, तसं तुम्ही बिस्लीरीवाल्या कंपन्याला एक रुपयानी दोन रुपयानी विकाता की काय. साडेसात एमएलडी पाणी आमच गायब होतं. म्हणजे ७५ लाख ली. पाणी. ते दोन रुपयानी विकलतर तुमचा अधिकारी किती पैसे कमवत असेल. मी आरोप करतो आयुक्त साहेब याच्यावर तुम्ही गंभीर विचार करा. आख्ख्या शहराचा प्रश्न अवघड आहे आम्हांला लोक म्हणतात पाऊस पडलाय आज धरण भरलीत, पुर आलेत आणि शहरात प्यायला पाणी नाही अवघड परिस्थिती आहे. आमच्या महापौरांनी सांगीतल दररोज आम्हांला पाणी पाहीजे, जर दररोज पाणी मिळाल नाहीतर आम्ही सभागृहात रडणार नाहीत याचा विचार करा. तसेच अधिका-यांना वॉर्निंग दयावी, मला बोलण्यास दिल्याबद्दल सभागृहाच आभार व्यक्त करतो.

**मा.वैशाली काळभोर** -मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महानगरपालिकेच्या मुलभूत सुविधा आपण नगरसेवकांच्या माध्यमातून नागरीकांपर्यंत पोहचवत असतो. या सुविधा जर नागरिकांना व्यवस्थित मिळाल्या नाहीतर नगरसेवकांना पण याचा त्रास होतो आणि मग विकासाच्या कामात अडथळा येतो. मग या मुलभूत गरजा पुरवत असताना नगरसेवक विकास कसा करणार. आज आपण बघताय स्मार्ट सिटीच ऑफिस आपण माझ्या वॉर्ड मध्ये उभ करताय. ते पण महीलांचे उदयोग जिथे चालत होते ते बंद करुन स्मार्ट सिटीच ऑफिस करताय. ठिक आहे, पण मला एकच प्रश्न विचारायचा आहे की आज ज्या मुलभूत सुविधा आहेत त्या नागरीकांपर्यंत पोहचत नाहीत त्यामध्ये हा सुध्दा प्रश्न आहे. कचरा असेल, झाडाच्यां फांदया असतील भरपूर असे प्रश्न आहेत. आज आपण झाडांच्या फांदया बघीतल्यातर त्या फांदया तोडायला येत नाही आणि मग आपल्या शहरात उजेड नाही असे अनेक प्रश्न आहेत, पाण्याच्या बाबतीत सर्व महीलांनी बोललेलेच आहे आणि हा महीलांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मी २०१२ ला निवडून आल्यानंतर मला नाही वाटत पाच वर्षे दोन टाईम पाणी येत होतं. २०१७ मध्ये जेव्हा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला मी

स्टॅण्डींगला होते त्यावेळेस तुम्ही मला लाईन आणून करुन दिले. तुम्ही पॉप्युलेशनच सांगता, लिकेजस सांगता यावर अभ्यास करुन नियोजनबध्दता का करत नाहीत. आपण पंपींगच्या बाबतीत सांगता मग त्याच्या बाबतीत जे काही कारण आहेत त्याबाबतीत तुम्ही अभ्यास करुन का योजना करत नाहीत. नागरीक आम्हांला विचारतात की टाकी भरत नाहीत म्हणजे काय होतं. मी तर स्पष्ट नागरीकांना सांगते की डोक फोडलतरी पाणी येणार नाही. दहाला टाकी भरल्यानंतर तुम्ही पाणी सोडता. मग या गोष्टीचा अभ्यास का नाही केला. सगळयांनी सांगीतल की २४X७ मध्ये रस्ते खोदून ठेवले अहेत मग पाणीपुरवठा आणि स्थापत्यामध्ये ताळमेळ नाही. ते रस्ते तसेच राहीलेले आहेत त्यामुळे नागरीकांना त्रास होतो. या गोष्टीकडे लक्ष दिल पाहीजे. खड्डे जास्त पडलेले आहेत तसेच २४X७ च काम करताना ब्लॉक काढून ठेवलेले आहेत. या खुप त्रासाच्या गोष्टी आहेत. याकडे लक्ष दयावे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये नव्हेतर पुर्ण देशामध्ये पुरस्थितीमुळे हाहाकार उडालेला असताना सगळीकडे पाणी पाणी झाल आणि आपल्या शहरामध्ये पाण्यासाठी आता ज्या ज्या सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी आपल्या व्यथा याठिकाणी मांडल्या त्या व्यथा मांडल्यानंतर पक्षनेते साहेब मला वाटायला लागल आपण सत्ता राबवायला अपयशी ठरलो की काय. एकतर याची मिटींग घेवून यांना सभागृहात काय बोलायच अधिका-यांनी काय केल पाहीजे याच्यावरती आपल्या कार्यशाळा झाल्या पाहीजेत. मा.महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे की, मगाशी माझे बंधु रागात येवून काही बोलले तो शब्द सभाकामकाजातून काढून टाकावा. एखादयानी भ्रष्टाचार केला असेल अजीबात पाठीशी घालायच कारण नाही. इतक, कुठ, कुणाच काय काय दुखायला लागल की एकटा रामदास तांबेना जबाबदार धरता. रामदास तांबेच्या बद्दल माझी आज तक्रार नाही गेल्या दहा वर्षापासून तक्रार आहे. पण एकटाच माणूस महापालिकेच्या परिस्थितीला जबाबदार आहे का. बाकीचे झारीतील शुक्राचार्य कुठ आहेत. त्यांच्यावरती का ऑब्जेक्शन्स नाही. जे फोन उचलत नाहीत, जे उत्तर देत नाहीत ते कुठ आहेत. सोची, समझी चाल हैं. एकाला कुणाच्या तरी गळयातून हे मडक आडकवणार त्याला गाढवावर बसवणार आणि तुम्ही तुमच काम चालू ठेवणार, नाही चालणार मा.महापौर साहेब, असं. नाही चालणार, असं. शहरात आयुक्त साहेब, पाण्याचा दुष्काळ आहे का, दुष्काळ आहे परंतु नियोजनाचा दुष्काळ आहे, पाण्याचा दुष्काळ नाही. धरण भरुन वाहतात, नदी वाहते, पुर येतो मग पाणी का नाही. आहो, सांगाना कमीशनर, वरुन पाऊस पडतो नदीला पुर आला की खालचा गाळ वर

येतो आणि पंपींग केलतर पंपींग स्टेशन बंद पडतं. का सांगत नाहीत तुम्ही हे सांगाना. तुमच्या सारखा हुशार अधिकारी याठिकाणी खुर्चीवर बसल्यानंतर आम्हांला हे असं ऐकाव लागतं. या शहराला दिशा देण्याच काम आम्ही गेल्या तीन वर्षापासून करतो. आज पाण्यासाठी जे जे या सभागृहात ऐकल विरोधी पक्षात असताना मी सुध्दा पातळी सोडून बोलले नाही, सत्ताधा-यानी बोलाव. काय बोलतोय, का आपण फोन घेत नाहीत, का आपली चोवीस तास यंत्रणा नाही. का आपल कॉल सेंटर नाही, ज्यावेळेस स्काडा आणला होता, या सभागृहामध्ये भाऊसाहेब भोईर आहेत. स्काडा आणला त्यावेळेस सगळयात पहीली विरोध करणारी सिमा सावळे आहे. त्यावेळेस आम्हांला सांगीतल होतं की कुठल्या टाकीमध्ये किती पाणी भरलं. कुठली नदी किती मी. कमी आहे, असं आहे, तसं आहे हे तुम्हांला सगळ कळणार. तुमच्या मोबाईलवरती ऍप येणार आणि मग नगरसेवकांनी आम्हांला फोन करायचा नाही म्हणून चाळीस कोटीच काम आहे. आम्ही म्हणल शहराच्या नावलौकीकामध्ये भर पडणारी स्काडा सिस्टीम आहे कशाला आपण विरोध करा. आपण कशाला पापाच धनी व्हा. मग तुमचा स्काडा कुठ गेला आम्हांला माहिती नाही. आज आम्ही पोटतीडकीने बोलतो, आम्हांल लोक वाटेल ती भाषा वापरतात. आम्हांला लोकांनी निवडून दिलेलं आहे, तुमच्यामुळे आम्ही निवडून आलो नाहीत. त्यामुळे आमच काम आहे, प्रथम कर्तव्य आहे की आम्ही त्यांच्यासाठी काम केल पाहीजे आणि त्यांच्यासाठी काम करत असताना जर आमचा फोन अधिकारी घेत नसेलतर मी संतापानी दोन वाईट शब्दात विचारणारच. महानगरपालिकेचे कर्मचारी हे चोवीस तास ऑन डयुटी पाहीजेत. त्याच्यात दुसरी गोष्ट म्हणजे माणुस आहे तो थकतो, झोप येते, भूक लागते, फॅमिली आहे याचाही विचार करावा लागतो. एकच कॉन्ट्रॅक्टर आहे का, त्यालाच का बसवला, याच्यावर मी स्वत: चेअरमन असताना मीही ऑब्जेक्शन घेतले होते. सिस्टीमेटीकली तोच माणुस कसा येतो हे तर २०१६ ला मी या सभागृहात बोलले होते. २०१७ ला मी बोलले की ज्या ज्या वेळेस इलेक्शन येतं त्या त्या वेळेस पाणीपुरवठयावरती आणि पाणीकपातीवरती अविस्कळीतपणा करण्याच्यासाठी त्या कॉन्ट्रॅक्टरचा वापर केला जातो. २०१६ ला आम्ही अनुभव घेतला, सत्तेत आम्ही बसलो त्यावेळेस अनुभव घेतला आणि आता विधानसभा आहेत म्हणून असं होतं. का येत नाही मागच्या पाच सात महीन्यातून अनुभव आम्हांला. उन्हाळयात तुम्ही एक दिवसा आड पाणी केल ते आम्ही आनंदाने स्विकार केलं, लोकांनी स्विकारल. तुम्ही लोकांचा कौल घ्या, लोकांना जर विचारल की तुमच काय म्हणण आहे हे पाणी रोज दिल्यानंतर माझ्या ज्या पाईपलाईनी

आहेत त्या पाईपलाईन पुर्ण भरत नाहीत आणि म्हणून मी प्रेशरनी पाणी देवू शकत नाही. शहराचा कौल घ्या, आपल्याकडचे गणपती मंडळ बोलवा, दुर्गामाता मंडळ बोलवा, पत्रकारांना बोलवा, नगरसेवकांना बोलवा कोणालातरी सांगाना साहेब काय चालल आहे इथ. किती ऐकूण घेणार. आहो, रात्रीच्या झोपा खराब होतील त्यांच्या. सगळेजण हात वर करुन उभे राहणार. एक मर्यादा असली पाहीजे. ही मर्यादा जर तुम्ही ओलांडणार असालतर कोणच तुम्हाला माफ करणार नाही. साहेब, तुम्ही सांगत नाहीत आणि म्हणून रोजच्या रोज त्याच्यावरती चर्चा होते. आम्ही म्हणल का की सत्ताधारी पक्षाच्याच लोकांना बोलवा, आम्ही म्हणल का विरोधी पक्षातल्या लोकंना बोलवू नका त्यांना विश्वासात घेवू नका. त्यांना पाणी कपातीचा निर्णय सांगू नका. तुम्ही जे जे काही करत असताल ते ते सगळ्याना सांगा. समजून सांगा, फोन उचलायला काय त्रास होतो. लडकत साहेब काय त्रास होतो फोन उचलायला आपल्याला. नगरसेवकांचे फोन उचलता येत नाहीत का. लोक आमच्या घरी येवून बसतात विनापाण्यानी आमची करतातना त्यावेळेस आम्हांला पण दु:ख होतं. आम्ही फक्त मोठेपणा करण्याच्यासाठी त्या लोकांच्या समोर तुम्हांला फोन करतोत, ज्यावेळेस लोकांना कळतं की यांची लायकीच नाही अधिकारी फोन उचलत नाहीत काय बोलणार ते इथ. आमच्याकडन तुम्ही काय अपेक्षा करता बोलण्याची. साहेब, सगळयांना नियम घालून दया. फोन उचलले पाहीजेत, उत्तर दिली पाहीजेत. माझ्या वॉर्डामध्ये पवार म्हणून अधिकारी आहेत मगाशी सुजातानी त्यांची खुप तारीफ केली. ११,१२,१३ तारखेला पाणी येत नव्हतं. ऑन द स्पॉट अधिकारी गेलेच नाहीत. काय करणार मी, मी म्हणाले साहेब, का गेला नाहीत ते म्हणाले ताई मला कळालच नाही. ते म्हणाले ताई मला आता कळाल मी लगेच जातो, संपला विषय लगेच जातो म्हणल्यावर. गेले पाहणी केली, ते म्हणाले की ताई जिथून पंपींग होत त्या ठिकाणाहून पाण्याच प्रेशर कमी आहे आणि त्यामुळे लाईन भरत नाही आणि पाणी कमी येतं. पण कळाल्यानंतर ज्या ज्या अधिका-यांनी दुर्लक्ष केल त्यांना मात्र शिक्षा दयावी. शंभर टक्के शिक्षा दयावी. आणि या शिक्षा करत असताना आपण सुध्दा कमीशनर साहेब, काय होतं की तुम्ही खुप चांगल काम करता पण त्याचा काही उपयोग होत नाही. तुम्ही चांगले आहात, चांगल काम करतात, कर्तव्यदक्ष आहाततर तुम्ही सुध्दा या सगळया गोष्टीवरती सोल्यूशन विचारात घेतलच पाहीजे, काढलच पाहीजे त्याशिवाय तुम्हांला सुध्दा पर्याय नाही. २४X७ च्या आम्ही तुम्हांला वारंवार तकारी केल्या. २४X७ वाल्याच काय. दुर्दैव असं आहे की वॉल कुठे आहे, कुठल कनेक्शन कुठ आहे याचा कशाचाच नकाशा नाही, कशाचाच नकाशा नाही. कोणी केबल टाकलय,

मध्येच एमएसईबी आहे. मधातच ड्रेनेज लाईन आहे, मधातच पाण्याची पाईप लाईन आहे, एमएसईबीची लाईन गेलेली आहे. गॅस पाईपलाईन गेलेली आहे. कुठून खोदाव हाही प्रश्न आहे. २४X७ झाल पाहीजे का, संकल्पना खुप चांगली होती, मला वाटत अशिष शर्मानी पहील्यांदा याठिकाणी प्रेझेंटेशन दिलं होतं आणि त्यांनी सांगीतल होत २४ तास जर पाईपामध्ये पाणी राहीलतर लोकांना गरज पडणार नाही पाणी साठवून ठेवण्याची आणि म्हणून २४X७ ची योजना आणली. आज आपण नवीन पाण्याच स्त्रोत काही शोधतो का. भामा-आसखेडच्या प्रकल्पाच काय झालं, आंद्रा धरणाच काय झालं, बंद पाईपलाईनच काय झालं. १४६ कोटी रुपये तुम्ही दिलेत असं माझ्या वाचण्यात आलं. त्या प्रकल्पाच पुढे काय त्यावर कुठे सोल्यूशन नाही आणि ते सोल्यूशन काढण्यासाठी याठिकाणी बसलेल्या प्रत्येक नगरसेवकाच काम आहे या सगळया विषयांवरती नवीन योजनां जर आपण याठिकाणी पाण्याच्या संदर्भात आणल्या नाहीतर पुढच्या दहा वर्षात या शहरात पाण्यासाठी मारामा-या होतील. दहा लाख लोक संख्या असताना जितक पाणी आपण धरणातून उचलत होतो, आज याठिकाणी शहराची लोकसंख्या २२ लाख झाल्यानंतर सुध्दा तेवढच पाणी अपण उचलतो. चिंचवडगावच्या भागामध्ये रोज मोठमोठे टॉवर उभे राहतात. काय करायच त्या टॉवरच पाण्याची व्यवस्था काय आहे. भोसरीमध्ये तुम्ही आमच्या भागात या, च-होली, मोशी, डुडूळगांव जाऊन बघा काय टॉवर उभे राहतात. स्मार्ट सिटीकडे आपण वाटचाल करतो. पाण्याची आपल्याकडे व्यवस्था नाही. कच-याची व्यवस्था नाही. ऊठसूठ रोज उठल की राजकारण, रोज उठल की राजकारण. काही सोल्यूशन सांगाना. झाली टिका करुन तुमची खुप काही सोलूशनवरती या. तुम्ही हे नाही केल, आम्ही सांगतोत की सतरा वर्षात निर्णय नाही घेतला, ठिक आहे. आता पाण्याच्या योजना आणल्या त्या कुठ कुठ बंद पडल्या, भामा-आसखेड असेल, आंद्रा असेल काही ठिकाणी त्याला विराध झाला. तीथ आपण काय करतो, तीथ आपली नातीगोती खुप आहेत. आपण जर त्यांना सांगीतलतर या शहराच नंदनवन होईल. या शहरासाठी आम्ही सुध्दा आमच्या वयाचे पंचवीस वर्षे इथ राजकारणात घालवलेली आहेत. आम्हांला सुध्दा लोकांचा तेवढाच कळवळा आहे. आम्ही सुध्दा लोकांच्या भरवशावर निवडून येतो. म्हणून काय रोज उठून एकच, कच-याची समस्या आहे, आज पुराच्या पाण्यामध्ये जेवढया लोकांनी मदत केली तेवढयांच मनापासून अभिनंदन परंतु नदीच्या कडेला भर टाकणा-यांच काय करायचं. वाटोळ होईल त्यांच सगळयांच, वाटोळ होईल, ज्यांनी, ज्यांनी नदीच्या कडेला भर टाकली, रोज भर टाकायच काम चालू आहे. आजही ते काम चालू आहे. कुठ आहे आपल

प्रशासन. भर कुणी टाकली हे आपण शोधत नाहीत. हे आपण शोधायच, भर टाकणारे पण तेच, मदत करणारे पण तेच, फोटो काढणारे पण तेच. प्रसिध्दी देणारे भराभर देतात प्रसिध्दी, अरे, बघातर खरं. भर टाकरणारे कोण होते, नदीच पात्र कुणी लहान केल. २००९ मध्ये ज्यावेळेस पुररेषा आली अख्ख्या सभागृहाला मुर्खात काढलं. आख्ख शहर माझ्यावरती टिका करत होतं, एकटी सिमा सावळे लढली साहेब., मी त्यावेळेसही म्हणत होते की दर दहा वर्षानी आकरा वर्षानी पुर येतो आणि तो ज्या वेळेस येईल त्यावेळेस तुम्हांला विचारुन येणार नाही. दुर्दैवाने हा ईतीहास असा घडेल अस मला वाटल नाही. आज माझ शहर संपुर्ण पाण्याखाली आहे. आज त्या सुर्या हॉस्पिटलला गेलो, कुणी दिली त्याला परवानगी, आदित्य बिर्ला हॉस्पिटलची काय परिस्थिती आहे आता तिथ जावून बघा, पुररेषेत आहे का नाही ते. मिडोटरी टॉवर प्रकल्पाला विरोध केला एक कोटी रुपये दंड केलाना साहेब, दंड कोणी छापला नाही, भ्रष्टाचार झाला अशी मागणी आहे, तशी मागणी आहे हे छापल्या जातं. ज्यांनी ज्यांनी या याठिकाणी असे हॉस्पिटलस बांधले साहेब, यांच पुर्नवसन झाल पाहीजे. ज्या ज्या सोसायटयामध्ये पाणी घुसल सगळयांच पुनर्वसन करा आणि पुररेषा एकदा नीट तपासा, दोन पुररेषेचे नकाशे, दोन डीपी. खेळ आहे, खेळ, खेळ. ईथ कधी लागतनां साहेब, ज्यावेळेस जीव जातोनां कुणाचा त्यावेळेस. सगळीकडे पुरस्थिती असताना माझ्या शहरातून मदतीचा ओघ जात असताना माझ शहर सुध्दा पाण्यात आहे. या सगळी कडे आज ड्रेनेजची काय परिस्थिती आहे. चुकीच असेलतर विरोध करा पण ड्रेनेज जागोजागी तुंबले आहेत आणि ते पाणी हॉस्पिटलीमध्ये शिरलं, हॉटेलमध्ये शिरलं आणि अनेक लोकांचा तीथ जीव जाण्याची वेळ आली. ज्यांनी मदत केली देव त्याला खुप आयुष्य देओ. पण ज्यांनी नदीमध्ये भराव टाकला त्यांना त्या गरीब लोकांचा लई तळतळाट लागेल. तुम्ही घरुन टिफीण आणताना साहेब, तुमची बायको त्या टिफीन बरोबर चमच देते तो चमच जर त्या टिफीन बॅगमध्ये दिसला नाहीनां त्या आकाशपातळ एक करतात घरात, कारण आमचा जीव त्या चमच्यात नसतो साहेब, त्याच्या प्रेमात असतो कारण ते खुप कष्टाने आम्ही जमवलेल असतं. असे अनेक लोकांचे संसार वाहून गेलेत. अनेक लोकांच होत्याच नव्हतं झालं. वेळ निघून गेलेली आहे आतातरी सुधारण्याची वेळ आहे. साहेब, ज्या ज्या ठिकाणी नदीच्या बाजूनी भराव टाकणारे लोक आहेत आजही तुम्ही जर गेलातर सगळी कडे भराव टाकण चालू आहे. सगळयात दुर्दैव म्हणलतर तो भराव जर तुम्ही पाहीलातर तुमच्या लक्षात येईल की तो भराव कुठल्या प्रकारचा आहे. ते भराव नदीकाठचे काढून टाका. ज्यानी अतिक्रमण केल

असेल त्यांच. माणसाचा जीव जर गेलातर आपण भरुन देवू शकत नाहीत. येवून जावून येतं कुठ, प्रशासनावरती आणि उरतात जोडे खायला सत्ताधारी. मग आज आम्ही असू उदया दुस-या कुठल्याही पक्षाचे असू दयात. हे जर थांबवायच असेलतर सगळया सदस्यांना हात जोडून विनंती आहे टिका करा केलीच पाहीजे. परंतु टिका करताना आपल्या सुचना दिल्यानंतर प्रशासन अंमलबजावणी करत का नाही त्याच्याकडे सुध्दा आपण तेवढच लक्ष दयाल एवढच मी मनापासून सांगते. मा.महापौर साहेब, मगाशी अंबरनाथ कांबळे यांनी रागाच्या भरात जे काही शब्द वापरलेत ते आपण सभा कामकाजातून काढून टाकावेत एवढी विनंती करते, थांबते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.जावेद शेख –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाणी, पाणी, पाणी, पाणी हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे. पाणी खरोखर पुरुषा पेक्षा जास्त महिलेच्या जीवनाचा प्रश्न आहे. आताच सिमाताईनी त्यांच मनोगत व्यक्त केलं त्याच्या बद्दल मी मनापासून त्यांच अभिनंदन व्यक्त करतो. त्यांनी काही गोष्टी खुलासा करुन सांगीतल्या. आयुक्त साहेब आपण आजच्या परिस्थितीला या शहराला सगळयांना रोज पाणी देवू शकतो का. म्हणजे महापालिकेच्या नियमानुसार रोज १३५ ली. आहे. आपण अख्ख्या शहराला ते पाणी पुरवू शकतो का. कारण आजच्या परिस्थितीत आपण पंपींग स्टेशनवरुन जे पाणी उचलतो त्यांनी आपल्याला जेवढी परवानगी दिली त्याच्या प्रमाणापेक्षा आपण जास्त उचलतो आणि त्याचा दंड देखील महानगरपालिका प्रत्येक महीन्याला भरतेच आहे. आयुक्त साहेब तरी देखील आपण या शहराला पाणी पुरवू शकता का हा माझा प्रश्न चिन्ह आहे. कुठला अधिकारी कुणाचा फोन घेतो, कुठला अधिकारी घेत नाही. कुणी काही गडबडीत असतो. याच्या बाबतीत मला अधिका-यांना बोलायच नाही. पहीली गोष्ट जेवढ पाणी या शहराला लागतय मग तो तळवडेचा भाग असेल, मोशीचा कोपरा असेल, च-होलीचा कोपरा असेल, पिंपळेगुरवचा कोपरा असेल, वाकडचा कोपरा असेल या सगळया कोप-यापर्यंत जाऊस्तर पाणी पुरत असेलतर अशा अनेक ठिकाणच आपण जर ॲनेलेसेस केलतर आजच्या परिस्थितीला असं माझ वैयक्तिक मत आहे की रोज शहराला पाणी पुरत म्हणून. ही परिस्थिती लक्षात ठेवून मागच्या काळामध्ये ज्या काळात आमची सत्ता होती त्या काळात आमचे आदरनीय नेते अजीत दादा पवार यांनी बंद पाईपलाईनची योजना आणली. जर का आज ती बंद पाईपलाईन चार सहा महीन्यात झालीतर आता जेवढे नगरसेवक, नगरसेवीका कळकळीने तळमळ करतात ती त्यांची तळमळ

दुर होईल का नाही. रस्त्यातून येणार पाणी किती तरी वाहून जात तेच पाणी पाईपलाईनमधुन घेतलतर ते वाया जाणार नाही. तीथल्या शेतीवाल्यांना जेवढ पाणी पाहीजे तेवढयापुरत पाणी सोडतील. दुसरा भाग म्हणजे आपण पंपसेटवर कधी गेलात का कधी. आपल्या मधील सर्व नगरसेवकांना मी विनंती करतो जिथून आपण पाणी उचलतो तीथल्या पाण्याची अवस्था बघीतली का. नाकाला रुमाल बांधल्या शिवाय आपण तीकड थांबू शकत नाहीत. इतका घाणेरडा वास, केमीकल, ऑईल अशी परिस्थिती आहे. तुम्ही सोमाटणे फाटयाला जावा जेवढया स्किम्स असतील, जेवढया कंपन्या असतील त्यांनी डायरेक्ट नदीला ड्रेनेज पाणी सोडल आहे. त्यांचा सगळा मलप्रवाह ताथवडे पासून बघीतलतर सगळया मोठमोठया सोसायटयानी नदीमध्ये सोडल आहे. तुम्ही कुणाला बोलणार. आज तुमचा एक पंप एक मिनीटासाठी बंद पडलातर किती फटका बसतो. अर्धा तास तुम्हांला तो चालू करायला लागतो. त्याच्यामध्ये तुमचा दोष नाही, त्याच्यामध्ये जी काही आजची अत्याधूनीक वस्तु असेल त्या गोष्टी आणण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे २०१४-१५ च्या काळामध्ये मी पक्षनेते आपल्याला विनंती करतो आपली सत्ता होती, लोकांनी वरती सत्ता दिली त्यानंतर महापालिकेत गवगवीत आपल्याला महानगरपलिका दिली. या शहराचा सगळया गंभीर प्रश्न हा पाण्याचा आहे. महापौर आपले, पालकमंत्री आपले हे सगळे आपले असताना देखील मावळातील शेतक-यांचा प्रश्न होता, त्यांची जी काही जागा धरणात गेलेली आहे, त्यांच पुनर्वसन व्हाव त्यांना ती जागा मिळावी याबाबतीत तुम्ही वर्ष दिड वर्ष काम केल असतंतर निश्चितपणे आज बंद पाईपलाईन पुर्ण झाली असती. आता भामा-आसखेडच काम सुरु केलं, आपल्याला वाटतय का ते एवढ सोप आहे. त्याच्यामध्ये राजकारण होणार नाही का. एवढया चांगल्या कामामध्ये मावळात जर राजकारण झालतर त्याच्यामध्ये राजकारण होणार नाही का. पाणी हा पुण्याचा विषय आहे. कुठलीही जात असो, कुठलाही धर्म असो कुठलाही उत्सव निघाला तर प्रत्येक संस्था, प्रत्येक मंडळ पाणी घेवून लोकांना पाजण्यासाठी उभे राहतात. का तर पाणी पाजण्यासारख पुण्य कुठलही नाही. ही गोष्ट तीथल्या मावळधारकांच्या, आमच्या बंधुच्या लक्षात आणून देण्याच यांच काम आहे. आमदार त्यांचेच, मंत्री त्यांचेच, पक्षनेते साहेब आपणही मनापासून हा प्रयत्न करायला पाहीजे होता आणि आतापर्यंत बंद पाईपलाईनचा प्रश्न आपण सोडवायला पाहीजे होता. याच्यामध्ये निश्चितपणे आपण अपयशी ठरले आहात हे मी मनाच्या अंतकरणापासून सांगतो. खुप खंत वाटते. वैशालीताईचा भाग असेल, माझा भाग असेल माझा अलीकडे आहे आणि वैशालीताई रोडच्या पलीकडे राहतात.

त्या साईडला त्या पाहतात आणि या साईडला प्रमोद कुटे आणि मी पाहतो. आमच्याकडे अगोदर व्यवस्थित पाणी येत होतं. आता नियोजन इतक बीघडल आहे की तुमच्या कालच्या बोलण्यातून आल की प्रत्येक वॉर्डात वीस टक्के लूजपॉईंट आहे. नाही साहेब, २० टक्के नाही. ४० ते ४५ टक्केच्या वर लूज पॉईंट आहे. २४X७ करायची काय गरज होती. तुम्ही ३०X३० देवू शकत नाहीतर तुम्ही २४X७ कशाला टेंडर पास करता आणि कशाला ती काम करता. याच्यामध्ये कशाला एनर्जी वेस्ट घालता. माझ्याकडे जवळ जवळ ९० टक्के २४X७ च काम व्यवस्थित झालेल आहे. उदया देखील अमच्या इथ काम सुरु करु शकता. माझ्या अर्ध्या वॉर्डामध्ये पुर्ण नाही म्हणणार. आमच्या अर्ध्या वॉर्डात आजही २४X७ चालू करु शकता एवढया बारकाईन उभे राहून लक्ष देवून काम केलेलं आहे. परंतु आता दोन वर्षानी काय होणार खालचे काहीतरी घोळ घालणार, कुणीतरी खड्डा करणार काहीतरी करणार, परत २४X७ च टेंडर. तो ठेकेदार पण इतका हुशार की कुठल्या गल्लीत काम करायच ते कुणाला विचारत सुध्दा नाही. याच्यामध्ये तुम्ही गळती म्हणता त्या गळतीमध्ये एक भाग असा पण आहे मी सर्व अधिकारी नाही म्हणणार, काम करणारे सुध्दा अधिकारी आहेत. आमचे ज्यु.ईंजिनीअर वैद्य साहेब त्यांच मनापासून कौतूक करतो. रात्री तीन तीन चार चार वाजेपर्यंत ते हिंडतात. रात्री ९ वाजता घरी गेलातर परत ११ ला निघणार आणि रात्री तीन तीन वाजेपर्यात वॉर्डात फिरतो तो. मी मनापासून त्याच अभिनंदन करतो साहेब. लडकत साहेबांच सुध्दा मी अभिनंदन करतो. त्यांच काम मी डोळयानी पाहील आहे, त्यांना त्याबद्दल नाराजकी असेलतर तो भाग वेगळा आहे. परंतु पाण्याच्या बाबतीत तो माणुस परफेक्टली आहे. यदाकदाचित त्यांच्या कामामध्ये एखादयाचा फोन घ्यायचा राहून गेला असेल किंवा काही असेल परंतु पाण्याच्या बाबतीत तो माणूस किती पॉझिटीव्हली आहे. या गोष्टी करत असताना देखील आपली नदी कशी स्वच्छ राहील, पाणी कस स्वच्छ राहील, आपला भाग कसा स्वच्छ राहील याच्यासाठी सुध्दा तो माणुस नौकरीतून वेळ काढून सामाजीक संस्थे बरोबर निस्वार्थीपणे काम करत असतो, उलट खिशातले पैसे घालून. एकदा माझ्याकड घाण पाणी आलं म्हणून दहा बारा महीला आल्या मी अधिका-याला फोन केला त्यांनी फोन उचलला मी म्हणालो सर असं असं झाल आहेतर ते दहाव्या मिनीटामध्ये माझ्या दारात आले, मलाच लाज वाटली ते म्हणाले नाही, मी इकड चाललो होतो दोन मिनीट तुमची भेट घेवून जाव. सकाळी दहा वाजता मला त्यांनी रिपोर्टपण पाठवला, तर सगळयांनाच नाव ठेवून फायदा नाही. काही अधिकारी असे आहेत की चांगले चांगले रेस्टॉरंट आहेत, चांगले चांगले

मोठमोठे रहिवासी आहेत ज्यांचे डबल कनेक्शन आहेत एक कनेक्शन समोरुन दुसर कनेक्शन मागून ते फक्त त्या प्लंबरला आणि अधिका-यालाच माहिती आहे बाकी कुणालाच माहिती नाही. याच्यावरती चांगला स्कॉड नेमा. असा स्कॉड बसवा की जेणेकरुन पाणी चालू असताना त्या टाकीमध्ये पाणी पडताना किती बाजूनी पाणी पडतय हे गांभीर्याने लक्ष दया. तुम्हाला प्रत्येक भागामध्ये हे भेटल साहेब, मी अस म्हणत नाही माझ्या वॉर्डात नाही, मोटर लावतात तो भाग वेगळाच आहे. मोटरी बद्दल बहुतेक आम्ही अधिका-याना ताकद देतो परंतु काय होतं, आता त्यातल्या त्यात काही काही नागरीक पण हुशार असतात, आमच्या घरात आले आणि तुम्ही आम्हांला अपशब्द बोलले, त्याच्यामुळे तो बिचारा अधिकारी घाबरतो. त्याच्या बरोबर महीला पोलीस पाहीजे. पाहाटे साडेपाचला कुठून महिला पोलीस आणणार तो. त्यामुळे त्यालातरी बोलून काय फायदा. सोसायटीच्या स्किमला परवागी दयायची असेलतर पर फ्लॅट मागे पैसे मोजावे लागतात, मागच्या हातानी. ६५ फ्लॅट आहेततर ६५ फ्लॅटचे ५०० रु. प्रमाणे पैसे मोजावे लागतात. त्याच्यामध्ये दोन तीन जणांचा वाटा आहे. आयुक्त जेवढ पाणी उचलतात तेवढ शहराच्या कोप-या पर्यंत पाणी पोहचू शकतं का. प्रत्येक जण प्रत्येकाच्या भावना व्यक्त करणार. परंतु जी गोष्ट होणारच नाही, येणा-या काही काळापर्यंत ती गोष्ट होवू शकत नाही, जोपर्यंत भामा-आसखेड येत नाही, जोपर्यंत बंद पाईपलाईन चालू होत नाही तोपर्यंत आपण आपली इच्छाशक्ती पुर्ण करु शकत नाहीत. जी गोष्ट आपल्याकडे येणारच नाही, तुमच्या कडे अर्धा ग्लास पाणी आहेतर मग तुम्ही शहराला कसं पाणी देता. इथ कुठतरी सभागृहाने आयुक्तांना समजावून घेण गरजेचे आहे. पक्षनेते साहेब आपण पुढकार घ्यावा आम्हांला पण मदत करावी. वाटलतर आम्ही सुध्दा तुमच्या बरोबर विनंती करायला बरोबर येतो. बंद पाईपलाईन टाका, भामा-आसखेड पुर्ण करुन घ्या. सगळया पक्षानी पालकमंत्री असतील, किंवा मुख्यमंत्री साहेब असतील, त्याच्यामध्ये बाळासाहेब भेगडेनांही बोलवा. मावळचा प्रश्न जरी सुटलातरी आपल्याला बराचसा फरक पडेल अशी मी भाजप पक्षाला मनापासून विनंती करतो आणि मा.महापौर साहेबांनी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी धन्यवाद व्यक्त करतो आणि लवकराल लवकर पाण्याचा प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा करतो, धन्यवाद.

**मा.अर्चना बारणे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्या बहिणी-भावानी सर्वानीच पाण्या विषयी चर्चा केलेली आहे. मा.महापौर साहेब, रोज पाणी दया आणि दोन तास दया व ते प्रेशरनी दया. मा.आयुक्त साहेब, जगताप नगर गल्ली नं. ५ डूकर

विषयी सांगीतल होतं. तीथ शेड मारुन डूकर पाळलेली आहेत. डॉ.रॉय यांना किती वेळा तसं पत्रही दिलेलं आहे की तुम्ही त्याच्यावर काहीतरी कारवाई करा म्हणून अजूनही कारवाई केलेली नाही. त्यांनी काही ते जनावर पाळायची परमीशन घेतलेली आहे का. जर त्यांना जमत नसेलतर मी माझ्या माणसाना लावून ती कारवाई करीन. मा.महापौर साहेब, तुम्ही क प्रभागाच्या मिटींगला आलेले होते तेव्हाही मी तुम्हांला सांगीतल होतं की ते काम होत नाही, धन्यवाद.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. काल नेत्यांबरोबर, आयुक्त साहेबांबरोबर मिटींग केली. प्रत्येक शब्दाला आयुक्त साहेब म्हणत होते माझ ऐकूण घ्या माझ ऐकूण घ्या आता ते ऐकायलाच नाहीत इथ. त्यांच काल ऐकूण घेतल त्यांनी दोन ते तीन दिवसाचा वेळ घेतला आहे पाण्या संदर्भात. दोन तीन दिवसात होईल कव्हर असं म्हणत म्हणत आता आपण २१ तारखेपर्यंत आलो आहोत. आयुक्त साहेब, आमच्या घरातच पाणी नाहीतर वॉर्डात काय अवस्था असेल. स्मार्ट पिंपळे सौदागर, लोकांना स्मार्टची अवश्यकता नाही. मोठमोठे पुल बांधा पण रस्ते आणि पाणी या दोन गोष्टी आतातरी इतके आवश्यक आहेत की त्यासाठी आपण आयुक्तांना घेवून व्हिजीट करुन त्याचा पाठपुरावा करावा ही विनंती करते, धन्यवाद.

**मा.कुंदन गायकवाड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाण्याचा प्रॉब्लेम आहेच. प्र.क्र. १ मध्ये तीन्ही गल्ल्याला पाण्याचा प्रॉब्लेम आहे. पाऊस आहे २४X७ काम झालेल नसेलतर जास्त प्रॉब्लेम आलेला आहे. मी आयुक्त साहेबांकडेही तक्रार केली होती. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याकडे तक्रार घेवून आलो होतो. आमच्या प्रभागातील तीन वर्षापासून मी फॉलोअप करतो साहेब, आमच्या टॉवूनहॉल बाबतीत सुध्दा मी महापौर साहेबांशी बोललो, मा.महापौर साहेबांनी त्यांच्या प्रभागातील टावून हॉल कॅन्सल करुन म्हणाले की तुमच्या प्रभागात करा. त्यांच्याकडे तीनशे लोकांची बैठक आहे आणि आमच्याकडे पाचशे लोकांची बैठक आहे. टावून हॉल बाबत आम्ही फॉलोअप करतो. आहे तसा तो मंजूर करावा, त्यात बदल करु नये. तुम्ही त्यादिवशी म्हणाले इथे टावून हॉलची गरज काय आहे. टावून हॉल केल्याशिवाय आज लोक तीथ येणार नाहीत. तरी आमच्या तेथील टावून हॉलला लवकरात लवकर मंजूरी दयावी ही विनंती. मा.महापौर साहेब, आमच्या प्रभागामध्ये रामदास नगर, गणेशनगर त्या प्रभागामध्ये आता २४X७ ची काम झाली आहेत. मी चार महीने पदावर नव्हतो. त्यावेळेला अधिकायांना बोललो होतो की तीथ पाईपलाईन

टाकु नका तरी तीन तीन फुटावरती पाईपलाईन टाकली. मी त्यावेळेला चार महीने पदावर नव्हतो तरी त्या अधिका-यांनी ऐकले नाही. आता काय झाले लोकांची घर झाली खाली आणि रस्ते झाले वरती. त्यामुळे काय होत त्या भागात पावसाच पाणी वाढल की ते पाणी लोकांच्या घरात जातं. माझी विनंती आहे की तुम्ही दहा रस्त्याला मंजूरी घेतली असलीतरी एकच रस्ता करा परंतु तो रस्ता खरडून करा. लोकांची घर झालीत खाली आणि रस्ते झालेत वरती, तरी खरडून रस्ते करावेत, धन्यवाद.

**मा.प्रियंका बारसे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाण्याच्या सारख्या विषयावरती दोन चार महीन्यापासून आपल्या सर्वांनाच चर्चा करायची होती. आज आपण पाण्यावर चर्चा करण्यासाठी एवढा वेळ दिला त्याबद्दल सभागृहातर्फे मी आपल्या सर्वांचे आभार मानते. पण खरच हा ज्वलंत प्रश्न आहे त्याच मुळ कुठे आहे ते शोधणे खुप गरजेच आहे. मी वेळोवेळी आयुक्त साहेबांना भेटत असते. ई प्रभाग समिती कार्यालयामध्ये सुध्दा वेळोवेळी पाणीपुरवठा विभागाला भेटत असते. आमच्या ई क्षेत्रीय कार्यालयामध्ये आम्हांला खालचे प्लंबर लोक आहेत त्यांच्याकडन आम्हांला खुप चांगल सहकार्य मिळतं. टाकीत पाणी नसेलतर त्यांना उत्तरे दयावी लागतात आणि जे सगळे जण ऐकतात ते मी सुध्दा ऐकत असते. मेन टाकीमध्ये पाणी वरुन आल नाही असं आम्हांला ऐकाव लागत. वरुन येणार पाणी आहे त्यासाठी तांबे साहेबांना दोषी धरलेल आहे. तरी याच्या बाबतीत आपण जास्त अधिक जबाबदारीने काही निर्णय घ्यावे लागतील ते निश्चितच आपण घ्याल अशी अपेक्षा आम्ही व्यक्त करतोत. आम्ही म्हणतोत की आम्हांला २४ तास पाणी नको आम्हांला दोन तासच पाणी दया पण प्रेशरनी पाणी दया ही आमची नेहमीचीच अपेक्षा आहे ही अपेक्षाच मी प्रभागाच्या वतीने व्यक्त करते. त्याचबरोबर आजच एलईडी संदर्भामध्ये बातमी वाचली ईएसईएल तर्फे आपल्याला एलईडी परत बंधनकारक केलेलं आहे. कोणत्या कंपनीचे एलईडी आहेत त्याच्याशी मला कर्तव्य नाही. माझी परत एकदा मागणी आहे की प्रभागामध्ये पन्नास टक्के लाईटस बंद आहेत एकतर सणासुदीचे दिवस आले आहेत. महीलांना सुरक्षिततेचा प्रश्न आहे. चो-यांच प्रमाण वाढलेल आहे. या सर्वाचा विचार करुन जे कोणत्या कंपनीचे आम्हांला एलईडी तुम्ही देणार आहात ते आम्हांला लवकरात लवकर आमच्या प्रभागा पर्यंत कसे येतील याबाबतीत आपण विचार करावा. आताच यादव ताईनी एक मुद्दा मांडला की कच-याच्या गाडीच्या संदर्भामध्ये आपण साठ रुपये प्रत्येक घरामागे घेणार आहात. तरी त्याबाबतीतही आपण चांगला फेर विचार करावा. घंटागाडीवरचे कामगार तुम्ही

कमी केलेले आहेत. महिला किंवा जे नागरीक आहेत त्यांना स्वत:लाच तो कचरा गाडीमध्ये टाकावा लागतो. कारण की त्या महिला गाडीतून उतरत नाहीत ड्रायव्हरशी मस्तपैकी गप्पा मारत असते तरी याबाबतीतही आपण विचार करावा. जे घरोघरी साठ रुपये घेणार आहेत ते जास्त आहेत. मी म्हणत नाही की तुम्ही पुर्ण बंद करा पण त्याबाबतीत निम्यानेतरी आपण कमी करण्याचा विचार करावा कारण तशी आपल्या पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या भरपूर आहे. मी आज सकाळ पेपरमध्ये बातमी वाचली की शास्तीकर आपण एक हजार स्क्वे.फुट पर्यंत पुर्ण माफ केलेला आहे आणि जो पुर्वीच्यानी शास्तीकर भरलेला आहे तो आता तुम्ही नवीन बीलामध्ये समायोजीत करतात तर समायोजीतचा शब्द आम्हांला नीट कळालेला नाही. प्लस तुम्ही तो माफ करुन चालू बीलामधुन मायनस करणार आणि एक एक दिड दिड लाख लोकांनी शास्तीकर आदि भरलेला आहे. मग तो प्रत्येक बीला मधुन येथून पुढच्या दहा-बारा वर्षे माफ होणार आहेत का. पहील्या पैशातून मायनस होणार आहे का याच्याबद्दलची एक चांगली प्रसिध्दी आपण प्रशासना मार्फत राबवावी अशी आपल्याला विनंती करते. आणि परत एकदा आता जो पाणीप्रश्न आहे त्याबाबत प्रेशरने आम्हांला सर्वाना पाणी मिळेल दोन तासच मिळालतरी चालेल अशी अपेक्षा व्यक्त करते आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.विनोद नढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शहरामध्ये पाणीगळतीच आणि पाणी चोरीच प्रमाण हे जवळ जवळ ३५ टक्के आहे. प्रशासना समोर ख-या अर्थाने कुठला प्रश्न असेलतर तो चोरीच प्रमाण आणि पाणी गळतीच प्रमाण आहे. पाणी गळतीच प्रमाण थांबवणे हा आपल्यासमोर ख-या अर्थाने खुप मोठा प्रश्न आहे. त्यासाठी केंद्रसरकारच्या योजनेतून अमृत योजनेची लाईन टाकण्याच काम चालू आहे. जुन्या लाईन बदलणे किंवा अनधिकृत नळ अधिकृत करणे. हे जे काम चालू आहे ते अतीशय संत गतीने चालू आहे. त्यामुळे आयुक्त साहेब आपण या गोष्टीकड प्राधान्याने लक्ष दयाव. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे शहरामध्ये पाणी विक्री केली जाते याची माहिती घ्यावी. ज्या ठिकाणी जार मध्ये पाणी विकल जातं तो जार सरासरी वीस ते पंचवीस रुपयाला शहरामध्ये कुठेही उपलब्ध होतो. हे पाणी त्यांना कुठून मिळतं याची देखील आपण आपल्या अधिका-या मार्फत चौकशी करावी. माझ्या मते हे पाणी घरातल्या अधिकृत नळ जोडाच्या माध्यमातून तो व्यावसायीक ते पाणी जार मध्ये घेतो आणि त्याची विक्री शहरामध्ये करतो आणि याच नुकसान महानगरपालिकेला होतं. याची देखील आपण चौकशी करावी. धरण शंभर टक्के

भरलेलं आहे, मा.महापौरांनी देखील जलपुजन केलेलं आहे. त्याठिकाणच शहराला व्यवस्थित पाणी मिळावं परंतु असं असताना देखील शहरातील पाणीप्रश्न ही खुप मोठी खंत आहे. काळेवाडीच्या वतीने याठिकाणी पाडळे ताईनी आपल मत व्यक्त केलं. आयुक्त साहेब आपल्या सारख्या जबाबदार आयएएस अधिका-यांनी जर अशाप्रकारे वक्तव्य केलं की काळेवाडीतन आम्हांला जास्त प्रमाणात उत्पन्न येत नाही त्यामुळ आम्ही त्याठिकाणी लक्ष देत नाहीत. आम्ही भारतात राहतो, आम्ही भारतीय नागरीक आहोत. आम्ही पिंपरी चिंचवडमध्ये राहतो आमची काळेवाडी पाकिस्तानमध्ये नाही. तरी आपण आमच्याकडन कमी उत्पन्न येत म्हणून काळेवाडीकड दुर्लक्ष करता ही अतीशय खेदजनक बाब आहे आणि मी या गोष्टी तीव्र शब्दात याठिकाणी निषेध व्यक्त करतो येत्या पाच ते सहा दिवसात पाण्याची स्थिती सुधारली नाहीतर याच काळेवाडीतील जनतेच्या वतीने आम्ही सभागृहावर किंवा या महानगरपालिकेवर मोर्चा आणू हे देखील अपल्याला नमुद करतो, धन्यवाद.

**मा.राजू बनसोडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच आमच्या भागाविषयी माईनी सांगीतल आहे. ७० टक्के स्लम ऐरीया आमच्या भागात आहे. त्याठिकाणी पाण्याचा प्रॉब्लेम चाललेला आहे. एक वाजता येणार पाणी चार चार तास पाणी येत नाही. त्याठिकाणी कामगार वर्ग आहे, सगळा झोपडपट्टी ऐरीया असल्यामुळ सगळा कामगार वर्ग तीथ आहे. ते कामाला जातात रात्री आडीच आणि तीन वाजता पाणी येत. याच्या अगोदरही प्रॉब्लेम होता पण एवढा नव्हता. आज एवढा कसा प्रॉब्लेम झाला. मला वाटतय की आमच्या प्रभागामध्ये जाणूनबुजून दुर्लक्षीत करताय का काय. अधिका-यांना सांगून तीन महीने झाले. ठेकेदाराला सांगून सहा महीने झाले आहेत. काम सुरु व्हायच्या पहील त्यांना आमच्या वॉर्डमध्ये गाडी मागवली होती. बजेट आहेना फुकट मागवतो की काय आम्ही. बजेट असताना एक गाडी दिली नाही. आमच्या प्रभागात एसआरए करण्यासाठी जर तुम्ही जाणूनबूजून दुर्लक्ष करत असालतर मी तुम्हांला सांगतो एक इंचही मी हालू देणार नाही मग तीथ जीव गेलातरी चालेल. जाणुनबूजून दुर्लक्ष केल जात. एवढे प्रोजेक्ट असताना का अधिकारी लोक काम करत नाहीत आमच्या प्रभागात. आम्ही जनतेतून निवडून आलो आहेत. आज आयुक्त साहेब तुम्ही आयएएस ऑफिसर आहेत तुम्हांला बोलणं उचित वाटत नाही. ही का परिस्थिती आमच्या भागात आहे. का नाही काम करत अधिकारी लोक आमच्या वॉर्डात. २०१८ मध्ये काम मिळालेली आहेत. एस. कन्स्ट्रक्शन ३३ टक्केच काम झाल आहे. दुसर एस.यूपी त्यांनी कामच सुरु केल नाही. तीसर पांडूरंग एन्टरप्रायझेस त्याच पण काम

पुर्ण नाही. मग यांचे बील कसे काय निघतात. काम पुर्ण न होता यांचे बील कसे काय निघतात. आयुक्त साहेब, हे जाणुनबूजून आमच्या वॉर्डा कड दुर्लक्ष चाललेल आहे. मी सुरवातीपासून तुम्हांला कळकळीने विनंती करुन सांगतो की तुम्ही आमच्या भागाकड लक्ष दया. तुम्ही व्हिजीट केली बघीतल त्या प्रभागामध्ये सर्वात मोठा स्लम ऐरीया आहे, झोपडपट्टी आहे. झोनिपूच्या अधिका-यांना सांगीतलतर हां करतो, बघतो अस चालल आहे. तुम्ही पण आदेश दिलेले आहेत तुमचे आदेश सुध्दा धुडकावून लावले आहेत. एवढया आठवडाभरात माझ्या वॉर्डातले प्रश्न सुटले नाहीतर याच्या अगोदर दोन वेळा आंदोलन झाले, एकदा गुन्हे दाखल झाले आहेत, गुन्हे कितीही दाखल झालेतरी फरक नाही पडणार. पण या पालीकेच्या गेटला ताला ठोकल्याशिवाय स्वस्त बसणार नाही. कुऱ्याचा आमच्या वॉर्डात प्रॉब्लेम नाही पण पाण्याचा आहे. आयुक्त साहेब तुम्हांला बोलण उचित वाटत नाही पण आम्हांला जनतेच्या प्रश्नाला उत्तर दयायला लागतं. ते विचारतात नां तुम्ही गेल्यानंतर तीथ काय करतात, झोपा, गोटया खेळायला जातात का. आयुक्त साहेब, तुम्ही जास्तीत जास्त लक्ष दयाव एवढीच विनंती करतो आणि थांबतो.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या तीन जीबी सलग तहकूब झाल्याबद्दल मला एका विषयाबद्दल बोलायच होतं मी मागच्या जीबीमध्ये बोलू शकलो नाही त्याबद्दल मला दिलगीरी व्यक्त करायची आहे. सस्पेन्डेट अधिका-यांना आयुक्तांनी कामावर परत घेतलं. तो विषय मी मांडला होता, आयुक्त साहेबांना मी बोललो होतो मी त्यादिवशी बोलू शकलो नाही. साहेबांना सर्वानी त्यादिवशी कोंडीत धरल गेल त्यासाठी मला त्यांची दिलगीरी व्यक्त करायची आहे. बाकी काही मला त्याच्यावरती चर्चा करायची नाही. त्यादिवशी माझी तब्येत ठिक नसल्यामुळे मी बोलू शकलो नाही. त्याचबरोबर प्रत्येकाच्या जिव्हाळयाचा पाण्याचा विषय आहे. आता माजी उपमहपौर मॅडम बोलल्या की आम्हांला सत्तेत असून सँडविच झाल्यासारख वाटतय. खरोखर असं वाटायला लागलय की उगीचच आलो इथ. स्वत:च सॅण्डवीच झाल्यासारख शंभर टक्के वाटतय. त्यासाठी फक्त अधिकारी वर्गच जबाबदार नाही. कुठतरी पदाधिकारी असतात ते पण जबाबदार आहेत. कांबळे सरांना प्रत्येकजण आता बोलतो पण तुम्ही आता ब-याच ठिकाणी पाहील त्या जे.ई.ला बीचा-याला बोलवल जात आणि त्याला कसल्याही शब्दामध्ये त्याचा मान-अपमान न ठेवता पाहीजे ते वधवून घेतल जातं. परंतु जे.ई., एक्झिक्यूटीव्ह आणि वरती बसलेले ईंजिनीअर्स असतील त्याच्याही पेक्षा वरती जे चालवणारे आहेत ते ही तीतकेच जबाबदार

आहेत. प्रशासन चालवायची जबाबदारी त्यांची आहे त्यांनी ते व्यवस्थीत चालवलतर मला वाटत या गोष्टी येत नाहीत. आता यामध्ये ताईनी सांगीतल नियोजनबध्दता, कुठली नियोजनबध्दता नाही. मी गेल्या दिड वर्षापूर्वी पाण्याच्या टाकीची अपेक्षा केली होती. मी पत्र दिल होत त्याच्यावरती मला सांगीतल की दोन ते तीन महीन्यामध्ये होईल. आजपर्यंत पाण्याच्या टाकीच नियोजन झाल नाही आणि त्याचा परिणाम हा आहे. माझ्या वॉर्डापुरत मी बोललोतर त्याचा परिणाम असंजर प्रत्येक वॉर्डामध्ये हा विषय घेतलातर तुमच्याकड स्टॉक करायलाच जागा नाही आज. तुमची २४X७ ची वाट लागलेली आहे. कशी वाट लागली आज २४X७ चा जो कोण ठेकेदार असेल त्या ठेकेदाराला कुणाचा अशीर्वाद आहे हे मला माहिती नाही परंतु त्या ठेकेदारामुळे आज नवीन पाईपलाईन टाकायची, त्याठिकाणी आज एवढी लोकसंख्या वाढलेली आहे, ती नवीन पाईपलाईन टाकायची आहे तर ती टाकू शकत नाही. आम्ही ज्यावेळेस अधिका-यांना बोलतो की साहेब, इथे पाण्याची लाईन टाकायचीतर त्यांचेकड ठेकेदारच उपलब्ध नाही. गेल्या दोन वर्षापासून मी चार पाच सोसायटयामध्ये पाण्याची लाईन टकायची म्हणतो परंतु ते म्हणतात की ठेकेदारच उपलब्ध होत नाही तो काम करु शकत नाही. मग अशा ठेकेदाराला का ठेवलय तो काही महापालिकेचा जावाई आहे का. जर एखादया ठेकेदाराला परवडत नसेलतर त्याच्यावरती त्याची चौकशी झाली पाहीजे आणि अशी परिस्थिती असताना ज्यावेळेस आम्ही कोणत्याही विषयाबद्दल जे.ई.ला फोन करतो त्या जे.ई.चा फोन सकाळी दहा वाजता ऑफच असतो. आम्हांला साडेपाचला फोन येतात ते फोन आम्ही अटेंड करतो. माझ्या प्रभागातले जे.ई.चे फोन लागतच नाहीत त्यांच्या हाताखाली प्लंबर आहेत, व्हॉलमन आहेत तेच बीचारे काम करतात. आमचे जे.ई. आठ वाजेपर्यंत झोपलेले असतात. पाणीपुरवठा विभागामध्ये काम करतात त्यांच मला अभिनंदन करायच आहे. तुम्ही बदल करायचा असेलतर जे.ई. पासून बदल करा. जास्त काळ एका ठिकाणी रहील्यामुळ त्यांना पण त्या पाणी विभागात काही भेटत नाही म्हणतात. आमचे सहकारी अंबरनाथ यांनी सांगीतल की काही ठिकाणी पाणीचोरी होते. चोरी काही ठिकाणी होत असेल काही ठिकाणी तो प्रामाणिक असेलतर तसाच राहतो आणि त्याला काम करायची ईच्छा राहत नाही त्यामुळ कामावरती परिणाम होतो. मा.महापौर साहेब, ज्यावेळेस आपल्याकड डिसेंबरमध्ये पाण्याची कमतरता होती त्यावेळेस जर तुम्ही तीथल्या स्थानीक नगरसेवकाला प्रभागात चार नगरसेवक असतात त्या नगरसेवकाला माहिती नसतानी जर मनानी पालीकेच्या हद्दीबाहेर पाणी देण्याचा ठराव करुन जर तुम्ही पाणी देत असालतर त्या ठरावाला

काय म्हणायच. गव्हूंजे हद्दीमधील पेनीनसूला कंपनी आहे पाणी कस करुन दिलं. आमच्या पैकी चारही नगरसेवकाना कुणालाही माहिती नाही. हे विचारल जात नाही त्यांना परस्पर ठराव करुन दिला जातो. आपल्याला पाणी कमी पडतय मग त्यांना का पाणी देता तुम्ही. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पाणी कमी पडतय मग बाहेर का देताय तुम्ही, त्याची चौकशी झालीच पाहीजे. असं का केल जातय. प्रत्येक ठिकाणी आता नवीन पाईपलाईन टाकल्या आहेत. मा.महापौर साहेब, माझ्या प्रभागामध्ये सर्व रोड चांगले झाले होते ते रोड आज देखील उकरायच काम चालू आहे. ते उकरल्यानंतर जे काम होतय, जे नवीन मीटर बसवले जातात त्या मीटरची अशी परिस्थिती आहे की आठ दिवसानंतर त्याची मीटर पासूनची लाईन तुटली जाते पाणी बंद केल जात त्याच्यानंतर तो ठेकेदार येवून काम करतो. प्रत्येक नागरीकाच्या मला लेखी तक्रारी हेत्या. आज रोड एवढे घाणेरडे झालेले आहेत त्याला जबाबदार कोण. या गोष्टीला माझा स्पष्ट विरोध होता. त्या कंपनीला का पाठीशी घातल जातं. किंवा त्यांचे जे सब ठेकेदार असतील त्यांना का पाठीशी घातल जातं. का मुद्दाम रोड खराब करायचे आणि परत महानगरपालिकेचा खर्च वाढवायचा. त्याच्यासाठी अगोदर नियोजन झाल पाहीजे. तुम्ही एक ठरावीक पिरीएड ठेवा कि पावसाळा झाल्यानंतर रोडच कामकाज, पाण्याच्या लाईनच कामकाज काय असेल ते करावे. तुमच्याकड नियोजन नसल्यामुळे ही परिस्थिती आहे प्रत्येकजण तुमच्याकड बोट दाखवतो. तुम्ही २४X७ किंवा डायरेक्ट पाईपलाईन घेणार म्हणून आजपर्यंत लाड पुरवत बसला. बंद पाईपलाईनच काय आजपर्यंत झाल, आज गेली पाच वर्षापासूनचा प्रश्न पेन्डीग राहीला आहे. हे होवू शकत नाही तोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही. दुसरा विषय मी मा.महापौरांना पत्र दिल होत काही प्रश्न विचारले होते. की आज जी पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. रोडारोडा प्रत्येक ठिकाणी टाकला जातो, नाल्यामध्ये टाकला जातो, नाले बुजावले जातात. आमच्या प्रभागामध्ये नवरंग सोसायटी, साईनगर तेथे नाल्यामध्ये बांधकाम झालेली आहेत. नालाच बंद झाला आहे तेथे लोकाच्या घरामध्ये पाणी शिरल होतं. पाच वर्षात पुरपरिस्थिती कधीही निर्माण होवू शकते. स.नं. ८३ किवळे, किवळे-रावेत सिमेवरती त्याठिकाणी नाला अक्षरशः बंद करायला आला आहे, त्या नाल्याच काय होणार आहे. तीसरा विषय भोंडवेनगरला प्रकाश भोंडवे म्हणून आहेत त्यांनी अक्षरशः पुर्ण नाल्याची पुर्वी काय परिस्थिती होती आणि आज काय परिस्थिती आहे कंम्प्लेटली नाला दाबला आहे. पुर्ण नाला बंद केलेला आहे. छोटी लाईन टाकून फक्त टेम्पररी काम केलेल आहे आणि त्याच्या बाजूला ओजस सारख हॉस्पिटल झालेल आहे. ज्यावेळेस

मोठया प्रमाणात पाणी येईल त्यावेळेस निश्चितच तुम्हांला सांगतो कात्रजला ज्यावेळेस शिंदेवस्तीला पुर्ण कुटूंब वाहून गेल होतं, जर असे ऍक्सिडेंट जर तुम्ही पाहणार असालतर या अपघाताना जबाबदार कोण असणार आहे. प्रत्येकानी आपआपल्या पध्दतीने नाल्यावरती अतीक्रमण केलेल आहे. अतिक्रमण जर होत असेल आणि आपल प्रशासन जर पाहत असेलतर याला काय पर्याय आहे. मी याच्यावरती शांत बसणार नाही मला याच्यावर उत्तर पाहीजे. आज भोंडवे कॉर्नरला जवळ जवळ पंचवीस मीटरचा नाला होता. आज पाच मीटरचा सुध्दा राहीलेला नाही. मग तीथ किती अतीक्रमण झाले असेतील हे तुम्हीच शोधायच आहे आणि सर्व अधिकृत बांधकाम आहेत. ओजस हॉस्पिटलची आज तीन मजली बिल्डींग झाली आहे त्याठिकाणी जर पुराच पाणी आलतर आणि सुर्या हॉस्पिटलसारख जर झालतर याला जबाबदार कोण आहे आयुक्त साहेब याच मला उत्तर पाहीजे. नाल्यामध्ये बांधकाम होत असेल, त्याच्या शेजारी बांधकाम होत असेलतर याला जबाबदार कोण आहे. मा.महापौर साहेब, दापोडीच्या विहार बद्दल तुम्हांला पत्र दिल होतं. दापोडीच्या विहाराच्या बॅकसाईडला पुर्ण भराव केलेला आहे, नदीमध्ये भराव केला आहे. त्या नदीच्या भरावामुळ त्या विहारामध्ये पाणी घुसल होत त्या विहाराच्या बाहेर ज्यावेळेस उभे राहीलो होतो ज्यावेळेस पुर आला त्यावेळेस त्या पुराच्या पाण्याला इतकी धार होती की अक्षरशः माणसाचा तोल जात होता. मला वाटते आशाताई आणि राजू बनसोडे आणि माईताईनीही पत्र दिलं होतं, ती सुरवात केली त्याच्यानंतर पाऊस चालू झाला. जर हा हजारो टनाचा भराव होत असेलतर, तो काही एका दिवसात होत नाही, तोही चार पाच सहा महीन्यापासून भराव झालेला असेल. तो भराव टाकणा-यावरती काय कारवाई केली. त्यासाठी या प्रश्नावरती कारवाई झाली पाहीजे. अशा ठेदारावरती कारवाई झाली पाहीजे. आणि नाल्याच्या बाजूला तुम्ही परवानगी देत असालतर अशा परिस्थितीला आयुक्त साहेब कम्प्लेटली प्रशासन आणि तुम्ही जबाबदार आसाल. किवळयाच्या पुढे एका ठिकाणी ड्रेनेज लाईन नाही. मा.महापौर साहेबांना मी फोटो दाखवले होते. पावसाळयात पाणी वरती येत. त्याच्यानंतरही त्याठिकाणी त्याला परमीशन दिली गेली. त्याच्यानंतर त्या ड्रेनेज लाईन जोडल्या गेल्या आणि त्या सुध्दा ओपन आहेत. साईनगरमध्ये ड्रेनेजच्या ओपन लाईन आज सुध्दा आहेत. कॅण्टोन्मेंट हद्दीमध्ये कॅण्टोमेन्टच्या तीथन आज किवळे ते शितळानगरचा भाग आहे संपुर्ण ड्रेनेजच पाणी ओपन सोडलेल आहे याला जबाबदार कोण आहे आणि याच्यावर कारवाई होत नाही. जस ब-प्रभागात चालत अधिकारी येणार, जाणार महीन्यातून एक मिटींग होते कोणीही दखल घेत नाहीत. मला असं वाटतय जनरल

बॉडीचा पण असाच विषय आहे. आज नागरीकानी निवडून दिलं आहे, नागरीकांसाठी काम करायच आहे राजीनामा तुम्हाला दयायचा नाही. पण नागरीकांच्या हिताच जर काम आपण करु शकत नसूतर याठिकाणी आम्हांला राहण्याचा अधिकार नाही आणि या सत्तेत राहण्याचा अधिकार नाही असं मला ठामपणे सांगाव वाटतय. मी फक्त जनतेसाठी आलो आहे मी कोणत्याही पक्षाचा बांधील नाही. नाल्यावरचे अतिक्रमण थांबवावे आणि त्यावर पुर्णपणे कारवाई करावी. अन्यत: त्या अगोदर जर कारवाई नाही झालीतर मला स्वत:ला त्याच्यावरती इथच अंदोलन म्हणून उपोषणाला बसाव लागेल असं मी आपल्याला चॅलेंज देतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपण गेली तीन तास झाले पाण्यावरती चर्चा करतो. आठ नऊ महीन्यापुर्वी आयुक्त साहेब तुम्हांला प्रेझेंटेशन दयायला लागल होतं. आडीच ते तीन तास तुम्हीच पाणी प्रश्नावरती बोलला होता. तुम्ही म्हणाला होतात की भामा-आसखेडचा प्रकल्प मार्गी लागलेला आहे, आपण त्यांना पैसे दिले आहेत. जगताप साहेबांना स्वत: मी साहेबांना देहू एसटीपीच्या तेथे घेवून गेलो होतो, तीन वेळा घेवून गेलो. त्यांना जागा दाखवली, शंभर एमएलडी पाणी आपल्याला तेथून उचलायच आहे. जागे संबंधात मी तुम्हालाही भेटलो होतो, एक वर्ष झालं अजून आपण त्याच्यावर कारवाई केली नाही. निकम साहेब मला म्हणाले की बिल्डर लोक ती जागा आपल्याला घेवून देणार आहेत. मग महापालिका काय ठेकेदारांना पैसे देण्यासाठी पोसतय का. बिल्डर लोकांनी जागा घ्यायला पैसे दयायचे, बांधायला बिल्डर लोकांनी पैसे दयायचे, महापालिका बिल्डरकडन डेव्हलपमेंट चार्ज घेते. प्रत्येक स्वरुपात महापालिका बिल्डरकडन पैसे घेते आणि तुम्ही अधिका-यांना पैसे वाटता आणि अधिकारी ठेकदाराना वाटतो. आज तांबे साहेब जे विषय नंबर वन आहे, एक दिवसाचे मुख्यमंत्री केले, मी मागे सभागृहात बोललो होतो तुम्हांला, म्हणजे एक दिवस चार्ज दिला आणि दुस-या दिवशी आयुक्त साहेबांनी चार्ज काढून घेतला. तांबे साहेबाकड ह,ग,ड आणि फ प्रभागाचा चार्ज आहे, एकाच ठेकेदाराला ते काम देतात. ९० टक्केच्या वरती त्या ठेकेदाराला काम आहे. आज परिचालन म्हणून त्या ठेकदारानीं बारा टक्के बिलोनी काम भरलय. इ आणि ड आणि अजून एक संबंधित प्रभाग तीथ २७ टक्के, ३२ टक्के आणि ३० टक्केनी काम भरलयं. जर व्हॉल ५० हजारात भेटत असेलतर ३० टक्के बिलो गेल्यास ३५ हजार त्याची किमंत झाली, एका व्हॉलची. समजा तुमची ओळख आहे हजार दोन हजार कमी होवू शकतो. तुम्हांला तो डायरेक्ट ३५ हजाराला

व्हॉल देणार का. म्हणजे पाणी कुठेतरी मुरतयनां. ३८ टक्के काम झालय म्हणता ते कशामुळ झाल, एकच ठेकेदार सगळीकड काम करतोय आज जर त्या ठेकेदारांनी पाणीपुरवठयास वेठीस आणायच ठरवलतर ठेकेदार कुठला आहे, कुणाचा आहे, कुणाच्या माध्यमातून काम करतोय. आता मगाशी सावळेताई म्हणाल्या की दर वेळेस इलेक्शन आले की हा घोळ चालू होतो. मागच्यावेळेला लोकसभेच्या वेळेस पाण्याचा विषय आला, आता विधानसभा आहेत पाण्याचा विषय आला. इथ बीजेपी-शिवसेनेची सत्ता आहे मग हे जाणुनबूजून दोन तीन आमदार अडचणीत आणायच काम करायच आहे का यांना. याच्या माग कोण आहे, आज आठ प्रभागामध्ये पाण्याचे टँकर पुरवणे प्रत्येक प्रभागाला तीन अशा हिशोबान तुमच टँकरच टेंडर आहे. त्या ठेकेदाराकडे तीनच टँकर आहेत आणि आठही प्रभागाचे टेंडर त्यालाच आहे एक टक्के बिलो ही कुठली सिटींग आहे. का तुमचे अधिकारी संबंधित ठेकेदारला पार्टनर आहेत का आणि असतीलतर किती टक्क्यानी. इथ आम्ही येतो आम्हांला पंधरा हजार रुपये मानधन भेटतय त्याच्यावरती अमच चांगल चालल आहे. एक मिटींग अटेंड केली की आम्हांला महीन्याला पंधरा हजार रुपये. मग या अधिका-यांनी जर एवढे बाकीचे उदयोग करुन जर पैसे कमवलेतर, आयुक्त साहेब तुम्हांला आडीच वर्षे झाले आम्हांला पण झाले आहेत. तुम्ही आल्यापासून या शहरात डेव्हलपमेंटच दिसेल असं काम अजून पण झालेल नाही आणि आमच्या माध्यमातून पण झाल नाही आणि तुमच्याही नाही झाल. मंजुर झालेली काम आहेत ठिक आहेत पण ते अजून फाईलमध्ये आहेत आहो, पण हे किती दिवस अजून फाईलमध्ये. शंकरराव शेलार ही व्यक्ती मावळ पाणी पाईपलाईन पुरवठयामध्ये ती जी काही केस उभा केली बाकी गोष्टी माझे ते नातेवाईक आहेत मी एक दिड वर्षापुर्वी आमच्या नेत्यांना पण बोललो, आठ दिवसापुर्वी पण एका कार्यक्रमात भेटले मी म्हणालो मामा काय प्रॉब्लेम आहे तुम्हांला. ते म्हणाले आमचा पाईपलाईनला प्रॉब्लेम नाही, विरोध नाही तुम्ही धरणाच्या खालून पाणी नका घेवू धरणाच्या बाहेर तुम्ही एक डब्ल्यूटीपी करा तीथन पाणी पंप करा बरोबर आहे त्या माणसाच पण. आज पुण्यामध्ये जी नदी आहे तीथ डायरेक्ट पाईपलाईन केली त्या नदीला गटारच पाणी बाकीच्या गोष्टीमुळ ती नदी झाली प्रदुषीत. पानशेत मधुन डायरेक्ट जलशुध्दीकरण केंद्रावर जात तीथून ते चालू आहे. ती नदी जर पानशेत पासून पुढ बघीतलीतर पुर्ण गटारगंगा झालेली आहे. जे काय पाणी येतय ते ड्रेनेजच पाणी त्या संबंधीत नदीत येत. जर पक्षाच्या माध्यमातून सगळेजर बोललेतर आणि बाकीच्या गोष्टी त्यांना समजून सांगीतल्यातर की बाबा मी इथ एक संप करतो संपच्या

माध्यमातून डब्ल्यूटीपी करुन आम्ही ते पाणी पंप करतो आणि तुम्ही धरणाच्या आतन पण पंपच करणार आहेत. डायरेक्ट ग्रॅव्हीटीन पाणी अणणार नाहीत आणि आणणार असालतर तस सांगाव. उगच इथ नऊ दहा वर्षे झाल पाईपलाईनच भीजत घोंगड ठेवल आहे. ते पाईप पण गंजले आहेत. महापालिकेनी २०० कोटी त्या ठेकेदाराला दिलेपण. काळया यादीत टाकायच नंतर महापालिकेनी कॅन्सल केलं. आज आपल्याला भामा-आसखेडमधून २५० एमएलडी पाणी मंजूर आहे. जर मी तुम्हांला सांगीतल त्याप्रमाणे जर केल असततर सात किली मी. पाईपलाईन करुन तळवडेमध्ये आणली असती, चार गावांचा प्रश्न होता १०० एमएलडी म्हणजे १० कोटी ली. पाणी झाल. चार गावचा प्रश्न मिटला असता तळवडे पासून च-होली पर्यंत. आपण आता कुठला पाणीपुरवठा करतो म्हणजे रावेत मधुन निगडीला आणतो निगडीमधुन वरच्या भागाला देतो त्यापेक्षा त्यांचच पाणी त्यांना झाल असतं. आज आपण ४८० एमएलडी पाण तीथन उचलतो. एमआयडीसीच धरलातर टोटल ५३० एमएलडी पाणी वाचतय आणि ३८ टक्के आपला एमआयडब्ल्यू आहे. ते पाणी मुरतय कुठ. ते पाणी मुरतय एकच ठेकेदार एकच पंप ऑपरेटर, एकच पंप चालक, एकच व्हॉलमेन त्याला सगळीकडचे काम तो लावतोय तीकड भोसरीच्या ऐरीयात, भोसरीमधला खराब झाला की तीकडून आणतो इकड. रिपेअरींग करायचा आणि लावायचा. आज प्रत्येक पाण्याच्या टाकीवरती सिक्यूरीटी किती आहे काय आहे. तीन प्रकारचे टेंडर आहेत, तीनची तीन टेंडर त्याला. आहो, आपण महापालिकेच्या माध्यमातून ठेकेदार पोसतोय. रोजगार प्रत्येकाला भेटला पाहीजे. एकच माणुस तीन जणांच काम करतोय दोन जणाचे पगार आपले असेच चालले आहेत. आता नदी सुधार चालू आहे साहेब तुम्हांला मी त्या दिवशी पण बोललो, पत्र दिलं तुम्हांला सांगीतलही कि आपल्या महापालिकेच्या माध्यमातून अमृत मधुन १४८ कोटीच काम करतो ७० ते ८० कि.मी. काम ऑलरेडी महापालिकेच्या खर्चातून केलेलं आहे. आता कुलकर्णी साहेबांनीतर नवीनच शोध लावला, आहो आपला डीपीआर मंजूर नाही, आपल्याला परमीशन नाही, आपल क्रॉस सेक्शन नाही, आपली मोजणी नाही, आपण मोजणीच चलन भरल नाही अजून. आपण टेंडर प्रक्रीया राबवून मोकळ झालोत. ९६ कोटी पवना आणि ४७-४८ कोटीच इंद्रायणी नदी. कर्जरुपाने आपण २०० कोटी काढलेले आहेत मग ते असे खर्च करायचे का. आज निती आयोगामध्ये आपल्या राज्यशासनाने प्रस्ताव दिला आहे की १७ नदया आम्हांला शुध्दीकरण करायच्यात. पवना आणि इंद्रायणीनदी त्याच्यामध्ये आहेतना. त्याच्यापेक्षा वेगळ काय करायची गरज आहे. कुलकर्णी नऊ ते दहा वर्षे झाले आलेले आहेत

त्यांनी नदी सुधारबाबत काय केल आजपर्यंत. निवडून आल्यानंतर मी पहील काय काम केल असेलतर पंप हाऊस वरती गेलो होतो. डायरेक्ट पंपाच पाणी नदीत चालल होतं. स्काडा यंत्रणा आहे ती कधी चालू आहे. पाण्याच्या बाबतीत म्हणल स्काडा यंत्रणा आम्ही एवढ करतो आणि आम्ही एवढ देतो. असे अधिकारी जर पदावरती ठेवलेतर कधीही या शहराच कल्याण होणार नाही. तांबे असु दयात नाहीतर कुलीकर्णी असु दयात त्यांची पहीली खातेनिहाय चौकशी करा की यांनी नेमके काय काय उदयोग केलेले आहेत. या गोष्टी थांबवायच्या असतीलतर अधिका-यावरती साहेब तुम्ही तुमच्या नियमांन पहील कंट्रोल करा मी तुम्हांला माग पण सांगीतल आहे. तुम्ही हेड ऑफ द डिपार्टमेंट आहात, जबाबदारी तुमची आहे. नाहीतर आम्ही येथे येतो, थांबतो, चाललो हे नाही चालणार. आम्हांला आमची योग्य भूमीका घ्यावीच लागेल त्यासाठी आम्हांला जिथ जाव लागेल तिथ आम्ही जाणार आहेत. मला कोर्टात जरी जायला लागलतरी मी जाणार एवढ बोलून थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जवळ जवळ तीन तास झाले पाणी या विषयावर चर्चा सुरु आहे. माजी उपमहापौरांनी कळकळीने संभाषण केल. साहेब, चार दिवसापुर्वी आमच्या वॉर्डात मी असेल, अमीत गावडे असतील आमच्या प्रभागातील लोक तुम्हांला भेटून गेलीत, तुम्ही त्यावेळेस शब्द दिला होता. महापौरांनी ज्यावेळेस धरणाची जावुन पुजा केली, आम्हांला वाटल की जलपुजन झाल त्याच्या अगोदर सन्मा. खासदारांनी पुजा केली होती त्यावेळेस आम्हांला वाटल होत की आता सुजलाम सुफलाम होईल. खर साहेब, पुजा झाल्यानंतर निम्मा घोटाळा झाला. मा.महापौर साहेब, वैनी साहेब पण तुमच्या बरोबर होत्या, तुम्ही तीथ जावुन प्रॉपररीत्या जलपुजन केलं, आम्हांला बरं वाटल. साहेब, तुम्हांला सर्व माहिती आहे काय अडचणी तुम्हांला आल्या. ज्यावेळेस मा.महापौरांनी पाण्याच्या संदर्भामध्ये मिटींग लावली होती त्यावेळेस मी पण तीथ होतो. काय अडचणी आहेत माहिती नाही, आडीच वर्षामध्ये या शहराची अशी किती लोकसंख्या वाढली. आडीच वर्षापुर्वी हे पुर्ण पाणी सर्व लोकांना व्यवस्थीत मिळत होतं. अडीच वर्षामध्ये असं झालं काय. आज पाणी पाणी करुन आतातर मी म्हणतो आजतर प्रशासनाकडन पाणी येतं. सारखाच शिपाई येतो पणी देतो, पाणी पाजतो. पाणी पाजू पाजू मारले साहेब, कन्टीन्यू पाणी. तीथ लोकांना पाणी नाही. तुम्ही नवीन सिस्टीम सुरु केली, आता आम्हांला अडचणी माहिती आहेत मगाशी सर्वानीच सांगीतल की अधिका-यांना पाणीपुरवठयामध्ये काम करत असताना, त्याठिकाणी काम करायला कोण अधिकारी लवकर तयार होत नाहीत. त्यामध्ये

लडकत साहेबांच मी अवर्जून नाव घेईल साहेब, मला वाटत नाही की ते तुमच्याकड आले असतील की मला बिल्डींग परमीशनला टाका किंवा मला टाऊन प्लॅनिंगला टाका. त्या माणसाने मनापासून या शहरात पाणीपुरवठयामध्ये काम केल साहेब, कधी त्यांना आवाज दया आमच्या प्रभागामध्ये चांगल्या पध्दतीने ते काम करतात. पाडळे ताईनी त्यांची खंत वेगळया पध्दतीने मांडली. साहेब, हे सर्व माहीती असताना तुम्ही याच्या पलीकडे जावुन नक्की काय करणार आहेत ते सांगा. बंद पाईपलाईन योजनेच्या बाबतीतही सर्वजण बोलले. भामा-आसखेड बाबतीत तर आमच्या सहकारी मित्रांनी संदिप वाघेरेनी एवढी चांगली संकल्पना भामा-आसखेडचे पाणी उचलण्याच्या बाबतीत दिली होती. काही कल्पना लोक मांडतात. मुलभूत गरजामध्ये पाणी हे सर्वात महत्वाची गोष्ट आहे. पाण्याच्या संदर्भात रावेत गावातून भोंडवे यांच्या प्रभागातून पाणी उचलतो. ते तांबे साहेब, म्हणतात की ग्रॅव्हीटीने पाणी आम्ही खाली नेतो. त्यामध्ये आमच्या जवळ पाणी असून आम्हांला सुध्दा पाणी डिस्टर्ब झाल आहे आज पेपरला बातमी पण आहे. हे सर्व होत असताना आडीच वर्षात साहेब, असं काय घडल. मगाशी सिमाताई पण काही गोष्टी बोलून गेल्या जे सत्य आहे ते साहेब सत्य आहे. साहेब या राष्ट्रवादीच्या कारकीर्दीमध्ये जो काही विकास झाला त्याच्यामुळ या पिंपरी चिंचवड शहरात लोकांची आवक वाढली. लोकसंख्या वाढीमुळ जर हा पाणीपुरवठयात खंड आला असेलतर साहेब, तुम्ही नवीन बिल्डींग परमीशन पहील बंद करा. मध्यंतरी तो काहीतरी उदयोग तुम्ही केला होता. परत चालू झाल, कुणाच ऐकल आणि कुणाच नाही आम्हांला नाही माहिती. परवा म्हणाला होतात की रेडझोनमध्ये असलेल्या नवीन बांधकामाच्या लोकांना सर्व्हीस देणार नाही, चांगली गोष्ट आहे. पण जे मुळ पहील्यापासून राहतात त्यांना आपल्याला सर्व्हीस देणं बंधनकारक आहे. सर्वात पहील तुम्ही नवीन प्रोजेक्टला मंजूरीच देवू नका. खुप मोठमोठे प्रोजेक्ट या शहरामध्ये आले आहेत, शहर सोडून आपण लांब सुध्दा पाणी दिल आहे. साहेब, आपल्या पिंपरी चिंचवड मधली जनता पाण्यावाचून वंचित व्हायला लागली आहे. पाणी, पाणी करुन मगाशी उपमहापौर बोलल्याना साहेब, आता त्या सत्तेत आहेत त्यामुळ त्यांना जरा जास्त त्रास झाला. रोज सकाळी साडेपाच ते सहालाच पाण्याचा फोन वाजल्या जातो. सकाळी आठ वाजता पाणी दिल्यानंतर सकाळी आवरुन जाणारा कामगार वर्ग आहे तो कधी आवरणार. साहेब, तुम्हांला सगळया गोष्टी माहिती आहेत तुम्ही त्या दिवशी म्हणत होतात की एक दिवसाआड पाणी चालू होत तेच बरोबर होतं. लोकांना तेवढयातरी प्रेशरनी पाणी मिळत होतं, आम्ही पण त्या गोष्टीला

ऍंग्री होतो. कुठल्याही  नगरसेवकांना त्रास नव्हता असं ब-याच नगरसेवकांनी आपल म्हणण सभागृहामध्ये मांडल होतं. लोकांना एका दिवशी पाणी देत होतो आणि उरलेल्या लोकांना दुस-या दिवशी पाणी देत होतो. २४X७ बाबत तुम्ही आम्हांला स्टॅण्डींगला रिक्वेस्ट केली की मी त्यावेळेस स्टॅण्डींगमध्ये हा प्रस्ताव मांडला होता. आपण साहेब, पावसाळयाच्या आगोदर शहरातली सर्व खोदाई बंद करतो. काही शासनाचे नॉर्म्स असल्यामुळे तुम्ही सांगीतल की त्यांना काम करुन दिल पाहीजे. नाहीतर ही योजना आपल्यातून जाईल त्यामुळे तीथही आम्ही तुम्हांला सहकार्य करण्याची भावना केली साहेब. जीओ पण खोदतय, पाणी पुरवठयाचे २४X७ पण खोदतय. सगळी खोदाई पावसाळयात सुध्दा चालू आहे. साहेब, १५ तारखेनंतर आपण खोदाई बंद करत होतो, कधीही कोणी येतं कुठलीही मशिन लावतय, अधिका-यांना विचारलतर ते स्मार्ट सिटीच आहे म्हणतात. आमच्या प्रभागामध्ये स्मार्टच जे काही करतायना साहेब त्या स्मार्ट मध्ये तीथले स्थानीक एक्झिक्यूटीव्हला किंवा तीथल्या जे.ई.ला माहितीच नाही साहेब, की तेथे स्मार्टची खोदाई होते म्हणून. ज्यावेळेस मी जे.ई.ला फोन केला की बाबा ती काय मशीन लावली ती बघ, तो रहदारीचा रोड आहे. आनंद हॉस्पिटल चौकात साहेब रात्रीच्या ११ वाजता आणून मशीन लावली आणि ती एवढी मोठी एक तर तो रहदारीचा रस्ता आहे. तुम्ही पण साहेब तेथून जाता त्या बोगदयातून तुम्ही पाहील असेल तो जो टनल आहे आमचा त्या टनल मधन आज किती गर्दी असते. संध्याकाळी ६ नंतर त्या मुकाई चौकात पोहचेपर्यंत जवळ जवळ वीस ते पंचवीस मिनीटे लागतात. हे सगळ होत असताना त्यांना माहीती नाही साहेब, ही कुठली पध्दत आहे. साहेब, स्मार्ट स्मार्ट करुन हे शहर साहेब, माफ नाही करणार. ज्या मुलभूत गरजा आहेत त्या देणं फार बंधनकारक आहे. याच्या अगोदर कच-याची पण अशीच वाट लावून तो कचरा कुठेतरी आता आटोक्यात आला. अजूनही थोडफार आहे त्याच्यामध्ये तुम्ही मेहनत घेतली. तुम्ही जे केल होत ते टेंडर त्यावेळेस व्यवस्थित होतं. आज दुपारी ११ वाजता काही नगरसेवकांनी आम्हांला बोलून घेतल की ते म्हणत होते की पब्लिकला अवेरनेस येण्यासाठी तुम्ही हे केल पाहीजे होतं. त्यावेळेस तुम्ही सांगीतल की अवेरनेस हा प्रकार होता तो काढून टाकाला गेला. ज्या गाडीवर दोन कर्मचारी होते ते काढून एक केला गेला साहेब, याचा किती त्रास झाला. जवळ जवळ कचरा कचरा करुन लोक दोन महीने ओरडत होती. आजही त्यातली थोडीशी ब-यापैकी परिस्थिती सुधारली नाही म्हणणार नाही. काही त्रुटी आहेत. काही त्यांच्या गाडया येणार होत्या आम्हांला आज कळल की आता गाडया आल्या म्हणून. साहेब तुम्ही जी ऍक्शन घेतली

त्याला ठाम नाही राहू शकले. तुम्हांला या सत्ताधारी मंडळीने ते करुच दिल नाही. आम्ही तुमच्या बरोबर दोन वर्षे स्टॅण्डींगला काम केल आहे साहेब, काही गोष्टींचा खुलासा तुम्ही आम्हांला तीथ केलेला आहे. ज्यावेळेस एखादा चांगला निर्णय होत असेलतर त्या जागी साहेब, तुम्ही ठाम रहा तुम्ही कुणाचच ऐकू नका साहेब. तुम्ही जो ठरवाल तो निर्णय घ्या, कशालाही तुम्ही बळी पडू नका साहेब. आम्ही तुमच्या बरोबर काम केलेल आहे आम्हांला प्रत्येक गोष्टीचा तुम्ही खुलासा केलेला आहे. आज एक दिवसाआड पाणीपुरवठा थोडासा, पुरस्थिती झाली त्यामध्ये सांगवी असेल, दापोडी असेल, पिंपळेनिलख असेल हा सगळा भाग पाण्यामुळे व्यापला नागरीकाना त्रास झाला. लोक काय म्हणतात पाऊस पडला आणि आम्हांल पाणी का नाही. लोकांना समजून सांगण्यासाठी पाण्यासाठी दिवसभर नगरसेवकांचे फोन वाजतात. आज सत्ताधारी मंडळी सुध्दा काय पाण्याच्या बाबतीमध्ये बोलतात साहेब, पईलवानतर म्हणले बिल्डींगवरुन कुणालातरी टाकून देईन, साहेब, हि परिस्थिती आली आज. हे पोटतीडकीने बोलतात. मग तो कुठल्याही पक्षाचा असू देत. तो नागरीकांना सुविधा देण्यासाठी प्रत्येकजण इथे आलेला आहे. पक्ष वगैरे साहेब तो पार्ट वेगळा आहे. ज्यावेळेस तो सभागृहात येतो त्यावेळेस शहराच्या दृष्टीकोनातून जे चांगल काम करतील त्या प्रयत्नात प्रत्येकजण असतो. पाण्याच्या संदर्भात आडीच वर्षात असं घडल काय. दहा वर्ष आमचा पाणीपुरवठा सुरळीत होता. या शहरातील नागरीक पाण्याच्या बाबतीमध्ये समाधानी होता. मा.महापौर साहेब, तुम्ही पण त्यावेळेस सभागृहात होतात त्यावेळेस तुमच्या प्रभागामध्ये सुध्दा प्रॉब्लेम पाण्याचा नव्हता. आता तुम्ही पुजा केल्यानंतर मला अपेक्षा होती की माझे मित्र महापौर झाले माझ्या मित्रानी पुजा केली. पुजा केल्यानंतर वाटल होत की आता टेन्शन मिटल. मा.महापौर साहेब, आज तुम्हांला निर्णय घ्यावा लागेल कारण आज जी लोक बोललीतना ते कृत्य करायला या नगरसेवकांना, या शहराला भाग पाडू नका. शहर तुम्हांला पाण्याच्या बाबतीत खरच माफ करणार नाही. एखाद काम कमी होवू दयात पण पाण्याच्या बाबतीतला जो निर्णय आहेना तो मा.महापौर साहेब, तुम्ही खरच घ्या. माझी अशी तुम्हांला विनंती आहे की नवीन बिल्डींग परमीशन देवू नका. जेवढी लोक या शहरात आता राहतातना त्या लोकांना तुम्ही पहील्यांदा सर्व सुविधा दया. आता परत तुम्ही २० कोटीच्या डस्टबीन घेणार आहेत. त्या संदर्भात नागरीक तुम्हांला भेटणार आहेत. पाण्याच्या बाबतीत माझी कळकळीची विनंती आहे आणि मगाशी बोललो आहे की तुमचे निर्णय खुप चांगले आहेत, तुमच्या डोक्यात चांगल प्लॅन आहेत त्या प्लॅनला जर कोण डिस्टर्ब करत असेलतर तो प्लॅन

डिस्टर्ब होवू देवू नका. तुम्ही तुमच्या प्रमाणेच काम करा साहेब, नक्कीच शहराला चांगल्या सुविधा मिळतील, धन्यवाद.

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त,सन्मा.सभागृह गेली ३/४ तास अतिशय पोटतिडकीने चर्चा चालू आहे. ब-याच सदस्यांनी आपआपल्या समस्या मांडल्या. आयुक्त साहेब याचं मुळ कारण शोधल गेल पाहिजे. ही परिस्थिती एक,दोन वर्षात झालेली आहे असे नाही. ज्यावेळेस प्रथमत: २०१७ मध्ये मी महापौर झालो त्यावेळेस आम्ही आयुक्त साहेबां बरोबर प्रभागामध्ये दौरा केला त्यावेळेसच सांगितलो होतो की, आता जी परिस्थिती उद्भवली आहे त्याच्यापेक्षाही जास्त वाईट परिस्थिती होईल. आयुक्त साहेब आपण जवळ जवळ ४८० एमएलडी पाणी उचलतो,एमआयडीसीचे १०० एमएलडी पाणी उचलतो. परंतु हे पाणी मुबलक असताना आपण प्रत्येक प्रभागामध्ये प्रत्येक टाकीला पाण्याचे नियोजन कसे केले गेले आहे हे सर्व सभासदांना सांगितले गेले पाहिजे. राजू मिसाळ यांनी सांगितले की पाण्याची परिस्थिती दोन /अडीच वर्षामध्ये बिकट झालेली आहे. अहो असे नाही,आम्ही सुध्दा गेली ५/७ वर्षापासून आम्ही पाण्यासाठी पोटतिडकीने भांडत आहोत. आता कोणाला दोष देऊन जमणार नाही. पाण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम केलं पाहिजे.कारण पाणी नाही आलं तर शहराची वाईट परिस्थिती निर्माण होईल. आज आमच्या प्रभागामध्ये पाहिलं तर सगळयाच समस्या वाढलेल्या आहेत आज चिखली पासून मोशी असेल, च-होली असेल एकदम शेवटचा पॉईंट आम्ही ठरतो. तीन ठिकाणी पंपींग करतो कुठल्याही एका पंपामध्ये बिघाड झाला तर त्याचा फटका आम्हांला बसतो. दुस-या पंपींगमध्ये बिघाड झाला तरी आम्हांला फटका बसतो,तिस-यामध्ये बिघाड झाला तरी आम्हांला फटका बसतो. सगळयात जास्त त्रास होत असेल तर मोशी असेल,च-होली असेल या चार /पाच गावांनाच जास्त त्रास होतो. ज्यावेळेस आम्ही कुठल्याही अधिका-यांना फोन केला तर सांगतात की,वरुनच पाणी टाकीत आलेले नाही काही ठिकाणी तर रात्री १२ ते १२.३० वा. पाणी येते लोकांनी कधी पाणी भरायचे आणि कधी झोपायचे अशी परिस्थिती आहे. तरी आपल्याला विनंती आहे की, पाण्याच्या संदर्भात योग्य नियोजन करुन यातून मार्ग काढावा. धन्यवाद.

**मा.राजेंद्र गावडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण याठिकाणी पाणी प्रश्नावर चर्चा करीत आहोत. परंतु याठिकाणी विरोधाभास असाही आहे ते तुम्हांला सांगतो. ज्यावेळेस आपण एक दिवसा आड पाणी पुरवठा करीत होतो त्यावेळेला अशी समस्या निर्माण झालेली नव्हती. मी अधिका-यांशी चौकशी केली की,त्यावेळेला सांगितले की,

पाण्याची मागणी वाढली महापौर साहेब,तीन महिन्यामध्ये अशी किती मागणी वाढली की,शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला. आणि मला तर शक्यता हीच वाटते की, जाणीवपूर्वक ही समस्या निमार्ण केलेली आहे. आता निवडणुका आलेल्या आहेत आणि याचा कोणाला तरी फायदा करुन घ्यायचा आहे. मगाशी ताईंनी सांगितलं की, प्रत्येक निवडणुकीच्या वेळेसच ही समस्या का उद्भवली आज शहरातील नागरीक सुध्दा आम्हांला हेच विचारतात की, दिवसा आड पाणी देत होता त्यावेळेस व्यवस्थित देत होता. आता पाऊस भरपूर झालेला आहे तरी ही समस्या का उद्भवली.तर यामध्ये नक्कीच ही समस्या जाणुनबूजुन केलेली आहे. आणि आता काही जणांनी सांगितले की,नवीन बांधकामांना परवानगी देऊ नका पण हा त्यावर तोडगा होऊ शकत नाही. कारण शहराचा जो एरिया आहे तो दिवसेंदिवस वाढतो आहे. आणि याठिकाणी विविध रोजगारासाठी नागरीक या शहरात येणारच आहेत यासाठी आपण नवीन बांधकामांना परवानगी द्यावी. याच्या व्यतिरिक्त आपण पर्यायी व्यवस्था करु शकतो काय? याच्यावर विचार केला गेला पाहिजे.आता आपण आंद्र धरण,भामा आसखेड धरणामधुन पाणी घेणार आहोत परंतु काही दिवसांनी हे ही पाणी आपल्याला कमी पडणार आहे. आपल्या शहरामध्ये किती खाणी आहेत त्या खाणीमध्ये पावसाळयामध्ये साठलेले पाणी आपण वापरु शकत नाही का? त्या पाण्याचा वापर करण्यासाठी त्याठिकाणी छोटे डब्ल्यूटीपी लावले आणि त्या पाण्याचा वापर केला तर खुप मोठया प्रमाणावर पाण्याचा वापर होईल त्यावर आपण विचार केला गेला पाहिजे.कारण आपण पाणी कमी पडतय म्हणुन यावर सर्वांनी चर्चा केली. परंतु यावर तोडगा काय काढायचा याच्यावरती विचार केला गेला नाही. कारण आपल्याकडे काही स्त्रोत आहेत त्याचा आपण वापर केला गेला पाहिजे. किती खाणी आहेत त्यातल्या पाण्याचा आपण वापर करु शकतो का याचा विचार केला गेला पाहिजे. या खाणीचा वापर कशासाठी करतो त्या खाणीमध्ये बाहेरचा राडारोडा टाकलेला आहे कदाचित त्या खाणीतील पाण्याचा वापर आपल्याला करता आला असता. कारण नागरीकांना पाणी देणं हे आपलं कर्तव्य आहे. यावर आपण सर्वांनी सहानुभूतीने विचार केला गेला पाहिजे. भविष्यामध्ये सुध्दा आपल्याला पाण्याशिवाय जीवन नाही. म्हणुन आपल्याला पाणी कुठून,कुठून घेता येईल याचा आपण विचार केला गेला पाहिजे.पवना धरणाची उंची वाढविण्यासाठी आपण शासनाकडे जाऊन आपला निधी त्यांना देऊन त्यामुळे धरणाची उंची वाढविता येऊ शकत असेल तर त्याचाही विचार केला गेला पाहिजे.सध्या आपण ४८० एमएलडी पाणी घेतोय पण भविष्यात आपण

जास्त पाणी उचललं तरी कमी पडणार आहे. म्हणजे आपल्याला त्या धरणामध्ये साठा वाढविण्यासाठी सुध्दा विचार केला गेला पाहिजे.या गोष्टीमुळे आपण भविष्यात कसे पाणी मिळवू शकू याचा योग्य तो  विचार केला गेला पाहिजे.आयुक्त साहेब आपण अजुन एक वर्ष या शहरात असाल परंतु मी तुम्हांला विनंती करतो की, भविष्यामध्ये पिंपरी चिंचवड शहरासाठी आपण कोण कोणत्या भागातून पाणी घेऊ शकतो याचा विचार करावा आपल्या शहरात असलेल्या खाणींचा विचार करावा. काही विविध प्रोजेक्ट करण्याचा विचार करतोय.त्या खाणीमध्ये साठलेल्या पाण्याचा वापर शहरासाठी करु शकत असेल तर त्याचा आपल्याला फायदा होईल.याठिकाणी आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो धन्यवाद.

**मा.सागर आंगोळकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज सगळेजण पाण्याबद्दल बोलतात. पाण्याच्या नियोजनाचा अभाव मला याठिकाणी एवढंच सांगायचं आहे की, आमच्याकडे सुदर्शननगर हा भाग आहे याच्या रोडच्या साईडला टाक्या वाहून जातात आणि आमच्या ४ गल्ल्यांना पाणी येत नाही. हा जो नियोजनाचा अभाव आहे यासाठी आपल्याला कन्सलटंट लागणार आहे का? आपल्याकडे प्रत्येक गोष्टीसाठी कंन्सलटंटची गरज आहे. मला वाटते आपल्या अधिका-याच्या बुध्दीला गंज लागलेला आहे. यांना कंन्सलटंट द्या, त्याच ड्रॉईग करा,त्यानंतर  त्याचं मायक्रोप्लॅनिंग करुन  प्रत्येक नगरसेवकाच्या ऑफिसमध्ये मायक्रोप्लॅनिंग पाहिजे.अशी मी मागणी करतो.

**मा.विकास डोळस** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑगष्ट महिन्याच्या जीबी मध्ये  आपण पाणी प्रश्नावर चर्चा करीत आहोत. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात पुरस्थिती आहे. आणि ऑगष्ट महिन्यात आपल्याला ही चर्चा करावी लागते. खरोखरच ही नामुष्की कशामुळे आली. याचे विवेचन करण्याची गरज आहे. मगाशी नायर साहेबांनी सांगितले की, आपले सर्व नगरसेवक सभागृहात बसले होते आणि अधिकारी बाहेर बसले होते. येथून येता-जाता Observe  करीत होतो इथं एक कॉलेज कट्टा झालेला आहे.आयुक्त साहेब आपल्या उपस्थित जर अशी परिस्थिती असेल तर ते त्यांच्या केबीन काय करत असतील याची कल्पना करावी. जर नगरसेवक या सभागृहात असतील तर सर्व  अधिका-यांनी सभागृहात उपस्थित रहावे असे आदेश  त्यांना द्या.आपल्या उपमहापौर शैलजा मोरे यांनी सांगितले की, मला पाण्यासाठी विनंती करावी लागली.

उषाताईंनी सांगितले की, मला टँकर द्या अशी मागणी करुनही आपण त्यांना टँकर दिले नाही. टँकरचं टेंडर नाही असे सांगितले जाते.असं खोटं सांगितले जाते.पाडाळेताईंनी सांगितले की, माझ्या वॉर्डात टाकीचे भूमीपुजन झालं पण काम चालू झालं नाही. तर राजू बनसोडेनी सांगितले की, माझ्याकडे बजेट नाही त्यामुळे ठेकेदार काम करण्यास येत नाही. म्हणजे आयुक्त साहेब, माझ्या मनात प्रश्न पडतो की, आयुक्त म्हणुन आपला ठेकेदार, अधिकारी यांच्यावर दबाव आहे की नाही. अनागोंदी कारभार चालू आहे.कोणाचाच कोणावर कंट्रोल नाही. काम काढायची, निविदा काढायची त्यातुन मिळणारी मलई घ्यायची कंन्सलटंट नेमायचे. याठिकाणी कंन्सलटंटचे पेव सुटलेले आहे. कशासाठी कंन्सलटंटची नेमणुक करायची, सागर म्हणाले की, पाण्याच्या नियोजनसाठी कंन्सलटंटची नेमणुक करायची का? मग आपले अधिकारी कशासाठी नेमलेले आहेत.अभियंता कशासाठी असतो असा प्रश्न पडतो. हे काम काय करतात हेच कळत नाही. पाणीपुरवठयाच्या विषयावर आम्ही गेली अडीच वर्ष बोलत आहोत. आयुक्त साहेब स्थायी समितीमध्ये सुध्दा मी पाण्याचे  इक्वल डिस्ट्रीब्युशन झाले पाहिजे असे सांगितले होते पण आपण वेळोवेळी सांगितले की, तुमचा भाग टेल आहे आणि टेलसाठी आम्ही वेगळी लाईन काढू असं वेळोवेळी सांगितले पण हे कुठेही दिसत नाही. आप्पांनी सांगितलं की, दिघी, च-होली, मोशी यांना असंच ठेवायचं का,दापोडीला असंच ठेवायचं का याच्यावरती ऍक्शन घ्यायची वेळ आलेली आहे. एकीकडे लोकसंख्या वाढती आहे सगळया गोष्टी मान्य आहेत, टेक्नीकली गोष्टी आहेत पण जे पाणी मिळतय ते प्रत्येक नागरीकाला समान पध्दतीने वाटप करण्यासाठी कुठं तरी विचार करण्याची गरज आहे. कंन्सलटंट बद्दल आपण बोलत होतो आपल्या इथं बोपखेलला एसटीपीच काम आहे,तसेच चिखलीला एसटीपीचं काम आहे आपल्या केंद्र सरकारच्या अनुज्ञेयमध्ये कंन्सलटंटच काम केलेलं आहे.तीन वेळा ते पाण्याखाली गेलं, वारंवार त्याच ड्रॉईंग चेंज करावं लागतय अशी परिस्थिती आहे. याला जबाबदार कोण?  एसटीपीच्या बाबतीत मी वारंवार स्थायी समितीमध्ये बोललो होतो. आज मी सभागृहामध्ये मागणी करतो की, जो कंन्सलटंट आहे ना त्याला ब्लॅकलिस्ट करावे. कारण त्यांनी काहीच काम केलेले नाही. जागेवर जायचं नाही, इथं बसून ड्रॉईंग काढायचं, आपल्या अधिका-यांकडे जायचं,  निविदा काढून मोकळं व्हायचं ज्याचं त्याला मिळालं विषय संपला. पण जागेवर जाऊन कोण काम करणारा आहे की नाही. आयुक्त साहेब भिमसृष्टीचं पण तसंच झालेलं आहे. आज आपण महापुरुषांना त्यांच्या विचारांचा वारसा म्हणुन याठिकाणच्या कार्यकर्त्यांना काही तरी देण्यासाठी  सेंट्रलवरती सृष्टी घडवत

असेल आणि वारंवार त्यामध्ये काही बदल घडत असेल तर सारखं पुढच्या महिन्यात,पुढच्या महिन्यात असं सारखं चेंज करीत असाल तर याला जबाबदार कोण? मी नगरसेवक झाल्यापासून भिमसृष्टीच्या कामाचं ऐकतोय भिमसृष्टीचं काम केंव्हा होणार आहे हे आज अधिका-यांनी सांगावं. आणि नागरीकांची आणि कार्यकर्त्यांच्या भावनेशी जो खेळ चालवला आहे तो थांबवाव अशी विनंती करतो. आज पाण्याची खरोखरंच बिकट परिस्थिती आहे. रात्री १ ते १.३० वा.पाणी सोडलं जातं माता भगिनींना रात्री पाण्यासाठी जागावं लागतं. आता कोकणे साहेबांनी एक फोटो दाखविला की,एक छोटीशी मुलगी हांडा घेऊन जात होती. तर आपल्या नागरीकांचा कित्येक वेळ हा पाण्यासाठी वाया घालवित असाल तर यासारखं दुर्दैव कोणतंच नाही. आयुक्त साहेब, मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्ही अधिका-यावरती नियंत्रण ठेवावे. आणि तुमच्या नियंत्रणा अभावी ही परिस्थिती ओढवली का? अशी शंका वाटते. आपण मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली धन्यवाद.जयहिंद,जय महाराष्ट्र. पण एसटीपीचा जो कंन्सलटंट आहे त्याला ब्लॅकलिस्टला टाकावे.आणि भिमसृष्टीच्या कामाबद्दल अधिका-यांनी खुलासा करावा.

**मा.प्रमोद कुटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपण याठिकाणी पावसाळयामध्ये पाणीपुरवठयावर चर्चा करीत आहोत. गेल्या ६ महिन्यापासून दिवसाआड पाणीपुरवठा चालू होता तेंव्हा या शहरामध्ये कुठेही हांडे वगैरे दिसले नाहीत. पण आता असं अचानक काय घडले आहे की, ४५० एमएलडी ते ४७० ते ४८० एमएलडी पाणी उचलून तेंव्हाही पुरवू शकत होतो आणि कुठेही अडथळा येत नव्हता.आणि तो व्यवस्थित चालला होता. आता एकंदरीत पावसाळयामध्ये अशी काय वाढ झालेली आहे. यावर्षी पाऊस चांगला झालेला आहे आणि पावसाळयामध्ये तुम्हांला ५५० ते ६०० एमएलडी पाणी मिळणार आहे आणि तुम्ही तेथून पाणी उचलणार आणि रोज पाणीपुरवठा करणार आहे. असेही काही नाही. दिवसाआड पाणीपुरवठा चालू होता तो निर्णय का बदलला आहे. आज आमच्या रामनगर आकुर्डी परिसरामध्ये पाणी दुपारी १.३० वा.ते २.०० वा.पाणी येते लोकांनी कामाला कधी जायचं आणि कधी यायचं मोहननगरचा परिसरही पूर्ण डिस्ट्रब आहे. याठिकाणी दिवसाचा एक तासाचा सुध्दा पाणीपुरवठा होत नाही. तसेच प्राधिकरणामध्येही तोच प्रॉब्लेम आहे आमच्या आजुबाजूचे जे नगरसेवक आहेत त्यांचीही मागणी आहे की, एक दिवसाआड पाणीपुरवठा करणेत यावा. आणि लोकही एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यास समाधानी

आहेत. आमचे सगळे सदस्य दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची मागणी करीत असेल तर आम्हांला दिवसाआड पाणीपुरवठा करणेत यावा. पण मुबलक पाणीपुरवठा करणेत यावा. आज त्याठिकाणी पंपींग स्टेशन बंद पडलं तर सेकंड पंपींग स्टेशन चालू करा ना लाईट नसल्यामुळे शहराला पाणीपुरवठा होत नाही ही दुर्देवी गोष्ट आहे.महापालिकेचे ६ हजार कोटी असताना आपण लाईटची व्यवस्था करु शकत नाही. काही वेळा सांगितले जाते की, पंपींग स्टेशन बंद आहे. हे खरोखरच दुर्देवी आहे यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. एवढंच बोलतो आणि पुन्हा एकदा विनंती करतो की, दिवसाआड पाणीपुरवठा करणेत यावा आमची लोक समाधानी राहतील. धन्यवाद.

**मा.अश्विनी जाधव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शहरामध्ये पाण्याचा प्रश्न उद्भवलेला आहे प्रत्येक शहरामध्ये पाण्याची टंचाई भासते आहे. या परिस्थितीत कंन्सलटंटचा प्रश्न उद्भवलेला आहे. यामध्ये ड्रेनेजलाईन प्रकल्पासाठी युनिटी कंन्सलटंट महापालिकेने घेतला आहे. या प्रकल्पाची वर्क ऑर्डर १० मार्च २०१८ रोजी दिलेली आहे. यामध्ये कोणतीही प्रगती दिसत नाही. काम करताना प्रचंड अडचणी समोर येत आहेत. ड्रेनेज नेटवर्क प्लॅन तयार नसताना त्या कंन्सलटंटने टेंडर कसे बनविले. आयुक्त साहेब तुम्ही माझ्या प्रभागामध्ये २/३ वेळेस भेट दिलेली होती. एसटीपीची जागा न तपासता कंन्सलटंटने नकाशा कसा काय तयार केला. प्रदुषण महामंडळ चिखली येथे सुरु असलेल्या टीपी मध्ये हस्तक्षेप करीत आहेत. कंन्सलटंटने काय काम केले आहे.त्यांनी त्यांची जबाबदारी काय पार पाडली आहे. चिखलीचे प्रस्थापित लोकेशन तीन वेळा पाण्यामध्ये गेले. असा प्रकल्प करणा-या कंन्सलटंटला ब्लॅकलिस्टला टाकणेत यावे व त्यांच्याकडील असलेले काम काढून घेतले पाहिजे एवढेच सांगते आणि थांबते.

**मा.तुषार कामठे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.आयुक्त साहेब आणि अधिकारी यांना विनंती आहे की, आज आमच्या ज्या भावना आहे त्या आपण समजून घेतल्या पाहिजे.तुम्हांला वाटत असेल की,जो तो आपल्यावर लक्ष ठेवुन आहे. आणि धाकात ठेवण्यासाठी आम्ही तशा पध्दतीने बोलत आहोत. असे वाटत असेल परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, आम्ही बायकोशी एवढं प्रेमाने बोलत नाही तेवढं तुमच्याशी बोलतो. तरीही कामे याठिकाणी होत नाहीत. नागरिकांचे पाण्यासाठी आम्हांला दररोज ३०० ते ५०० फोन येतात.त्यांची मानसिकता बिघडलेली आहे.आमचा तुमच्या बांधाला बांध नाही

आम्हांला फक्त पाणी मिळालं पाहिजे एवढीच अपेक्षा आहे. आयुक्त साहेब तुम्हांला सांगू इच्छितो की, महापौर साहेब असतील नसतील आज १३३ नगरसेवक असताना आपण कोणाच्या सांगण्यावरुन,कोणाचं ऐकुण हा निर्णय घेतला हे माहित नाही. पण मागच्या वर्षी सुध्दा जुलैमध्ये पवना डॅम फुल्लं भरलेलं होत पण जानेवरीनंतर आपल्याला पाणी टंचाई जाणवत होती. त्याचा अनुभव विचारात घेऊन आपण हा डिसीजन घेतलेला आहे. पवना डॅमची क्षमता ९ टीएमसी आहे पण फक्त ७ टीएमसी पाणी आहे.त्याचा आपण अभ्यास केला पाहिजे. मगाशी कोणी तरी सांगितलं की, भाजपची सत्ता असुनही पाणी नाही. मागच्या वर्षी सुध्दा लोकांनी निवेदन केलं असतं पाणी साठविण्यासाठी अजुन काही उपाययोजना करता येईल का? आयुक्त साहेब, आपण आता काही स्थापत्यची कामे काढलेली आहेत ती कामे बाजुला ठेवा आणि डॅममध्ये पाणी कसे वाढेल, आपल्याला पवना डॅमसारखी एखादी जागा विकत घेऊन डॅम बांधता येईल का? याचाही अभ्यास करावा. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, मागच्या वर्षी ज्या चुका झालेल्या आहेत त्या यावर्षी होता कामा नये.ही फक्त अधिका-यांचीच नाही तर आपली सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे. आज लोकांना पाणी मिळत नाही म्हणुन भांडतोय,इथे आपले विचार मांडतोय. पण याचं सोल्युशन आपणही शोधलं पाहिजे. हे काम एकटया आयुक्तांच नाही आयुक्त हे तीन वर्ष राहतील आणि निघुन जातील. पण पाण्याच्या प्रश्नावर लोक आपल्याला विचारतील तुम्ही काय केलं. त्या पापाचं धनी आपल्याला व्हायचं नाही. भविष्यात आम्ही असेल, नसेल हे माहित नाही आम्हांला पण आपण जोपर्यंत आहोत तेंव्हा पाण्याची साठवणुक कशी होईल याचे नियोजन आपण केलं पाहिजे. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, पाणी साठविण्यासाठी एखादी नवीन जागा विकत घेउन नवीन डॅम कसा होईल याचा विचार करणेत यावा. व यासाठी काही निधी ठेवणेत यावा. आपण ४५० एमएलडी पाणी उचलतो त्यापैकी १८१ एमएलडी लिकेजमध्ये जाते आणि २९७ एमएलडी पाणी आपल्याला वापरण्यास मिळते. आजची लोकसंख्या पाहता हे पाणी आपल्याला कमी पडते. त्याच्यावर आपण नियोजन केलं पाहिजे. आज २४ बाय ७ नियोजन आहे त्या नियोजनामागे आपली वैयक्तीक काय भावना आहे हे माहित नाही. आम्हां लोकांना त्या नियोजनाची माहिती नाही. आम्हांला एवढंच माहिती आहे की, २४ बाय ७ झाले म्हणजे पाणी प्रश्न संपेल. पण २४ बाय ७ ची समस्या अजुन वाढत चालली आहे. २४ बाय ७ चा निर्णय देताना तो कशा पध्दतीने दिला आहे त्याच्या कामाची पध्दत काय आहे. काम चालू असताना आपल्या अधिका-यांनी त्याची चौकशी केली का याची माहिती घेतली पाहिजे.

जुन्या लाईन तशाच ठेवुन २४ बाय ७ ची नवीन पाईपलाईन टाकलेल्या आहेत दोन,दोन लाईनमधुन पाईप जात असताना आपल्याला पाणी कसे पुरेल याचं आपण कॅलक्युलेशन केलं पाहिजे. जुन्या लाईन न काढता आपण २४ बाय ७ ची योजना आणलेली आहे. २४ बाय ७ ची पाईपलाईन टाकून होईल. आणि लोकांना नळकनेक्शन द्याल तेंव्हा जुनी पाईपलाईन काढली पाहिजे. आज माझ्या इथे २४ बाय ७ योजनेचे ५० टक्के काम झालेलं आहे. पण त्याठिकाणी जुन्या लाईन पण तशाच आहेत, जुन्या लाईनचं कनेक्शन पण तसेच आहे आणि नवीन लाईनचे कनेक्शन पण तसेच आहे. त्यामुळे पाणी लिकेजचे प्रमाण वाढलेले आहे. शहराची २५ लाख लोकसंख्या असताना नियमीत नळ कनेक्शन १ ते १.५० लाखाच्या आसपास आहेत. आणि जे अनधिकृत नळकनेक्शन आहेत त्याचे नियोजन काय आहे. जोपर्यंत अनधिकृत नळकनेक्शनच आपल्याकडे कॅलक्युलेशन येत नाही तोपर्यत पाण्याचा हिशोब आपल्याला लागत नाही. तोपर्यंत अधिका-यांना बोलून काही उपयोग नाही. आज आपण बोलणार पण आठ दिवसानंतर पाण्याची समस्या पुन्हा तशीच राहणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, जोपर्यंत पाणी व्यवस्थित येत नाही तोपर्यंत सभा तहकुब करणेत यावी. आपल्याला पाणी महत्वाचे आहे स्मार्ट सिटीच्या नावावर बाकीचे उद्योग चालू आहेत. आज माझ्याकडे पाणी येत नाही, घंटागाडी येत नाही. कोण माणुस येतो तो सुध्दा मी पाहिलेला नाही. एक सुध्दा गाडी त्याची माझ्याकडे नाही. याला कोण जबाबदार आहे तो महापालिकेचा जावई आहे का, आरोग्याची निविदा कोणी काढली, त्याला ६ महिन्याची मुदतवाढ का दिली. स्मशानभूमीची एक नवीन निविदा काढणार आहात त्यामध्ये ९ लोक दिलेले आहेत म्हणता कशासाठी ९ लोक पाहिजेत. ज्याठिकाणी लोक पाहिजेत त्याठिकाणची लोक काढली आहेत. हे कशासाठी आणि कोणासाठी चाललंय आयुक्त साहेब कोणाचाही दबाव येऊ द्या पण तुम्ही तुमचा डिसीजन घ्या. आम्ही १३३ नगरसेवक आहोत आम्हांला जनतेनी याठिकाणी पाठविलेले आहे. जनतेची समस्या सोडविण्याचं काम आमचं आहे. आम्ही याठिकाणी बोलतो याचा अर्थ पक्षाची भूमिका घेतो असे नाही. जनतेचे प्रश्न सोडविणे हे आपले काम आहे.तो या पक्षाचा, हा या पक्षाचा असं याठिकाणी मनात आणु नका. त्याने काही प्रश्न सुटणार नाहीत. जे मागं चालत आलेल आहे ते पुढे चालत राहणार. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, आपल्याला पाणी साठविण्यासाठी कायमस्वरुपी काय नियोजन करता येईल याचा प्रयत्न करावा. आणि याची जबाबदारी आपल्यावर आणि आयुक्तांवर राहील. आणि आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, तुम्ही २/३ अधिका-

यांना  विश्वासात घेऊन निर्णय लादू नका. बाकीच्यानाही विश्वासात घेत जावा. तुमच्या एवढं ज्ञान आम्हांला नाही हे मान्य आहे पण काही गोष्टी आम्हांलाही समजतात. आम्ही ग्राऊंड लेव्हलहून  आलेलो आहे. आम्ही कागदी घोडे नाचविण्यापेक्षा प्रॅक्टीकल आम्ही माहिती घेत आहोत. धन्यवाद.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरं तर भर पावसाळयात आणि ऑगष्ट महिन्यामध्ये आपण पाण्यावर चर्चा करतो आहे याच्यासारखं दुर्देव नाही. कारण प्रशासनाचा जो गलथान कारभार चालला आहे त्याची शिक्षा नागरीकानांच नाही तर नगरसेवकांना सुध्दा मिळते. आयुक्त साहेब  आपल्याकडुन शहराच्या खुप मोठया अपेक्षा आहेत. पाणीपुरवठा व्यवस्थेवर कोटयावधी खर्च करुन देखील या सगळया योजनांचा बोजवारा उडालेला आहे. कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करुन ठेकेदार पोसायचं काम  आपले अधिकारी करीत आहेत. खरं तर आता काही दिवसापुर्वी पूर आलेला होता. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापनाने चांगलं काम केलं आयुक्त साहेब तुम्ही स्वत: अति.आयुक्त संतोष पाटील साहेब यांनी नागरिकांची चांगली सोय केली. आज आपण आपत्ती व्यवस्थापनाच्या कर्मचा-याचा सत्कार केला. म्हणजे अधिकारी कामचुकारपणा करतात, गलथान कारभार करतात त्यांचा पण सत्कार केला पाहिजे.आणि त्या सत्काराच पॅटर्न ठरवावं लागेल. कारण मागच्या वेळेस महेश शेठनी जसा सत्कार केला होता तसा सत्कार प्रत्येक प्रभागात झाला पाहिजे. आयुक्त साहेब परत सांगतोय जे सोसायटीचे फ्लॅटधारक आहेत ते पाण्याचे  टँकर मागवुन त्यांचे लाखो रु. खर्च होत  आहेत. त्यांच संपुर्ण आर्थिक  नियोजन कोलमडलेलं आहे. जर ही परिस्थिती लवकरात लवकर हाताळली नाही तर सत्तेत असुन देखील आम्हांला नाईलाजास्तव रस्त्यावर उतरावं लागेल. एवढंच सांगतो आणि थांबतो.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.मा.महापौर साहेब आपण १०/१५ दिवसापूर्वी जलपुजन केल्यानंतर आम्हांला वाटलं की, आता रोज पाणी येणार आणि आमची समस्या सुटणार, पण जलपुजन झाल्यानंतर उलट ही समस्या निर्माण झाली. प्रत्येक सदस्य आपआपल्या पोटतिडकीने बोलत आहेत. आपण २०० ते ४०० कोटीचे काम करीत आहोत. आपण हे शहर स्मार्ट सिटी करण्यापेक्षा नागरीकांना गरजेच्या सुविधा द्या. यामध्ये मुख्य गरज म्हणजे पाणी सभागृहामध्ये येत असताना नागरीकांचे पाण्यासाठी आतापर्यंत किमान ५० फोन आलेले असतील. आयुक्त साहेब आपल्याला इरिगेशन

डिपार्टमेंटनी जे पाणी दिलेले आहे ते कमी आहे का? साहेब, आपल्याला पाणी कमी नाहीच तुमच्या हिशोबाने शहराची लोकसंख्या २५ लाख पकडतो.२५ लाख लोकसंख्येच्या हिशोबाने प्रति माणसी १३५ लिटर पाणी म्हणले तरी दररोज ३६५ एमएलडी पाणी लागते. आपण दररोज ४८० एमएलडी पाणी उचलतो.एक्स्ट्रा पाणी उचललं तर ५३० एमएलडी पर्यंत जातं. १६५ एमएलडी पाणी जरी कमी पकडलं तरी माझ्या मते त्यातलं फक्त २० टक्के पाणी लोकांपर्यंत जातं. आणि हे मी तांबे साहेबांच्या तोंडून ऐकलं आहे असं असताना तुमचे खालचे अधिकारी कुठं तरी चुकतात असं मला वाटत. काल तांबे साहेबांची भेट घेतली तर हे एवढं खोटं बोलतात की, त्यांचा काही संबंधच नाही. आज संध्याकाळी पाऊस पडतो आणि नागरीकांना वाटते की,आज संध्याकाळी पाणी येईल आणि इथं तर पाणीच नाही. तांबे साहेबांना संध्याकाळी फोन केला की, म्हणतात नाही आज संध्याकाळी पाणी सोडतो. आणि संध्याकाळी फोन केला की म्हणायचे उद्या सकाळी सोडतो. तुमचं पाण्याचं डिस्ट्रीब्युशन बरोबर नाही. कुठलाही नगरसेवक समाधानी नाही. कुठलाही नगरसेवक तुमच्या बाजुने बोलला का? एकच डिपार्टमेंट असं आहे की, तो म्हणजे पाणीपुरवठा काही अधिकारी चांगले काम करतात साबळे हे अधिकारी चांगले काम करतात. त्यांच आम्ही कौतूक करतो. पण तांबे सारख्या माणसाचं विचारा बरं ते सारखं खोट बोलत असतात. नागरीकांना पाणी देणं हे तुमचं कामच आहे. मागच्या वेळेस मी ६ महिन्यापुर्वी सांगितलं होतं की, आमच्यातील काही जुने नगरसेवक आहेत त्यांना घेऊन एक तुम्ही कमीटी बनवावी, केले का तुम्ही तसे. प्रत्येक नगरसेवक तुम्हांला टेक्नीकल माहिती सांगत होता, संबंध काय, इरिगेशन डिपार्टमेंटनी तुम्हांला जो कोटा दिलेला आहे. आमचं म्हणणं आहे की,प्रती माणसी १३५ लिटर पाणी द्या ते सुध्दा देत नाही. आपल्याकडे पाणी कमी नाही पाणी भरपूर आहे. अल्टरनेट देण्याची सुध्दा गरज नाही. रोज पाणी द्यावं असं आमचं म्हणणं आहे. तुमच्या कार्यकारी अभियंता, उपअभियंता,कनिष्ठ अभियंता यांना कुठला व्हॉल्व सोडला पाहिजे.म्हणजे प्रेशर वाढेल हे माहिती असलं पाहिजे कार्यकारीला विचारलं की ते म्हणतात डेप्युटीला विचारा डेप्युटीला विचारलं की म्हणतात वरुनच पाणी कमी येत आहे. अहो वरुन कुठलं, १० दिवसापुर्वी ज्यावेळेस सांगली,सातारा कोल्हापूर भागामध्ये पुर आला या भागामध्ये पिण्याच्या पाण्याची वाईट परिस्थिती झाली होती. आयुक्त साहेब आपण प्रत्येक नगरसेवकाचे मुद्दे घेतलेले आहेत त्याचा तुम्ही खुलासा करावा अन्यथा जोपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यंत सभा

तहकुब करणेत यावी. आयुक्त साहेब,गेली ४ तास झाले चर्चा चालू आहे. या चर्चेच्या अनुषंगाने तुम्ही काय उपाययोजना करणार आहे याचा खुलासा करावा.

**मा.महापौर** – बापू प्रत्येक नगरसेवकाला बोलू द्या. त्यानंतर आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे** – महापौर साहेब, खुलासा झाल्यानंतर बोलू द्या. प्रत्येक जण हेच बोलणार आहे.

**मा.महापौर** – बापू तुमचं बोलायचं झालं का,

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे** – मला बोलायचे नाही. पण आयुक्तांनी खुलासा केल्यानंतर बोलू द्या.

**मा.महापौर** – सर्वांच बोलून झाल्यानंतर खुलासा करतील.

**मा.राजेंद्र लांडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वांच्या भावना आयुक्त साहेब आणि आमच्या पर्यंत पोहचलेल्या आहेत. मला अस वाटतयं की, इतर सदस्यांच्या प्रभागातील समस्यापेक्षा माझ्या प्रभागातील समस्या थोडयाशा वेगळया आहेत. मी महापौरांना पण बोललो होतो की, मला खरोखरच अभिनंदन करण्यासाठी एकच मिनिट बोलायचे आहे त्यासाठी मला चान्स द्या. कारण माझ्या प्रभागातून जेंव्हा मी निवडुन आलो त्यावेळेस पाण्याची दयनीय अवस्था होती.कारण त्यावेळेस एक हांडाभर पाणी भरण्यासाठी २० ते २५ मिनीटं लागायची आज आमचे जे इंजिनियर आहेत त्यांनी चांगल्या प्रकारे काम केलेलं आहे. त्यानंतर २४ बाय ७ चं काम ८० टक्के झालेलं आहे. निश्चितच अधिका-यांनी चांगलं काम केलेल आहे त्यामुळे एवढा प्रॉब्लम येत नाही पण बाकीच्या ठिकाणी खुपच अडचणी आहेत. आणि या आगोदर दिवसाआड पाणी पुरवठा होत होता त्या लोकांची मागणी आहे की, आम्हांला दिवसाआडच पाणी द्या. कारण आता आपण १ एक तास पाणी देतो पण दिवसाआड पाणी देतो त्यावेळेस दिड ते दोन तास पाणी देतो आणि प्रेशरनी देतो. याठिकाणी आमच्या प्रभागातील दवंडे साहेब, पवार साहेब यांनी निश्चितच चांगली कामे केलेली आहेत. त्याबद्दल त्यांच अभिनंदन करतो. आणि थांबतो.

**मा.निलेश बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज सर्वजण पोटतिडकीने बोलत आहेत बापुने जसं सांगितले आहे की,तुमची दुसरी टर्म आहे,आणि माझीही दुसरी टर्म आहे. आज याठिकाणी बरेच सिनियर नगरसेवक याठिकाणी उपस्थित आहेत. मागच्या वेळेस पाण्यासाठी एवढी चर्चा झालेली नाही. जेवढी या गोष्टीवर झालेली आहे. मागच्या वेळेस काँग्रेस- राष्ट्रवादीची सत्ता असताना २१ लाख लोकसंख्या होती आणि

आता बीजेपीची सत्ता आल्यानंतर लोकसंख्या काही ४० लाखावर गेली का, कुठे तरी आपले नियोजन चुकतंय का, पुणे महापालिकेत रिटर्न नाही साहेब, आपल्याकडे रिटर्न आला त्याला १५० कोटी दिले. महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो की, जसं बापुनी सांगितलं सर्व अधिकार तुम्हांला आहेत आज मी बघतोय प्रत्येक जण येतोय, बडबड करुन जातो अधिका-यांनाही सवय झालेली आहे. आज २० तारीख आहे नगरसेवक येतील आणि बोलतील आणि निघुन जातील अशी सवय झालेली आहे. महापौर साहेब, तुम्ही जर यांना दोन महिने सस्पेंड केलं ना तर हे जागेवर येतील. आपल्याला अधिकार आहेत जो अधिकारी काम करीत नसेल मागच्या वर्षी आपण पिठासिन अधिकारी म्हणुन सगळयांना उभं करीत होतो. आता का यांना उभं करीत नाही. अधिकारी हे सदस्यांना गोल,गोल करुन टाकतात. एखाद्या नगरसेवक अधिका-यांच्या बाजुनं बोलला की, विषयाचं गांभीर्य निघुन जातं पण माझी आपल्याला विनंती आहे की, या अधिका-यांना कमीत कमी २ /४ महिने तरी सस्पेंड करावे. धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थांनी महापौर साहेब तुमचं कौतूक करावंस वाटतय यामध्ये अनेक महिन्यांच्या नंतर या सभागृहात केलेली चर्चा ऐकायला मिळाली. प्रत्येकानी आपआपले मनोगत व्यक्त केलं आहे. आपल्या प्रभागातील समस्या सांगायच्या होत्या यासाठी आपण दिलेला पुरेपुर वेळ याठिकाणी वाखानन्यासारखा वाटतो. ख-या अर्थांने सभागृहाचे विरोधी पक्षनेते म्हणुन नाना काटे असतील, महापौर पदाची धुरा आपण सांभाळता आहात. कुठं तरी सभागृहात भांडणं करायची आणि सभागृह विस्कळीत करायचे, विषय मंजुर होतात आणि आमच्या सारख्याची चर्चा सुध्दा या सभागृहामध्ये आमच्या मनातले विषय,मुद्दे आमच्या बरोबरच याठिकाणी राहतात. अशी खेद मी याठिकाणी व्यक्त करते. आणि मी आपले मनापासून स्वागत करते आणि ख-या अर्थानं सभागृह हे असेच चालले पाहिजे.आशा शेंडगे फार शहाणी होती परंतु या सभागृहातले काही विषय जेष्ठ सदस्यांनी सांगितले आपल्या सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक सिमाताई असतील,भाऊसाहेब भोईर असतील,मंगलाताई या सगळयांची भाषणं आम्ही ऐकायची आणि एक,एक मुद्दे आमच्या डोक्याला क्लीक व्हायचे. नाही असं असतं,असं होत आजच्या नवीन नगरसेवकांना मात्र याचा काहीही थांगपत्ता लागत नाही. हे या सभागृहाचं दुर्देव होतं पण निश्चितपणे या पुढच्या काळामध्ये अशाच पध्दतीचे कामकाज चालेल अशी अपेक्षा व्यक्त करते. दुसरा महत्वाचा भाग म्हणजे सभागृह चालू असताना अनेक नगरसेवक महिला असतील, बंधु असतील यांनी थोडी शांतता राखायची कारण आम्ही बोलतोय, हे

सभागृह पवित्र आहे. शहरातील एकुण २१ लाख लोकसंख्यामधुन या सभागृहामध्ये आपण फक्त १३३ जण आलो आहोत ते नशिबाने आलेलो आहोत. म्हणुन या सभागृहात या लोकांच्या भावना,त्यांच्या सूचना मांडण्याची संधी आज आपल्याला सभागृहामध्ये उपलब्ध झालेली आहे. परंतु या सभागृहामध्ये चेष्टा,मस्करी,बाहेर जाणं-येणं आपले विचार या सभागृहात मांडणं आणि प्रशासनाकडुन ते करुन घेणं ही तुमची आमची जबाबदारी असते परंतु ती याठिकाणी तसे काही दिसत नाही.आपण उठतो आणि मोघमपणे बोलतो, आरोप करतो. परंतु मला सांगताना आनंद होतो की, या सभागृहात ज्या ज्यावेळेस सिमा सावळे असतील,सुलभाताई असेल,आशा शेंडगे असतील ज्या ज्या वेळेस विरोधी पक्षनेते म्हणुन काम केलं ज्या ज्यावेळेस विरोधी पक्षनेता म्हणुन भूमिका मांडली त्या त्या वेळी मी कागदावरती पुरावे दिले. उठायचं त्याचं नाव घ्यायचं, याचं नांव घ्यायचं मोघम कोणी या सभागृहामध्ये बोललं नाही पाहिजे. हे सभागृह पवित्र आहे. या सभागृहाचा अपमान आपल्याकडून कोणत्याही प्रकारे होता कामा नये. आपण याचं भान ठेवलं पाहिजे. आम्ही पण नवीन नगरसेवकच होतो. पण भाऊसाहेब भोईर सारख्या अनुभवी नगरसेवकांकडुन आम्ही शिकलो. आम्ही काही चुकून बोलतोय ही काय आमची भावना नाही, कोणाचं तरी ऐकुण कोणी तरी शिव्या द्यायचं. हे कोणाला बोलायचं नसतं परंतु सभागृहाची भाषा त्यांच्यापर्यंत पोहचली जात नाही का याचा खेद याठिकाणी वाटतो. आणि म्हणुन महापौर साहेब, आपलं पुन्हा एकदा याठिकाणी मनापासून कौतूक करते आणि आजचं सभागृह हे अत्यंत चांगल्या प्रकारे चालले आहे. दोन,दोन तीन तीन दिवस सभागृह चालवून पाहिलेले आहे. आम्ही १३३ नगरसेवक तुमच्या बरोबर आहोतच या शहराचे प्रश्न घेऊन आम्ही याठिकाणी येतो पाण्याबरोबरच वॉर्डातील बारीक,बारीक मुद्ये घेऊन सांगितले आहेत. अशा एक ना अनेक समस्या नगरसदस्यांनी मांडलेल्या आहेत दुर्देवाने आपली सत्ता असताना सुध्दा मुद्ये मांडले. का मांडले गेले, का तुम्ही सत्ताधारी पक्षाचे नेते आणि विरोधी पक्षाचे नेते एकाच मजल्यावर आहेत आपण त्यांना समजून सांगितले पाहिजे हे असं नाही असेच पाहिजे. का सांगत नाही आपण कमिशनर साहेबाना या शहराचा विकास करीत असताना या शहराच्या नागरीकांना काय देणं लागतो.याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. खरं तर आज पाणी,पाणी १५ दिवसापुर्वी खरंच आपल्याकडे पाणी होतं की, पाणी नको आहे बाबा येरे,येरे पावसा म्हणायच्या ऐवजी जा रे जा पावसा अशी म्हणायची वेळ आलेली होती.दुर्देवाने ते पाणी आपली पूरस्थिती असताना मी बाहेरच होते त्यामुळे माझ्या प्रभागातील नागरीकांकडे फार लक्ष देता आले

नाही. मला शक्य होत तेवढं तिकडचा प्रवास कॅन्सल केला सन्मा.आयुक्त साहेब, अति.आयुक्त साहेब असतील, अधिकारी असतील सगळयाशी कोऑर्डीनंन्स करुन त्या सगळयांना ज्या ज्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील त्या त्या देण्याचा पुर्ण प्रयत्न केला आहे. आज त्याठिकाणी महसुल विभागाचे लोक येतात ते सर्व्हे करतात पण माझ्या प्रभाग अधिका-याला काही माहित नसलं तरी त्यांना सांगितलं पाहिजे. महसुल विभाग जरी सर्व्हे करीत असला, ते जरी पहाणी करणार असले तरी आपल्या अधिका-याशी त्यांच समन्वय पाहिजे. कोणाला काय मदत मिळणार आहे हे त्यांनी सांगितलं पाहिजे. अक्षरशा आम्ही नगरसेवक म्हणुन पॉलटीशियन करायचं नाही. माझी प्रामाणिक भावना असल्यामुळे मी त्यांच्या बरोबर अजिबात गेले नाही. शहरवासीय आमचे आहेत आमच्या शहरवासीयांच्या घरामध्ये पाणी गेलं हे येऊन बघा त्यांची काय अवस्था आहे. गार्डन फ्लॅटमध्ये ३/४ फुट पाणी होते सगळया फर्नीचरची वाट लागली. लोकांच्या तुम्हांला डाळी,गुळ खराब झालेलं तुम्हांला दिसतं पण त्यांच उद्ववस्थ झालेलं मन तुम्हांला दिसणार नाही. त्यांच्या वेदना तुम्हांला दिसणार नाहीत.माझ्याकडे एक बाई आहे ती म्हणते ताई मला मुल बाळ नाही, मी लग्न केलं नाही, घरामध्ये मी एकटीच राहते आणि माझ्या घरामध्ये जे काही पै पै करुन साठवून ठेवले होते ते सगळं वाहून गेलं यामध्ये चुक कोणाची आहे आज पाणी नाही म्हणुन सगळेजण ओरडतो आहे पण एका बाजुला पाणी किती होतं याचा सुध्दा आपण सर्व्हे केला पाहिजे. सन्मा.आयुक्त साहेब आपण आयएएस आहात तुम्हांला बोलणं योग्य नाही, पण तुम्हांला बोलायचं नाही तर कोणाला बोलायचं तुम्हांला कोणते मुद्दे किती वेळा सांगायचे तेवढे सांगा साहेब आम्ही सुध्दा तक्रार करु नदीमध्ये सगळीकडे बघा तुम्ही त्याठिकाणी सगळीकडे भराव टाकलेला आहे आणि नुसता भरावच नाही तर डांबराचा भराव टाकलेला आहे. यांच्याकडे उत्तर असतं की, महापालिकेचे ठेकेदार खोदलेल्या रस्त्याचा भराव टाकतात याच्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आमची आहे का? नाही तर सांगा आम्हांला पगार द्या आम्ही कामाला लागतो. किती वेळा आम्ही तुम्हांला सांगायचे. कासारवाडी, फुगेवाडी,दापोडी परिसरातील आज जवळपास २ हजार लोक पाण्याखाली असतील २ हजार लोकांना शासनाकडुन मदत होईल ती मदत पैशाच्या स्वरुपात दिसते पण त्यांची घरे उध्दवस्त झालेली दिसणार आहेत का, हे शहर माझे आहे आणि या शहरातील लोकांना कसलाही त्रास होता कामा नये. इथं कोणाला तरी हॉटेल उभं करायचे आहे,कोणाला तरी पत्राशेड टाकायचे आहे त्या पत्राशेड नदीपात्रामध्ये असेल तर त्या पत्राशेडचं भाडं मला ५००० हजार रु. मिळणार आहेत. त्या ५ हजार रु.च्या

भाडयासाठी या शहरातील ३५०० लोकांची पुरग्रस्त म्हणुन नोंद झालेली आहे. आम्ही हे का भोगायचं, तुमच्याकडे यंत्रणा कमी आहे, युवर मॅटर महानगरपालिका म्हणुन आपल्याला जे करावे लागेल ते करु आपल्याला हे प्रॉब्लेम सॉल्व्ह करता येतील. का, साहेब वारंवार चुका होतात. बाळासाहेब ओव्हाळनी सांगितलं दापोडीचा बुध्द विहार हे गौतम बुध्दाचं विहार आहे त्या विहारामध्ये शांतीचा संदेश दिला जातो त्या बुध्द विहारामध्ये पाणी शिरलं त्याठिकाणचा माणुस तुमच्या अंगावर येणार नाही तुमच्या विरुध्द कम्पलेंन्ट करण्याची कुवत नाही, त्यांची मानसिकताच नाही,ते तुमच्याशी भांडायला येणार नाही. आयुक्त साहेब त्याठिकाणी भराव टाकण्याचे काम चालू आहे ते तरी थांबवा. आज त्या भरावामुळे नदीचे पाणी पुढे न गेल्यामुळे ३ दिवस माझ्या वॉर्डातील लोकं पाण्यामध्ये होती याला कारणीभूत कोण आहे. आयुक्त साहेब ही तुमची जबाबदारी आहे. या जबाबदारीतून तुम्हांला आम्ही पळून जाऊ देणार नाही. कासारवाडीच्या पुलाखाली भराव टाकला जातो. कशासाठी,कोण टाकतो,नदीपात्राखाली भराव टाकला जातो,पर्यायाने स्थापत्य विभाग त्याठिकाणचा सगळा गाळ काढुन घेतो पण तुमच्या या अकार्यक्षमतेमुळे आम्हांला हे सगळं भोगावं लागतयं. आणि यापुढे आम्ही भोगणार नाही हे तुम्हांला सांगायचं आहे. सन्मा.सदस्य बाबु नायर यांनी सांगितले की, तुमचे अधिकारी बाहेर बसतात. तुम्हांला नाही कळत पण मलाही कळतय ज्या अधिका-याचे विषय विषयपत्रिकेवर असतात त्यांना येण्यास वेळ लागू नये यासाठी संबंधित अधिका-यांनी मागे येऊन बसावे आणि त्यांचा वेळ वाचावा ही भूमिका आहे. तुम्ही या महापालिकेचे बॉस आहात तुम्ही अधिका-यांना सांगा, आम्हांला सांगायची का वेळ येते आणि हे सगळ असंच राहणार असेल, आणि आम्हांला सांगावं लागणार असेल तर, साहेब तुमची गरज काय, साहेब आम्ही सगळे मानधनावर काम करतो आम्ही त्या मानधनावर खुष आहोत. याठिकाणी बसलेले सगळे अधिकारी नागरीकांच्या पै पै वर आहात हा शब्द वापरते आणि तुम्हांला जो पगार मिळतो त्या पगाराच्या मोबदल्यात आम्ही तुमच्याकडुन काम करुन घेतो तुम्हांला जमत नसेल तर सांगा आमचे महापौर, पक्षनेते कार्यक्षम आहेत परंतु आम्ही याठिकाणी एकाच विषयावर ५/६ तास चर्चा करायची परंतु त्यातुन फलीत काय? आज आम्ही नगरसेवक आहोत नळ,गटर आणि रस्ता या तीन गोष्टी केल्या की,आम्ही चांगले नगरसेवक होतो आणि पुढच्या वर्षी निवडुन येतो. आम्ही लोकांना पाणी देवु शकतो, नाही देवु शकत, गटर देवु शकतो, नाही देवु शकत,रस्ते खोदलेले आहेत ते दुरुस्त करुन देवु शकतो. नाही देवु शकत साहेब तुमच्यामुळे आम्ही नाकर्तेपणा का भोगायचा. महापालिकेचे

बजेट कमी आहे का ? नाही, मग पाणी मुरतं कुठं साहेब, आम्ही इतका वेळ झालं पाणी,पाणी या विषयावर चर्चा करीत आहोत.४८० एमएलडी पाणी उचलतो मग एवढे पाणी कुठे जाते. आमच्याकडे हायड्रो टेस्टींग झालं, अजुन काही टेस्टींग करायच्या होत्या त्या झाल्या. मी या सभागृहात २०१२ ला निवडुन आले त्याच्या आधी २००९ साली या शहराचे सगळे निकष बदलले, का निकष बदलले.त्यावेळेस मी या सभागृहात नव्हते. आज २४ बाय ७ आले का पाणी, नाही आले. त्यानंतर सांगितले की, आपण भामा आसखेडच्या धरणाचे पाणी घेणार आहोत का घेतले नाही. आता २४ बाय ७ च्या योजनेचे काम चालू आहे आख्खं शहर खोदून ठेवलेलं आहे. आज याठिकाणी ३/४ तास चर्चा चालू आहे त्याचा रिपोर्ट काय आहे. साहेब, आम्ही दिवसाआड पाण्यात सुध्दा खुष आहोत. आणि आमचे नागरीक खुष आहेत. मग सांगा तुम्ही की,नाही जमणार आपल्याकडे पाणी एवढं येते, त्यातुन पाण्याची एवढी गळती आहे, अशी अडचण आहे आणि आपल्याला दिवसाआड पाणी ठेवल्यानंतर सगळे समाधानी असतील तर का करायचं आशा शेंडगे बोलती म्हणुन करायचं का, तिला वाटते म्हणुन करायचं का, हे सगळे प्रश्न विचारत आहेत. माझे शहरवासिय याठिकाणी खुष आहेत त्यांना आपण दिवसाआड पाणी द्यायचं असेल तर निश्चित द्या.मी परवा एका अधिका-याला फोन केला विचारलं पाण्याचं टँकर आहे का? म्हणल्यानंतर सकाळी १० च्या नंतर टँकर येईल म्हणुन सांगितलं पण टँकर आला नाही त्यानंतर मी परत फोन केला पाण्याचा टँकर आला नाही तर म्हणाले की, ताई मी टँकरवाल्याला फोन केला तो फोनच उचलत नाही, मी त्यांच्याकडुन फोन नंबर घेतला आणि मी त्या व्यक्तीला ७ वेळा फोन केला आणि ८ व्या वेळेस फोन केला तेंव्हा त्याने फोन उचलला आणि म्हणाला कोण बोलतंय. मी त्याला म्हटले ये भाऊ नीट बोल मी नगरसेविका आशा शेंडगे बोलतेय तर तो म्हणाला ताई मी तर ड्रायव्हर आहे. परत मी त्या अधिका-याला फोन केला आणि म्हणले साहेब आपण अशा प्रकारे ड्रायव्हरला फोन करतो. ते म्हणाले नाही आपण असंच करतो, ड्रायव्हरलाच फोन करतो. जो ठेकेदार आमचा फोन उचलू शकत नाही, आमच्या अधिका-याचा फोन उचलू शकत नाही हे ठेकेदार कोणाच्याही जवळचे नातेवाईक असू द्या या शहरामध्ये ज्याला कोणाला काम घ्यायचे आहे तुम्ही निवीदा भरता, हरकत नाही ज्याला कोणाला काम मिळतंय त्याबाबतीत चर्चा पण करणार नाही आणि बोलणार पण नाही पण ज्याला कोणाला काम मिळतय त्यांनी या शहरातील नागरीकाचं काम करणं, माझ्या अधिका-याचं ऐकणं,माझ्या कमिशनर साहेबांच ऐकणं, माझ्या नगरसेवकांच ऐकणं हे त्यांच दायित्व आहे.

कोणत्या मुद्यावर आपण ठाम राहणार आहात हे तुम्ही सांगा आज ज्यावेळेला तुम्ही पाणी देता महापौर साहेब खरंच आयुक्तांनी बोलले पाहिजे. आपण रात्रीच्या वेळेला टाकी भरतो आणि सकाळी पाणी सोडतो पण टाकीवर काम करणारा कर्मचारी हा महापालिकेचा परमनंन्ट कर्मचारी असतो का, सगळया टाकीची माहिती द्या. तिथं ठेकेदारांची माणसं असतात त्यातील निम्मे  कर्मचारी हे पिलेले असतात, काय करायचं आम्ही, तुम्हांला हवं असेल तर रेकॉर्डींग देते. पण रेकॉर्डींग ही २/४ माणसाच आहे पण ही आख्ख्या  शहराची अवस्था आहे. जो तुमचा परमनंन्ट माणुस २५ ते ३५  हजार रु.पगार घेतो  आणि तो ७ हजार रु.पगाराचा माणुस टाकीवर काम करतो आणि आमचा टाकीवरचा परमनंन्ट कर्मचारी  घरी बसतो.टाकी भरली की नाही, किती भरली, कशी भरली,कोणता कर्मचारी होता, पाणी सुटलं, का नाही सुटलं हे सगळं त्या ठेकेदाराच्या हातात मग आमचे १३३ नगरसेवक बोंबलणार नाही तर काय करणार. रात्रीच्या वेळेस टाकी भरणं आणि सकाळी पाणी सोडणं हे अत्यंत महत्वाचं काम आहे.  हे आम्हांला कळतं पण तुमच्या अधिका-यांना कळत नाही का? आयुक्त साहेब तुम्ही बॉस म्हणुन  माझ्या दृष्टीकोनातून कमी पडता तुमचं बॉशिंग, तुमचं नेतृत्व,तुमचं नियंत्रण आहे ते याठिकाणी  कमी पडतं असे मी सभागृहाला सांगू इच्छिते.आयुक्त साहेब, दापोडीचा काही  भाग पाहिला  तर त्याठिकाणी  कायमस्वरुपी पाण्याचा प्रश्न आहे. आपण हे शहर स्मार्ट सिटी करतो आहोत पण या दापोडीमध्ये पाण्याची टाकी नाही. दुर्देवाने आमच्या सारखा नगरसेवक अधिका-यांच्या मागे लागतो साहेब ही जागा बघा,ती जागा बघा आणि तुम्ही कारणे शोधता. माझ्या वॉर्डात टाकी उभारण्यासाठी तुम्हांला जागा शोधता येत नाही. तुमचे नियम आडवे येतात मग नियमामध्ये  काहीच बसत नाही. टाकीवर कोण काम करतो हे कळत नाही,पाणी कोण सोडतो हे कळत नाही, कुठं पाणी वाया जाते हे कळत नाही. हे सगळं आयुक्तांना कोऑर्डीनेट करायचं आणि म्हणायचं साहेब हे झालं एवढं बघा ना, तेवढं झालं बघा ना, तुमच्या अधिका-यांना तुम्ही सांगा आणि तुम्ही पण बॉस आहात आज जीबी आहे त्यामध्ये चर्चा केली पाहिजे  आणि त्यामध्ये मुद्ये सुध्दा मांडलेच पाहिजे आज खुप इच्छा होती आणि तुम्ही वेळ द्यावा आणि आपल्याला मनापासून धन्यवाद देते. तुम्हांला चांगल वाटावा यासाठी बोलत नाही. सभागृहात चर्चा झालीच पाहिजे. पुणे महापालिकेत २/३ दिवस जीबी मध्ये चर्चा चालते आमच्या शहरात  का नाही. सन्मा.आयुक्त साहेब मी एक सर्वसामान्य नगरसेविका म्हणुन ओरडते हे तुम्हांला सुध्दा कळत नाही का आपल्या अधिका-यांना बाकी सर्व गोष्टी कळतात, टेंडर कोणाला द्यायचं, कोणाला लागणार हे सुध्दा कळतय

मग माझ्या शहरामध्ये काय कमी आहे एवढं मोठं बजेट आहे या शहराचं नंदनवन होईल. पवना नदी २४ कि.मी. आहे या पवना नदीच्या परिसरात भराव टाकतात हे आम्हांला समजतं ते तुम्हाला का समजत नाही. कोण टाकतो हे माहित नाही. आणि मग शोधायचं कोणाला आणि मग मला सांगा तुमच्या कारवाईचं काय झालं आणि मग मला सुचतय तुमच्या अधिका-यांना का सुचत नाही. आख्खा नदीचा परिसर स्वच्छ करुन टाकू म्हणुन जाऊ द्या ना काही ५० ते ६० लाख रु. जर शहराच्या विकासामध्ये भर पडणार असेल तर जी नदी आमच्या सगळयांची जलवाहीनी आहे,रक्त वाहीनी आहे आज त्या नदीचं नाला व्हायची वेळ आलेली आहे. आपण त्याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून टाकू. मी घरी गेले माझ्या घराच्या इथं शंकराच मंदीर आहे त्या मंदीराच्या बाजुने धुराचा खुप मोठा ओघ येत होता.मी तिथं जाऊन विचारले काय झालं त्या बाईने सांगितले की, कोणी तरी कचरा जाळला आहे मी संजय कुलकर्णीला फोन लावला जाळलं कोणी माहित नाही,जाळून ती व्यक्ती निघुन गेली त्याची चर्चा करुन उपयोग काय आहे. त्याचा रिझल्ट येत असेल तर तुम्ही तुमचा माणुस ठेवा जसा बीआरटीचा माणुस दोरी सोडायला – ओढायला असतो तसा.आयुक्त साहेब नदीच्या काठी सीसीटीव्ही कॅमेरे लावा आणि जे कोणी राडारोडा टाकतील त्यांना दंड लावा. लोकांना कुठे तरी दहशत बसेल. आपल्याकडे प्रशासन मजबुत नाही ही खेदजनक बाब आहे. आयुक्त साहेब अनेक गोष्टी सांगण्याचा आपल्याला प्रयत्न केला त्यामध्ये पाणीपुरवठा असेल तो विस्कळीत होत आहे एक टाईम पाणी द्यायचं असेल तर आमचं अजिबात ऐकू नका शहरवासियाचं ऐका आमचं कासारवाडी,फुगेवाडी,दापोडीचे नागरीक म्हणतात एक टाईम पाणी येत होत ते बरं होतं. पण एवढया मोठया सभागृहामध्ये मी माझ्या दापोडीबद्दल बोलणं किंवा एका गल्लीमधील पाण्याचा प्रश्न मांडावा हे शोभतच नाही. परंतु दुर्दैवाने सांगावे लागते. त्याची तीव्रता रहात नाही. साहेब,आज रस्त्यापासून १५/१५ फुट उंचीचे कच-याचे ढिगारे माझ्या प्रभागात उभे आहेत. परत तुम्ही म्हणणार राजकीय हस्तक्षेप असतो, नगरसेवकाचं पाठबळ असतं,मी म्हणले कोणाला सांगु आयुक्तांना ४ वेळा सांगितलेले आहे,१० वेळा फोन केले आता माझं तर काम नाही ना त्यांच्याशी भांडायला जायचं. आपण सभागृहामध्ये शेवटचा ठराव केला होता शासनाकडे ठराव पाठवा त्यांच्याकडुन त्याच्यामध्ये दुरुस्ती करुन घ्या आणि मग ते तुम्ही मंजुर करुन घ्या. तोपर्यंत हा विषय करु नये शासनाकडुन दिड / दोन महिन्याच्या आत विषय येण्याच्या आधी इथं विषय तहकुब. अहो तुमच्या अखत्यारीत काही तरी नियम आहेत या नियमाने तहकुब करता येत नाही आता त्या माणसांने कोर्टाची

ऑर्डर आणली तो कशाला आम्हांला विचारतोय, तो म्हणणार ताई कोर्टाची ऑर्डर आहे. साहेब इतर शहरात बघा नाशिक महापालिकेच्या कच-याच्या गाडया अत्यंत स्वच्छ असतात आणि आमच्या इथं कचरा कुंडया बघा तुटक्या-मुटक्या आहेत, घाण आहेत.साहेब आमची श्रीमंत महापालिका आहे, सर्वात मोठं बजेट आहे असलेली महापालिका आहे. आयुक्त साहेब आम्ही जे,जे मुद्ये मांडतो ते कमीशनर साहेबांनी आणि त्यांच्या अधिका-यांनी हे सगळं केलं पाहिजे. इथं वैयक्तीक कोणाची जबाबदारी असेल तर आम्ही सूचना करु शकतो. तुमच्या काही सूचना असतील तर सांगा नां आम्हांला या अशा अटी,शर्ती आहेत आणि त्याला असा पर्याय आहे. ज्या बिल्डींगमध्ये मी रहाते त्या बिल्डींगला पाणीच नाही आज कित्येक ठिकाणी पाणी नव्हते, का नव्हते पाणी. बिर्ला हॉस्पिटलची काय अवस्था आहे या शहराचे शहराध्यक्ष लक्ष्मणभाऊ जगताप यांनी हे सगळं पाहिलं आपण त्यांना कशी काय परमिशन दिलेली आहे.मग आपलं डिपार्टमेंट काय करतं, का देतो,कोणामुळे परमीशन देतो. तुम्ही त्यांना सांगा ना याला अशी परमीशन दिली तर या,या कारणांमुळे हे चुकीचं होईल. खो-खो खेळणं बंद करा साहेब, दिवसें दिवस शहराची लोकसंख्या वाढत चालली आहे.शहराच्या विकासा बरोबर शहरातील काही लोकांना आपण काही गोष्टी देणं लागतो. आणि त्याचा सुध्दा विचार,त्याच नियोजन करणे आवश्यक आहे. मगाशी म्हटलं गेलं की, शहर विकसीत केलं गेलं त्याच वेळेपासून भामा आसखेड या धरणाचं पाणी आणणार हे पब्लिश करायला पाहिजे होतं बंद पाईपलाईनच्या योजनेचं नियोजन यापुर्वीच केलं असतं तर आज शहारात पाणी आलं असतं.महापौर साहेब प्रशासन अत्यंत असंवेदनशिल म्हणुन काम करीत असेल तर माझी आपल्याला विनंती आहे की,आपण संवेदनशिल म्हणुन काम करावे काय अडचणी येतात त्या सांगा पण कोणाच्याही दबावाखाली काम करणार नाही याची खात्री आहे. आणि या पुढच्या काळामध्ये माझ्या शहराचा विकास तुमच्यामुळे किंवा अधिका-यामुळे राहू नये अशी अपेक्षा याठिकाणी व्यक्त करते. आणि महापौर साहेब आपण प्रशासनाला कडक आदेश द्या अत्यंत महत्वाची बाब आहे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. धन्यवाद.

**मा.सचिन चिंचवडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आजच्या या सभागृहामध्ये गेली ५ तास झाले चर्चा चालू आहे. महापौर साहेब मी आपलं अभिनंदन करतो की, आज शहरामध्ये कोणी बोलायचं राहिले आहे आणि जे बोलले नाही त्यांना काही अडचण नाही असा काही गैरसमज करुन घ्यायची गरज नाही. या चर्चेत जे बसलेले आहेत ते सर्वजण सहभागी आहेत असं गृहीत धरायला काही हरकत नाही. संपुर्ण शहरामध्ये आपण

ज्या विषयावर ५ तास चर्चा करीत आहोत या चर्चेमध्ये प्रत्येकानी आपआपले मत मांडलेलं आहे. आणि आपला रोष व्यक्त केलेला आहे. आपल्या शहराचे माजी उपमहापौर शैलजाताई यांनी राजीनामा द्यायची तयारी दर्शविलेली आहे.ही नक्कीच खेदजनक गोष्ट आहे. याच बरोबर माजी महापौर नितीन आप्पा यांनी आपलं मत प्रशासनाच्या विरोधातच मांडलेलं आहे. खरं तर मला असं वाटतय की, “ना भय ना भ्रष्टाचार” हे भाजपाचे ब्रीदवाक्य पहायला मिळते आहे. कारण विरोधी पक्षाच्या नेत्यांनी बोलण्यापेक्षा सत्ताधारी पक्षाच्या लोकांनीच जास्त उचलून धरलं आहे. म्हणजे आम्हांला कोणाचं भय नाही हे सिध्द होतं. म्हणजे आम्ही चुकीच्या गोष्टीबद्दल आवाज उठविण्याची क्षमता आम्हांला पक्षांकडुन मिळते आहे याबद्दल मी पक्षनेत्याचे अभिनंदन करतो.की ते आम्हांला एवढी सवलत देत आहेत की, तुम्ही तुमचं मत चांगल्या पध्दतीने मांडा प्रशासनाच्या विरोधात जुन्या काळात बोललं जात नव्हतं. सत्ताधा-यांना तर नक्कीच नाही. सत्ताधा-यांनी प्रशासनाच्या विरोधात बोलणं म्हणजे घरचा आहेर देणं ही आतापर्यंतची एक संकल्पना सभागृहाने पाळली. आज या सभागृहात भाऊसाहेबां सारखे ज्येष्ठ नेते यांनी हे सभागृह गेली २०/२५ वर्ष पाहिलेलं आहे. तर मला नाही वाटत एखादा सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक विरोधात बोलला आहे. सिमाताईनी सांगितलेल्या गोष्टीच मी खंडण करतो प्रशासन चालवायला भाजप अपयशी नक्कीच नाही असे मला वाटतंय उलट “ना भय ना भ्रष्टाचार” या ब्रीद वाक्याप्रमाणे आज हे सभागृह चाललं आहे. आज आपल्या या सभागृहामध्ये पाण्याच्या आणि आरोग्याच्या संदर्भात सगळेजण ओरडत आहेत मी पण त्यातून बाहेर नाही मी पण त्याच्यामध्ये सहभागी आहे. माझ्या प्रभागामध्ये देखील पाण्याची समस्या आहे मी पण प्रशासनाच्या विरोधात आहे. पण आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रभाई मोदी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी “मन की बात” मधुन निरोप दिला असेल आता आपल्या सभागृहामध्ये कोण किती ऐकतो हे मला माहित नाही परंतु मागच्या दोन महिन्यापुर्वी आदरणीय पंतप्रधानांनी पाण्याच्या संदर्भात एक छान मेसेज दिलेला होता आणि आपल्या सगळयांना माहिती आहे त्यांनी मेसेज दिला हे महत्वाचं नाही आणि त्यांनी मेसेज दिला म्हणुन तसं वागणं आणि कृतीत आणणं महत्वाचं आहे. पंतप्रधानानी एक मेसेज दिला होता की, पाणी जपून वापरा आता सांगली,कोल्हापूर याठिकाणी जो पूर आला त्यामुळे कोटयावधी रुपयांच नुकसान झालं आणि काही जनावरे, माणसांचे जीव त्याच्यामध्ये गेले. मी चार दिवसापूर्वी तेथे जाऊन आलो,प्रत्यक्ष परिस्थिती पाहून आलो आणि तेथून ५० ते ७० कि.मी.चा परिसर सोडला तर आजही त्याठिकाणी नद्या कोरडया ठणठणीत पडलेल्या

आहेत. आपणच एका गोष्टीचा अट्टाहास करणं ही चुकीची गोष्ट आहे. नक्कीच एका ठिकाणी पाऊस भरपूर आहे आणि एका ठिकाणी नाही. सोलापूर भागात पाऊस झालेला नाही याठिकाणच्या नद्या कोरडया पडलेल्या आहेत अशी परिस्थिती असताना आपल्या देशाचे पंतप्रधान जे मार्गदर्शन करतात त्या मार्गदर्शनाचा आपण सर्वांनी विचार करुन पाणी व्यवस्थित वापरावे असे मला वाटते. पाण्याचे जे शेडयुल होतं त्यामध्ये बदल करणार नाही जे शेडयुल आहे त्याप्रमाणे चालू राहील असे स्टेटमेंट होतं. आयुक्तांचही म्हणणं असेच आहे की, पाणी आहे तसंच चालू ठेवलं तर चांगल राहील. या शहराचे दोन व्यक्ती म्हणजे आयुक्त आणि महापौर हे कसे शहर चालवतात हे सगळयांना माहिती आहे. हे सत्य आहे की,आम्ही तुमच्या बरोबर आहोत,सहभागी आहोत आमचं नांव या,या मिटींगमध्ये लिहीलं जातं या,या मिटींगमध्ये हे उपस्थित होते. आमच्या विचाराचा,आमच्या बोलण्याचा कितपत परिणाम होतो हे आम्हां सगळयांना माहिती आहे.ज्यावेळेस आपण गेल्या तीन महिन्यामध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा करीत होतो त्यावेळेस पाणीपुरवठा अगदी व्यवस्थित चालू होता नागरीकांच्या तक्रारी नव्हत्या. आज सगळीकडे लोक आक्रोश करुन भांडतात,सगळीकडे या गोष्टीला सामना करावा लागतो आहे. सगळीकडे शहरात पाण्याची समस्या बिकट आहे. आयुक्तांची इच्छा नव्हती,महापौरांची इच्छा नव्हती इथे बसलेल्या १३३ नगरसेवकांना तर त्याची कल्पना नव्हती. आशिया खंडातील ही श्रीमंत महापालिका स्मार्ट सिटीच्या माध्यमातून आपण वाटचाल करीत आहोत अशी महापालिका ही ऍटोमॅटीक झाली का? कारण ज्या महापालिकेला दोन मुख्य चाके आहेत त्या चाकांनाच माहिती नाही की, आपण नेमके कुठल्या दिशेने चाललो आहे याचा अर्थ असा होतो की, सन्मा.आयुक्त, सन्मा.महापौर, सन्मा.नगरसेवक यांच्या व्यतिरिक्त इथं कोणती तरी बाहेरची व्यक्ती येऊन महापालिका चालविते असे वाटते. आयुक्त साहेब मी तुम्हांला एका नाल्याच्या संदर्भात सांगितलं होतं आता बाळासाहेबांनी पण तोच विषय काढला त्याच्यावरती तुम्ही छानसं उत्तर दिलं आता तुमच्याकडे माहिती ही तुमचे अधिकारी देतात. आणि संबंधित नोटीसा जे काही आहे तो व्यक्ती छातीठोकपणे सांगतो की, कोणी काहीही केलं तरी याचा काहीही परिणाम होणार नाही.एवढी खात्री बाहेरच्या व्यक्तीला असते आणि अधिका-याला त्यांच नॉलेज कमी पडतं म्हणुन आपण चुकतो ज्यावेळेस एखादी मोठी दुर्घटना घडेल त्यावेळेसच आपण ऍक्शन घेणार आहात का? पाण्याच्या संदर्भात आपण खुप मोठी चर्चा केली ही चर्चा करताना याच्यावर सोल्युशन काय आहे यावर खुप कमी लोकांनी चर्चा केली. आपण याठिकाणी सर्व

सदस्यांनी पक्ष विसरुन सर्वांनी एकत्र येऊन काम करणं गरजेच आहे. आज शहरामध्ये पाण्याचा प्रश्न जसा गंभीर आहे तसेच कच-याचा प्रश्न देखील गंभीर आहे कच-याच्या बाबतीत बोलायचं झालं तर गेली दोन महिने झाले माणसा अभावी कच-याचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत महापालिका सभा होती की नाही आणि हा प्रश्न मार्गी लागेल की नाही अशी शंका येत होती. आता ब-यापैकी परिस्थिती नियंत्रणात आलेली आहे. कच-याचा ठेका घेताना ठेकेदार ज्याठिकाणी कच-याच्या २० गाडया लागत होत्या त्याठिकाणी ठेकदार चारच गाडया आणतात. म्हणजे जो ठेकदार काम घेतोय जिथं १६ गाडया लागत होत्या तो तिथं चारच गाडयामध्ये मॅनेज करतोय म्हणजे जवळ जवळ १६ गाडयांचा पैसा तो वाचवतोय हा पैसा एखादा ठेकेदार वाचवू शकतो आणि महापालिका म्हणुन आपण इथं पैसा वाचवू शकत नव्हतो का?कुठल्याही बाबतीत आपण ठेकेदाराला काम देताना आपण कुठल्या परिस्थितीला देतो आणि आपण त्याचा वापर का करीत नाही. मग ती कोणतीही गोष्ट असू द्या आज बाजारात सहज उपलब्ध होणारा बाकडा रु.१७०० ते १८०० रुपयला मिळतो आणि आपली महापालिका तोच बाकडा ४५०० ते ५००० रु.ला घेतो. महापालिकेच्या कोषागारात जे पैसे जमा होतात ते शहरातील कष्टकरी जनतेच्या खिशातून १-१ रु.जमा होत असतो. आपण याचा अजिबात विचार करायचा नाही का? याची जबाबदारी आपली नाही का? का नगरपालिकेचे पैसे आहेत म्हणुन कसेही वापरायचे का? स्वत:चे पैसे असले की,माणुस प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत विचार करतो. १० रु.ची वस्तु असेल तर आपण १० रु.च देतो १५ रु.देत नाही. त्यावेळेस आपण वैयक्तीक पातळीवर वस्तु खरेदी करीत असतो. आणि नगरपालिकेसाठी वस्तु खरेदी करायची म्हणले की, १० रु.ची वस्तु २० रु.ला खरेदी केली तरी फरक पडत नाही.असं आपण का करतो. कारण महापालिका ही आपली समजत नाही. म्हणुन या सगळया गोष्टी घडतात. या शहरातील प्रश्न कच-याच्या संदर्भातील असु द्या, पाण्याच्या संदर्भातील असु द्या किंवा रस्त्याच्या संदर्भातील असु द्या मागे गेल्यावर्षी एका सभेमध्ये मी सांगितलं होतं की,आमच्या प्रभागामध्ये कुठल्याही प्रकारची खोदाई करताना संबंधित नगरसेवकांना विचारणा करीत जा. आजपर्यंत असा कुठल्याही बाबतीत असा निर्णय झालेला नाही. म्हणजे इथं फक्त चर्चा करायची परंतु त्याची अंमलबजावणी करायची नाही. या शहराचे माजी उपमहापौर याठिकाणी राजीनामा देण्याची घोषणा करतात शहराचे माजी उपमहापौर याठिकाणी त्यांची व्यथा मांडतात. महापौर साहेब, पाण्याच्या संदर्भात तुमची इच्छा नव्हती तरी या पाण्याच्या बाबतीत निर्णय घेतला गेला. अशी छोटीशी बातमी होती. माझा याला

विरोध होता. पाणीपुरवठा होतो कुठून महापौरांच्या मनात नाही,आयुक्तांच्या मनात नाही मग हा होतो कुठून आणि का? मा.महापौर साहेब,आपण या शहराचे २५ वे महापौर आहात आणि सुदैवाने आपल्याला ३ महिने मुदतवाढ मिळालेली आहेत.त्यामुळे आपलं अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो. आणि महापौर साहेब आपण या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये असं काम करा की, येणा-या पुढच्या २५ वर्षामध्ये आणि मागील २५ वर्षामध्ये असा महापौर झालेच नाहीत असं घडल पाहिजे. अशा पध्दतीचे निर्णय तुम्ही घ्या आणि आयुक्त साहेब तुमचे सुध्दा ६ च महिने राहीलेले आहेत तुम्ही सुध्दा गेल्या अनेक वर्षामध्ये केलेलं नाही ते या सहा महिन्यामध्ये असं लोकाभिमुख काम करुन दाखवा की, या शहरासाठी आणि सर्व सामान्य जनतेसाठी असं काम करुन दाखवा की,ज्यांनी यापुर्वी कोणी केलंल नाही आणि जनतेच्या मनात कायम स्मृतीत राहील असं एखादं तरी काम करावे. श्रावण हार्डीकर हे आयुक्त म्हणुन पिंपरी चिंचवड मध्ये आले आणि त्यांनी हा निर्णय घेतला आणि तो जनतेच्या मनात कायमस्वरुपी स्मृतीत राहील असं एखादं तरी काम करावं अशी तुमच्याकडुन अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.शितल उर्फ विजय शिंदे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. धन्यवाद महापौर साहेब, इतका वेळ आपण थांबलात,सर्वांचे विषय समजुन घेतले आताच्या कारभारावरती एक छोटसं काव्यपंक्ती सादर करतो. शिर्षक आहे “पाणी” पाणी रे पाणी तेरा रंग कैसा, जिसमे मिलाया उसके जैसा, श्रावण होते हुए भी यहा तो तेरा मिलना भी मुश्कील गढ्ढे भरे हुए है या फिर भी तेरे आगे जनता डुबे, अधिकारी तो नींद में है ये जनता डुबेगा, ये शहर डुबेगा हमें तो लेना, देना है हमारी तन्ख्वासे पाणी रे पाणी तेरा रंगा कैसा, जिसमें मिलाएं उसके जैसा. साहेब, ही काव्यपंक्ती म्हणजे उगाच नाही बोलून दाखवली आताची जी परिस्थिती आहे शहरामध्ये प्रत्येक नगरसेवकाला पाण्याची अडचण आहे. प्रत्येकाच्या वॉर्डातील माता-भगिनींना अडचणी आहेत रात्री ११/१२ वाजेपर्यंत पाण्यासाठी फोन येतात. आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेचं घोषवाक्य आहे “कटिबध्दाय जनहिताय” असं घोषवाक्य आहे पण आज आपण ते विसरुन गेलोय. आता त्याच्या उलट चालू आहे कटिबध्दाय ठेकेदार स्वहिताय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ठेक्यावर ठेके निघतात पण कामे काही होत नाहीत. तुमचं जे वेतन आहे आणि आमचं मानधन हे शहरातील लोकांच्या करातून मिळतंय साहेब,आणि आपण त्यांच्यावर एक,एक अन्याय करत चाललो

आहे. एक दिवस आड पाणी येईल, तुला गरज असेल तर घे नाही तर बोंबलत बस साहेब आपण जो मानधन आणि पगार घेतो तो त्यांनी जमा केलेल्या पैशातून घेत आहोत. त्यामुळे त्यांना रोजच्या रोज पाणी देणे गरजेचे आहे. कारणांवर कारणं भरपुर निघतात, मगाशी गढूळ पाणी आलं म्हणुन पंपींग होत नाही. अहो, नवीन मशिनरी बसवा नां, याचा अर्थ एकच आहे आपले काही अधिकारी नेता अवस्थेत गेलेले आहेत आणि त्यांच्यामुळे जे सत्तेत असतात आता आम्ही सत्तेमध्ये आहोत,उद्या तुम्ही सत्तेमध्ये असाल पण उद्या रोष येतो की, सताधा-यामुळं हे सगळं चाललं आहे. सत्ताधा-यावर रोष करण्याची परिस्थिती नाही की, प्रशासनाने पूर्ण काळजी करण्याची गरज आहे. आणि या चुका प्रशासन करीत आहे.माझं एकच सांगणे आहे की,आमचा जो मुलभूत हक्क आहे उद्या आपल्याला असे मोर्चे काढायला नाही लागले पाहिजे की,आमच्या जीवनावश्यक वस्तुसाठी इथंपर्यंत यायला नाही लागलं पाहिजे. रोज पाणी मिळालं पाहिजे अशा प्रकारचं नियोजन करावे आणि आमची,महापौरांची जी काही मदत लागत असेल ती घ्या पण अन्याय करु नका एवढंच सांगतो आणि थांबतो. जयहिंद,जय महाराष्ट्र.

**मा.माया बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वांत प्रथम मी महापौरांच अभिनंदन करेन की,पाणी या विषयासाठी आपण स्पेशल जनरल बॉडी ठेवली आहे. अशीच एक स्पेशल जनरल बॉडी आरोग्य विभागासाठी ठेवावी अशी माझी विनंती आहे.महानगरपालिकेचे जेवढे विभाग आहेत पाणीपुरवठया सारखीच त्यांची स्थिती आहे. या दोन-तीन वर्षात जर का आपण पाहिलं तर शहराची अक्षरश: चाळण झालेली आहे. नागरीकांना ज्या,ज्या मुलभूत सुविधा द्यायच्या आहेत त्या योग्यप्रकारे दिल्या गेलेल्या नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. आता सन्मा.सदस्यांनी पोटतिडकीने बोलले आहेत. काहींच्या तोंडून अपशब्दही गेले. हा कुठला वैयक्तीक रोष नव्हता. परंतु कुठे तरी प्रतिनिधीत्व करीत असताना आम्ही कमी पडतो आहे ही खंत मनामध्ये होती आणि तो राग नकळत बाहेर पडला. खरं तर प्रशासनाला मी दोष देणार नाही. कारण ते ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. आपल्याकडे पाणी भरपूर आहे परंतु नियोजनाचा अभाव आपल्याला याठिकाणी जाणवतो. आपण खुप चांगल्या योजना आणल्या २४ बाय ७ चा पाणी पुरवठा असेल, अमृत योजना असेल अमृत योजना करीत असताना आपण स्थापत्य विभागाचा आपण कधी विचार केला नाही. त्या दोघाचं कधीही कॉऑर्डीनेशन झालेलं नाही. आणि हीच स्थिती संपुर्ण शहरामध्ये

आहे संपुर्ण रस्त्याची चाळण झालेली आहे. एकही काम व्यवस्थित नाही. म्हणुनच हा रोष सगळया नगरसेवकांच्या तोंडून आलेला आहे. योजना कुठलीही वाईट नसते, योजना या चांगल्या असतात आणि त्याचा अभ्यास करुनच या शहरासाठी राबविल्या जातात आणि त्या राबविताना कुठं तरी प्रशासन कमी पडतंय हे आपल्याला दिसुन येत आहे. भविष्यात जर आपल्याला पाणी प्रश्न सोडवायचा असेल तर पवना धरणाची बंद जलवाहीनी, किंवा भामा आसखेड धरणांमधुन पाणी आणायचं आहे तो प्रश्न मार्गी लावणं गरजेच आहे. त्यासाठी महापौर आणि दादांना विनंती आहे की, सर्वपक्षीय जे वरीष्ठ नेते आहेत त्यांची आणि प्रशासनाची एक मिटींग लावावी की जेणेकरुन आज शहराची जी अवस्था आहे पुढं चालून ३/४ वर्षानंतर अजुन बिकट होऊ नये त्यासाठी आताच पावलं उचलणं गरजेचं आहे. खरं तर पाणी अतिशय महत्वाचा घटक आहे.आणि तो महिलांना जास्त करुन जाणवतो. कारण आमचं प्रत्येक काम हे पाण्याशिवाय होत नाही. पण हे सर्व करीत असताना दिवसाआड जो पाणीपुरवठा करीत होतो तो मला वाटते योग्य होता. आता जर तुम्ही दररोज पाणी देणार असाल, तर तो पूर्ण क्षमतेने देणार असाल तर द्या नाही दिवसाआड पाणी सुध्दा या शहरातील नागरीकांनी ऍक्सेप्ट केलेला आहे. आतापर्यंत धरणं भरलेली आहेत हे मान्य आहे परंतु पुढच्या दोन महिन्यात पाऊस पडेलच याची गॅरंटी ना तुम्ही घेऊ शकता ना आम्ही घेऊ शकत नाही. मग आपल्याला जर पुढच्या जुन पर्यंत नियोजन करावयाचे असेल तर कुठे तरी आताच सांगड घालावी लागणार आहे. या शहरामध्ये अनेक प्रश्न प्रलंबीत आहेत.खरं तर ते बोलले पाहिजे परंतु ऑल रेडी आपली ५ तास जीबी चालू आहे आणि प्रत्येकाची आता मानसिकता राहीलेली नाही. तर माझी तांबे साहेबांनी विनंती आहे की, त्यांनी याचा खुलासा द्यावा. आणि आयुक्त साहेबांनी एक अल्टीमेट द्यावा की,हा प्रश्न किती दिवसात मार्गी लावणार आहात एवढं बोलून मी थांबते धन्यवाद.

**मा.सुलक्षणा धर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज ५/६ तासाच्या चर्चेनंतर पाणी,पाणी आणि पाणी शेवट हा पाण्यावरचं होणार आहे की, काय कळत नाही. आणि याचं सोल्युशन आपण काढणार आहे की नाही ते कळत नाही. खरं तर सगळेजण पिण्याच्या पाण्याबद्दल बोलतात पिण्याचं पाणी कमी आहे, पिण्याचं पाणी गढुळ आहे, लिकेज आहे. २४ बाय ७ सक्सेसफुल झालय की नाही,होणार आहे की नाही या सगळयांच्या चर्चा आहेत परंतु त्याचबरोबर दुसऱयाही बाजुने बघणे गरजेचे आहे तेवढंच

महत्वाचं आहे. कारण आपल्याकडे जी पुर परिस्थिती होती आणि त्या पुर परिस्थिला आपल्या शहरातील अधिका-यांनी, प्रशासनाने योग्य प्रकारे सामोरे जाऊन कुठल्याही प्रकारची आपल्या इथे जीवीत हानी झालेली नाही. तर त्याबद्दलचं कौतूक आपण तितक्याच यानं करावं अस मला वाटतयं कारण ज्या पध्दतीचं आपल्याकडे पुरेसं मनुष्यबळ होत परंतु कुठं तरी  या पुरस्थितीमुळं आपल्या कर्मचा-यांनी आरोग्याची टिम असेल, रेस्क्यु टिम असेल, अग्निशामक दल असेल किंवा आपली डिझास्टर मॅनेजमेंट टिम असेल या सगळयांनी खूप चांगल्या पध्दतीने काम केलेलं आहे. तर त्याबद्दल सर्वप्रथम मी त्यांच कौतून करेन  आणि मी सभागृहाला  विनंती करेन की, अशा प्रकारच्या ज्या नॅचरली आपत्ती येतात त्या सांगुन येत नाहीत.तर भविष्यातही अशी परिस्थिती आपल्यावर निर्माण होईल त्यासाठी आपली जी मॅनेजमेंट टिम आहे ती वाढवणं ही काळाची गरज आहे. कारण ज्या पध्दतीनं अग्निशामक दल संत तुकारामनगर मध्ये आहे त्यांच्याकडे ज्या बोट होत्या त्या बोटचं प्रमाण खूप कमी आहे. आणि त्यांची जेवढी मागणी होती तेवढी आपण कम्पलीट करु  शकलो नाही. कारण अर्ध्या रावेतला होत्या, अर्ध्या ताथवडेला होत्या, अर्ध्या पिंपरीला होत्या जो पुरग्रस्त भाग होता तिकडे सगळीकडे आपण  सॅटीसफाईड करु शकलो नाही. या पध्दतीचं मॅनेजमेंट आपल्याला भविष्याच्या  दृष्टीने करणं खूप गरजेचं आहे कारण आतापर्यंत सगळया जणांच म्हणणं होतं की, नदीमध्ये भराव घातल्यामुळे अशी परिस्थिती भविष्यात कधीही येऊ शकते.त्याच्यासाठी आपल्याला या सभागृहामध्ये हा विषय घेणं खुप गरजेचं आहे.ज्या पध्दतीने आपल्या २४ बाय ७ आता शहरात सगळीकडे धो-धो पाऊस चालू आहे परंतु आपल्या २४ बाय ७ च्या योजनेचा ठेकेदार मात्र सगळीकडे रस्ते खोदून शहराचे विद्रुपीकरण करण्यामध्ये ते अगदी सराईत होते. माझ्या एरियामध्ये अगदी धो-धो पाऊस चालू आहे आपल्या फायरब्रिगेडच्या गाडया पास व्हायला सुध्दा जागा नाही परंतु २४ बाय ७ ची खोदाई सुरु होती. आणि त्यांना मी विचारल्यानंतर आपल्या अधिका-यांना सुध्दा माहित नव्हतं प्रायोरीटी सुध्दा त्यांना माहित नव्हतं खरं तर मी अधिका-यांना विचारलं की, काम चालू आहे का तर आपल्या अधिका-यांना सुध्दा शहरात काय चाललंय हे माहित नाही.म्हणजे सगळे ठेकेदाराच ठरवणार आहेत का? त्यांनी काम कधी सुरु करायचं आहे,कधी थांबवायचं आहे पाऊस सुरु असताना आपण पाण्याचं काम,ड्रेनेजचं काम ही सगळी कामं थांबवतो परंतु आज सुध्दा माझ्या वॉर्डामध्ये पाण्यासाठी खोदाई चालू आहे. २४ बाय ७ मुळे ऑल रेडी माझ्या संत तुकारामनगर मध्ये असेल,कासारवाडी मध्ये असेल चालायला रस्त्यांवर जागा

नाही मोठ मोठे हॉस्पिटल्स आहेत, फायरब्रिगेड आहे तिथं गाडया पास होत नाहीत परंतु आमच्या शहरामध्ये खोदाई मोठया प्रमाणात चालू आहे. अशा प्रकारे आपण नागरीकांना किती त्रास देणार आहे.या सर्व गोष्टी आपण ठेकेदारांच्या सोईनी करणार असाल तर हे कशा पध्दतीने आपण कंट्रोल करणार आहे. ज्या पध्दतीने आपण चौकशी करतो अधिकारी सांगतात आम्हांला माहित नाही, ठेकेदार सांगतो आम्हांला काम संपवायच आहे संपुर्ण उन्हाळयामध्ये ठेकेदारांनी काम केलेलं नाही आणि आता पावसाळा सुरु झाल्यानंतर त्यांनी काम सुरु केलेलं आहे. ड्रेनेज असेल किंवा वॉटर असेल या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्वाच्या आहेत आणि स्थापत्य विभागाने तर यावर्षी अजिबात लक्ष दिलेलं नाही. डांबरीकरणाचं काम असेल किंवा ब्लॉकचे काम असेल त्यांच असं म्हणणं आहे की,आता ताई असं म्हणाल्या की,त्यांच एकमेकामध्ये कॉऑर्डीनेशन नाही. स्थापत्य विभाग येणार काम करुन जाणार आणि मग पाणीपुरवठयाचे ठेकेदार येणार, ड्रेनेजवाले येणार आणि रस्ता खोदाई करुन जाणार.खरे तर बरेचसे विभाग आहेत की, आपण अधिका-यांच्या सोयीनुसार काम करतो आणि आपले अधिकारी सुध्दा ठेकेदाराच्या सोयीनुसार काम करतात. आणि आपल्या फेव्हरेबल ठेकेदारांना काम मिळावं म्हणुन त्यांच्या जीवाचा आटापीटा चालू असतो. आणि त्यासाठी महापौर साहेब, आपल्याला एक आठवण करुन द्यायची आहे की,अशा ब-याचशा गोष्टी आहेत की, स्थापत्यची कामे झाली की, किंवा कोणतीही आपल्या अधिका-यांना फक्त त्याच गोष्टीमध्ये इंटरेस्ट आहे की,आपला फेव्हरेबल ठेकेदारा त्या कामावर बसला पाहिजे. बरीचशी कामे अशी आहेत की,बरेचसे ठेकेदार याठिकाणी पाळलेले आहेत ब-याचशा ठेकेदारांनी त्यांच्या कॅपॅसिटीच्या बाहेर कामे घेतलेली आहेत त्यामुळे कामे ठप्प आहेत आणि आपल्याला आवर्जुन गोष्ट सांगावीशी वाटते की, स्पेशिफिकेशन टाकण्यामध्येच आपले अधिकारी हुशार आहेत. माझ्या वॉर्डामधील कामामध्ये आपण स्पेशिफिकेशन आपण डांबराची अट टाकलेली आहे. रस्ता अगदी १०० ते २०० मीटरचा असेल परंतु डांबराची अट का टाकली आहे हे आपल्यालाही माहिती आहे. याची सविस्तर चौकशी केली असता यामध्ये आपलं नांव सांगण्यात आले की, आम्ही आयुक्त साहेबांना विचारुन स्पेशिफिकेशन टाकतो. साहेब,नगरसेवकांना एवढं सुध्दा मुर्ख बनवू नये असे मला याप्रसंगी सांगावेसे वाटतं. बरेचसे ठेकेदार आहेत म्हणजे अगदी आपल्या स्थापत्यच्या केबीन म्हणा किंवा प्रत्येकाच्या आपले जेवढे एक्झीक्युटीव्ह अधिकारी आहेत तिथे बसुन हे सगळं ठरलेलं असते त्यांना आपल्याला रिंग करायची असते आपल्याला ठरवयाचं असतं की, कोणता ठेकेदार अधिका-यांसाठी

फेव्हरेबल आहे आणि अधिकारी सांगतात ना आपल्या नावावर या सगळया गोष्टी ढकलतात बरेचसे ठेकेदार आपल्या पालिकेचे जावई आहेत त्यामध्ये साठे,खोसे,धनेश्वर असतील, मातेरे असतील या सगळयांना आपण एवढी कामे दिलेली आहेत की, आता त्या कामाची परिस्थिती काय आहे.हे सुध्दा बघणं गरजेचं आहे प्रत्येक एरियामध्ये टेंडर झाले आहेत पण त्या कामाची आता सेन्स काय आहे हे बघणं आता गरजेचे आहे. टेंडर झालयं, भूमीपुजन झालयं पुढची परिस्थिती काय आहे हे सुध्दा बघणं गरजेचं आहे या सगळया गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो पाण्याबरोबरच ड्रेनेज लाईन सुध्दा आता खुप खराब झालेली आहे.या गोष्टीही बघणं गरजेचं आहे. पाण्याच्या बाबतीत आता सगळयांनी पोटतिडकीनं सांगितलं आहे. आमचंही म्हणणं आहे की, माझ्या एरियामध्ये सुध्दा बराचसा स्लम एरिया आहे आणि आपण एमआयडीसीकडुन पाणी घेतो. एमआयडीसीने पाणीपुरवठा बंद केला की, ती लोक बरेच दिवस पाण्यापासून वंचित राहतात. मग ७ दिवस, ८ दिवस एमआयडीसीला जसा वेळ मिळेल तशी ते त्यांची लाईन क्लीअर करुन देतात आणि मग आमच्या नागरीकांना पाणीपुरवठा होतो स्टोअरेज कॅपॅसिटी त्यांच्याकडे अजिबात नाही. त्यांचाही आपण विचार करण्यात यावा.त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था आपल्याकडे असली पाहिजे. आताच ज्या पध्दतीने बरेच जण म्हणाले की,आपल्याकडे नियोजन पध्दतीने काम होत नाही. प्रॉपर मॅनेजमेंट झालं पाहिजे सगळयांना इक्वल डिस्ट्रीब्युशन झालं पाहिजे. आणि आपण ज्या पध्दतीने म्हणालो की, पाणी ज्या पध्दतीने आपण उचलतो तो प्युरीफायर करायला जेवढा खर्च करतो त्याच्या बदल्यात आपण जर बंदीस्त पाईपलाईन आणली तर तो खर्चही वाचेल आणि आपली स्टोअरेजची कॅपॅसिटी वाढवली तर आपल्याला कन्टीन्युशन फ्लोमध्ये आपल्याला नागरीकांना पाणीपुरवठा करता येईल. या शहराची लोकसंख्या दिवसें दिवस वाढणार आहे. तर यापुढेही आपल्याला याच्यापेक्षा जास्त भयंकर आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. तर आजची जी पाण्यावरची सभा आहे सर्वांनी आपली भावना व्यक्त केलेली आहे याबाबतीत कमिशनर साहेबांनी आपले मनोगत व्यक्त करावे म्हणजे प्रत्येकाच्या शंकेचे निरासन होईल आणि प्रत्येकाला आपल्या वॉर्डमध्ये गेल्यानंतर नागरीकांना कशा पध्दतीने दिलासा द्यायचा हे कळेल महापौर साहेब, आपण बोलायला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते धन्यवाद.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरं म्हणलं तर आयुक्त साहेब मी आपलं अभिनंदन करतो कारण आपल्या शहरामध्ये गेल्या १०/१५ दिवसापुर्वी आपल्या नद्यांना पूर आला आणि काही गावामध्ये आणि काही वसाहतीमध्ये काही झोपडपट्टयामध्ये पाणी शिरलं आणि त्याचं नियोजन,जी सिस्टीम होती त्यांनी अत्यंत चांगलं काम केलेलं आहे त्याबद्दल अभिनंदन करतो. आणि जवळ जवळ माझ्या माहितीप्रमाणे सर्व नगरसेवकांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यातुन माझ्या मनाला एक सुचलं की, आपल्या शहरामध्ये पाण्यावरुन कोणाची ना कोणाची भांडण होत असतात आरोग्याचा कचरा उचलण्यावरुन भांडण होत असतात त्याचबरोबर गाडी पार्कींगवरुन भांडणं होत असतील उदा.द्यायचं असेल तर आमच्या रहाटणी – काळेवाडीमधुन जाणारा जो बीआरटी रस्ता आहे तो गेली ४/५ वर्षापासून तयार आहे त्याच्यामध्ये सुध्दा गाडयाची पार्कींग होत असते. किंवा पार्कींगवरुन भांडण होत असतात भांडणं झाल्यानंतर आपण काय करतो पोलीस चौकीला कम्पलेंन्ट देतो परंतु चौकीला गेल्यानंतर त्या पोलीसाने त्याच्या खाकी वर्दीच्यामधुन उत्तर दिलं किंवा एखादया नागरीकाला अपमानास्पद जर बोललं तर त्या नागरीकाला वाटते की, त्याचा अपमान झाला. म्हणुन तो माणुस त्या चौकीमध्ये पाऊल सुध्दा ठेवणार नाही. परंतु मला म्हणायचे आहे की, गेली ५ तास चर्चा चालू असताना आणि नगरसदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करताना अधिकारी कामे करीत नाहीत म्हणुन त्यांची नांवे घेतली गेली. त्यांना बोललं गेलं परंतु मला वाटते की एखादयाला जास्त बोललं तर किंवा मारलं आणि कितीही मारलं तर तो लागलं तरी लागलं नसल्यासारखं करतो तर त्याला म्हणतो तुझी काय गेंडयाची कातडी आहे का?किंवा एखादयाला कितीही शिव्या दिल्या किंवा कोणी काय बोललं तर तो नाराज होईल म्हणुन आपण त्याची काळजी करतो. असं आपल्या महानगरपालिकेच्या अधिका-यांमध्ये होतं की काय अशी मनामध्ये शंका येते. मला वाटते आपले शहर हे स्मार्ट सिटीमध्ये जाईल असे वाटते परंतु आपले पाणीपुरवठयाचा विषय असेल, आरोग्याचा विषय असेल,रस्त्याचा विषय असेल असे विविध विषय असतील मला वाटते गेली १५ दिवस मी बघतोय आमच्या भागामध्ये रहाटणी आणि लिंक रोड या दोन रस्त्याचे कॉंक्रीटचे काम चालू करायचे आहे किंवा काही प्रमाणात चालू झालेले आहे. त्याच्यामध्ये रस्त्याच्या कडेला लागणा-या हातगाडया असतील, दुकानातील माल बाहेर ठेवलेला असेल, येणा-या जाणा-या नागरीकांना याचा त्रास होतो याच्यावर कारवाई करावी असे कार्यकारी अभियंता पोरेड्डी साहेबांना वारंवार सांगितले होते परंतु याच्यावर कारवाई

केली जात नाही याची खंत वाटते. फक्त कागदावर घोडे नाचविले जातात पण कारवाई झाली नाही. हे अधिकारी का ऐकत नाहीत हे मला कळत नाही. पाणीपुरवठयावर ब-याच सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तांबे साहेबांच नांव घेतलं गेलं तांबे साहेबांच्या बाबतीत आयुक्त साहेबांनी काय कारवाई केली हे माहित नाही. पाणी पुरवठयाच्या संदर्भात ज्या ज्यावेळेस मिटींग झाल्या त्या त्यावेळेस तांबे साहेबांना बोलवून घेतलं होत तर त्यावेळेस तांबे साहेबांनी माझी समजुत काढली तापकीरनगर ते छत्रपती चौकापर्यंत एक लाईन टाकली आणि त्या लाईनमधुन मला सांगितलं गेलं की, प्रतिदिन आपल्याला ३ ते ४ लाख लिटर पाणी घेता येईल. मी म्हणलं बरं झाल आपल्या एरियाला चांगला पाणीपुरवठा होईल.परंतु आयुक्त साहेब इथं खंत व्यक्त करण्यासारखी आहे की,आज जवळ जवळ माझ्या वॉर्डामध्ये ९० टक्के पाणी हे कमी दाबाने मिळते आहे. आयुक्त साहेब एखादया भागामध्ये ७० ते ८० टक्के पाणी दयायचं असेल तर किती तास पाणी दयावं लागेल. दोन तास,तीन तास,चार तास माझ्या भागामध्ये जवळपास ७ तास पाणी मिळतंय रात्री २ वा.पाणी सोडलं जातय तर सकाळी ९.०० पर्यंत पाणी असतंय तरी त्या भागामध्ये तक्रार आहे की,आमच्या भागामध्ये प्यायला पाणी नाही म्हणजे पाणी किती दाबाने येत असेल याचा विचार करा. आताच मला संतोष कोकणींनी सांगितलं की,नळाच्या ठिकाणी खड्डा घेतला जातो आणि त्याच्यावर परात ठेवली जाते आणि परातीवर एखादा हांडा ठेवला जातो एखादी बाई किंवा मुलगा त्या ग्लासने पाणी त्या हांडयामध्ये ओतलं जातं म्हणजे आपण ७ तास पाणी देऊन सुध्दा नागरीकांना पाणी मिळत नाही. त्याच बरोबर आपल्याला पाणी मिळण्यासाठी आंद्रा धरण असेल किंवा भामा आसखेड धरण असेल याच्यामधुन आपल्याला लवकरात लवकर पाणी कसे मिळेल यासाठी प्रयत्न करावा. आणि त्यासाठी एखादी कमिटी नेमावी आणि त्या माध्यमातून लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती करतो आणि नायर साहेबांनी सांगितलं की, सगळे नगरसेवक आहेत पण अधिकारी सभागृहात नाहीत आणि त्याच माध्यमातून माझी एक तक्रार आहे की, आमच्या ड प्रभागाची मिटींग चालू असताना सुध्दा स्थापत्य असेल,बांधकाम परवानगी असेल, फायरब्रिगेड असेल,किंवा पाणीपुरवठा असेल, अतिक्रमण विभाग असेल याचे जे मुख्य अधिकारी आहेत ते कोणीही मिटींगला येत नाही. जेई किंवा डेप्युटी येतो कृपया माझी आपल्याला विनंती आहे की, पुढच्या काळामध्ये संपुर्ण शहरामध्ये आठही प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये अधिकारी हजर राहीले पाहिजेत. आणि आम्हांला सांगितले जाते की, आम्हांला एवढे चार्ज आहेत,तेवढे चार्ज आहेत असे असेल तर त्यांच्याकडील चार्ज काढून तरी घ्या

ठेवुन तरी काय फायदा आहे.आयुक्त साहेब, अजुन एक विषय होता की, बिगर परवाना बांधकाम असेल आणि ते रस्त्यावर येत असेल आणि त्याच्यावर कारवाई करण्यास सांगितले तर ते म्हणतात की,आम्हांला पोलिस बंदोबस्त मिळत नाही.आणि पोलिस बंदोबस्त मिळेपर्यंत ते बांधकाम २/३ मजल्यापर्यंत जाते. आणि त्याच्यावर कारवाई करताना कुठेतरी ठोके मारले जातात आणि एखादया नागरीकाला घराचे बांधकाम करण्यासाठी प्लॅन पास करुन घेण्याची त्याची ऐपत नसेल तर तो अनधिकृत बांधकाम करतो परंतु त्याठिकाणी आपले अधिकारी बिगरपरवाना बांधकाम थांबवू शकतो. त्यांना सांगू इच्छितो की, बाबा पत्रे काढ म्हणले तर पत्रे काढतात, भिंती काढायच्या राहीलेल्या आहेत. त्या व्यक्तीची प्लॅन पास करुन घेण्याची ऐपत नसेल तर अशा माणसावर तुर्तास कारवाई करु नका आणि केली तर थोडी फार कारवाई करण्यास सांगितले तर आपले अधिकारी मात्र त्याठिकाणी संपुर्ण घर पाडण्यास तयार होत असतात. आणि सांगतात की,आम्हांला असं करता येणार नाही जो रस्त्यावर बांधतो त्याच्यावरही कारवाई करणार आणि याच्यावरही कारवाई करणार तरी कृपया याच्यावर देखील नियंत्रण ठेवा आणि पाणीपुरवठा या विषयावर आपण लक्ष ठेवावे अशी विनंती करतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरं तर शहरातील सत्ताधारी पक्ष असेल किंवा विरोधी पक्ष असेल सर्वच नगरसेवकांनी आपआपल्या व्यथा सांगितलेल्या आहेत यावर्षी एवढा चांगला पाऊस होऊन सुध्दा नद्यांना पुर येऊन सुध्दा अक्षरशा मेन,मेन हायवे आपल्याला बंद करावे लागले. त्याच्यानंतर सुध्दा पाणी कपात करावी लागते याच्यामुळे शहरातील नागरीकांचा विश्वास तुमच्यावरही बसत नाही आणि आमच्यावरही बसत नाही. सर्वसामान्य नागरीकांना आम्ही सांगत असतो की, पाणीकपात चालू आहे,पाणी कपात होणार आहे असं सांगितलं तर नागरीक तुमच्यावरही हसायला कमी करीत नाहीत. सन्मा.महापौर साहेब,तुम्ही पाणी कपात करीत असताना कोणाला विश्वासात घेतलं कोणाची विचारपूस केली तुम्ही, कोणाचे विचार घेतले शहरामध्ये जी पाणीकपात केली त्याला आमचा प्रचंड विरोध आहे. पावसाळयाच्या आधी २० टक्के पाणीपुरवठा झाला त्यावेळेस देखील शहरामध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित झाला. पण गेल्या ३/४ महिन्यामध्ये पाणी गेलं कुठं नक्की तुम्ही कोणाला पोसतो आहोत तुम्ही आताच गावडे साहेबांनी या विषयावर मुद्या मांडला की,शहरात पावसाळयापुर्वी चांगला पाणीपुरवठा होत होता आता का

होत नाही.आता नक्की काय प्रॉब्लेम आहे. आणि आताच सन्मा.सदस्यांनी सांगितलं की,तुम्हांला पाणीपुरवठा सुरळीत करायला कोणी सांगितलं शहरामध्ये पाणीपुरवठा कपात नाही पाहिजे. नागरीकांना २ ते ३ तास पाणी द्या पण तो सुरळीत आणि प्रेशरनी द्या अशी मी तुम्हांला विनंती करतो.गेल्या १ ते दिड वर्षापूर्वी सेक्टर २३ रावेत येथे एक कॉमन मिटींग घेतली होती. त्यामध्ये असे ठरले होते की, एक तास पाणीपुरवठा कमी करायचा. ५ आणि ६ मध्ये तुम्ही पाणी कपात केली आणि पाणी कपात केल्यानंतर आकुर्डीतला पाणी पुरवठा तुम्ही वाढवून दिला पण गेली ३ वर्ष झाली आता सुध्दा आकुर्डीतील पाईपलाईन टाकुन झाली पाईपलाईनमधील पाणी कुठं तरी टाकीमध्ये सोडलं जातं त्यांचा पाणीपुरवठा व्यवस्थित झाला आहे कारण ती लाईन टाकुन ४ ते ५ महिने झाले त्याच्यानंतर सुध्दा निगडी,यमुनानगर परिसरामध्ये एक तासाची पाणीकपात ठेवलेली आहे ७ वाजता पाणी सोडल्यानंतर जो सुरळीत पाणीपुरवठा व्हायला पाहिजे तो बिल्कुल होत नाही. दुस-या,तिस-या मजल्यापर्यंत पाणी जात नाही.हे एक ते दिड महिन्यापासून आम्ही पाणी कपातीला पूर्ण सहकार्य केलं पण आता एवढा पाऊस पडून सुध्दा आपण पाणी कपातीला सामोरे जातोय हे आपलं दुर्दैव आहे. सकाळी ५ वाजल्यापासून ते १० पर्यंत नागरीकांचे फोन खणखणीत चालू असतात अधिका-याला फोन येत नाहीत पण आमच्या घरासमोर लोकांचा जमाव असतो आणि नको ते शब्द ऐकावे लागतात. यमुनानगर,सेक्टर २२ मधील परिसरामध्ये जास्तीत जास्त पाणी कपात आपण करतो आहोत.शहरातील सर्वात पहिला प्रोजेक्ट तुम्ही यमुनानगरमध्ये केला यमुनानगरमध्ये केल्यानंतर २४ बाय ७ योजना राबविली आणि त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत चालू केला. पण बरोबर निवडुन आल्यानंतर ६ महिन्यामध्येच तो पाणीपुरवठा पुन्हा खंडीत केला त्यानंतर हळु,हळु टप्प्याटप्याने पाणीपुरवठा पूर्णपणे बंद केला. नागरीकांना आता सध्या पुर्णपणे पाण्याच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. याठिकाणी सत्तारुढ पक्षनेते आहेत त्यांना आम्ही सांगितलं की,स्कीम नं.५, ४,२,३ असेल या परिसरामध्ये पाणी बिल्कुल जात नाही. टाकी शेजारी डोक्यावर आहे आणि घर शेजारी आहे तरी सुध्दा घरामध्ये पाणी येत नाही तर हे पाणी जातं कुठं आपण नक्की कोणाला पोसतो आहोत. अजुन सुध्दा आमचा प्रशासनावर पुर्णपणे विश्वास आहे परंतु वेळोवेळी ज्या गोष्टी आमच्या समोर येतात बिल्डर लॉबी, टँकर लॉबी तर १०० टक्के आमच्या मनामध्ये सुध्दा कुठं तरी प्रश्नचिंन्ह उभा रहातोय. सन्मा.सदस्यांनी आताच सूचना केली आहे की, बिल्डींग परमीशन रद्द करा. आता जर का आपण या शहरासाठी पाणी देवु शकत नाही,संबंधित नागरीकांना

पाणीपुरवठा देवु शकत नाही तर तुम्ही कोणत्या बेसवर १०० एकर, ५० एकर, २० एकरच्या जागेमध्ये बिल्डींग परमीशन देता हे मला समजत नाही. नवीन बिल्डींग परमीशन देवुन आपण कोणाला पोसतो आहोत या सर्व गोष्टीचा विचार तुम्ही,आम्ही केला पाहिजे. प्रभागामध्ये अत्यंत दुर्देवी अवस्था आहे प्रभागामध्ये तुम्ही लवकरात लवकर लक्ष घाला.आणि शहरातील पाणीपुरवठा सुरळीत चालू करावा. आम्ही काही दिवसापूर्वी प्रशासनाला निवेदन दिलेलं आहे की, प्रभागामध्ये कुत्र्याचं, डुकराचं प्रमाण मोठया प्रमाणावर वाढलेलं आहे आम्ही यासंबंधी वेळोवेळी पत्रव्यवहार करतो आणि त्यांच एक ओळीचं पत्र येतं की, संबंधित जो कोणी अधिकारी आहे त्यांना आम्ही सांगितल्यानंतर हे कुत्री,डुकरं पकडुन घेऊन जातात परंतु परत दुसऱ्या दिवशी तेवढीच डुकरं दिसतात. म्हणजे त्यांच्याकडुन आपण पैसे घेतो की काय, त्यांना पोसण्याचं काम आपण करतो की काय, का आपल्यामध्ये एवढी धमक नाही का याठिकाणी डुकरं पाळू नको दुसरीकडे कुठे तरी नेऊन पाळ काही अधिकारी भितीपोटी त्या माणसांकडे जात नाहीत. आमची तुम्हांला नम्र विनंती आहे की, तुम्ही पोलीस, प्रशासन सोबत घ्या त्यांच्या घरी जावा आणि त्यांना सांगा की, बाबा याठिकाणी डुकरं पाळण्याची व्यवस्था करु नका. या शहरातील ज्येष्ठ नागरीक असतील,महिला असतील ते आम्हांला वेळोवेळी सांगतात की, कुत्रं चावलयं, पिसाळलेल कुत्र फिरतय आम्ही पण वेळोवेळी प्रशासनाला सांगतो. एक कम्पलेंट करण्यासाठी ३ ते ४ वेळा सांगावे लागते. आणि ते त्यादिवशी न येता दुसऱ्या, तिस-या दिवशी आम्ही फोन केल्यानंतर येतात. एवढे सगळे प्रश्न असताना सुध्दा आपण त्याकडे गांर्भीयाने लक्ष देत नाही याचा आम्हांला खेट वाटतो. सांगली,सातारा, कोल्हापूर असेल याठिकाणचा पुर आपण पाहिलेला आहे. यासंबंधी पेपरमध्ये बातमी प्रसिध्द झालेली आहे की, जी पुरस्थिती निर्माण झालेली आहे त्याला संबंधित क्रेडाईचे बांधकाम व्यवसायीक त्यांनी काही दिवसापूर्वी संबंधित अधिका-यांना बिल्डींगच्या परमीशनची मागणी केली आणि त्यांनी १३ हजार एकर जागेमध्ये नदीच्या पात्राला लागून मोठमोठे बिल्डींग उभे केले. नदीचं पात्र पूर्णपणे झाकलं गेलं आणि मुसळधार पावसामुळे नदीचं पात्र पुर्णपणे झाकलं गेलं आणि शहरामध्ये पाणी शिरलं आणि याठिकाणी सांगण्याचं तात्पर्य एकच आहे की,आपलं पिंपरी चिंचवड शहर हे सांगली,सातारा,कोल्हापूर सारखं होऊ नये आपल्या नदीमध्ये राडारोडा जाऊ नये, याठिकाणी नदीचाच नाला व्हायची वेळ आलेली आहे. महापौर साहेब, काळाची गरज आहे,काळजी घ्या आणि लवकरात लवकर जो कोणी असेल, नगरसेवकाच्या जवळचे असतील, प्रशासनाच्या जवळचे असतील यांच्यावर आपत्ती

व्यवस्थापनाकडुन कारवाई झाली पाहिजे. आणि या गोष्टीकडे आपण लवकरात लवकर लक्ष घालावे.अशी विनंती करतो.जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.राहुल कलाटे** -मा.महापौर साहेब,मा .आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेली ६ तास म्हणजे पहिल्यांदा महापौर साहेब तुमच्याबरोबर अधिका-यांच आणि सर्व नगरसेवकांच अभिनंदन करावं लागेल की, ६ तास सरळ सभागृहात आहेत. म्हणजे कुठं तरी या पाण्याच्या प्रश्नावर सगळेच सिरीएस आहेत सगळे सिरीएस का आहेत तर सगळयांना आपआपल्या वॉर्डात नागरीकांचे बोलणं ऐकावे लागते. मग ते सत्ताधारी पक्षाचे असो किंवा कुठलाही नगरसेवक असो त्याची पहिली जबाबदारी असते की, आपल्या भागातील, वॉर्डातील नागरीकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय झाली नाही पाहिजे. का गैरसोय झाली नाही पाहिजे तर त्या लोकांनी आपल्या लोकांवर विश्वास दाखविलेला आहे ही चर्चा करीत असताना प्रत्येकांनी सांगितलं की,पाण्याची अतिश्य वाईट अवस्था आहे.आयुक्त साहेब, तुम्ही ५/६ महिन्यापुर्वी पवनामध्ये परतीचा पाऊस झाला नाही त्यामुळे आपण अल्टरनेट पाणी देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर चांगला पाऊस झाला त्यानंतर सर्वांनी मागणी केल्याप्रमाणे आपण एक बैठक घेतली त्या बैठकीत आपण दररोज पाणीपुरवठा करणार, आपला अनुभव योग्यही असेल, त्यानंतर महापौरांनी जलपुजन केलं.परंतु न पाण्याचा अतिश्य गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. आयुक्त साहेब मला आपल्याला एकच निदर्शनास आणुन द्यावयाचे आहे की,सत्ताधारी म्हणजे आम्ही सगळे, आम्ही अधिका-यांच्या तालावर नाचतोय याचं उदा. द्यायचं झालं तर पाणी एकवेळेस द्यायचं आहे, एक वेळेस, दिवसाआड द्यायचं आहे, दिवसाआड, आठवडयातून एक दिवस पाणी येणार नाही. म्हणजे हे काय चाललंय प्रशासनावर कोणाचाच अंकुश नाही. मा.महापौर,आयुक्त, आणि सत्ताधारी पक्षाने निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचे काम माझे आहे.अधिका-यांनी येऊन सांगितलं की, साहेब एक दिवसाची अशी,अशी अडचण होती त्यामुळे अल्टरनेट पाणी दिलं मला ज्यावेळेस निकम साहेबांचा फोन आला की, आपण अल्टरनेट का करतोय, परत सांगितले की, आपण आठवडयातून एक दिवस पाणी बंद करतोय. मी त्यांना सांगितलं की, साहेब, तुमचा निर्णय तुम्ही घ्या. जर तुम्हांला घेतलेल्या निर्णयावर ठाम राहून सुरळीत पाणीपुरवठा करता येत नसेल तर तुम्ही राजीनामा द्या. साहेबांना सांगा की, आम्हांला या डिपार्टमेंटमधुन मुक्त करा आणि दुसरं डिपार्टमेंट द्या आम्हांला नको आहे पाणीपुरवठा म्हणजे तुम्ही शहरातील जनतेला

वेठीस धरायचं, वेगवेगळे प्रयोग करायचे. या शहराला एक वेळ पाणीपुरवठा करीत होतो त्यावेळेस व्यवस्थित पाणीपुरवठा होत होता. अल्टरनेट डे चालू होता त्यावेळेसही चांगला पाणीपुरवठा होत होता. आपली पाण्याची रिक्वायरमेंट काय आहे आपल्या शहराची लोकसंख्या २५ लाख आहे. तरी आपल्याला ३५ ते ३७ लाख लिटर पाणी लागतं ४०० एमएलडी पाणी जरी पकडलं तरी आपण १५० एमएलडी पाणी जास्त उचलतो. लागणा-या पाण्यापेक्षाही आपण जास्त पाणी उचलतोय पाणी नाही असं नाही म्हणजे कुठे तरी डोक्यातला भ्रम काढून टाका की,आपण नाही म्हणतोय आपल्याकडे फक्त नियोजन नाही म्हणुन पाण्याची करतरता आहे. सर्वांनी सांगितलं की, पक्षनेता आहेत अडीच वर्ष झालं कधीच पाण्याच्या संदर्भात मिटींग घेतली नाही आम्ही गटनेते फक्त नावाला आहोत तुम्ही गेल्या अडीच वर्षामध्ये मला आठवत नाही की, तुम्ही आम्हांला विश्वासात घेतलं नाही. तुम्ही तुमचे डिसीजन तुम्ही घेता पण तुम्ही ते आमच्यावर लादता. ते लादत असताना आम्हांला का विचारत नाही आम्हांला माहिती आहे की, तुम्ही हुशार आहात गेली बरीच वर्ष तुम्ही शहर चालवित आहात तुमचं काम आहे या शहरातील नागरीकांना विश्वस्त करायचं. तुम्ही किती वेळा सत्ताधारी म्हणुन डिसीजन बदलले आहेत . आमच्याकडे सध्या पाणी नाही,आमच्या ही परिस्थती आहे, ती परिस्थिती आहे, साहेब पाण्याचीच समस्या नाही तर कच-याची सुध्दा समस्या आहे. कच-याचं तुम्ही काय केलं, कच-याचा प्रश्न करता,करता एक महिना पुढं आलो एक महिना पुढे येत असताना आयुक्त साहेब, तुम्ही ठरवलं की, टेंडर बंद करायचे आणि चार टेंडर करायचे तुम्ही ते टेंडर प्रोसेस केले. पहिल्यांदा केस होती आयुक्त विरुध्द ठेकेदार नंतर केस होती स्टॅण्डींग विरुध्द आयुक्त निकाल स्टँडींगच्या ठरावाच्या विरोधात गेला. आणि ते काम त्या ठेकेदाराला मिळालं. कोर्टाची कोणीही भिती दाखवण्याची गरज नाही. कोर्टानी काय सांगितलं आहे की, आमच्या आदेशाचं पालन करा. कोर्टात गेलं म्हणुन आपल्याला करावं लागलं, नाही स्टँडीग आणि आयुक्त यापेक्षा महापालिका सभा महत्वाची आहे. तुम्ही महापालिकेत ठराव पास करा आणि कोर्टात पाठवून द्या ते टिकतं का बघु. म्हणजे कुठे तरी आयुक्त साहेब, नागरीकांची दिशाभूल आपण किती प्रकारे करायची तुमच्यावर विश्वास ठेवला म्हणुन करायची. आज या सभागृहामध्ये आपण कचरा,शाळा, पाणी या विषयावर बोललो आहे. प्रत्येक गोष्टीवर आपण बोललो आहे. मगाशी कुटेताईंनी सांगितले की, स्मार्ट सिटी नको,पण् पाणी द्या. पालांडेताईंनी सांगितले की, शिक्षण मंडळाने मुलांना अजुनही ड्रेस दिलेले नाहीत, काहींनी सांगितलं की, डुकरं पकडली जात नाहीत, सिमाताईंनी सांगितलं की, पूररेषेमुळे ही

परिस्थिती उद्भभवली आहे. सूर्या हॉस्पिटलचं विचारलं तर साहेब, हे बांधकाम पूररेषा येण्याच्या आगोदरचं बांधकाम आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील लहान मुलांना उपचार देण्याचं एकच हॉस्पिटल आहे. पुररेषा शहरात येण्याच्या आगोदर हॉस्पिटल बांधलेलं आहे. आमच्या गावातील शाळेमध्ये जी पुरग्रस्ताची लोकं ठेवलेली आहेत ती या अडीच वर्षामध्ये जी अनधिकृत बांधकाम झालेली आहेत ती लोक आहेत. ती लोक पूर्वीची नव्हती. म्हणजे कुठं तरी आपलं अनधिकृत बांधकामावर कंट्रोल नाही.शहरातील कुठलेही क्षेत्र बघा शिक्षण मंडळाच पाहिलं तर शाळेत शिक्षक नाहीत आजही आपण पाहिलं तर एका शाळेत दोन,दोन शिक्षक नाहीत. सत्तारुढ पक्षनेते एकनाथराव प्रत्येक क्षेत्रात ही परिस्थिती आहे. आज याठिकाणी प्रत्येकाला बोलण्याची संधी मिळाली आहे. आज ६ ते ७ तास जीबी चालू आहे याचं कारण आहे की, प्रत्येकाला याठिकाणी आपली खंत व्यक्त करावयाची आहे. शत्रुघ्ननी सांगितल्याप्रमाणे याठिकाणी कोण सदस्य येत नाहीत. याठिकाणी तुमच्या पेमेंटच किंवा आमच्या १५००० मानधनाचं काही घेण देणं नाही. याठिकाणी प्रश्न असा आहे की, तुम्ही शहर कसं चालवता. ज्यावेळेस आपण प्रशासनावर टिका करतो पण त्यावर आपण सोल्युशन सुध्दा दिलं पाहिजे. मी साहेबांना १० वेळा सांगितलं की, वाकड, पिंपळे सौदागर आम्ही टेलला येतो का, तुम्ही घ्या नां ताथवडेच्या पलिकडच्या लाईनला या, म्हणजे काय होईल,जो आम्ही २३ कि.मी. धरलं होत त्याच्या पलिकडे १/२ किमी पलिकडे जाऊ, काय होईल, तुम्ही पुनावळेत आलाय तिथं सेक्टर २६ सारखा फिल्टरेशन का नाही टाकणार साहेब, फरक काय पडणार आहे तुम्ही मला सांगा. आज एका बाजुला दोन,दोन महापालिका सारखी महापालिका आहे. त्यांनी धरणं विकत घेतली तर आपल्याकडेही पैसे आहेत नां ते नागरीकांचेच पैसे आहेत एफडी करण्यापेक्षा तुम्ही करा नां स्वतःचे धरणं बांधा एवढी कॅपॅसिटी आहे आपल्याकडं आयुक्त साहेब, तुमच्या अनुभवाचा उपयोग झाला पाहिजे. तुमची नागपुरची कारकीर्द पाहिली आहे तुम्ही तिथं पाण्याचं सोल्युशन दिलेलं आहे. महापौरांना विनंती आहे की, याठिकाणी कच-याच्या संदर्भात एक स्पेशल मिटींग झाली पाहिजे. आज आपण महिन्याला १ कोटी रु. नुकसानीत आहोत. आयुक्त साहेब, तुम्ही पवना जलवाहिनीच्या कामावर लक्ष द्या. आणि तुमच्या बरोबर या सत्ताधा-यांची सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे. भामा आसखेडचं काय करीत आहात. पुढच्या अडीच वर्षामध्ये जर पाण्यावर सोल्युशन नाही निघालं तर पुढच्या महापालिका निवडणुकीच्या वेळेस लोक आपल्याला घरासमोर उभं राहू देणार नाहीत. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, आपण टिका करीत असताना त्यावर

सोल्युशन पण द्या. आपण प्रत्येकवेळेस आपल्या अधिका-यांना ऐ पाणी नाही, आता आमच्याकडे साबळे साहेब आहेत ते खरंच चांगले आहेत माझ्या वॉर्डातली परिस्थिती काय होती.आज आमच्या प्रभागात पर माणसी १३५ लिटर पाणी येत नाही. ६० ते ६५ लिटरच पाणी येत आहे. पण काही,काही एरियामध्ये पर माणसी २०० लिटर पाणी जातंय म्हणजे कुठे तरी सर्वच ठिकाणी विचित्र अवस्था आहे. स्काडा योजनेचा हेतू काय होता सर्वांना समान पाणी डिस्ट्रीब्युशन करण्याचा होता. आज आमच्या भागामध्ये काही ठिकाणी पर माणसी २०० लिटर पाणी जात आहे आणि काही ठिकाणी ३० ते ३५ लिटर पाणी जात आहे. काही ठिकाणी १५० लिटर पाणी येत आहे. ४०० एमएलडी पाणी म्हणजे किती लिटर म्हणजे कुठे तरी आम्हांला कागद घेऊन बसायची वेळ आली. का, आली तर नागरीकांमुळे आली आहे. आपल्या शहराची डेव्हलपमेंट करीत असताना दुस-या बाजुला शहराची डेव्हलपमेंट थांबवायची का साहेब, याबाबतीत सर्व संबंधिताना सूचना देण्याची गरज आहे. आणि या सूचना देत असताना मेन्टनंन्सची कामे होत असतात का आज पेपरला एक बातमी तांबे साहेबांविरुध्द आहे मला तुम्हांला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. किमान वेतनाचा जो फरक महापालिकेने ठेकेदाराला दिला आहे.ते पैसे त्या वॉलमनला मिळाले की नाही साहेब, याचा खुलासा मला तुमच्याकडुन पाहिजे. आणि हे होत असताना एकंदरीत सध्यस्थितीत ऑऊटसोर्सींगची कामे किती चालू आहेत पाणीपुरवठया बद्दल, आऊटसोर्सींगच्या कामासाठी किती लेबर वापरतात,पाणीपुरवठयाच्या संबंधित किती ठेकेदार आहेत आणि हाच प्रश्न स्टँडींग मध्ये विचारला होता की, पाणीपुरवठया संबंधीत जेवढे ठेकेदार आहेत त्याचं आम्हांला डिटेल्स द्या. दोन मिटींग झालेल्या आहेत अजुन आम्हांला त्याची माहिती मिळालेली नाही. साहेब, याचं उत्तर तुम्ही द्या ना तुम्ही उत्तर देणार असाल तर त्या उत्तरामध्ये या सगळया गोष्टीचा अंतर्भाव त्यामध्ये असला पाहिजे. आणि जर असेल तर आम्ही तो ऍकसेप्ट करु, आम्ही ऍक्सेप्ट केलं की, नागरीक सुध्दा ऍक्स्पेट करतील. या शहराचे आयुक्त आपल्यासाठी काही करीत आहेत आणि आयुक्त साहेब, तुम्ही जर आज याची सुरुवात केली नाही तर पक्षनेते आपल्याला लोकांच्या दारात जायचं आहे. सर्व राजकारणाचा भाग बाजुला ठेवुन सर्व नगरसेवकांच्या भावना आपण समजुन घेऊन आपण देखील या गोष्टीकडे सिरीयसपणे पहावं उपमहापौर पण त्याच विषयावर बोलले आहेत म्हणजे कुठे तरी पक्षाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे. प्रत्येक नगरसेवकाने प्रत्येक विषय घेतलेला आहे. महापौर साहेब, तुम्ही आरोग्यावर अशीच एक सभा घ्या. अशी सभा

घेतली तर सभागृहाच्या बाहेर सुध्दा आपला सत्कार करावा लागेल. आज जी ६ ते ७ तास चर्चा चालू आहे ती या आगोदर पण झाली असती. माझी सभागृहाला विनंती आहे की, शहराचा पाणीप्रश्न अत्यंत गंभीर आहे. पाणी असताना नागरीकांना पाणी मिळत नाही आयुक्त साहेब, आम्हांला निश्चितच अश्वस्त करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरं तर गेली ६ तास आपण पाणीप्रश्नावर चर्चा करतो आहे. आज ख-या अर्थाने पिंपरी चिंचवड शहरामधील पाणी प्रश्न पेटलेला आहे आणि त्यामध्ये सर्वच मंडळीनी सहभाग घेऊन आपल्या वॉर्डामध्ये ज्या ज्या समस्या आहेत त्या सांगण्यात आल्या आहेत आम्हांला आश्चर्य वाटते की, खरं तर आम्ही प्रशासनावर बोलणार होतो आमच्या आगोदरच ज्यावेळेस सभागृह चालू झालं त्यामध्ये पाडाळेताई असतील, मोरेताई असतील त्यांनी विषय मांडले आणि त्यांनी ज्या कळकळीने आपल्या समस्या मांडल्या त्या समस्या मांडल्यानंतर खरोखर वाईट वाटलं कारण ताईनी सांगितलं की, समस्या सुटली नाही तर मी राजीनामा देईन. याठिकाणी सत्तेत असुन सुध्दा सत्तेत नसल्यासारखं वाटतंय ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर एक जाहीरात आली होती आणि ती जाहीरात म्हणजे एक मुलगा आणि त्याचे वडील चर्चा करतात वडील त्या मुलाला म्हणतो “तुझ्या बाबाला या शहरातले मोठ मोठे गुंड घाबरतात आणि तो मुलगा त्याच्या बाबांना म्हणतो मग बाबा हे छोटे,छोटे मच्छर का घाबरत नाहीत”. तुम्ही जर सत्ताधारी आहात तर हे प्रशासन तुम्हांला का घाबरत नाही.आज तुम्हांला देखील या पाणी प्रश्नासाठी खरं तर पक्ष म्हणुन बोलत नाही परंतु प्रत्येक जण आपआपल्या भागातून चांगल्या मताने निवडून आलेला आहे. या शहराचे नेतृत्व आपण सर्वजण करतोय ते नेतृत्व करीत असताना सगळयांना सकाळ पासून फोन चालू असतात त्याच कळकळीने आज प्रत्येकजण ८ वाजले तरी महापौर प्रत्येकाला बोलण्याची संधी देतात सर्व महिला भगिनी आपआपल्या वॉर्डातील समस्या चांगल्या पध्दतीने मांडतात.आणि ही परिस्थिती पहाता काही दिवसापूर्वी लोकनेते आदरणीय अटलबिहारी वाजपेयी हा विचारमंच स्थापन करायचा खरं तर ही समस्या सुटली तर काय तर आम्ही सर्वजण त्यांच्याकडे तक्रार करीत होतो या पिंपरी चिंचवड शहरात सत्ताधा-याचं ऐकत नाहीत तर ही जी विचारमंचची समिती स्थापना झाली आहे यांच्या माध्यमातून देखील आपण दाद मागू. येणा-या काळामध्ये मी जवळ,जवळ १५ दिवसापुर्वी महापौर साहेब, आयुक्त साहेब यांना निवेदन दिलेलं आहे पाणीप्रश्नाच्या संदर्भात ब-याचशा

कम्पलेन येतात आमचे सहकारी भालेकर असतील, नानी असतील किंवा काळेवाडीतून संतोष कोकणे असतील संपुर्ण भागातून ज्या कम्पलेट जात असतील त्या कम्पलेटच्या माध्यमातून आम्ही तुम्हांला निवेदन दिलेलं आहे की, ती समस्या लवकरात लवकर सोडवावी. त्यानंतर एक दुसरं निवेदन दिलेलं होतं की, फक्त पाणीप्रश्नावर शहरातील सर्व नगरसेवक, पदाधिकारी यांची फक्त शहरातील ५ समस्यांवर मिटींग लावावी जेणेकरुन आपल्याला वर्षभराचं नियोजन करता येईल. सगळयांचे विचार ऐकूण आपण सुज्ञ आहात आपले विचार आम्हांला कळतील,आमचे विचार तुम्ही घ्या याच्यामधुन एक मार्ग काढुन संपुर्ण वर्षभरासाठी पाणीपुरवठा सुरळीत कसा करता येईल याच्याकडे आपण पाहिलं पाहिजे. फक्त पाणीपुरवठयासाठी एक जनरल बॉडी आयोजित करून नगरसेवकांच म्हणणं ऐकुन आपण ऍटो क्लस्टरला एक बैठक आयोजित करणेत यावी. पिंपरी चिंचवड शहरातील जे जाणकार लोक आहेत त्यांचही म्हणणं ऐकुण ठराविक कालावधीमध्ये पाण्याचं नियोजन करणं गरजेचं आहे. कारण पाऊस चालू झाल्यानंतर भितीचं वातावरण चालू झालं होतं धरण हे ५० टक्केच भरलं होतं. १०० टक्के भरल अस वाटलं नव्हतं परंतु योग चांगला असल्यामुळे पाऊस अतिश्य चांगला झाला आणि धरण १०० टक्के भरलं, पूर आला आणि ब-याचशा सदस्यांची मागणी झाली की, धरण भरलं असताना आता नियमीत पाणीपुरवठा करण्यास हरकत नाही नागरीकांनी अशीही मागणी केली होती की, रोज पाणीपुरवठा करणेत यावा परंतु तुमची अडचण होती त्यावेळेस आपण सर्व पदाधिका-यांना एकत्र घेऊन व्यवस्थित माहिती देऊन हे करणं शक्यच नाही तुम्ही तुमच्या निर्णयावर जरी ठाम राहीले असते तर ही वेळच आली नसती. आता निर्णय आमच्या मागणीनुसार जरी बदलला असला तरी आमच्याकडे नागरीकांची मागणी होती त्या पध्दतीने मागणी केलेली आहे. बाजुला पाणी आहे हे डोळयाला दिसतंय पण प्यायला पाणी नाही. आणि त्या मागणीनुसार आम्ही मागणी केलेली होती. परंतु तुम्हांला नियोजन करणं शक्य नसेल, तर तुम्ही सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन हा विषय मांडताना याच्यावर निर्णय घेताना आम्ही वैयक्तीक घराला पाणी येत नाही म्हणुन भांडत नाही नगरसेवक जे भांडतात ते या संपुर्ण शहरासाठी भांडतात या शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी एक चांगलं नियोजन करावं अशीच अपेक्षा आहे येणा-या काळात नियोजन होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. काळेवाडीच्या पाणीप्रश्नासंबंधी संतोष कोकणे यांनी संतप्त मत व्यक्त केलेलं आहे. आणि मी सुध्दा प्रशासनाला सांगतो की, येणा-या काळात जर पाणी सुरळीत झालं नाही तर संपुर्ण पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीनं,

नागरीकांच्या वतीने एक हांडा मोर्चाचे नियोजन करुन मोर्चा या महापालिकेत आणण्यात येईल आपण लवकरात लवकर निर्णय घ्यावा कारण आमचे मित्र कांबळे यांनी सांगितलं कारण तो संताप होता काल देखील आपली चर्चा झाली होती माझ्या भागात देखील पाणी नाही. जर मला पाणी आलं नाही तर मी सत्तेत असलो तरी मी नागरीकांसाठी काहीही करायला तयार आहे. आणि ज्यांनी त्यांचा संताप याठिकाणी व्यक्त केलेला आहे अशी कुठलीही चुकीची घटना होणार नाही याच्यामधुन प्रशासनाने व्यवस्थित नियोजन करुन शहराला चांगला पाणीपुरवठा करणेत यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.अधिक न बोलता जाता,जाता एवढंच सांगतो की, काल देखील आपण ऐनवेळचे विषय घेतले होते प्रती घर ६०रु महिना कचरा गोळा करण्याचे घेणार आहोत आपण लोकांकडुन जो टॅक्स घेतो, कर घेतो, मग आपण ६० रु. का घ्यायचे, महापालिकेकडे पैसे नाहीत का, हे कशासाठी नागरीकांच्या खिशाला भुर्दंड द्यायचा. यासंदर्भात एक मिटींग घ्या आताच काही दिवसापुर्वी महापूर आला होता आता सांगली,सातारा,कोल्हापूर भागामध्ये पुर आला आणि ब-याच नागरीकांची जीवीतहानी झाली,जनावरांची झाली,त्या भागातील बरीचशी लोक पिंपरी चिंचवड भागामध्ये रहातात आपलं हे कर्तव्य म्हणुन मी आपल्याला विनंती करतो की, आपले पालकमंत्री देखील कोल्हापूरचे आहेत आपले कर्तव्य म्हणुन पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे सांगली,सातारा,कोल्हापूर पुरग्रस्तांना ५ ते १० कोटीचा निधी देणेत यावा अशी मागणी मी याठिकाणी करतो.धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाणी या विषयावर गेली ७ तास चर्चा चालू आहे आणि मी पण या सभागृहामध्ये सगळयांची भाषणं शांतपणे ऐकत होतो. आणि शेवटच भाषण विरोधी पक्षनेते यांचे झाले आहे आणि त्यांच्या बोलण्याचा सूर पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आणि पाणी टंचाई झाली ब-याचशा सन्मा.सदस्यांनी सांगितलंय की, पाणी मुरतय कुठं खरं तर जावेदभाईचं भाषण खूप चांगलं झालं,उपमहापौरांचही भाषण चांगल झालं आणि कधी,कधी मला असा प्रश्न पडतो की,पाण्याची समस्या ही काही अडीच वर्षामध्ये भारतीय जनता पार्टी सत्तेमध्ये आली आणि पाण्याची समस्या आली अशा प्रकारची परिस्थिती नाही. राहूल कलाटेंनी बोलता,बोलता खूप काही चांगलं सांगितलं खरं तर आता निवडणुकीचं वातावरण आहे. आणि नानांचही भाषण तशाच पध्दतीच झालं त्यामुळे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला १०० टक्के शंका येते.

मागच्या १५ दिवसाच्या काळामध्ये महापालिकेच्या पाणीपुरवठयाच्या अधिका-याबरोबर मी दोन,दोन तास बसलो. एका अल्टरनेटच्या पाणीपुरवठयामुळे विस्कळीतपणा आला आणि तो विस्कळीतपणा दू र करण्यासाठी काय केलं पाहिजे यासंदर्भामध्ये खरं तर आम्ही बसलो होतो. आणि सगळेजण ज्यावेळेस असं म्हणतात सगळयांना १०० टक्के माहित आहे की, आपण पवना धरणामधुन ४८० एमएलडी पाणी उचलतो.गेल्या १० वर्षापासून महापालिकेला जो कोटा दिलेला आहे तो ४८० एमएलडी पाणी उचलण्याचा आहे. पाच वर्षापूर्वी तोच होता, १० वर्षापूर्वी तोच होता. आजही तोच कोटा आहे. आणि ज्या पध्दतीने सगळेजण म्हणतात की, गेली दोन वर्षामध्ये शहराची लोकसंख्या कमी जास्त झाली असेल मी १०० टक्के आकडेवारी घेतली नाही. पण तेवढंच पाणी उचलतो म्हणजे १० लाख लोकसंख्या असताना तीच परिस्थिती आहे आणि १५ लाख लोकसंख्या असताना तीच परिस्थिती आहे २० लाख लोकसंख्या असताना तीच परिस्थिती आहे. आज २५ लाख लोकसंख्येची २७ लाख लोकसंख्या झाली तरी तीच परिस्थिती आहे. खरं तर मी प्रशासनाला एवढंच सांगेन की, ८ तास या महापालिकेमध्ये एखादया विषयावर सर्वपक्षीय नगरसेवक चर्चा करीत आहेत. म्हणजे कधी,कधी आपण वर्तमानपत्रामध्ये बातमी येण्यासाठी भाषण करायचं या महापालिकेच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ३०/४० वर्षाचं प्लॅनिंग करायचं खरं तर या विषयावर सदस्य बोलतील असं वाटलं होतं. खरं तर पुढच्या २५/३० वर्षामध्ये या शहराचा पाणीपुरवठा कसा व्यवस्थित होईल, शहरातील लोकांना पाणी कशा पध्दतीने मिळेल खरं तर या ही अपेक्षा म्हणजे आज मी असं म्हणणार नाही की, प्रशासनाची बाजु १०० टक्के चुकीची आहे. पाणीपुरवठयाचे अधिकारी मेहनत करीत आहेत पण कुठे तरी दोष आहे म्हणजे मी ३/४ दिवसापुर्वी सांगितलं आपले अधिकारी रात्री १,२,३ वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता आणि त्यांचे सहकारी काम करतात, कमिशनर साहेब, आपला रात्री १ वाजेपर्यंत फोन घेत आहेत. म्हणजे कुठे तरी लिकेजेस आहेत, आणि खरं तर नाना मला या गोष्टीची शंका आली वॉलमनच्या बाबतीत माझ्या मनामध्ये १०० टक्के शंका आली आहे. म्हणजे वॉलमन हे जाणुन-बुजुन काम करतात का? याबद्दलच्या शंका सन्मा.सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. पाण्याची समस्या निर्माण करण्यास ठेकेदाराचे कामगार जबाबदार आहेत का? हा खरंतर माझा प्रश्न आहे. माझ्या केबीनमध्ये मी आणि सर्व पक्षाचे नगरसेवक बसलो होतो आणि सगळयांना सांगितले की, तुमच्या वॉर्डातील पाण्याची समस्या आहे आपल्या भागातील एखादा दु सरा नगरसेवक सोडला तर सगळे नगरसेवक हे आपलेच आहेत त्यांच्या अडचणी

आहेत, त्यांचं दुःख आहे,त्यांना पाणी मिळत नाही. आणि कोणाला हौस नाही याठिकाणी चर्चा करण्याची त्यांच्या वॉर्डात पाणी येत नसल्यामुळे नगरसेवकांना शिव्या दिल्या जातात. माझी पाणीपुरवठा विभागाच्या आणि निकम साहेबांना विनंती आहे की, मी आपल्याला मागच्या आठवडयातच सांगितलं होतं की, तुम्ही सगळयांच्या कामाची जबाबदारी फायनल करा. का पाणी येत नाही, रावेतच्या धरणामधील जर पाणी आपण उचलतोय त्याठिकाणी कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रीकचा किंवा एमएसईबीच्या लोकांचा कसलाही प्रॉब्लेम नाही. आपण १०० टक्के पाणी उचलतोय त्याच डिस्ट्रीब्युट व्यवस्थित का होत नाही.पाण्याची परिस्थिती कोणाच्या भागामध्ये बिघडली जाते,कोणामुळं बिघडली जाते. वॉलमन पहाटे ३.०० वा.जाऊन त्याला वॉल चालू करायचा असेल तर तो ३ वाजताच्या ऐवजी ५.०० वा.जात असेल हे खरं तर बघण्याची गरज आहे. आयुक्त साहेब,महापौर साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, कधी,कधी आपण दोन अधिका-यावर अवलंबुन राहतो. पण या कामाच्या संदर्भात जर कोणत्या अधिका-यांकडुन कमी/जास्त काम होत असेल तर त्याला बोलवून घ्या. खरंतर आपण आज गेली ८ तास या सभागृहामध्ये पाण्याच्या समस्या विषयी चर्चा करतोय. पाण्याची समस्या सुटली पाहिजे अशा प्रकारची भावना व्यक्त करतोय. ब-याचवेळा बीपी आणि डीपी मध्ये जाणारे आपले अधिकारी आहेत त्यांनाही माझी विनंती आहे की,खरंतर आपल्याला हे आव्हान स्विकारणेची गरज आहे मी काल कमिशनर साहेबांना सरळ म्हटलं साहेब,हे अधिकारी नीट नाहीत त्यांनी मला सरळ एक प्रश्न विचारला की, तुम्ही मला कुठला अधिकारी देताय, कोण अधिकारी आहे की, तो स्वतःहून पाणीपुरवठा विभागामध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त करतोय. पाणीपुरवठयाकडे गेलं की, या व्यक्तीकडे जा, त्या व्यक्तीकडे जा त्या नगरसेवकांकडे जा पण मला पाणीपुरवठा विभागामध्ये काम नको. ही जर भावना असेल, खरंतर हे पुण्याचं काम आहे. खरं तर या पाणीपुरवठयाच्या संदर्भामध्ये मागच्या वेळेस जनरल बॉडीमध्ये असा विचार केला होता की, आणि आपण त्यावेळेसही म्हटलं होतं की, पाणीपुरवठा विभागामध्ये चांगल काम करणा-या अधिका-यांना जे स्वतःहून काम करण्यास तयार आहेत त्यांना १/२ इन्क्रीमेंट दिलं तर मला असं वाटतय की, ते अधिकारी काम करण्यास तयार होतील. पण ब-याच वेळा आपण महापालिकेच्या मेन बिल्डींगमध्येच बसायचं आणि त्याठिकाणी बीपी आणि डीपी याशिवाय काही काम करायचं नाही ही भावना आहे.मी याठिकाणी राजकीय भाष्य करणार नाही. म्हणजे सगळयांनी सांगितलं की, भारतीय जनता पार्टी सत्तेमध्ये आली आणि पाणीप्रश्न निर्माण झाला. तुम्हांला

राजकारणच करावयचं असेल तर पवना धरणाच्या जलवाहीनीला काय प्रॉब्लेम आला आणि आजपर्यंत आपण पुढच्या २५ वर्षासाठी भामा आसखेडच्या पाण्यासाठी काय प्रयत्न केले. हा मुद्या मी मांडू शकतो. माझी सर्व नगरसेवकांना विनंती आहे की, आपण सर्वांनी प्रशासनाला एक संधी दिली पाहिजे आणि दुसरी एक गोष्ट आहे की, पाणीपुरवठयाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या खालचे डेप्युटी इंजि., जेई असतील, वॉलमन असतील,प्लंबर असतील, साहेब तुम्ही जर रात्रीचे २/३ वाजेपर्यंत काम करीत असाल तर या लोकांनी किमान ४ तास जरी प्रामाणिकपणे काम केलं तरी या शहराला पाणी कमी पडणार नाही. आता ब-याच नगरसेवकांनी सांगितलं की, अल्टरनेट डे पाणी सोडलं तर पाणी व्यवस्थित येईल. पण पाण्याचा प्रॉब्लेम संपणार नाही. या शहरातील लोकांनी काटकसरीने पाणी वापरलं पाहिजे. याच्यासाठी ख-या अर्थानं काम करायचं आहे आपण राजकीय भाषणं करु, उद्या पेपरला बातम्या येतील आज जेवढं पाण्याच्या विषयावर बोलायचं आहे तेवढं बोलू द्या. महापालिकेच्या जनरल बॉडीच्या विषयपत्रिकेवरील विषय थांबवू द्या. पण लोकांच्या भावना पण लक्षात घेतल्या पाहिजेत. लोकांना पाण्याच्या विषयावर फेस करावं लागत आहे याला फक्त दोन गोष्टी जबाबदार आहेत एक तर आपलं प्लॅनींग असेल, किंवा अधिका-यांचा निष्काळजीपणा, अधिका-यांनी सुध्दा मनापासून ठरवलं पाहिजे की, आपल्याला पुढील २५/३० वर्ष या शहराला पाणीपुरवठा करायचा आहे. पण हे सांगण्याची गरज नाही. म्हणजे मला कोणी तरी सांगितलं तरच काम करायचं असं हे बरोबर नाही. आम्ही भामा आसखेडच्या मागं लागतोय. तुम्हा सगळयांना कल्पना आहे की,भामा आसखेडहून १०० एमएलडी पाणी आणण्याच्या कामाची टेंडर प्रोसिजर अंतिम टप्प्यात आहे. पुढच्या महिन्यात तिथे कामही चालू होईल. पुढच्या काळामध्ये देहुच्या बंधा-यामधुन १०० एमएलडी पाणी आणलं तरी २/४ वर्षानंतर आपल्याला जास्त पाणी लागणार आहे. म्हणजे पुढच्या काळामध्ये जे महापालिकेच्या सभागृहामध्ये येतील देहुच्या बंधा-यामधुन आणलेल्या पाण्याने शहराच्या पाण्याची तहान भागणार नाही. म्हणजे सगळयांनी सांगितलं की,एखादं विकासाचं काम आपण कमी केलं पाहिजे. पण पुन्हा एकदा या शहरामध्ये पवना धरणा सारखं अजुन कोठून पाणी आणता येईल. यासाठी खरं तर सर्वांनी राजकरण करावयाचं असेल तर करु शकता. आपण सगळयांनी सांगितलं आहे की, शहर कोरडं आहे,आम्हांला तहान लागली आहे पाणी मिळत नाही या विषयावर जर कोणाला राजकारण करावयाचं असेल तर,आपणही राजकारण करु शकतो. राजकीय भाष्य करु शकतो,आणि पुढच्या काळामध्ये या शहराला खरंच पाणी

सुरळीत करायचा असेल तर सगळयांनी राजकारण बाजुला ठेवुन या शहरातील नागरीकांची तहान भागवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पवना जलवाहिनीचा प्रश्न असेल, पाणी वाढवण्याचा प्रश्न असेल, आंद्रा धरणामधुन, त्यानंतर मुळशी धरणातुन आपल्याला पाणी आणता येईल का? या ही संदर्भात आपल्याला विचार करण्याची गरज आहे. खरंतर एखादया विषयावर ८ तास चर्चा करतोय तर या सभागृहामध्ये एक पॉझिटीव्ह दिशा घेऊन जाण्यासाठी सगळयांनी ख-या अर्थाने काम करण्याची गरज होती. नाही तर आपण काय करतोय पाण्याचा प्रश्न कसाही झाला,भाषण केलं, माझं वर्तमानपत्रांमध्ये नांव आलं,माझी प्रतिक्रिया आली आणि माझ्या वॉर्डातल्या लोकांना कात्रण दाखवून प्रसिध्दी मिळवण्याचं काम करत असू तर मला माहित नाही की, पुढच्या २५/३० वर्षामध्ये या शहराला तहानलेलं ठेवू नये. माझी सगळयांना विनंती आहे की,पाणी या विषयावर सर्व गटनेत्यांची बैठक घेवुन घेवु. खरं तर उपमहापौरांच याठिकाणी कौतूक केलं पाहिजे. त्यांनी जलपुजन करायला गेले तर त्यांनी सर्व गटनेत्यांना घेवुन गेले. म्हणजे त्यांच्या मनामध्ये पाप असतं तर त्यांनी अशा पध्दतीची परिस्थिती केली नसती. आपण सगळी परिस्थिती बघतोय तिथली परिस्थिती बघुन आपण पुढच्या काळामध्ये आपलं भाष्य सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेरचं भाष्य हे सारखंच असण्याची गरज आहे. म्हणजे सभागृहामध्ये आपण एक बोलतो पण वास्तव दुसरंच आपण खाजगीत म्हणतो आम्हांला बोलावचं लागतंय ना, कारण आम्ही बोललं तरच आमच्या बातम्या येणार आहेत. माझी या सभागृहाला विनंती आहे की, खरंतर आज या सभागृहामध्ये बघितले तर सगळी बाकं रिकामी आहेत जे बसले आहेत त्यांना चिंता आहे तुम्ही सगळे नेते आहात तुमच्या सगळयांच्या मनामध्ये लोकांच्या समस्यांबाबत कळकळ आहे,तळमळ आहे. पुढच्या काळामध्ये हे शहर चांगलं डेव्हलप झालं पाहिजे लोकांना मुलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. माझी सगळयांना विनंती आहे की,कधी,कधी पॉझिटीव्ह बोलायला शिका. राजकीय बोलायचं म्हणलं तर मी खुप बोलू शकतो. ज्या अधिका-यांनी या आगोदर अल्टरनेट डे पाणी देण्याचा निर्णय घेतला. महापौर साहेब याबाबतीत खुप इमोशनल आहेत आणि पत्रकारांनाही विनंती आहे की, म्हणजे त्यांना इमोशनल एवढं करताय की, त्या बिचा-यांना निर्णय करायला लावताय तुम्ही. ही परिस्थिती होते नां. म्हणजे तुम्ही इमोशनल होता ना आपण एका बाजुला म्हणतो की, नदीला पूर आला आहे, धरणं भरलं आहे पण आपण उचलतोय तेवढंच नां ४८० एमएलडीच पाणी उचलतोय, आज काही सदस्यांनी सांगितलं आहे की, ५०० ते ५५० एमएलडी पाणी उचला.५५० एमएलडी पाणी उचलण्याची कॅपॅसिटी तरी

आहे का? आणि माझी तुम्हांला विनंती आहे की, एखादया गोष्टींच भांडवल करीत असताना वास्तवतेचं सुध्दा भान ठेवणं गरजेचं आहे. मा.आयुक्त साहेब, मी तुम्हाला विनंती करतो की, ब-याच जणांनी सांगितलं आहे की, आमचे नगरसेवक विनंती करायचे. भारतीय जनता पार्टीची संस्कृती एखादया अधिका-याच्या कानफाडीत मारण्याची नाही हे लक्षात ठेवा. आमचे नगरसेवक फॉलोप करीत आहेत. आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, जे अधिकारी कामचुकार करतात, जे प्लंबर कामचुकार करतात, जे ठेकेदार याठिकाणी मुद्यामहून या शहरामध्ये पाण्याची समस्या वाढली पाहिजे. अशा प्रकारच्या ठेकेदार जाणुन बुजुन पाण्याची समस्या निर्माण करणार असतील तर अशा ठेकेदारांना महापालिकेचे एकही काम दिले नाही पाहिजे. पुढच्या काळामध्ये पाण्याच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढणेत यावी. लोकांनाही समजू द्या, आणि ज्यावेळेस आपण समस्या मांडतो. कधी,कधी नागरीकही सकाळी ५ वा. चौथ्या,पाचव्या मजल्यावर पाणी आलं पाहिजे म्हणतात. आपल्याला लोकांनाही सांगण्याची गरज आहे. आयुक्त साहेब, माझी तुम्हांला विनंती आहे की, जे अधिकारी पाणीपुरवठा विभागामध्ये काम करतात त्यांनी एक, एक क्लस्टरचं पाणी आपण बंद केलं आणि त्या क्लस्टरचा पाणीपुरवठा दुस-या भागामध्ये प्रेशरनी देऊन करता येईल का? याचा अभ्यास ८/१० दिवसामध्ये करावा. आणि जे अधिकारी आपल्या कामामध्ये कसूर करतील,चुकतील असे अधिकारी, कर्मचारी,ठेकेदार असतील त्यांना आपण निलंबीत करावं. दुसरी एक माझी विनंती आहे की, पाणीपुरवठयामध्ये काम करणारे जे चांगले अधिकारी आहेत व इतर विभागामध्ये काम करीत असतील तर त्यांना कामावर घ्या. आणि कोणीही तुम्हांला कुठल्याही पदाधिका-याने सांगितलं की, या पाणीपुरवठयाच्या अधिका-याची बदली करा असं म्हणलं तर त्या पदाधिका-याचं कधीच काम ऐकायचं नाही असे मी तुम्हांला सांगतो. आणि अशा पध्दतीचं माझ्या निदर्शनास आलं तर सभागृहामध्ये सगळयांच्या समोर त्या अधिका-यांना सांगेन आणि मग तुम्हांला सांगेन की, पुढच्या काळामध्ये परिस्थिती काय आहे. प्रशासनावर आमचा कंट्रोल आहे. आपला प्रशासनावर कंट्रोल नाही असं समजू नका. त्यांच्यावर कंट्रोल आहे. याठिकाणी महापौर रोज मिटींग घेत आहेत,चेअरमन रोज फोन करतात, मी आरडाओरड करतोय, खरं तर जी परिस्थिती आज आपल्यावर आलेली आहे त्यावर आपण मार्ग काढण्याचा प्रयत्न करतोय. माझी तुम्हां सगळयांना विनंती आहे की, अधिकारी चुकत असतील तर त्यांना आपण एका शब्दात वठणीवर आणू. ठेकेदार चुकत असतील तर त्यांनाही त्याच पध्दतीने उत्तर देऊ. परंतु या सभागृहातील जबाबदार नागरीक

म्हणुन,पदाधिकारी म्हणुन आपलीही तेवढीच जबाबदारी आहे या शहरातील लोकांना पुढच्या २५/३० वर्षासाठीचे चांगले प्लॅनिंग करुन पाण्यापासून कोणी वंचित राहणार नाही एवढी काळजी करण्याची खरंतर गरज आहे. मला माहित आहे की,पवना जलवाहिनीचा प्रश्न माझ्या अनेक सहका-यांनी उपस्थित केला आहे मी तुम्हांला याठिकाणी आश्वासन देतो की, पुढच्या वर्षभराच्या आत पवना जलवाहिनीचं काम आम्ही मावळवासीयांच्या १०० वेळा जाऊन पाया पडू, शिवसेना-भारतीय जनता पार्टीचं सरकार आजही राज्यात आहे आणि उद्याही पुढच्या महिनाभराच्या काळामध्ये येणार आहे. मी मनापासून सांगतो की, पुढच्या वर्ष/ दिड वर्षाच्या कालावधीमध्ये पवना जलवाहिनीचं काम १०० टक्के मार्गी लावण्याचं काम करु. सर्व पत्रकारांना विनंती आहे की, राजकारण बाजुला ठेवून आपणही या शहराचं काही तरी देणं लागतोय अशा पध्दतीची जर भावना असेल तर निश्चितच काम करु नाही तर परिस्थिती काय होते त्या भागातलं काम राहीलं म्हणुन गोळीबार केला म्हणुन पाणी मिळालं नाही आपल्याला राजकारण करायचं नाही.मी आपल्याला विनंती करतो की, एवढे सगळे महत्वाचे विषय असताना सुध्दा आज आपण याठिकाणी पाणी या विषयावर चर्चा करण्यास वेळ दिला .मा.महापौरांनी आयुक्तांना आदेश देण्यात यावे की, त्यांनी पाणी या विषयावर पुढच्या ८ दिवसांमध्ये या शहराचा पाणीपुरवठा सुरळीत कशा पध्दतीने होईल यासाठी त्यांनी पुढचं नियोजन करावं आणि तोपर्यंत पुढच्या महिन्याच्या ३ तारखेपर्यंत सभा तहकुब करणेत यावी. अशा पध्दतीची विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.सत्तारुढ पक्षनेते यांनी सभा तहकुबीची सूचना मांडली त्याला मी अनुमोदन देतो.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. दुपारच्या १.३० वाजल्यापासून पाणी या विषयावरती आणि संलग्न प्रश्नावरती चर्चा सुरु आहे. यासंबंधाने सर्वच सन्मा.नगरसदस्य यांनी पोटतिडकीनी आपली मतं,नागरीकांच्या अडचणी सभागृहासमोर विषद केलेल्या आहेत. आतापर्यंत सुमारे ४७ सन्मा.सदस्या/सदस्यांनी आपली मतं व्यक्त केलेली आहेत. यापुर्वी देखील गेल्या १५ दिवसापासून विविध नगरसदस्य असतील, प्रभागातील नागरीक असतील,पत्रकार बंधु भगिनी असतील यांच्या सोबत वेळोवेळी प्रत्यक्ष चर्चेत अथवा दूरभाषवरुन माझी सविस्तर चर्चा शहरातील पाणीपुरवठयाच्या संदर्भात झालेली आहे. वेळोवेळी त्याठिकाणी समस्या जाणवली त्यावेळेला पाणीपुरवठा विभागाचे सर्व अधिकारी यांचे

समवेत  अनेकवेळा कार्यालयामध्ये अथवा सेक्टर २३ येथील पाणीपुरवठा केंद्रावरती बसुन या विषयावर सविस्तर चर्चा याठिकाणी झालेली आहे. कालच्या तहकुबीच्या आधी आणि तहकुबीच्या नंतरही याच विषयावरती वेगवेगळी निवेदन घेऊन विविध नागरीक, सदस्य आलेले होते. त्यांच्याशी देखील माझी सविस्तर चर्चा झालेली आहे. आणि त्यामुळे मला माहिती आहे की, अनेक जणांना माझ्या समोर बसलेल्यांना निश्चित समस्या काय आहे, त्याचं गांर्भीर्य काय आहे याची कारणं काय आहेत,याची थोडया फार प्रमाणात का होईना निश्चितपणे  जाण आहे, समज आहे. मला याठिकाणी एक गोष्ट निश्चितपणे चांगली वाटते आहे की, आज सर्वच नगरसदस्यांनी आपआपली मतं निर्भीडपणे मांडलेली आहेत आणि त्यातनं त्याची संवेदनशिलता आणि शहराच्या भविष्याप्रती त्यांची आत्मीयता दिसून येत आहे. सुरुवातीलाच मला एक निवेदन करायचं आहे की, अनेकांनी अशी देखील मागणी केली की, तुम्ही आयुक्त आहात, तुम्हाला ब-याच गोष्टीचं ज्ञान आहे आणि तुम्ही परखडपणांन अनेक बाबींची अंमलबजावणी केली पाहिजे. याद्दष्टीने मी सभागृहाला आणि नागरीकांना अश्वस्त करु इच्छितो की, हा माझ्या व्यक्तीगत संवेदनशिलतेची बाब आहे, एखादा अधिकारी ज्यवेळेला लोकशाहीमध्ये काम करतो त्यावेळेला सर्व सन्मा.नगरसदस्य यांच्या बोलण्यामधुन आलं की, आम्हांला नागरीकांनी निवडुन दिलेलं आहे, त्यांची कामं करावं या हेतूनी निवडुन दिलेलं आहे. आणि त्यामुळे आमच्या मतांनी काम करणं अपेक्षीत अहे. याच मताचा मी आहे आणि त्यामुळे मला जे कळतं ते योग्य असलं आणि मला तसं वाटत असलं तरी सुध्दा ती बाब मी सर्वांना समजावण्याचा प्रयत्न करतो. कारण आपण नगरसदस्य आहात, आपण नागरीकांचे प्रतिनिधी आहात. हे सभागृह ही स्वायत्त संस्थेचं वरीष्ठ सभागृह आहे. आणि या सभागृहाचे सर्व अधिकार या सभागृहामध्ये विविध सर्वपक्षीय प्रतिनिधीत्व आहे, त्यांचे गटनेते आहेत आणि म्हणुनच आपण अनेक प्रश्नावर विविध गटनेत्यांच्या समोर चर्चा करतो,त्यांच्यासमोर मांडतो आणि चर्चा करुन वेळोवेळी निर्णय घेत असतो. आणि त्यामुळे ही माझी संवेदनशिलता आहे या लोकशाहीमध्ये काम करीत असताना ज्यावेळेला शहर विकासाचा व्यापक प्रश्न उद्भवत असतो त्यावेळेला त्या व्यापक सभागृहामध्येच या बाबतीमध्ये डिटेल चर्चा होणं अभिप्रेत आहे. जे,जे नगरसदस्य आहेत त्यांनी निर्णय घेण्याच्या पुर्वी हा निर्णय योग्य पध्दतीने,योग्य माहितीच्या आधारावर विविध ऑप्श्नची माहिती घेऊन त्याचा चौकटीत अभ्यास करुन योग्य असा निर्णय घ्यावा ही माझी अपेक्षा आहे. अनेकांच्या मतातून ऐकण्यात आलं की, आयुक्तांच्या मनात आलं तर त्यांनी हे केलं, त्या आयुक्तांच्या मनात आलं

त्यांनी हे केलं कधी काही चांगलं झालं,कधी काही चांगलं झालं नाही. माझा असा विश्वास आहे की, आज जे शहर आहे आणि या शहराचे लोकप्रतिनिधी निश्चितपणे या स्थितीत आहेत की, आज देशातलं सर्वात वेगानं वाढणारं शहर आपण आहोत आणि याचं कारण आहे की, आजपर्यंत आपण निश्चितपणे काही ना काही चांगलं करीत आलेलो आहोत. की ज्यामुळे या शहरात नागरीक येऊ इच्छित आहेत. शहर वाढीचा वेग म्हणजे किती, अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, खरंच आपण किती वेगानं वाढतो आहे. गेल्या तीन वर्षात काय झालं, गेल्या चार महिन्यात असं  काय झालं की,ज्याच्यामुळे टंचाई जाणवू लागली आहे. हा अनेकांच्या मनामधला प्रश्न आहे. २७ एप्रिल २०१७, २०१६-१७ या वर्षाची डेव्हलपमेंट चार्ज या हेडमधुन आपला रेव्हीन्यु २६७ कोटी होता. आणि २ वर्षानंतर कुठलाही कर न वाढवता,कुठलीही पॉलीसी न बदलता कुठल्याही कराच्या टक्केवारीमध्ये बदल न करता दोन वर्षानंतर २०१८-१९ चा आपला डेव्हलपमेंट चार्जचा रेव्हीन्यु साधारणता ५४५ कोटी आहे. याचा अर्थ दोन वर्षात आपल उत्पन्न डेव्हलपमेंट चार्जसमधुन डब्बल झालेला आहे. हा आपल्या शहराच्या वाढीचा वेग आहे. शहराच्या वरती पाण्याचं संकट आहे का?  तर आहे आणि मी हे ज्यादिवशी या शहरात आलो तेंव्हापासून सांगत आहे. ही पहिली सभा नाही की, याच्यामध्ये आपण सविस्तर चर्चा करतो आहे. कारण साधारणता  माझ्या माहितीनुसार ही चौथी सभा आहे. आज पाण्यावरती चर्चा सुरु आहे. आणि तितक्याच पोटतिडकीने सुरु आहे. भाऊसाहेब भोईरांनी एका सभेमध्ये प्रश्न विचारला होता  मला आठवतं की, पहिली सभा ज्यावेळेला झाली  त्यावेळेला जी चर्चा झाली ती चर्चा, त्यावेळेला मांडलेले मुद्ये आठवतात. प्रत्येक वेळची पार्श्वभूमी वेगळी असते पण सगळे जणांच्या मनातली जी अडचण आहे ती तीच आहे कारण आज ज्या वेगाने शहराचा विकास होत आहे त्यामुळे हा प्रश्न पक्षीय राजकारण असेल, एखादया वॉर्डमधील विषय असेल, एखादया झोनमधला विषय असेल ते सगळयाच्या पलीकडे जाऊन पोहचलेले आहेत.  आता हा प्रश्न ग्रॅव्हीटी विरुध्द पंपीग असाही राहीलेला नाही. याचं कारण अस आहे की, अनेकांनी आकडेवारी मांडली की, आपल्याकडे खरोखर पाणी किती उपलब्ध आहे. आपल्या शहराची लोकसंख्या साधारणता २३ ते २५ लाख पोहोचली आहे असा अंदाज बांधतो आहे.२५ लाख लोकसंख्या असेल असे गृहीत धरु फ्लोटींग पॉप्युलेशन धरलं तर २७ लाख लोक आपलं पाणी वापरतात असं गृहीत धरावं लागेल.यासाठी साधारणता ३७५ एमएलडी इतकं  पाणी लागतं थोडक्यात आकडे सांगतोय, एक्झॅट आकडे सांगत नाही. याच्यामध्ये ३५ टक्के आपण तुट आणि चोरी असं धरलं तर साधारणता ५००

ते ५५० एमएलडी पाणी दररोज  लागतं आज आपल्याला पाणी ४८० एमएलडी उपलब्ध आहे. प्लस ३० एमएलडी पाणी एमआयडीसीकडून घेतो. दोन्ही मिळुन ५१० एमएलडी पाणी होते. म्हणजे जेवढं पाणी लागत तेवढं उचलतो. खरं म्हणलं तर आपण सर्वांनी ऑलवेज असायला पाहिजेत. थोडंस क्रिटीकली बॅलन्स पण अडचण कुठे येते तर दोन गोष्टी आहेत थोडसं इतिहासात जायला हवं ज्यावेळेला शहर वाढत होतं ३ लाख लोकसंख्या होती त्यावेळेला फेज -१ होतं आपल्याकडे मग पुन्हा अडचणीचा काळ आला नंतर फेज-२ आणलं आणि पंपाची संख्या वाढवली आणि ट्रिटमेंटची कॅपॅसिटी वाढवली. असंच वाढता,वाढता आपण फेज- ३ ला गेलो आणि आपल्याला पवना धरणामधुन जेवढं आरक्षण आहे त्याच्यापेक्षा २० टक्के अधिक कपॅसिटी ट्रिटमेंटची  वाढवत अनेक वर्षामध्ये आलेलो आहे. आज पवना धरणामधुन ४१५ च्या आसपास दररोजचा  एमएलडी पाणी उचलण्यास  अनुज्ञेय आहे. पण त्याच्या अगेन्स्ट आपण २० टक्के अधिक पाणी दररोज उचलतो. आणि हे जे अतिरिक्त पाणी उचलतो त्याचे अतिरिक्त दराने पेमेंट करतो. पेमेंटचा प्रश्न नाही, पेमेंट करु शकतो, अतिरिक्त पाणी मिळालं तर ते ही उचलू शकतो पण आज रावेत पंपींगची स्थिती काय आहे आज आपण वाढवत,वाढवत तिथे आज १८ पंप ठेवलेले आहेत जे की, १८ ची १८ पंप एकही स्पेअरमध्ये न रहाता १०० टक्के २४ तास पंपींग चालू आहे. याच्यापेक्षा जास्त पाणी रावेत बंधा-यातून उचलण्याची क्षमता आहे का?  पाणी उचलल्यानंतर त्याची ट्रिटमेंटची क्षमता आहे का? आणि ते आपल्याला अलौड आहे का? कारण ज्या पध्दतीने आज आपले पाणी पवनेमध्ये आरक्षीत आहे त्याच्या प्रमाणात जेवढं पाणी उचलतो ते पाणी आपण नदीतून उचलतो ते जर आपण बंद पाईपमधुन उचललं तर आपल्याला थोडीशी बचत होईल. पण ती सुध्दा अद्याप आपल्याकडून भाष्य केल गेलेलं नाही आपल्याकडनं पवना धरणाची उंची माझ्या मताने  १ मीटरनं वाढवून घेणं अपेक्षीत आहे आणि त्याच्यासाठी जो काही खर्च होणार आहे तो आपण बेअर करणार आहोत आणि तो त्यांच्याकडे जमा देखील केलेला आहे. पण ही गोष्ट केंव्हा होईल जेंव्हा पवना धरणाची उंची १ मीटरने वाढेल आणि त्यानंतर बंद पाईपलाईनद्वारे पाणी आपल्या दाराशी  येईल त्यावेळेला अतिरिक्त १ टीएमसी पाणी आपल्याला मिळणार आहे. ज्यावेळेला १ टीएमसी पाणी आपल्याला मिळेल त्यावेळेला आपण संपुर्ण शहराला व्यवस्थित पाणी वाटप करु शकू. पण ही गोष्ट झाली डायनॅमीक नसताना किंवा स्टॅटीक असताना शहर ज्या वेगानं वाढतंय त्या वेगानं वाढतच राहीलो तर हे पाणी देखील कमीच पडणार आहे. म्हणून पॅरलली आपण अन्य स्त्रोताची व्यवस्था सुरु केली. आंद्र

आणि भामा आसखेड या दोन्ही धरणांकडन आपल्याला २६७ एमएलडी पाण्याचं आरक्षण मंजुर झालेलं आहे. पाणी आरक्षण मंजुर झालं म्हणजे आपल्याला पाणी मिळालं असा अर्थ होत नाही त्यामुळे त्याची अंमलबजावणी करण्यासाठीची यंत्रणा अस्तित्वात आणली आपण जो डीपीआर केलेला आहे त्याच्यामध्ये आंद्र धरणातून पंपींग आणि भामा आसखेड मधुन पंपींग करुन नवलाख उंब्रे या जागेवरती आपलं ग्रेडप्रेशर टाईम इकडं दोन्हीच पंपींग करुन एकत्रितपणे पाणी मिळेल आणि त्या पाण्यामधुन ग्रेडप्रेशर टाईममधुन ग्रॅव्हीटीच्या माध्यमातून संपुर्ण रस्त्याच्या मधुन पाईपलाईनचा प्रवास होऊन आपल्या शहरापर्यंत पाणी येणार आणि चिखली येथे डब्ल्यूटीपीसाठी आरक्षीत केलेल्या जमीनीमध्ये त्याचं ट्रिटमेंट होऊन मग ते पाणी आपल्या शहराला उपलब्ध होणार अशी ही भामा आसखेड आणि आंद्राची योजना आहे. सुमारे ४०० ते ४५० कोटीचा हा प्रकल्प आहे. पण त्यांची समस्या पण आपण समजून घेतली पाहिजे. पुणे महानगरपालिकेचं भामा आसखेडचं प्रकल्प गेली अनेक वर्षापासून अंमलबजावणी सुरु आहे तो सुरु होतो,अडकतो,सुरु होतो, अडकतो याची कारणं आपल्या सगळयांना ठाऊक आहे. हा प्रश्न सोडवल्याशिवाय आपण नवलाख उंब्रेचं टेंडर काढून काम सुरु करणं भामा आसखेडमध्ये हे आपल्याला अडचणीचं आहे. आंद्र धरणाच्या वरती एमआयडीसीची एक वॉटर सप्लायची स्कीम तयार आहे मात्र ती गेली १० वर्षापासून सुरु होऊनही केवळ १०० मीटरची पाईपलाईन जोडण्यासाठी गावक-यांनी विरोध केल्यामुळे गेल्या १० वर्षापासून कार्यरत नाही. आणि या सगळया प्रश्नांचा अभ्यास करुन आपण असा निर्णय घेतलेला आहे आणि शासनाकडन त्याची मान्यताही घेतलेली आहे भामा आसखेड धरणाच पाणी कुठेही वापरलं जात नाही ते नदीमध्ये सोडून घ्याव आणि आपण १०० एमएलडी पाणी देहू बंधा-यातून उचलावं ही तात्पुरती उपाययोजना म्हणुन आपण त्याच्यावर विचार करुन हा एक मार्ग काढलेला आहे. जी एनर्जी सेव्हींग होणार आहे त्या एनर्जी सेव्हींगमधुन ती फायनान्स होईल. आणि म्हणुन आपल्याला हे शक्य होत आहे. पण हे पण इंटेरियम सोल्युशन आहे आपल्याला नवलाख उंब्रेच्या ठिकाणी आंद्रा आणि भामा आसखेड दोन्हीकडुन पंपींग करुन पुढील दोन ते तीन वर्षात ती देखील योजना अंमलबजावणी करणं अत्यंत आवश्यक आहे. कारण आपण सुमारे ८ ते १० टक्के दरवर्षी या दरानं आजच्या लोकसंख्येच्या बेसवर वाढतो आहोत. आज आपलं शहर २२ लाख लोकसंख्येचा धरला तर २२ लाख लोकसंख्येवर १० टक्क्यांनी धरलं तर दरवर्षामध्ये २ लाख २० हजार नागरीक नव्याने शहरामध्ये येत आहेत. थोडसं डेव्हलपमेंट पॅटर्नकडे जाऊ या, डेव्हलपमेंट पॅटर्न जर पाहिला

तर गेल्या तीन वर्षामध्ये माझ्या सोबत डेव्हलपमेंट व्हावी त्याच्यामध्ये किती नवीन स्लम उभे राहीले ते मला सांगा. तुम्ही एका स्लमचं नांव सांगा की, हे गेल्या तीन वर्षामध्ये उभं राहीलं आहे. एखादी, दुसरी स्लम तात्पुरती नदीपात्राच्या कडेला निर्माण झाली असेल.त्या स्लम जुन्या स्लमच्या याच्यामध्ये निश्चित वाढ झालेली आहे. दुसरी गोष्ट अनधिकृत बांधकामांच्या मध्ये काही प्रमाणात वाढ झालेली आहे.आपण त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. तथापि त्याच्यामध्ये थोडी फार निश्चितपणे वाढ झालेली आहे. पण मोठया प्रमाणात लोकसंख्या या शहरात आलेली आहे ही रेग्युलर डेव्हलपमध्येच आलेली आहे. आणि हे जर आपण पाहिलं तर त्यांची नियमीत मागणी आहे ती पाणीपुरवठयाची आहे. आंद्र,भामा आसखेड या धरणांतुन ज्यावेळेला पाणी सप्लाय होईल त्यावेळेला तुम्हांला पाणी देऊ. या बोलीवर आपण नवीन सगळे प्रकल्प मंजुर करीत आलेलो आहोत. आज देखील करतो आहोत. पण आपण सगळेजण जाणतो की, एखादा नागरीक ऑफीशियन्सी सर्टीफिकेट घेऊन,स्वत:ची सोसायटी स्थापन करुन बिल्डींगमध्ये आले आणि रेग्युलर टॅक्स पेअर झाले की, त्यांची जी मागणी आहे ती मी ही थोपवू शकत नाही आणि तुम्ही ही थोपवू शकत नाही. आणि त्यामुळे किमान पिण्याचं पाणी तरी द्या ही मागणी निरंतर वाढत आहे. दुसरी महत्वाची गोष्ट एकंदर शहराचा ज्यावेळेला आम्ही विचार केला होता त्यावेळेला पाणी वापराचं पॅटर्न काय तर आपला जो जुना भाग आहे त्या भागामध्ये मुबलक पाणी असल्याची सवय असलेला एक मोठा भाग आहे तो जवळपास ५० टक्के शहराचा भाग आहे. की, ज्यांना सवय आहे की, आपल्या शहरात मुबलक पाणी आहे अनेकांनी म्हटलं की, प्रेशर नाही. याबाबत मला सभागृहाची एक मदत लागणार आहे अनेकांनी म्हटल की, काही अडचणी असतील तर आम्हांला सांगा. माझी एक अडचण आहे की, प्रेशरनी पाणी ही व्याख्या वेगवेगळया प्रभागात वेगवेगळी आहे. आणि थोडीशी पत्रकार मित्रांना सुध्दा विनंती आहे की, आज मोठया प्रमाणामध्ये प्रक्षोभ नागरीकांचा,नगरसदस्यांच्या माध्यमातून व्यक्त झालेला आहे. पण आज परिस्थिती काय आहे की, कुठे तरी नागरीकांच्या समोर देखील तितक्याच योग्य पध्दतीने मांडली जाणं आवश्यक आहे. कारण आज अशी वेळ आहे की, ज्यावेळेला नागरीकांना किंवा कोणालाही आज आपण थोपवू शकत नाही. मागणी तर येणारच आहे एखादया व्यक्तीला २०० लिटर पाणी वापरण्याची सवय आहे त्याच्याकडे जर कमी प्रेशरनी १२५ लिटर पाणी मिळालं तरी त्याची तक्रार राहणारचं आहे. आणि ज्याला २५ लिटर मिळत होतं किंवा काहीच मिळत नव्हत त्याला ४० लिटर मिळालं तर तो सुध्दा ६० लिटर

का नाही, ८० लिटर का नाही ही पण तक्रार राहणार आहे. प्रत्येकाच्या तक्रारीमध्ये फरक आहे आज मला कुठल्याही तक्रारीला निरस्त करायचं नाही तुमची तक्रार योग्य नाही म्हणुन प्रत्येकाला माझ्या खुलाशावरती मत व्यक्त करण्याचा निश्चित अधिकार आहे. फक्त माझं आजचं ऑब्झेर्व्हेशन मी आपल्यासमोर मांडतो आहे. अजुन मी माझ्या ऍक्शन प्लॅनकडे आलो नाही. आजची स्थिती अशी आहे की, वेगवेगळया ठिकाणी ज्यावेळेला तक्रार येते, आणि त्यांच्या मागण्या ज्यावेळेला येतात त्या मागणीचं स्वरुप वेगवेगळे आहे काही भागामध्ये प्रेशरनी पाणी येणं म्हणजे चौथ्या माळयावरुन दुस्या, तिस-या मजल्यावर पाणी येणं असं होतो काही भागामध्ये दुस-या माळयावरुन पहिल्या माळयावरती प्रेशरनी पाणी ड्रॉप होतो असा त्याचा अर्थ होतो. काही भागामध्ये ग्राऊंड फ्लोअरवरनं खड्डयामध्ये जाऊन पाण्याची धार कमी होणं म्हणजे हाफ प्रेशर ड्रॉप होणं चालतो. पण प्रत्येक भागातल्या नागरीकांना त्यांच्या,त्यांच्या भागातील पाणी वापराची सवय असल्यामुळे त्याच्यामध्ये कुठे कमी/जास्त झालं तर त्याची तक्रारही येते आणि त्यामुळेच तक्रारीचं स्वरुपच गंभीर असतं त्यातील गंभीरता मला काढून घ्यायची नाही. कारण काही नागरीकांना आपणच सवय लावलेली आहे. ती सवय त्यांना राहणारच आहे आणि त्याच्यामध्ये कपात झाली तर निश्चितपणे त्यांना त्रास होणार आहे. दुसरा पॅटर्न जो आपल्याला समजुन घ्यायचा आहे तो म्हणजे पाणी वाटपाचा समय अनेकांची तक्रार अशी आहे की, आम्हांला पाणी खूप उशिरा येतं रात्री १ ते २ वाजेपर्यंत आम्ही जागचं रहायचं काय? पाणी भरण्यासाठी वाट बघत रहायची का? तर दुस-या बाजुला अशी तक्रार आहे की,सकाळी ७ वाजता पाणी येत होतं आता ८.३० वा.पाणी येतं किंवा १० वाजता पाणी येतय तर १० वाजेपर्यंत थांबून रहायचं का? अनेक ठिकाणी असं पण पहाण्यात आलेलं आहे की, ग्राऊंड फ्लोअरला संप मध्ये पाणी आहे पण पुर्वीच्या सवयीनुसार आपल्याकडे किचन सिंकमध्ये पिण्याचं पाणी भरण्याची सवय आहे आणि ते पाणी नाही आलं म्हणुन पण तक्रार आहे. म्हणुनच मी म्हणतो की, तक्रारीचं स्वरुप हे वेगवेगळं आहे त्यातलं गांर्भीय मला कमी करायचं नाही पण तक्रारीचं स्वरुप वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळं आहे. पाणी वाटपाचं सुध्दा आपण परसेंटेज पाहिलं तर समान पाणी वाटपावर सुध्दा अनेकांनी आपली मतं खूप अभ्यासपूर्ण मांडलेली आहेत. शहराच्या ५० टक्के भागाचा जर आपण विचार केला तर त्यांना १३५ एलपीसीडी अथवा अधिक १५० पेक्षाही अधिक असं पाणी उपलब्ध होतं सुमारे २७ टक्के कनेक्शन आज शहरामध्ये असे आहेत की, ज्याचा पाणी वापर १५० एलपीसीडी पेक्षा अधिक आहे. सुमारे २५ टक्के कनेक्शन्स शहरामध्ये असे

आहेत की, ज्याचा वापर १३५ ते १५० एलपीसीडीच्या इतका आहे आणि उरलेले ५० टक्के कनेक्शन्स असे आहेत की, ज्यांचा पाणी वापर १२० एलपीसीडी पेक्षा विविध क्षेत्रामध्ये कमी आहे. काहींचा ४० ते ८० एलपीसीडी पेक्षा कमी आहे. समन्यायी पाणी वाटप होणं हे अत्यंत गरजेचं आहे पण समन्यायी पाणी वाटप कसं होईल त्याला दोन गोष्टी कारणीभूत असतात एक पध्दतीत सुधारणा याच्या अंतर्गत आपण जे करतोय त्याला आपण अत्यंत चुकीच्या अर्थाने २४ बाय ७ असं नाव दिलेलं आहे. २४ बाय ७ प्रक्रीया प्रकल्प हा पध्दती सुधारण्याचा प्रकल्प आहे. ही संपुर्ण शहरामध्ये सुमारे ४० टक्के जी गळती होते यामध्ये सुमारे २० टक्के चोरी आहे आणि सुमारे २० टक्के गळती आहे. चोरी होताना लोक इललिगल टॅब घेताना तो अशा पध्दतीने घेतला जातो की, तो योग्य पध्दतीने केलेला नसेल ,किंवा रिक्रुप केलेला नसेल, त्याची केअर घेतलेली नसेल आणि त्यामुळे इललिगल टॅबमुळे पाणी लिकेज होते. जर २० टक्के लिकेज असेल तर २० टक्के चोरी आहे.चोरी हा फायनान्सीयल लॉस आहे. तो काही रिअल लॉस नाही. आपल्या नागरीकांना एकत्रित केल्यानंतर त्याला पाणी द्यावचं लागणार आहे ही पण बाब विचारात घेण्याची आहे. आज जरी आपण चोरी डिटेक्ट केली आणि त्याला अनधिकृतचं रेग्युलाईज करुन घेतलं तरी त्याचा पाणी वापर तेवढाच राहणार आहे आणि तो वाढणार आहे. आणि म्हणुन अनधिकृत टॅब शोधणं, तो रिप्लेस करणं, त्याच्यातली गळती रोखणं आणि त्याला नियमानीकुल करुन घेवुन त्याला नियमीत कनेक्शन सिस्टीममध्ये आणणं हा आपल्या टेक्नीकल मधला कुठला भाग आहे तर तो हा आहे. दुसऱ्या पध्दतीत सुधारणा मधील जो भाग आहे तो म्हणजे आजची जी आपली वितरण व्यवस्था आहे जे टेलला आहेत त्यांना पाणी कमी प्रेशरनी मिळतं दिघी,बोपखेल,वाकड,पिंपळे सौदागर, पिंपळगुरव,दापोडी हे भाग टेलला आहेत त्यामुळे आम्ही काहीच करु शकत नाही. तो टेल हा जो कन्सेप्ट आहे हा पध्दती सुधारणेच्या माध्यमातून तो काढून टाका कोणीच टेलला राहणार नाही याची जर व्यवस्था करायची असेल तर आपल्या पध्दतीत सुधारणा करावी लागते.हायड्रॉलीक प्लॅनिंग करुन प्रत्येक कमांड एरियानुसार त्याचं स्वत:च एक नेटवर्क तयार करायचं कमांड एरियामध्ये जी सप्लाय करणारी टाकी असेल ती पूर्णपणे भरल्यानंतर त्याच्यावरती जेवढा भाग कनेक्टेड आहे तेवढा पूर्णपणे फ्लड करुन त्याच्यामध्ये पाणी पूर्णपणे उपलब्ध करुन जेणेकरुन त्याचा वापर नियमीत होऊ शकेल. पण हे करण्यासाठी अमृत योजना असेल किंवा २४ बाय ७ चा ४० टक्के भाग असेल या दोन्ही योजनांची ज्यावेळेला अंमलबजावणी होईल त्यावेळेला हे इंटर

कनेक्शन्स तोडले जातील प्रत्येक भाग पाणीपुरवठयासाठी कमांड एरिया ॲब्सुलेट केला जाईल. वेगवेगळा केला जाईल. आणि त्यानंतरच त्याच्यामधलं प्रेशर राहील डिस्ट्रीब्युशन त्या, त्या टाकीवरुन किंवा सप्लायमधुन बुस्टरवरनं आपल्याला मॅनेज करता येईल. पण ही प्रक्रीया करत असताना आपल्याला काही कालावधी लागणार आहे. आणि त्यामुळे या पध्दतीत ज्यावेळेला सुधारणा होईल त्यावेळेला समन्यायी पाणी वाटप करणं आपल्याला शक्य होईल. आजच्या स्थितीमध्ये काही भागामध्ये जी टेल आहे त्या टेलला पाणी द्यायचं असेल, किंवा त्या प्रभागातला उंचावरचा जो भाग असेल त्या उंचावरच्या भागाला अर्धा तास पाणी देण्यासाठी मला उर्वरीत भागाला ४ तास पाणी द्यावं लागेल. ज्या भागाला ४ तास पाणी जातं त्या भागाचा पाणा वापर वाढतो आणि तिकडे जी गळती असेल तर ती गळतीही वाढते. आणि त्यामुळे आपलं न वापरण्यायोग्य पाण्यामध्ये वाढ होते. मग त्याच्यामध्ये एक गोष्ट अशी आहे की,अनधिकृत नळकनेक्शन रेग्युलाईज करुन घेत राहू. पण एक मदत मला सभागृहाकडनं हवी आहे की, अतिरिक्त पाणी वापरावरती कुठं ना कुठं तरी निर्बंधाला सुरुवात करावी लागेल. आणि हा पॉलीसी डिसीजन आहे हा काही कुठला राजकीय निर्णय असु नये, हा सभागृहाने लाँगटर्म विचाराने घेतलेला निर्णय असावा. अशी माझी अपेक्षा आहे. जी व्यक्ती १३५ एलपीसीडी पेक्षा अधिक प्रमाणात पाणी उचलतंय जेंव्हा अन्य घरांना आपण ४० एलपीसीडी सुध्दा आपण योग्य प्रमाणात देवु शकत नाही त्यावेळेला ती पुर्णपणे अन्याय वापर असतो. आणि हा अन्याय वापर कमी करण्याचे अनेक टेक्नॉलॉजी उपाय आहेत आज प्रवीण लडकत असेल किंवा त्यांची टिम असेल प्रत्येकांना घरातील लिकेज शोधा, ते दुरुस्त करा म्हणुन सांगत असतात. आपल्या सिस्टीम मध्ये लिकेज कमी करीत असतात पण हे करीत असताना कुठे तरी एक डिइन्सेटीव्ह म्हणुन योग्य दर आज आपण जाहीर केलेलं आहे पहिले प्रती माणसी ४० लिटर पाणी आज आपण शुन्य रुपये चार्ज करतो. ४० एलपीसीडी कापुन १३५ एलपीसीडी आज आपण ४ ते ४.५० पै. हा मिनीमम दर आहे. आणि जर १३५ एलपीसीडी च्या पुढे एखादा माणुस पाणी वापरत असेल तर त्याला किती दर आहे त्याच्यावर काही पेनॉल्टी आहे काय़? त्याला काही कंट्रोल आहे का? कुठे तरी आपण अतिरिक्त पाणी वापरत असू तर त्याच्यावर कुठे तरी कंट्रोल आणण्यासाठी हा दर वाढवावा अशी माझी सभागृहाला विनंती राहील. हे सगळं करीत असताना आपल्याला दररोजचा पाणीपुरवठा नियमीत करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याकडे मी आता वळतो.आजच्या स्थितीमध्ये पाण्याची निश्चितपणे समस्या आहे काही अंशी पाणी उपलब्धता आहे तर दुसऱ्या

अंशी पाणीपुरवठा विभागाचा काही प्रमाणातला अयोग्य कारभार कारणीभूत आहे आणि त्यामुळे या स्थितीमध्ये दोन्ही गोष्टीवरती एकत्रितपणे काम करण्याची अत्यंत तात्काळ आवश्यकता उपलब्ध झालेली आहे. एक अडचण आपल्या समोर निश्चितपणे मांडावी लागेल की, आजची पाण्याची स्थिती इतकी टाईट आहे की, आपल्याकडे रावेत पंपींग स्टेशनवरती दोन एक्सप्रेस फिडर आहेत एक एक्सप्रेस फिडर जर काही कारणांनी बंद पडला तर दुसरा फिडर एका मिनीटांच्या आत सुरु होतो. पण त्याचा परिणाम असा होतो की, एका मिनीटात जर शिफ्ट झाला तरी सुध्दा तो स्मुथ नसतं सगळे पंप बंद पडतात आणि ते पुन्हा सुरु करावे लागतात आणि ज्यावेळेला सगळे पंप सुरु करावे लागतात त्यावेळेला त्याचा लोड बॅलन्स करण्यासाठी आपले एक,एक पंप ऑन करत जावं लागतं. आणि हे करण्यामध्ये आपला पंप ऑन करताना सुमारे अर्ध्या तासाचा कालावधी लागतो. त्याच्यामध्ये आपल्याला सुमारे ३० एमएलडी इतक्या पाण्याचा लॉस होतो. म्हणजे एक मिनीट जरी इलेक्ट्रीसिटी गेली तर ३० एमएलडी पाणी कमी होतं. म्हणजे आज क्रीटीकली बॅलन्स एरियामध्ये ज्यावेळेला ही घटना घडते त्यावेळेला जो डिस्ट्रीब्युशनचा जो भाग असतो तो डिफर होऊन जातो. गेल्या दोन दिवसाच्या घटना सांगतो आपण भरपूर पाण्याच्या उपलब्धतेबद्दल, पावसाबद्दल बोलत आहोत, पुराबद्दल बोलत आहोत, निश्चितपणे पूर आला होता, धरणंही १०० टक्के भरलेलं होतं. आणि या पावसाळयाच्या कालावधीमध्ये आपण नदीपात्रातीलच पाणी पंपींग करुन घेत होतो. पण मला असं सांगण्यात आल की, गेल्या दोन  दिवसापासून नदीपात्रातील पाणी कमी झालेलं आहे रावेत बंधा-यावर पाण्याची लेवल कमी झालेली आहे  त्यामुळे आपल्याला विसर्ग सुरु करावा लागला. म्हणजे धरणांतून पाणी ड्रॉ करायला आज आपल्याला डेली बेसीसवर आणाव लागणार आहे जर पाऊस या  महिन्यात थांबला किंवा ज्या दिवशी पाऊस थांबेल त्या दिवशी आपलं पंपींग कंन्टीन्यू चालू असल्यामुळे लेवल कमी होईल  आणि आपल्याला बंधा-यातून पाणी सोडायला रिक्वेस्ट करावी लागेल. ते पॉवर जनरेशन सुरु करतील त्यातुन पाणी येईल  आणि ती लेव्हल मेन्टेन राहील जर तिथे पाऊस पडत नसेल तर आतापासूनच बंधारा हळूहळू कमी व्हायला सुरुवात होईल.गेल्यावर्षी हेच घडलं १५ ऑगष्ट पर्यंत आपलं धरण १०० टक्के भरलं आणि आपण खूष झालो पण आपल्या कमनशिबानं परतीचा पाऊस आला नाही. आणि त्यामुळे आपल्याला ऑक्टोबर,नोव्हेंबर मध्ये टंचाई भासली. आणि दस-याच्या वेळेला अशीच सभा इथं झाली, ऑक्टोबर मध्ये पुन्हा अशीच चर्चा झाली त्यावेळेला याच मुद्यावर आपण चर्चा केलेली होती. परिस्थिती दिवसागणीक अजुनच बिकट होत जाणार

आहे. या कॉर्पोशनमधलं काय चांगल आहे हे तर मी सांगणारच आहे आणि त्याचे तुम्ही धनी आहातच पण जे काही वाईट येणार आहे हे कोणी तरी सांगितलं पाहिजे ते काम मला करावं लागणार आहे. त्याचं सोल्युशन देखील आपल्याला काढायचं आहे सोल्युशन आपल्याकडे आहेत पण त्याच्यामध्ये काही खंबीर निर्णय आपल्याला घ्यावे लागतील. आणि त्यामुळे पहिली जी मदत मागणार आहे ती अतिरिक्त पाणी वापरासाठी निर्बंध आणण्यासाठी आपली मदत लागणार आहे. दुसरी जी मदत मला सभागृहाची लागणार आहे ती म्हणजे प्रेशर ही कुठल्या लेव्हला देणार याची एक सरटन्सी आम्हांला करायची आहे ती निश्चित करण्याची आवश्यकता आहे. कारण काही तक्रारींना आम्हांला निश्चित बोलावं लागणार आहे आम्ही कुठल्या भागामध्ये पाणी कसं देणार हे आम्हांला निश्चित करुन द्यावं लागणार कारण प्रत्येक ठिकाणी ते देणं शक्य नाही. आणि तिसरी मदत लागेल की, प्रत्येक नागरीकाला सकाळी ६ ते ९ आणि संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत पाणी देणं शक्य होणार नाही. त्यामुळे सायबरटायमींगनी जाणं हा आज कालानुरुप आपल्यावरती क्रमप्राप्त आहे की, जी त्या त्या वॉर्डस्तरावरती बसुनच निर्णय करावा लागणार आहे. आणि याच्यामध्ये मला आपल्या सर्वांची मदत लागणार आहे. कारण आज प्रत्येक नागरीकांची खरोखर ज्याची गरज असते की, मी घरात असतांना पाणी आलं म्हणजे माझ्या नियंत्रणाखाली ते भरता येईल पण आज खरंच ते शक्य नाही. त्यामुळे सायबयरटायमींग जे आहे ते होणारच आहे ते कसे करायचे याचे नियोजन करण्यासाठी आपल्या सर्वांची मदत लागणारच आहे. एखादया भागामध्ये सगळेच गरीब आहेत,नोकरदार आहेत संपवेल निर्माण करणं शक्य नाही. त्यांच्यासाठी वेगळं काही करणं, जे स्टोअरेज करु शकतात त्यांच्यासाठी वेगळा टाईम देणं याची परिस्थिती आपण जास्त जाणतात कारण आपण त्यांचे प्रतिनिधी आहात. आपण जर आमच्या जेई, डेप्युटी,कार्यकारी अभियंता यांच्या सोबत बसून नियोजन करण्यास मदत केली तर ओरड कमी होईल आणि कुठं तरी नागरीकांना समजावण्याची गरज सुध्दा लागणार आहे. या तीन मदतीची अपेक्षा आपल्याकडनं करुन मी माझ्या प्रशासनाकडे वळतो. प्रशासनाची निश्चितपणे काही बाबतीमध्ये चुक आहे. आणि याबाबतीमध्ये मी काही निर्देश प्रशासनाला दिलेले आहेत प्रशासनाच्या अधिका-यांनी त्याची गंभीरपणे दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. तांत्रिक सुलभता ही ज्यावेळेला अतिरिक्त पाणी उपलब्ध होते तेंव्हा आपण मान्य करु शकतो. कारण ज्यावेळेला कट टु कट स्थिती आहे त्यावेळेला तुम्हांला तांत्रिक कॉम्पलीकेशनस्ला जावेच लागेल. आणि त्यासाठी तुमच्या मनाविरुध्द जाऊन वॉर्ड ऑपरेशन लेव्हल पर्यंत जाऊन

आपलं मायक्रो मॅनेजमेंट करावे लागेल. आणि याला कुठेही पर्याय नाही. तुम्हाला ते करावंच लागेल आणि याच्यासाठी प्रत्येक वॉल ऑपरेटरला जबाबदार धरावं लागेल. आणि यासाठी प्रशासनाला असे निर्देश देण्यात आलेले आहेत की, एकुण बल्क वॉटर डिस्ट्रीब्युशन आणि जे आपले विविध मेन डिस्ट्रीब्युशन लाईन्स आहेत ग्रॅव्हीटी थेरगांव, ग्रॅव्हीटी चिंचवड,एस-१,एस-२ किंवा पंपींग मधले इतर लाईन्स या सगळयांचा बेंचमार्क निश्चित करुन देण्यात आलेला आहे. हा बेंचमार्क जो निश्चित केलेला आहे या बेंचमार्क प्रमाणे आणि तो बेंचमार्क कुठल्या वेळेला कधी उपलब्ध होईल, कुठल्या, कुठल्या लाईनला कधी उपलब्ध होईल. हे निश्चित करण्याची जबाबदारी सेक्टर २३ आणि निकम साहेब यांच्याकडे देण्यात आलेली आहे. निकम साहेबांनी लक्ष देऊन योग्य पध्दतीनं नियोजन करुन बेंचमार्कच्या टायमींग नुसार, दिवसभराच्या टायमींगनुसार ऍडजेस्ट करण्याची जबाबदारी यांची राहील. अनेक जणांच्या मनात प्रश्न असतो की, आम्ही जेईला फोन करतो की, पाणी का आलं नाही जेई म्हणतो वरनंच पाणी आलं नाही तर मी कोठुन देऊ वरनं आलं नाही याला हे सोल्युशन आहे. किती येणार,कधी येणार याची सरटन्सी सेक्टर २३ मधुन एकदा झाली की, म्हणजे प्रत्येक कार्यकारी अभियंत्याची जबाबदारी सुरु होते एकदा त्यांच्या लाईनला म्हणजे थेरगांव ग्रॅव्हीटीला जबाबदार तांबे असतील, तर थेरगांव ग्रॅव्हीटी मधील विविध टाक्या असतील तर त्याच ऑपरेशन कसं करायचं याचं नियोजन लावण्याची जबाबदारी आणि त्या नियोजनाप्रमाणे पाणी उपलब्ध झाल्यानंतर त्याच डिस्ट्रीब्युट करण्याची जबाबदारी ही त्या,त्या कार्यकारी अभियंत्याची राहील. टाक्या किती वाजता भरतील किती वेळानं रिपीट होतील बायपास किती वाजता सुटेल याच हायड्रोलिक प्लॅनिंग करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंत्याची राहील. आणि एकदा का डिस्ट्रीब्युशन नेटवर्क मध्ये एखादी टाकी भरली आणि मग त्यानंतर नागरीकांपर्यंत त्याचं डिस्ट्रीब्युशन करण्याची जबाबदारी ही डेप्युटी इंजिनियर आणि जेई यांची राहील. ऍक्च्युल ग्राऊंड लेव्हलच नियोजन लावून दिल्यानंतर ठरलेल्या वॉलच्या ऑपरेशनची जबाबदारी त्या,त्या वॉलवर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या नावानिशी राहील. हे नियोजन लावण्यासाठी आम्हांला ३ ते ४ दिवसांची आवश्यकता आहे. माझे निर्देश प्रशासनाला आहेत की, येत्या तीन दिवसात शनिवारच्या आत नियोजन लावून ते आपल्या वेबसाईटवर आणि प्रेसमधुन पब्लीश करावं. हया जबाबदारीसाठी कोण जबाबदार आहे जेणेकरुन कुठल्या लेव्हलला चुक झाली, काय अडचण आली याचं निश्चितीकरण करुन त्या व्यक्तीला वैयक्तीकरित्या जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करता येऊ शकेल. जर बेंचमार्क

प्रमाणे पाणी आलं आणि डिस्ट्रीब्युट झालं नाही तर कार्यकारी अभियंता जबाबदार राहील. अंतर्गत क्लॉजला येतील आणि सॉल्व्ह करताना अडचणी येतील त्यावेळेस मार्गदर्शन करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील. प्रकल्प राबविण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंत्याची राहील.शेवटच्या प्रश्नांमध्ये आणिबाणी जन्यस्थिती आधार त्यामुळे प्रशासनाचा दुसरा निर्देश सर्व इतर विभागाच्या कार्यकारी अभियंता आणि जेईना देण्यात येत आहे की, ज्यावेळेपर्यंत पाण्याची परिस्थिती नॉर्मलला येत नाही तोपर्यंत स्थापत्य विभागाचे, स्थापत्य उदयान विभागाचे आणि बांधकाम परवानगीचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांच्या सेवा पाणीपुरवठयाच्या रेग्युलायझेशनसाठी अधिग्रहीत करण्यात येतील आणि पुढील गरज असेपर्यंत यांच्या सेवा निकम साहेबांच्या सूचनेनुसार, विविध कमांड एरियावरती मॉनीटरींग रेग्युलायईज करेपर्यंत अधिग्रहीत करण्यात येतील. त्यांच मुळ काम पाणीपुरवठा नियमीत होईपर्यंत पाणीपुरवठा हे राहील आणि पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत पाणीपुरवठाच त्यांच्याकडे काम राहील त्याच्यावरती प्रत्येक एरियाची नियंत्रण करण्याची जबाबदारी ते ते कार्यकारी अभियंता यांची राहील. आणि निकम साहेब त्याच नियंत्रण करतील हे आदेश उद्याची उद्या निर्गत करण्याची जबाबदारी निकम साहेब आणि संतोष पाटील साहेबांची राहील. केवळ स्लम, पर्यावरण,आरोग्य याच विभागाना त्यांच काम पूर्णपणे चालू ठेवता येईल. जे टाईमबॉंड काम असेल तेवढं करण्यापुरते काही कर्मचारी बांधकाम परवानगी विभागामध्ये कार्यरत राहतील.बाकीचे सर्व कर्मचारी आपण या कामासाठी अधिग्रहीत करतो आहोत. मला विश्वास आहे की, ज्यांनी पाणीपुरवठयामध्ये यापुर्वी काम केलेलं आहे त्यांच्या कामाचा अनुभवाचा योग्य वापर करुन घ्यावायचा असेल तर निश्चितपणे आज वेळ आलेली आहे. लडकत साहेब,तांबे साहेब,पवार साहेब तुम्हां तिघांना पूर्णपणे मुभा राहील कोणाचा अनुभव आपआपल्या क्षेत्रामध्ये वापर करुन घ्यायचा आणि त्याच नियोजन करुन पाणीपुरवठा सुरळीत करुन घेण्यासाठी जोपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यंत हा विभाग पाणीपुरवठयाच्या विभागामध्ये कामावर राहतील. सगळयात शेवटची गोष्ट जी मला आवश्यक आहे ती सभागृहासमोर मांडणार आहे एक चांगला मुद्या मांडला होता की, पाणीपुरवठा लॉगटर्म करण्यासाठी आपल्याला नगरसदस्यांची देखील मदत घेणं गरजेचं आहे माझी सन्मा.महापौर आणि सन्मा.सभागृहाला विनंती आहे की, हा गंभीर प्रश्न जर टाईमबॉंडने सोडवायचा असेल तर विशेष पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समिती स्थापन करायची ते अधिकार कायदेशीर सभागृहाला आहेत विशेष समितीला कार्यकक्षा निश्चित करुन सर्व जे

सिनीयर नगरसदस्य आहेत ज्यांना या शहराची इतंभूत माहिती आहे त्यांचा समावेश या समितीमध्ये करावा आणि ही समिती आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पुढच्या १० वर्षाचं नाही तर २५ ते ३० वर्षाच योग्य नियोजन करुन कालबध्द पध्दतीने हे सर्व प्रकल्प तीन वर्षामध्ये पूर्ण होतील याच्यासाठी एकत्रितपणे काम केलं राष्ट्रीय पक्ष पक्षीय भूमीकाच्या पलीकडे जाऊन काम केलं तर ख-या अर्थानं हे करण्यायोग्य शहर ज्या नागरीकांच्या पसंतीस पडलेलं आहे त्या पध्दतीनं भविष्यातील जर ३० वर्ष रहायचं असेल तर ते करावं लागेल अशी विनंती मी सभागृहाला करतो. निश्चितपणे मला माझ्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे. मी काही बाबतीत जर कमी पडलो असेल तर निश्चितपणे मला त्याची दिलगीरी व्यक्त करावीशी वाटते. पण आज अशी वेळ आहे की, ज्यावेळेला आपल्या सर्वांच्याकडनं मदतीची अपेक्षा प्रशासनाचा प्रमुख म्हणुन मी आपल्या सगळयाकडनं व्यक्त करतो. निश्चितपणे अनेक आमच्या मनामध्ये माझ्या निवेदनावरती किंतू असतील चर्चेसाठी अजुनही वाव असेल आपण निश्चितपणे पुनश्च चर्चा करु या.आपल्या ज्या काही सूचना असतील, जे काही म्हणणं असेल माझं काही म्हणणं असेल ते खोडून वेगळा मुद्या सांगण्यासाठी निश्चितपणे स्विकारण्यास तयार आहे. आपण पुनश्च बैठक घेतली, पुनश्च चर्चा केली तर ती करणं आवश्यक राहणार आहे. आणि करावीच अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझं निवेदन संपवतो. तरी एक खुलासा राहीलेला आहे आठवडयातून एक दिवस खंड करण्याचा निर्णय घेतलेला आहे माझा विश्वास आहे की,याचं नियोजन आपण पुढे काही काळापर्यंत निश्चितपणे चालू ठेवू शकतो. अल्टरनेट डे केल्याचा काय परिणाम झाला हे आज आपल्याला माहित नाही. ज्यावेळेस मी नागरीकांना सांगतो की, टंचाई आहे पाणी जपून वापरा त्यावेळेला नागरीक पाणी जपून वापरतात आज मी नागरीकांना सांगू शकत नाही की, टंचाई आहे. आज आपल्या डिस्ट्रीब्युशनमध्ये काही प्रॉब्लेम्स आहेत. ज्यावेळेला टंचाई नाही आणि मी आग्रह करतो त्यावेळेला नागरीक जास्तीत जास्त पाणी स्टोअरेज करतील आणि पुन्हा आपल्याला याच समस्येला सामोरे जावे लागेल.आणि म्हणुन आपण आहे त्या परिस्थितीमध्ये एक दिवसाचा खंड करुन आपण जोपर्यंत खरी टंचाई सुरु होत नाही तोपर्यंत आपण निश्चितपणे या पध्दतीने वाटप करु शकतो. एक दिवसाचा खंड याचा अर्थ ५० ते ६० एमएलडी अतिरिक्त पाणी ज्या दिवशी उपलब्ध होतं ते ज्या भागामध्ये टेलचा एरिया आहे त्याठिकाणी प्रेशरनी पाणी जात नाही तिथे आपण उपलब्ध करुन देणार आहोत. मात्र पुनश्च मला सांगायचं आहे प्रेशरची व्याख्या आपल्याला कुठे तरी ग्राऊड फ्लोअरला निश्चित करावी लागणार आहे

त्यामुळे दुसरा माळा,तिसरा माळा,चौथा माळा करुन चालणार नाही. काही जणांकडे आज संप ची व्यवस्था नसेल तर कुठे तरी स्थापत्य विभागाच्या मार्फत तिकडे संप निर्माण करण्याचा पर्याय आपल्याला निश्चितपणे करावा लागेल आणि त्यामुळे अनेक नगरसेवकांच्या मनामध्ये राग मला किंतू दिसतोय याच्यावर असं झालं तर काय होईल . काही भागावर निश्चितपणे इफेक्ट होणार आहे पण त्याच्यासाठी आपल्याला बसुन त्यावर सोल्युशन काढल्याशिवाय समन्वयी पाणी वाटपाच्या दृष्टीनं आपला प्रवाह सुरु होणार नाही धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, आजची सभा मंगळवार दिनांक ३/९/२०१९ रोजी दु.पारी १.०० पर्यंत तहकुब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – उपस्थित सर्व सन्मा.नगरसेवक, नगरसेविका, सर्व अधिकारी वर्ग सर्वांचे मनापासून स्वागत करतो जी समिती गठीत करावयाची आहे ती लवकरात लवकर करु या आणि ती दोन दिवसात बैठक घेऊन त्या समितीचे पुढचे निर्णय घेऊ. तसेच आयुक्त साहेबांनी सर्व नगरसदस्यांच्या प्रश्नांचा खुलासा केलेला आहे. सर्व नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील त्याचबरोबर गटनेत्यांनी शहराच्या पाणीपुरवठयाच्या संदर्भात अतिशय अंतकरणापासून आपआपल्या पध्दतीने पाणीपुरवठयाच्या समस्या याठिकाणी मांडलेल्या आहेत खरंतर याठिकाणी सर्व चर्चा झालेली आहे. मी तुम्हांला वेगळं काय सांगू पण मी वेगळं काही सांगणार नाही परंतु आयुक्त साहेबांच्या खुलाशावर शनिवारी आपण बैठक घेऊ त्यामध्ये गटनेते,नगरसेवक सर्वांना बोलावलं जाईल. आणि त्यावर तोडगा काढू आणि आयुक्तांनी तुम्हांला शनिवारपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत करा आणि सोमवारी आपण सर्व नगरसेवक,गटनेते यांची ऍटो क्लस्टरला बैठक लावू. परंतु हे करीत असताना आज जरी पाण्यावर चर्चा चालू आहे आज सुध्दा सर्व नगरसेवक आणि मला सुध्दा पाण्यासाठी फोन आलेले आहेत ज्या ज्या ठिकाणी आम्ही स्वत:चे टॅंकर पाठवले ज्याठिकाणी पाणी जात नाही त्याठिकाणचे फोटो आम्हांला व्हॉटस् ऍपवर येतात. त्यामुळे तांबे साहेब, लडकत साहेब असतील तुम्हांला पुन्हा सुचना करतो की, ज्या ज्या ठिकाणी तुम्ही यापुर्वी पाणीपुरवठा सुरळीत करीत होता त्याच पध्दतीने आपण पाणीपुरवठा सुरळीत करावा. जे अनधिकृत कनेक्शन आहेत ते अधिकृत करा किंवा तोडून टाका परंतु आपलं पाणी असं वेस्टेज जाऊ

देऊ नका आणि कोणाला करुही देवु नका त्याच बरोबर काही नगरसेवकांनी २४ बाय ७ या लाईनसाठी शहरामध्ये जेवढे रस्ते खोदलेले आहेत ते सर्व रस्ते संबंधित एजन्सीला लवकरात लवकर भरायला सांगा. नाही तर त्या संबंधित ठेकेदाराला आपण ब्लॅकलिस्ट करावे.कारण आतापर्यंत ३ ते ४ सर्वसाधारण सभेमध्ये सर्व नगरसेवकांनी हा मुद्या उपस्थित केला परंतु त्याच्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. एवढेच नव्हे तर मी सुध्दा माझा प्रभाग क्र. २ आहे त्याठिकाणी खोदलेली लाईन आहे आणि मला वाटतं यमुनानगर ते निगडी या रस्त्याने मी काल जात असताना महाराणा पुतळा जो आहे तेथून आपण यमुनानगरकडे जाताना स्वीट होमच्या जवळ स्ट्रेचेस भरलेले आहेत आणि बाकीचे पूर्ण खड्डे आहेत तर अपघात होण्याची वाट पाहू नका जर का त्यांच्या टेंडरमध्ये खोदाई करायची,लाईन टाकायची परत स्ट्रेंचेस भरायची जबाबदारी त्या विभागाची आहे तर मग ते काय आपले जावई नाहीत जर त्यांची मानसिकता नसेल तर स्थापत्य विभागाने काम करावे आणि त्याच जे काही बील असेल ते त्यांना द्यावयाच्या बीलामधुन कपात करणेत यावे. परंतु २४ बाय ७ च्या योजनेचे खड्डे कुठेच ठेवू नका आणि त्याच बरोबर पावसामुळे झालेले खड्डे ते ही स्थापत्य विभागाने बुजवून घ्यावेत. पाणीपुरवठा विभागाच्या संदर्भात काही विषय आमच्याही कानावर आलेले आहेत. अधिका-यांची जी साखळी आहे त्यामध्ये कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, वॉलमन, प्लंबर असे जे काही आहे. जे वॉलमन आहेत त्यांना मानधनही देतो आणि तो एजन्सीकडेही काम करतो. त्यामुळे सोसायटयांकडनं जास्त पैसे घेणे आणि त्यांना जादा पाणी देणे आणि बाकीच्या लोकांना कमी पाणी देणे असले उद्योग आता बंद करा आणि आपण प्रॉपर्ली त्याठिकाणी लक्ष घालावे. तुम्हांला स्थापत्य विभागाची टीम सुध्दा आयुक्त साहेबांनी दिलेली आहे. त्यामुळे असे प्रकार शहरामध्ये ज्या ज्याठिकाणी घडतात त्याच्यावर तुम्ही निर्बंध आणणं गरजेचं आहे त्याच बरोबर काही नगरसदस्यांनी मुद्या उपस्थित केलेला आहे की, लोकांनी नदीमध्ये आणि काही नाल्यामध्ये भराव टाकलेला आहे. असं ज्या ज्याठिकाणी निदर्शनास येईल त्याठिकाणी आपण कायदेशीर कारवाई करावी. आणि शक्य तेवढया लवकर जो भराव टाकलेला आहे तो काढून घेतला तर अतिशय चांगले होईल. पुढच्या वर्षी आपल्याला पुन्हा पूरस्थितीला सामोरे जावं लागणार नाही. सर्व नगरसेवक,नगरसेविका, अधिकारी वर्ग यांची उपस्थिती चांगली आहे अशीच उपस्थिती ८ ही प्रभाग समितीची बैठक असेल त्यावेळेस आपण उपस्थित रहावं अशी सूचना करतो. सर्वांचं मनापासून स्वागत करतो, पत्रकार बंधुचही मनापासून स्वागत करतो आणि उपस्थितीबद्दल

आभार व्यक्त करुन आजची सभा मंगळवार दिनांक ३/९/२०१९ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

------

**( राहुल गुलाब जाधव )**
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ३३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/७/२०१९, दि.२५/७/२०१९, दि.६/८/२०१९ व दि.२०/८/२०१९ (दु.१.००) व दि.२१/८/२०१९ (दु.१.३०) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – ३.९.२०१९</u> <u>वेळ – दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२१.८.२०१९ (दु.१.३० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक ३.९.२०१९ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.दत्तात्रय बाबूराव साने

४) मा.सारीका शिवाजी सस्ते

५) मा.बुर्डे सुवर्णा विकास

६) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

७) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

८) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

९) मा.गायकवाड निर्मला मनोज

१०) मा.सागर बाळासाहेब गवळी

११) मा.गोफणे अनुराधा देविदास

१२) मा.बारसे प्रियांका प्रविण

१३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.फुगे भिमाबाई पोपट

१८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१९) मा.सावळे सिमा रविंद्र

२०) मा.लोंढे नम्रता योगेश

२१) मा.लांडे विक्रांत विलास

२२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२३) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२४) मा.अनुराधा गणपत गोरखे

२५) मा.केशव हनुमंत घोळवे

२६) मा.मंगला अशोक कदम

२७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२८) मा.अश्विनी भिमा बोबडे

२९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३०) मा.संजय बबन नेवाळे

३१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३२) मा.भालेकर प्रविण महादेव

३३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३६) मा.घोलप कमल अनिल

३७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३८) मा.पवळे सुमनताई मधुकर

३९) मा.चिखले सचिन तुकाराम

४०) मा.जावेद रमजान शेख

४१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४२) मा.प्रमोद कुटे

४३) मा.राजू मिसाळ

४४) मा.शैलजा अविनाश मोरे

४५) मा.बाबर शर्मिला राजू

४६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४९) मा.ढाके नामदेव जनार्दन

५०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५१) मा.करुणा शेखर चिंचवडे

५२) मा.भोईर सुरेश शिवाजी

५३) मा.अपर्णा निलेश डोके

५४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५६) मा.जयश्री वसंत गावडे

५७) मा.कोमल दिपक मेवानी

५८) मा.सुलक्षणा राजू धर

५९) मा.सुजाता सुनिल पालांडे

६०) मा.योगेश मंगलसेन बहल

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६४) मा.नढे विनोद जयवंत

६५) मा.पाडाळे निता विलास

६६) मा.काळे उषा दिलीप

६७) मा.कोकणे संतोष अंकुश

६८) मा.पवार मनिषा प्रमोद

६९) मा.बारणे अर्चना तानाजी

७०) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

७१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७२) मा.बारणे माया संतोष

७३) मा.निलेश हिरामण बारणे

७४) मा.दर्शले रेखा राजेश

७५) मा.कलाटे राहुल तानाजी

७६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७७) मा.ममता विनायक गायकवाड

७८) मा.कामठे तुषार गजानन

७९) मा.चौंधे आरती सुरेश

८०) मा.कस्पटे संदिप अरुण

८१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८५) मा.कुटे निर्मला संजय

८६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८८) मा.आंगोळकर सागर सुनिल

८९) मा.मुंढे उषा अंकुश

९०) मा.लोखंडे चंदा राजू

९१) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

९५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९८) मा.नवनाथ दत्तू जगताप

९९) मा.संतोष बबन कांबळे

१००) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०४) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. पाटील – अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर - सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.वाबळे-अधिष्ठाता वायसीएमएच, मा.कुलकर्णी, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.मोरे, मा.वाघुंडे- कार्यकारी अभियंता,

मा.डॉ.गोफणे- आरोग्याधिकारी, मा.बहुरे- प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

(सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मा.उपामहापौर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

**मा.उपमहापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, अरुण जेटली- भाजपाचे जेष्ठ नेते तथा माजी केद्रीय अर्थमंत्री, बाबुलाल गौर – भाजपाचे जेष्ठ नेते तथा मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री, कुसुम जगन्नाथ शेंडे – जेष्ठ गायीका, रामभाऊ भागुजी गोलांडे – माजी नगरसदस्य राजाभाऊ गोलांडे यांचे वडील, शिवाजी वाखारे, लक्ष्मीबाई मोरे, इंदुबाई पवार यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उपमहापौर-** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारतीय जनता पार्टीचे केंद्रीय नेतृत्व आदरणीय सुषमाजी स्वराज तसेच आजच्या सभेमध्ये सर्वानी श्रध्दांजली वाहीली असे केंद्रीय अर्थमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते अरुणजी जेटली यांच्या बद्दल याठिकाणी बोलायच झालतर ते विदयार्थी परिषदेचे कार्यकर्ते असल्यापासून आपल्या सार्वजनिक जीवनामध्ये कार्यरत होते. विदयार्थी परिषदेपासून अर्थमंत्री आणि अटलजी बिहारी वाजपेयी यांच्या कारकीर्दीमध्ये जलवाहतूक मंत्री तसेच राज्यसभेचे सदस्य अशा अनेक पदावरती त्यांनी याठिकाणी काम केलेल आहे. मागच्या नरेंद्रभाई मोदींच्या सरकारमध्ये पाच वर्षाच्या काळामध्ये अर्थमंत्रीपद त्यांनी भूषवलं. गेल्या पाच वर्षामध्ये संपर्ण देशामध्ये चांगल्या पध्दतीच बजेट त्यांच्या माध्यमातून केल गेलं. अतीशय हूशार आणि अभ्यासू व्यक्तीमत्व असणार अरुणजी जेटली साहेब आणि याठिकाणी गेलेले भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते. ख-या अर्थान आज आपण जर

बघीतल असेलतर सुषमाजी असतील किंवा अरुणजी असतील यांच्या जाण्यामुळे भारतीय जनता पार्टीमध्ये खुप मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. ख-या अर्थान भारतीय जनता पार्टीच छत्र याठिकाणी हरवलेल आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना याठिकाणी दिसतय. ज्यावेळेस आपण याठिकाणी श्रध्दांजली वाहतो त्यावेळेस त्यांनी केलेलं कार्य, त्यांनी विदयार्थी दशेपासून केलेल कार्य हे आपणा सगळयांना माहिती आहे. आम्हा सर्वांना त्यांच्या कार्यावरती काम करत राहण ख-या अर्थाने आठवणी होतील. सर्व सामान्याच्यासाठी जसं त्यांनी काम केल तशाच पध्दतीच कार्य आमच्याकडून व्हाव अशी याठिकाणी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि आदरणीय अरुणजी जेटली साहेबांना पिंपरी चिंचवड भारतीय जनता पार्टी तर्फे तसेच या सभागृहातर्फे मी याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. देशाचे माजी अर्थमंत्री, संरक्षण मंत्री आणि ख-या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाचे विधीतज्ञ आम्हा सर्वांचे श्रध्देच आदरणीय अरुणजी जेटली साहेबांना याठिकाणी श्रध्दांजलीच्या अनुषंगाने खरोखरच त्यांच्या जाण्याने या देशाच खुप मोठ नुकसान झालेल आहे अगदी विदयार्थी अवस्थेपासून शालेय जीवनापासून त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे काही सुप्त गुण दिसून आले. अखिल भारतीय विदयार्थी परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या सामाजीक, राजकीय कार्याला सुरवात केली आणि ख-या अर्थाने आपण जर पाहीलतर कायदयाबाबत अतीशय हुशार अस व्यक्तीमत्व म्हणून त्यांना ओळखल जातं. त्यांच्या केस आजही अनेक विदयालयामध्ये, महाविदयालयामध्ये ख-या अर्थाने रेफरन्स साठी घेतल्या जातात. किंबहूना जे आपल्या राष्ट्राचे गृह मंत्री आहेत अमीतभाई शाहा यांच्या केसबाबत खरोखरच त्यांनी विशेष लक्ष घातल. एवढच नव्हेतर अलीकडच्या काळामध्ये आपणास माहित होतं की टॅक्सच्या बाबतीत, दर प्रणालीच्या बाबतीत देशामध्ये, विवीध राज्यामध्ये वेगवेगळे कर असायचे आणि ख-या अर्थाने कामगार ज्यावेळेस उदयोगजगतात जे आढाणी राहीलेल होतें आणि सर्वात महत्वाच म्हणजे आपल्या महाराष्ट्र राज्यात अनेक उदयोगधंदे गुजरात असेल, उत्तरांचल असेल, पंतनगर असेल, साऊथमध्ये अशा विवीध राज्यामध्ये हरियाणासारख्या ठिकाणी अनेक उदयोगधंदे स्थलांतरीत झाले त्यामुळे अनेकाना उपासमारीची वेळ आली अनेकांच्या नौक-या गेल्या लघुउदयोजक

असतील, मध्यम उदयोजक असतील अतीशय त्यांची वाताहात झाली. परंतु ख-या अर्थाने या व्यक्तीमत्वाने, या नेतृत्वाने प्रगत राष्ट्राचा अभ्यास केला, त्याठिकाणच्या करप्रणालीचा अभ्यास केला आणि त्या नुसार ख-या अर्थाने जीएसटी सारखा अतीशय क्रांतीकारी असा निर्णय या राष्ट्रासाठी त्यांनी आणण्याच काम केल आणि त्यामुळ आम्हांला ब-याचदा चिंता वाटायची की पिंपरी चिंचवड शहर हे शहर ख-या अर्थाने डेट्रॉईक सिटी म्हणून होतय की काय परंतु ती वाटणारी भीती ती ख-या अर्थाने या नेतृत्वाच्या अभ्यासूपणामुळ ते थांबल्या गेलं. जीएसटी मुळ अनेक उदयोगधंदे आजही आपल्या पुण्यामध्ये महाराष्ट्रामध्ये सुरु झाले किंबहूना बाहेर गेलेले अनेक उदयोगधंदे ख-या अर्थाने आपल्या राज्यामध्ये पुन्हा याठिकाणी आले. अतीशय चांगल्या पध्दतीची करप्रणाली जेणे करुन या राष्ट्राला ख-या अर्थाने प्रगतीपथावर कस नेता येईल त्या अनुषंगाने सुरु झालेलं आहे. जे ख-या अर्थाने चांगल आहे त्याला आपण चांगल म्हणल पाहीजे ही मानसीकता आपल्या मनामध्ये असली गेली पाहीजे. ख-या अर्थाने आपण जर पाहीलतर आदरणीय आणि श्रध्देय अरुणजी जेटली साहेबांच्या माध्यमातून अतीशय चांगले निर्णय या राष्ट्रासाठी ख-या अर्थाने घडले गेलेले आहेत. खरोखरच शेवटच्या श्वासापर्यंत ते आपल्या या राष्ट्रासाठी काम करत राहीले आणि आजकाल आपण पाहतो आहोत राजकारणामध्ये अनेकजण पदासाठी हापापलेले आहेत पदाच्या माग पळतात त्यासाठी अनेक प्रकार करुन दाखवतात. परंतु मोदी साहेब स्वत:हून त्यांना सांगत होते की आता या मंत्रीमंडळामध्ये तुम्हांला मंत्री म्हणून शपथ घ्यायची आहे परंतु त्यांनी स्पष्टपणे त्यांना नाही म्हणून सांगीतल माझी प्रकृती स्वस्थ्य ठिक नाही आणि मी आता सेवा करु शकत नाही त्यामुळ जरी तुमची माझ्यावर इच्छा असलीतरी देखील मी ते स्विकारु शकणार नाही. असं व्यक्तीमत्व मिळण हे खरोखरच आजच्या काळामध्ये दुर्मिळ आहे. अशी भाग्यवान रत्न या राष्ट्रानी पाहीली, अनुभवली म्हणून या राष्ट्राच्या हितासाठी त्यांनी जे जे चांगल योगदान दिलेल आहे ते खरोखरच अतीशय वंदनीय आहे. त्यांच्या संपुर्ण आयुष्यात जे त्यांनी काही केलेल आहे ते मला असं वाटत श्रीमद भगवत गीतेतील कर्मांडीवादी या प्रमाणे त्यांनी संपुर्ण आयुष्य गोरगरीबांसाठी, कष्टक-यासाठी, राष्ट्रासाठी समर्पीत केलेलं आहे. अशा या महान नेतृत्वाला मी याठिकाणी वंदन करतो आणि आपल्या सर्वांच्या वतीने याठिकाणी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.सुलक्षणा धर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज हामारे भारत देशने एक महान नेता खोया हैं और मैं उनके चरीत्रोपे कुछ कहिना चाहती हूँ. Arun Jaitely was a Strong headed politician, renowned Advocate, and great Leader, great Spokperson. उनके जीवनपे, उनके व्यक्तीगत जीवनपे और उनके व्यावसायीक जीवनपे और उनके राष्ट्रीय जीवनपर मैं रोषणी दालना चाहती हूँ. Arun Jaitely was born on 28 Dec.1952 in Delhi. After passing his LLV, he was a student leader of ABVP. Being a President of Student Union Of Delhi. University he was detained for 19 months during Emergency period. He Practiced law in Supreme Court & later was designated as Senior Advocate in Delhi High Court. Arun Jaitely was Married to a daughter of a politician in J & K in 1982. He started his political carrier in BJP & was a Spokperson. During Vajpayee Govt. he was appointed as minister of state for I & B Sector & letter on ministree of Law & Justice. Althoug he never won any L S election, but he was 4 times R S member & during 2009-14 he was leader of opposition in RS in modi Govt. he was handeling 2 important ministeries Defence & Finance. In the in future & this tenure 2 big initiatives were taken by GST & Demonatisation in finance. Beacause of ill health he declared that he wont take active role in the new Govt. ऐसा महान नेता हमारे देशने खोया हैं. हामने और एक महान नेता खोया हैं. उपस्थित हम सभी महिलांए उनको अपना आयडॉल मानती थी. ऐसे नेताके बारेमें सन्मा.महापौर, मै अनुमती चाहती हूँ मैं उनके बारेंमे भी कूछ कहूँ. ऐसी महान नेता हैं जो ऐसी शक्सयित हैं जो एक शेरनी की तरह दहाडती थी और बडे बडे लीडरभी उनके सामने चुप हो जाते थे. ऐसी महान नेता जीनके सामने पक्षका नेता हो या विपक्षका उनके सामने कोई टिक नही सकता. ऐसी ओ स्पोकपर्सन थी ऐसी ओ शक्सयित थी जीनका नाम है सुषमा स्वराज. सुषमा स्वराजने अपने पॉलिटीकल करीअरमे भारत देशमे ही नही बल्की विदेश मे भी अपनी अलक पहचान बनाई थी. सुषमाजी एक ऐसी प्रवक्ता थी, ओ एक ऐसी पर्सनॅलटी थी जो संसद मे कितना भी सिरीएस टॉपीक क्यो नां हो कितना भी controversis क्यों ना हो ओ अपने राजनैतिक विरोधियो को भी आपने मोह कर अपना दोस्त बनाती थी. अपना मित्र बनाती थी ऐसी खासीयत थी उन्हमें. सुषमाजी एक ऐसी शक्सयित थी उनको संयमीत अनुशासित और मर्यादीत लीडर थी. व्यक्तीगत रुप मे वह बहूत ही सुलझी हूई शक्सयित थी. सुषमाजी के बारे में और कहना चाहती हूँ की उन्होंने उनका जो पॉलीटीकल करीअर हैं ओ अखिल भारतीय विदयार्थी परिषदके माध्यमसे १९७० मे स्टार्ट किया था. सुषमाजीने बहुतसारे मोदी गव्हर्मेंटके पहले कार्यकाल में सुषमाजीने विदेश

मंत्री के रुपमें भी बेहतरीन कार्य किया हैं. हाम सभी उसको जानते हैं. उनको विदेश में कोई भी अपना भारतीय नागरीक किसी भी समस्या में हो और उन्हो ट्वीट करें तो उन्हें को तुरन्त जवाब देती थी. ओ खुद उनका मसला हाल करती थी ऐसी खासीयत उन्हेंमे थी. ओ एक डायनॅमीक लेडी थी, एक डायनॅमीक पर्सन्लॅटी थी. ओ बीजेपी की दो बार व्हाईस प्रेसिडेंट करके सुषमाजीने आपना रोल निभाया था. सुषमाजीने सात बार सांसद सदस्य और तीन बार लोकसभा सदस्य के रुपमे सुषमाजीको चुनाया गया था. सुषमाजीने बहुत सारे निर्णय भी उनके कार्यकाल में लीये हैं. और सुषमाजी ऐसी शक्सयित थी की एकमेव लोकसभा सदस्य भी उनको चुना गया था और उसी दौरान उनको विधानसभा सदस्य भी चुना गया था. उन्होने उनका जो कार्यकाल हैं उन्होने विधानसभा सीट रिटर्न करने के लिए राज्यसभा सदस्य को इस्तिफा दिया था. सुषमाजी की और खासिएत हैं की सुषमाजीने वसुवदैव कुंटूंबकम का मतलब पुरे विश्व को बहुत अच्छेसे समझाया था. सुषमाजी का हिंदी भाषा के साथ सांस्कृत भाषा में भी अच्छी पकड थी. ओ बहूत शायरी अच्छी करती थी, कविताए अच्छी करती थी. उनके शायरी का अंदाज हाम संसद में कई बार देख चुके हैं. ओ भारत की पहली मुख्यमंत्री के रुपमें दिल्लीसे उनको चुना गया था. ओ भारत की पहली स्पोकसपर्सन के रुपमे उनको चुना गया था. ओ भारत की पहली महीला युनियन कॅबीनेट मिनीस्टरके रुप में उनको चुना गया था. उन्होने हेल्थ ऍण्ड फॉमिली वेलफेअर में काम किया था. ऐसे बहुत सारे कार्य उन्होने किये हैं. हाम उपस्थित सभी महिलांए उनको अपना आयडॉल मानते थे. ऐसी एक डायनॅमीक पर्सनॅलीटी आज हमारे देशने खोई हैं. मैं अपने परिवार की और से, आपनी पक्ष की और से, और अपनी प्रभाग की औरसे सुषमाजी और अरुण जेटलीजी को भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करती हूँ, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपल्या देशाचे अर्थमंत्री आदरणीय अरुण जेटली साहेब आणि सौ.सुषमाताई स्वराज यांच दु:खद निधन झालेल आहे. देशाचे चांगले अर्थमंत्री आज आपल्या या देशाने गमावलेले आहेत. मी राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या वतीने, महापालिकेच्या वतीने या सभागृहाच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि मा.महापौरांना विनंती आहे की आजची सभा श्रध्दांजली झाल्यानंतर लोक पाणी पाणी पाणी करतात तरी सभागृहाच्या जबाबदार

खुर्चीवर आज आपण बसलेला आहात आज रिंगमास्टरची रिंग आम्ही आपल्या हातात दिलेली आहे. आज सभागृहाच्या सर्व नगरसेवकाना असं वाटतय की आज आपण त्याठिकाणी बसून काहीतरी जशी ईडीची भीती जशी दिलेली आहे तशी इडीची भीती आमच्या महापौरांकडन आम्हा सगळयाना, अधिका-यांना पण पडावी अशी अपेक्षा आपल्याकडन व्यक्त करतो आणि शहरातील जे मुख्य प्रश्न असतील, या महापालिकेच्या आलेल्या प्रत्येक सभा या वेगवेगळया कारणानी तहकूब झालेल्या आहेत. शहरामध्ये अनेक विषय आहेत, कचरा आहे, पाणी आहे किंवा इतर अनेक प्रश्न आहेत. त्या प्रश्नावर मुळ चर्चा करायला ज्यावेळेस आम्ही उपलब्ध होत असतो त्यावेळेस काहीतरी होत, ज्या घटना घडतात त्याला आम्ही कधी नाकारणार नाहीत पण ही श्रध्दांजली झाल्यानंतर पुढची जी मिटींग आहे त्यात एक तास आम्हांला सादक बाधक चर्चेला वेळ दयावा अशी आपल्याला विनंती करतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजची जीबी आपण कदाचित तहकूब करणार आहोत, परंतु आज आपल्या देशाचे अत्यंत कार्यक्षम असणारे अरुणजी जेटली त्यांची प्राणज्योत २४ ऑगष्ट २०१९ रोजी मावळली. देशाचे अर्थमंत्री म्हणून त्यांनी पद भोगलेलं आहे. विपक्षनेते म्हणून त्यांनी पद उपभोगलेलं आहे. असे अत्यंत विचारवंत, अत्यंत बुध्दीमंत त्यांनी त्यांच्या विदयार्थी जीवनापासूनच राजकीय वाटचाल सुरु केली. म्हणजे ख-या अर्थाने कुठेतरी राजकारण करायचं ही भावना नसते, विदयार्थी असताना ज्यावेळेस काम करतो त्यावेळेस ती भावना वेगळी असते. ती कुठेतरी मोठया पदावर जायच म्हणून ती भावना नसते आणि मला वाटते निश्चितपणे अरुणजी जेटलीमध्ये तेच बघायला मिळालं की विदयार्थी जीवनामधुन त्यांनी सुरवात केली आणि आज ते त्यांच्या चांगल्या बुध्दीमत्तेमुळे एका चांगल्या पदावर सुध्दा पोहचले. एवढेच नव्हेतर आदरनीय अटलबिहारी वाजपेयी असतील, नरेंद्रजी मोदी असतील हे पंतप्रधान असताना अरुण जेठलींचा विचार घेतल्या शिवाय त्यांच्याशी डिस्कशन केल्या शिवाय त्यांच्याशी चर्चा करुनच निर्णय घेत असा एक महान नेता आज आपल्या देशाने हरपलेला आहे. त्यांना माझ्या कुटूंबीयाच्या वतीने, प्रभागाच्या वतीने, आपल्या सभागृहाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते त्याच बरोबर सुषमाजी स्वराज यांना सुध्दा आपण नुकतच गमावलेल आहे. त्यांनी देशाचा विचार केला,

देशासाठी केलं, आम्ही शाळेत शिकत असताना सुषमाजी स्वराज यांचे भाषण ऐकायचो. ते उतूंग व्यक्तीमत्व, साडी घातलेली, जॅकेट ते मोठ कुंकू त्या ज्यावेळेस सभागृहात बोलायच्या त्यावेळेस आम्हांला ते ऐकावस वाटायचं इतक चांगल व्यक्तीमत्व आज आपल्या देशाने हारवलेल आहे. या दोघानाही पुन्हा एकदा मी श्रध्दांजली अर्पण करते.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या दहा ते पंधरा दिवसात भारतीय जनता पार्टीचे दोन सर्वोच्च नेते अरुण जेटली आणि सुषमा स्वराज यांना गमावलेलं आहे. सुषमा स्वराज यांच्या बाबतीत बोलायच झालतर भारतीय जनता पार्टीचा एक पहीला आवाज यांना देशात रणरागीनी म्हणून ओळखल जायचं. भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री हे देखील आपल्या सर्वातून निघून गेलेले आहेत. अरुणजी जेटली यांच्या बद्दल सांगायच झालतर देशाचे माजी अर्थ मंत्री तसेच दिल्ली क्रिकेट बोर्डचे चेअरमन होते त्यावेळेस माझा त्यांचा जवळून संबंध आला. त्यांचे क्रिकेट बोर्डचे सदस्य ते आजही माझ्या चांगल्या संपर्कात आहेत. या देशातल्या जनतेनी एक चांगल उतूंग व्यक्तीमत्व आज गमावलेलं आहे. मी सभागृहाच्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वैयक्तीक कुटूंबीयाच्या वतीने या दोन्ही सर्वोच्च नेत्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अरुण जेटली यांना मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. खरतर सचिन चिंचवडे यांच अभिनंदन करायला पाहीजे. ते याठिकाणी महापौर म्हणून बसलेले आहेत सभागृहाच्या वतीने आपल स्वागत, धन्यवाद.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर महापौर सभागृहात आल्यानंतर आनंद वाटला आपण सिंहासनावर होता. तुम्हांला संधी मिळाली त्याबद्दल तुमच अभिनंदन करते. देशाचे एक अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणल्यानंतर अरुणजी जेटली यांच नाव डोळयासमोर आल्या शिवाय राहत नाही. देशाची जडणघडण करत असताना त्यांचे विचाराशिवाय ती जडणघडण झालेली नाही. अशा व्यक्तीला आपण सर्वानी याठिकाणी श्रध्दांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजीत केला. खरतर चांगली गोष्ट सर्वानाच हवी असते त्याप्रमाणे पाचपक्वानाचं जेवण करत असतो आणि त्या पाच पक्वानामध्ये एखादा पदार्थ अतीशय आवडीचा असतो पण तो परत वाढायला येत नाही आणि कुठतरी आपल जेवण राहील्यासारख वाटत. त्याच पध्दतीच हे व्यक्तीमत्व आज

आपल्या देशाला, भारतीय जनता पक्षाला मिळालेल होतं. अतीशय चांगल व्यक्तीमत्व होत त्यांना कमी अयुष्यामध्ये हे जग सोडून जाव लागलं. त्याचप्रमाणे माजी परराष्ट्र मंत्री सुषमाताई स्वराज हेही व्यक्तीमत्व अतीशय वेगळ होतं. त्यांची विचारसरणी वेगळी होती, त्यांची पर्सनॅलीटी वेगळी होती, त्यांच राहणीमान सुंदर होतं, विचार चांगले होते. ही व्यक्ती सुध्दा आज आपल्यातून गेलेली आहे. यांच्या विषयी बोलाल तेवढ कमीच आहे आताच सुलक्षणा धर यांनी अतीशय सुंदर भाषण केल आहे. मी एवढेच म्हणेन या व्यक्तीला आपल्या सभागृहाच्या वतीने त्याचबरोबर मी माझ्या वॉर्डच्या वतीने, कुटूंबीयाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करते आणि माझे दोन शब्द संपविते.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अरुणजी जेटली, सुषमा स्वराज आणि त्याच्या अगोदर मनोहर पर्रीकर भारतीय जनता पार्टी आणि राजकारणाच्या इतिहासामध्ये भारतीय जनता पार्टीने चांगले मोहरे गमावले आहेत. अरुण जेटली हे कायदे पंडीत होते. सुषमा स्वराज यांच वकृत्व चांगल होत आणि भारत देशाच कधीही भरुन न येणार नुकसान या तीन लोकांच्या जाण्यामुळ झालेल आहे. विशेषतः सचिनजी चिंचवडे मी तुमच अभिनंदन करतो. कारण पिंपरी चिंचवड इतिहासामध्ये सगळया आडनावाचे महापौर झाले पण चिंचवडे आडनावाचा महापौर पहील्यांदा झाला त्याबद्दल चिंचवड वासीयांच्या वतीने, पिंपरी चिंचवडच्या वतीने मी तुमच अभिनंदन करतो आणि या तीन्ही नेत्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहून माझ भाषण संपवतो.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, आजची ही सभा दि.७/९/२०१९ दुपारी १.०० वाजेपर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.उपमहपौर -** सर्वांचे आभार मानुन ही सभा शनिवार दि.७/९/२०१९ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

**(चिंचवडे सचिन बाजीराव)**
उपमहापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ३३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/७/२०१९, दि.२५/७/२०१९, दि.६/८/२०१९ व दि.२०/८/२०१९ (दु.१.००) दि.२१/८/२०१९ (दु.१.३०) व दि.३/९/२०१९ (दु.१.००) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – ७.९.२०१९</u> <u>वेळ – दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.३.९.२०१९ (दु.१.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा शनिवार दिनांक ७.९.२०१९ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर
२) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
३) मा.साधना अंकुश मळेकर
४) मा.दत्तात्रय बाबूराव साने
५) मा.अश्विनी संतोष जाधव
६) मा.सारीका शिवाजी सस्ते
७) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
८) मा.बुर्डे सुवर्णा विकास
९) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

११) मा.गायकवाड निर्मला मनोज

१२) मा.सागर बाळासाहेब गवळी

१३) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१४) मा.बारसे प्रियांका प्रविण

१५) मा.अजित दामोदर गव्हाणे

१६) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१७) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१८) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१९) मा.फुगे भिमाबाई पोपट

२०) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.लोंढे नम्रता योगेश

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.लांडे विक्रांत विलास

२५) मा.गीता सुशिल मंचरकर

२६) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२८) मा.अनुराधा गणपत गोरखे

२९) मा.केशव हनुमंत घोळवे

३०) मा.मंगला अशोक कदम

३१) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३२) मा.अश्विनी भिमा बोबडे

३३) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३४) मा.संजय बबन नेवाळे

३५) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३६) मा.भालेकर प्रविण महादेव

३७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४०) मा.पवळे सुमनताई मधुकर

४१) मा.चिखले सचिन तुकाराम

४२) मा.यादव मीनल विशाल

४३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४४) मा.प्रमोद कुटे

४५) मा.राजू मिसाळ

४६) मा.बाबर शर्मिला राजू

४७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५१) मा.ढाके नामदेव जनार्दन

५२) मा.करुणा शेखर चिंचवडे

५३) मा.भोईर सुरेश शिवाजी

५४) मा.अपर्णा निलेश डोके

५५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५६) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५७) मा.कोमल दिपक मेवानी

५८) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५९) मा.सुलक्षणा राजू धर

६०) मा.सुजाता सुनिल पालांडे

६१) मा.योगेश मंगलसेन बहल

६२) मा.कदम निकीता अर्जुन

६३) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६५) मा.नढे विनोद जयवंत

६६) मा.पाडाळे निता विलास

६७) मा.काळे उषा दिलीप

६८) मा.कोकणे संतोष अंकुश

६९) मा.पवार मनिषा प्रमोद

७०) मा.बारणे अर्चना तानाजी

७१) मा.अभिषेक गोविंद बारणे

७२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७३) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७४) मा.बारणे माया संतोष

७५) मा.निलेश हिरामण बारणे

७६) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७७) मा.दर्शले रेखा राजेश

७८) मा.कलाटे राहुल तानाजी

७९) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८०) मा.ममता विनायक गायकवाड

८१) मा.कामठे तुषार गजानन

८२) मा.चोंधे आरती सुरेश

८३) मा.कस्पटे संदिप अरुण

८४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८६) मा.सुनिता हेमंत तापकीर

८७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८९) मा.कुटे निर्मला संजय

९०) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९२) मा.आंगोळकर सागर सुनिल

९३) मा.मुंढे उषा अंकुश

९४) मा.कदम शशिकांत गणपत

९५) मा.लोखंडे चंदा राजू

९६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९९) मा.नवनाथ दत्तू जगताप

१००) मा.संतोष बबन कांबळे

१०१) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०३) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार -अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार-

उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.वाघमारे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.साळूंके – मुख्य उदयान अधिक्षक, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.वाघुंडे - कार्यकारी अभियंता, , मा.डॉ.गोफणे- आरोग्याधिकारी, मा.वस्ते, मा.बहुरे- प्रशासन अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

(सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मा.उपामहापौर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

**मा.उपमहापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(नवनिर्वाचीत अति.आयुक्त मा.अजित पवार यांनी त्यांची ओळख सभागृहाला करुन दिली.)

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -३

दिनांक ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९ दि.२९/०५/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५१
दि.१२/०६/२०१९

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालय तर्फे “बांधकाम साहित्य व राडारोडा यांच्यातील टाकाऊ घटकाच्या विल्हेवाट लावणे” या नियम २०१६ नुसार [C & D Waste Management Rule 2016] महानगरपालिकेने व्यवस्थापकाची जबाबदारी पार पाडावयाची आहे. पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयच्या नियमांनुसार महानगरपालिकेने सदर यंत्रणेसाठी उपविधी [By laws] मंजूर करून सदर व्यवस्थापन खर्च राडारोडा निर्माण कर्त्याकडून वसूल करणे प्रस्तावित आहे. तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरूनबांधकाम

राडारोडयाचा पुर्नवापर करण्याच्या व टाकाऊ वस्तूचे प्रमाण कमी करण्या-या बांधकाम व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलती व सूट देणे याकरिता महानगरपालिकेतर्फे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

पूर्वपिठीका: भारत देशातील बांधकाम व्यवसायाच्या वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. पुढील वर्षात नीती आयोगाच्या अनुमानानुसार सध्याच्या बांधकामाच्या तिप्पट गृहनिर्माण प्रकल्प, रस्ते, व्यावसायिक व संस्थात्मक आस्थापना व मुलभूत सुविधा प्रकल्प भारतात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पातून वाळू, खडी, दगड, चुनखडी, माती यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या प्रकल्पाच्या बांधकाम साहित्यातून निर्माण होणा-या राडारोड्यातून अनेक संसाधानाचे वर्गीकरण करून पुर्नवापर केला जाऊ शकतो. यासाठी दिल्ली व अहमदाबाद येथे पथदर्शी प्रकल्प गेली ५ ते ६ वर्षापासून कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील व आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प कार्यरत आहेत. शहरांतर्गत अनेक विकास प्रकल्पाचे बांधकाम शासन व महानगरपालिकेतर्फे व खाजगी स्वरुपात केले जात आहेत. शहरातील मध्यम वर्गामध्ये सातत्याने गृह दुरुस्ती करिता व सुधारणा करिता घराअंतर्गत बांधकाम साहित्यांचा वापर होत आहे. सद्यस्थितीत शहरात सदर टाकाऊ बांधकाम साहित्य नदी, नाले, ओढे, तळे इत्यादींच्या काठावर व इतर ठिकाणी अयोग्य पद्धतीने टाकण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक स्त्रोतांचे प्रदूषण होत आहे. तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होऊन अनारोग्य परिस्थिती निर्माण होते.

उद्दिष्ट: Construction and Demolition Waste Management Rule 2016 नुसार शहरात निर्माण होणा-या बांधकामाचा राडारोडा सुयोग्य पद्धतीने गोळा करून त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेतून वेगळ्या झालेल्या बांधकाम संसाधानाचा पुर्नवापर महानगरपालिकेतर्फे केल्या जाणा-या बांधकाम प्रकल्पामध्ये करणे तसेच खाजगी प्रकल्पामध्ये सदर साहित्याचा पुर्नवापर करणेसाठी प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

कृती आराखडा: १. शहरातील बांधकाम साहित्य वापर करण्या-या सर्व व्यावसायिक कंत्राटदार व नागरिक यांना पर्यावरण मंत्रालयातर्फे बांधकाम व दुरूस्ती निष्कासनातून निर्माण होणा-या राडारोड्याच्या महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम अंतर्गत भाग १८ तील २९०,२९१,२९२,२९३ नियम बंधनकारक असतील. २. बांधकाम व

दुरूस्ती मधून निर्माण होणा-या राडारोडा व्यवस्थापनासाठी राडारोडा निर्मितीदारचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

श्रेणी क्र.१ : i शासनाच्या व महानगरपालिकेतर्फे नेमणूक केलेले कंत्राटदारामार्फत विविध विकास कामातून निर्माण होणारा राडारोडा. : ii खाजगी बांधकाम व्यावसायिक, संस्था व नागरिकांकडून करणेत येणारी बांधकामे ज्यांना महानगरपालिकेतर्फे खाजगी बांधकामासाठी प्राधिकृत वा परवानगी वितरीत बांधकामातून निर्माण होणारा राडारोडा. श्रेणी क्र.२ : i शासनाची व महानगरपालिकेची परवानगी आवश्यक नसलेले कोणतीही घरगुती आस्थापना अंतर्गत, संस्था अंतर्गत बांधकाम व दुरुस्ती श्रेणी १ मध्ये अंतर्गत समाविष्ट नसलेले सर्व घटक : ii मनपा किंवा कोणत्याही प्राधिका-याकडून परवानगी न घेता करणेत येणा-या बांधकामामधून निर्माण होणारा राडारोडा.

श्रेणी क्र.१ अंतर्गत येणा-या घटकांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित असेल.

१. शासकीय/ निमशासकीय विभागाच्या विविध विभागामार्फत किंवा महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून कार्यादेश वितरीत झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत अथवा आपत्कालीन परिस्थितीत काम सुरु केल्यानंतर तीन दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडे कामाचे स्वरूपानुसार निर्माण होणारे राडारोडाच्या अंदाजित प्रमाण व प्रकार कामाचे ठिकाण विहित नमुन्यात शासकीय/ निमशासकीय किंवा मनपाच्या संबधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकां-यांकडून प्रमाणित करून सादर करावे. सदर राडारोडा ५०० किलोपेक्षा जास्त असल्यास आवश्यक कंटेनरची संख्या निश्चित करून अंदाजित प्रक्रिया व वाहतूक खर्च तसेच महानगरपालिकेतर्फे साठवणूक कंटेनरसाठी आवश्यक ठेव रक्कम निश्चित करण्यात येईल.

२. राडारोडाचे दैनिक प्रमाण जास्त नसल्यास निर्मितीदार स्वतःचे कंटेनर वापरू शकतात व महानगरपालिकेच्या कॉल सेंटर मधिल यंत्रणाना राडारोडा उचलण्यासाठी संपर्क करू शकतात. महानगरपालिकेच्या यंत्रणांना टोल फ्रि क्रमांकावर राडारोडा उचलण्यासाठी संपर्क केल्यानंतर त्वरीत राडारोडा उचलण्याची व्यवस्था मनपाने नेमलेल्या कंपनीतर्फे करेल परंतु कोणत्याही परिस्थितीत राडारोडा नैसर्गिक जमिनीवर किंवा रस्त्यावर व इतरत्र टाकता येणार नाही याची जबाबदारी सबंधित संस्थावर व नागरिकांवर राहील.

३. अंदाजित प्रक्रीया खर्चाच्या कमीत कमी २५ टक्के रक्कम व साठवणूक कंटेनरकरिता ठेव रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल. श्रेणी १ मध्ये येणा-या

महानगरपालिकेच्या कंत्राटदाराच्यावतीने संबधित विभागाचे अधिकारी विभागाचा Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात.

४. सध्या अस्तिवात असलेल्या राडारोडाच्या व अनाधिकृत बांधकामाच्या राडारोड्याच्या वहनासाठी व प्रक्रिया करण्यासाठी प्रभाग प्रमुखांना Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात. या करिता छायाचित्र सहित केलेली कार्यवाही व राडारोडा अंदाजित प्रमाण यांची नोंद करणे आवश्यक असेल.

५. महानगरपालिकेतर्फे राडारोडा व्यवस्थापनासाठी निर्माण करण्यात येणा-या मोबाईल ॲप व संकेतस्थळामध्ये Login व Password संबधित संस्था यांना अग्रीम रक्कम जमा झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

६. सदर ॲप व संकेत स्थळावर अंदाजित राडारोडाचे प्रमाण व जमा अग्रिम रक्कम खात्यामध्ये दिसेल.

७. सदर संस्थाने कंटेनर भरल्यानंतर अथवा सदर संस्थेने संपर्क केल्यानंतर राडारोडा उचलण्यासाठी वाहन पाठविले जाईल. सदर वाहनातील संगणक यंत्रणेव्दारे उचलण्यात आलेला राडारोडा त्याचे छायाचित्र व त्यांचे वजन तसेच सदर साठी आकारण्यात येणारी रक्कम महानगरपालिकेच्या समन्वय कक्षाकडे व मोबाईल ॲप वर दोन्ही कडून नोंदवण्यात येईल व अग्रिम रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

८. राडारोडा उचलण्यात येण्यासाठी मोबाईल ॲपमधील शिल्लक रक्कम हि अंदाजित प्रमाणाच्या ५% पेक्षा जास्त असणे आवश्यक राहील. ९. सदर रक्कम ५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेने तात्काळ पुढील २५% टक्के भरणा करणे आवश्यक राहील.

श्रेणी २ अंतर्गत येणा-या घटकांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. श्रेणी २ अंतर्गत घटकांनी जमा झालेला राडारोडा, गनी बॅगमध्ये भरणे आवश्यक राहील. श्रेणी २ अंतर्गत सदर राडारोडा महानगरपालिकेच्या मोशी येथील Construction & Demolition पर्यंत स्वखर्चाने नेऊन देऊ शकतात. अथवा महानगरपालिकेच्या राडारोडा व्यवस्थापन केंद्रास टोल फ्रि क्रमांकावर संपर्क करून राडारोड्यासाठी वाहन Pickup साठी बोलवू शकतात.

२. राडारोडा मनपाच्या नजीकच्या ट्रान्स्फर स्टेशन पर्यंत नेल्यास श्रेणी १ व २ मधील घटकांना ट्रान्स्फर स्टेशन येथे वजनाप्रमाणे शुल्क भरणा करावा लागेल. सर्व श्रेणीसाठी पुढीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन शुल्क आकारणे प्रस्तावित आहे. राडारोडा गोळा

करणे. श्रेणी १ व २ बांधकाम राडारोडा उचलणे व मोशी राडारोडा प्रक्रिया केंद्रापर्यंत वहन खर्च र.रु.१५/- प्रति किमी/प्रतिटन राडारोड्यावर प्रक्रिया करणे. श्रेणी १ व २ बांधकामराडारोडा प्रक्रिया शुल्क. रक्कम रुपये. २५०/- प्रति टन

नियम बाह्य राडारोडा व्यवस्थापनाकरिता दंड :-

१. वरीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन यंत्रणाशी संपर्क न करता अथवा अनधिकृत राडारोडा टाकणा-या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक, कंत्राटदार, नागरिक व इतर घटकावर टाकलेल्या राडारोडाच्या वाहनासाठी व प्रक्रियेसाठी येणा-या खर्चाच्या १० पट शुल्क अधिक वहन व प्रक्रिया खर्च वसूल करण्यात येईल. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन २०१६ व C & D Waste Management Rule 2016 च्या अधिनियमनुसार कार्यवाहीस पात्र राहतील.

२. वरीलप्रमाणे कोणत्याही श्रेणीमधील घटकाने नैसर्गिक, नदी, नाले, ओढे, इत्यादी जलस्त्रोतांच्या बाजूने विनापरवाना राडारोडा टाकलेचे निदर्शनास आल्यास, तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून १० पट दंडाची रक्कम तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा मनपाच्या वतीने दाखल करणेत येईल.

राडारोडा पासून पुनर्निर्मित घटकाच्या वापरास प्रोत्साहन :-

१. (i) प्रक्रियायुक्त राडारोडा वापरणा-या बांधकाम व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्याकरिता बांधकाममध्ये ग्रीन बिल्डींग रेटींग अंतर्गत GRIHA किंवा LEED प्रमाणपत्र घेणा-या बांधकाम प्रकल्पांना मालमत्ता करामध्ये प्रचलित नियमानूसार जास्तीत जास्त ५% सूट तसेच मोठ्या प्रकल्पामध्ये (Large Development) अथवा परवडणा-या (Affordable Housing) (GRIHA) गृहा मानांकननुसार प्रकल्पामध्ये चार स्टार व पाच स्टार प्रकल्पामध्ये गृह प्रमाणपत्र अथवा (Leed) लीड प्रमाणपत्रामध्ये Platinum अथवा गोल्ड दर्जा प्रमाणपत्र मिळवलेल्या प्रकल्पांना मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडील ग्रीन बिल्डींग रेटींगच्या योजनेनूसार प्रचलित सुट देय राहील.

(ii) प्रक्रियायुक्त राडारोड्यापासून निर्माण झालेल्या बांधकाम साहित्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणा-या बांधकाम व्यवसायिक किंवा, खाजगी नागरिकांना तसेच शासकीय /निमशासकीय/मनपाच्या ठेकेदारांना सदरचे साहित्य त्या-त्या वर्षाच्या चालू बाजारभावापेक्षा २०% कमी दराने उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील.

२. महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या सर्व स्थापत्य, कामामध्ये राडारोड्यावर प्रक्रिया करून बनविलेल्या बांधकाम साहित्याचा वापर M२० grade पर्यंत Non structural भागासाठी वापर करणे बंधनकारक राहील त्यासाठी मनपाच्या शहर अभियंता कार्यालयाने आवश्यक साहित्याची मागणी प्रक्रिया केंद्राला तीन महिने आगाऊ पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे माध्यमातून कळविणे आवश्यक आहे. सदर स्थापत्य विषयक बाबींचे प्रत्येक वर्षीचे दर, स्थापत्य विभागामार्फत शहर अभियंता कार्यालयाकडून दरपृथ्थकरणाव्दारे निश्चित करणेत येतील. तसेच बाजार भावातील अशाच बाबींच्या दरापेक्षा सुमारे २०% कमी दराने सदरचे साहित्य मनपाच्या विविध विकास कामासाठी उपलब्ध करून देणे सबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याचा वापर मनपाच्या विविध विकास कामामध्ये आवश्यकतेनूसार करणेची दक्षता स्थापत्य/उद्यान/ड्रेनेज/पाणीपुरवठा इत्यादी विभागांकडून घेणेसाठी अशा बाबींचा समावेश निविदेमध्ये स्वतंत्रपणे करणेत येईल.

३. यामध्ये प्रामुख्याने पेव्हर ब्लॉक, कर्ब स्टोन, चेंबर्स कव्हर, ट्रि गार्ड, युटीलीटी डक्ट व इतर आवश्यकते प्रमाणे निर्माण होऊ शकणारे नाविन्यपूर्ण प्रिकास्ट प्रॉडक्टसचा समावेश असेल. या व्यतिरिक्त विविध विकास कामांसाठी लागणारे कच्चे साहित्य उदा. दगड, खडी, विटा, वाळू, माती इत्यादी सह रस्त्यासाठी लागणारा भराव, GSB, Wet - Mix इत्यादी विविध बांधकाम साहीत्याचा वापर मनपाच्या विविध विभागाकडील ठेकेदारांमार्फत करणेसाठीची कार्यप्रणाली शहर अभियंता कार्यालयाकडून निश्चित करणेत येईल. त्यानुसार याचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील निर्माण होणा-या बांधकामाच्या राडारोड्याचे Construction and Demolition Waste Management Rule 2016 चे नियमानूसार वहन करुन त्याचेवर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्यापासून निर्माण होणा-या विविध Precast Product बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर मनपाच्या व इतर खाजगी बांधकामामध्ये करणेच्या धोरणास [C & D Waste Policy] मान्यता देणेत यावी.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो. परंतु अनुमोदन देत असताना अधिका-यांनी या विषया संदर्भात सभागृहास माहिती दयावी. याचे टेंडर झालेले आहे का याबाबतीत सभागृला माहिती दयावी. तरी अधिका-यांनी महिती दयावी.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच बाबू नायर साहेबांनी ज्याप्रकारे सांगीतल आहे पर्यावरणावर आपण अहवाल प्रसिध्द करतो तरी या विषयाची सविस्तर माहिती दयावी. माहिती दिल्यानंतर आम्हांला बोलू दयाव. कारण की हा महत्वाचा विषय आहे. प्रेझेंटेशन पुर्ण दया व त्याच्यानंतर आम्हांला बोलू दयाव.

**मा.मीनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाच आम्ही स्वागतच करतो परंतु आम्ही आयुक्त साहेबांना, मा.महापौर साहेबांना एक सांगू इच्छिते की पालीकेच्या जागा या कोणाच्याही पर्सनल प्रॉपर्टी असल्यासारखे आपल्या पालीकेचे ठेकेदार वागतात. सगळयात प्रथम आपण त्यांच्यावर कारवाई केली गेली पाहीजे. पालीकेच्या वास्तू आपण बांधतो त्या बांधत असताना हे पालीकेचे ठेकेदार जो राडारोडा आहे तो कुठल्याही भागात, कुठेही ऊठसुठ टाकतात. स्मार्ट सिटीकड आपण जात असताना शहराच जे वाईट विद्रूपीकरण होतं ते सर्वांत मोठ कारण म्हणजे पालीकेचे ठेकेदार. कारण माझ्या प्रभागामध्ये सगळयात मोठ वायसीएम सारख हॉस्पिटल होतं, तिथे जे काम चालू आहे, दोन वर्षापासून त्याचे ठेकेदार आहेत साठे म्हणून ते दोन वर्षापासून जे काम करतात मागील वर्षभर हॉस्पिटलचा जो राडारोडा आहे तो माझ्याच प्रभागात पालीकेचीच वास्तू आहे त्याच्या बाजूला त्याच्या बाजूला मोकळा प्लॉट आहे त्या ठिकाणी रात्रीच्या वेळेस तो राडारोडा तीथे आणून टाकला जातो. या संदर्भांत स्थापत्याचे अधिकारी जे आहेत त्यांना अंधारात ठेवल जात का त्यांच त्याकडे दुर्लक्ष केल जात, कारण रोज्चा जो राडारोडा आहे तो त्या भागामध्य टाकला जातो आणि मोठया प्रमाणावर टाकला जातो. आयुक्त साहेब याच्या आदिही मी तुम्हांला दोनवेळेस सांगीतलेल आहे परंतु त्याच्यावर तुम्ही काही कारवाई केलेली नाही. एवढ मोठया हॉस्पिटलच काम त्यांना दिलेलं आहे मग ती काय त्यांची स्वत:ची प्रायव्हेट प्रॉपर्टी झाली का उठसुठ राडारोडा टाकतात ही रोजची गोष्ट आहे. मी स्वतः किती वेळा ऑफिसवर बोलवलतर एकदाही ते ऑफिसवर आलेले नाहीत. माहिती देत नाहीत, हॉस्पिटलच काम कसं चालल आहे ते आम्हांला सांगत नाहीत. मी त्यांना विचारल किती टक्के काम झालेल आहे तर ते फक्त पुढच्या वर्षात काम होईल असं सांगतात. परंतु तसे चालणार नाही त्या हॉस्पिटल कित्ती काम चाललेल आहे कस कस काम चाललेले आहे या सगळयाची माहिती आम्हांला मिळालीच पाहीजे. ऐश्वर्यम बिल्डर्स, ऐश्वर्यम सोसायटी ६०० फ्लॅटची आमच्या प्रभागामध्ये सोसायटी आहे. तो बिल्डर्स त्याच्या शेजारी अजून एक मोठी स्किम चालू करतो आणि ती स्किम चालू झालेली आहे. त्याचाही राडारोडा आहे, त्याच्या शेजारी आपल्या पालीकेचा डीपी प्लॅन्ट आहे.

तीथ तो राडारोडा टाकला जातो जेणेकरुन वर्षात तीन वृक्षारोपण केलेलं आहे परंतु तो स्वतःची मालमत्ता असल्यासारख सगळा रोडारोडा आपल्या पालीकेच्या जागेवरती टाकला जातो. अशावेळेस प्रश्न येतो की पालीकेच्या अधिका-यांचही लक्ष नाही का. मी नम्रतेची विनंती करते की जे असे आपल्या पालीकेचे ठेकेदार आहेत त्यांना ब्लॅकलीस्टमध्ये टाका. त्यांना इतरत्र काम देतात ते बंद करायला सांगा त्यांना तुम्ही विचारा की तुम्ही केणत्या पध्दतीन राडारोडयाची विल्हेवाट लावणार आहेत, धन्यवाद.

**मा.संजय कुलकर्णी** (कार्य. अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये जो बांधकामाचा राडारोडा आहे त्यासाठी केंद्रशासनाच्या पर्यावरण, वन विभाग यांच मंत्रालयातल C & D Waste Management Rule मध्ये आपल्याला पॉलीसी फायनल करायची आहे. रुल्स तर आपल्याला कंपलसरी आहेत पण प्रत्येक महानगरपालिकेनी तीची पॉलीसी आणि टेंडर काढून त्यात जे रेट आलेले आहेत त्यानुसार आपल्या शहरापुरते जे रेट आहेत त्यासह अनधिकृतपणे जे इकडे तीकडे राडारोडा टाकातात त्यांच्यावर काय कारवाई करणार. याची प्रत्येक महानगरपालिकेनी त्यांची पॉलीसी निश्चित करुन त्याला जनरल बॉडीची मान्यता घ्यावी अशी प्रोव्हीजन आहे. त्या अंतर्गत आपण ही पॉलीसी स्टॅण्डींग कमिटीच्या मान्यतेनी जनरल बॉडी समोर ठेवलेली आहे. फक्त पॉलीसी आहे, पॉलीसीच प्रेझेंटेशन आहे त्यामध्ये काय प्रोव्हीजन आहे ते. पाच ते सात स्लाईड आहेत, त्यामध्ये प्रोव्हीजन्स आहेत.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू –** मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो. बीपीएमसी ऍक्टच्या अंतर्गत एखादी पॉलीसी स्टॅण्डींग कमिटीमध्ये मान्य झाल्यानंतर सभागृहाने पण मान्य कराव लागत त्याच्यानंतर ते टेंडर फ्लोट करायला पाहीजे होतं. या संदर्भात अधिका-यांनी खुलासा दयावा की या विषयावर सभागृहाने मान्यता दिल्याशिवाय याच टेंडर्स आलेल आहे का आणि झालेल असेलतर कधी झाल. त्याची पुर्ण माहीती सभागृहाला दण्यासाठी विनंती आहे.

**मा.संजय कुलकर्णी** (कार्य. अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याबाबतच बीओटी तत्वावर टेंडर नोटीस नं. ८/२०१७-१८ मध्ये झालेलं आहे. स्टॅण्डींग कमिटीला जो विषय ठेवला होता तो २८/२/२०१८ रोजी त्याला मान्यता मिळाली. त्याचा ठराव क्र. होता २३८३ जनरल बॉडीला यावेळी जागा दयायच्या संदर्भात विषय आपण ठेवला होता. तो ठराव नं. १८१ दि. २०/४/२०१८ ला तो मंजूर झाला होता. जे टेंडर आहे त्याना ती

जागा अलॉट करायची होती. बीओटीच्या ज्या कंडीशन्स आहेत त्या जीबीला दि. २०/४/२०१८ ला मंजूर झालेला आहे. त्यानंतर त्या कॉन्ट्रॅक्टरनी ॲग्रीमेंट करुन आपल्याकड सादर केलेलं आहे. यामध्ये पुर्ण शहरात जिथून राडारोड जनरेट होतो तीथून तो गोळा करुन उचलणे आणि तो प्रोसेसींग प्लान्ट वर देणे यासाठी स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार १३.५० पैसे पर किमी. पर टन हा रेट फायनल झालेला आहे. प्रोसेसींगसाठी जो प्लान्ट लागतो तो संपुर्ण त्यांनी स्वत:च्या खर्चाने तीथ बसवायचा आहे. आणि लगेच स्वत: इन्व्हेस्मेंट करायची आहे आणि त्याची कॉस्ट २८ करोड अशी आहे. त्यासाठी आपण त्यांना मोशी कचरा डेपो येथे चार एक्कर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये प्लॅन्टच काम चालू आहे. आपण आता या शहरातून पुर्ण राडारोड गोळा करण्याच काम चालू करणार आहेत. त्यासाठी आवश्यक ते डंपर किंवा जेसीबी ते लावून तयार झालेले आहे. या महीन्यापासून ते काम चालू करणार आहेत. प्रोसेसिंगसाठी पुर्ण प्लॅन्ट बसल्यानंतर प्रत्येक टनच्या प्रोसेसिंगसाठी २४५.६९ पै. एवढा पर टन आपण त्यांना प्रोसेसिंग चार्जेस देणार आहोत. कारण त्यांच्या यंत्रणेमार्फत ते प्रोसेसिंग करणार आहेत. पुर्ण प्लॅन्ट ते लावणार आहेत आणि आपण प्रोसेसिंग झाल्यानंतर पर टन २४५ रु. त्यांना देणार आहेत. यामध्ये एमएसडब्ल्यू रुल अंतर्गत C & D Waste Management Rule मध्ये कशा पध्दतीने प्रोसेस झाली पाहीजे ते दिलेली आहे. त्याबाबतचे सगळे रुल्स फायनल आहेत ते बंधनकारक आहेत. कॉलसेंटर त्यांनी करायच आहे. जेव्हा आपण बिल्डींग परमीशन देतो किंवा अनधिकृत बांधकाम तोडल गेल किंवा आपले कॉर्पोरेशनचे जे विकास काम आहेत त्यामध्ये जनरेट होणारा राडारोडा आहे त्यांनी त्या कॉल सेंटरवर टोल फ्रि नंबर असेल त्याला कॉन्टॅक्ट करायच किती राडारोडा आहे त्या पध्दतीने ते व्हेईकल पाठवतील आणि तो ते कलेक्ट करतील. बिल्डींग परमीशन झाल्यानंतर बिल्डींग परमीशनला ते कम्पलसरी राहील की तीथे एक युजर आयडी आणि पासवर्ड त्याला दिला जाईल आणि त्यांच जेवढ बिल्टप आहे त्या अंतर्गत तेवढे पैसे ॲडव्हान्स मध्ये बिल्डींग परमीशनच्यावेळी भरुन घेणार आहेत. त्या अंतर्गत तेवढा राडारोडा आल्यानंतर त्यातून ते मायनस होणार आहे. गाडया त्याच्या स्वत:च्या मालकीच्या असतील. कन्टेनर त्याच्या स्वत:च्या मालकीचे असतील. जेसीबी त्याचा स्वत:चे मालकीचा असेल. तो कुठून उचलणार कुठपर्यंत जाणार कि.मी. वगैरे ऑनलाईन सगळ रेकॉर्ड होईल आणि ती व्हेईकल कुठ धरली ते पण कळेल. तीथ आल्यानंतर प्रोसेसिंग जे होईल ते पण प्लॅन्ट आहे त्या प्लॅन्टचा प्रेझेंन्टेशन मध्ये दोन मिनीटाचा

व्हीडीओ पण आहे. हा प्लॅन्ट आता सध्या दिल्लीमध्ये चालू आहे, अहमदाबादमध्ये आता झालेला आहे, सुरतमध्ये त्याच टेंडर झालेल आहे आणि नवी मुंबईन आता केलेलं आहे आणि येथून पुढे हा कम्पलसरी आहे. राडारोडयाचा प्लॅन्ट कम्पलसरी करावा लागणार आहे.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता तुम्ही म्हणालात की बिल्डींग परमीशन देणार आहेत तीथला राडारोडा तो उचलणार आहेत पण जो नदीकाठी टाकलेला आहे त्याच करणार आहेत का.

**मा.संजय कुलकर्णी** (कार्य. अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण जर सांगीतल त्यांना हा उचला तर त्यांच उचलण्याच काम आहे. तो कुणी टाकला काय टाकला हे अगोदर आपल्याला ट्रेसआऊट करावा लागेल. त्यांच्याकडून तो दंड वसुल करावा लागेल. त्या दंडाच पण आपण या पॉलीसीमध्ये घेतलेल आहे. त्यांनी अनधिकृतपणे विदाऊट परमीशन टाकल असेलतर त्यांना आताचे जे रेटस आहेत त्याच्या दहापट दंड आकारायचा.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पण तो कोणी टाकला आहे हे माहित नसेलतर काय करायच.

**मा.संजय कुलकर्णी** (कार्य. अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यामध्ये ज्यांच्या प्रायव्हेट जागा, नदीच्या कडेला आहेत त्या जागा मालकांची जबाबदारी आहे की त्यांच्या जागेत ते नाही पडायला पाहीजे. तीथ जर राडारोडा पडला असेलतर आपण त्या जागा मालकाला जबाबदार धरणार आहेत आणि येथून पुढे पडू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावणार आहेत. यापुर्वी भरपूर राडारोडा पडलेला आहे पण येथून पुढे पडणा-या राडारोडयासाठी आपल्याला पॉलीसी फायनल करायची आहे. पॉलीसी फायनल झाल्या शिवाय आपल्याला त्यांच्यावर कारवाई करता येत नाही. प्रेझेंटेशन पाहीलेतर बरेचसे डाऊट क्लेअर होतील.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे आयुक्तांचे डॉकेट आहे विषय दुसरीकडे भरकटत जाऊ नये म्हणून मी विषयावर परत बोलतो. बीपीएमसी ऍक्ट नुसार पॉलीसीचा निर्णय घेण्याचा अधिकार जर सभागृहाला आणि स्थायी समितीला असेलतर त्याच्या अगोदर टेंडर फ्लोट होवू शकेल का आणि टेंडर फ्लोट करुन ते वर्क ऑर्डर देवू शकेल का. आता कुठल प्रेझेंटेशन देतात, पॉलीसी डिसीजनच्या वेळेस आम्हांला काही सुचना मांडायच्या असतील, सभागृहाच्या सदस्यांना याच्यावरती काही

सजेशन दयायचे असतीलतर ते तुम्ही गृहीत धरुन पुढे टेंडर फ्लोट करताय. या पध्दतीने कामकाज होत असेलतर कोण अधिकारी येथे रिस्पॉन्सीबल आहे त्याच्यावर कारवाई होणं गरजेच आहे. एखादा जर घरी नाही गेलातर हे चालणार नाही. सभागृहाला गृहीत धरु नका, सत्ताधारी असो किंवा विरोधी पक्षाचा असो. एखाद टेंडर जर फ्लोटस होत असेलतर ते सिरीएस मॅटर आहे. एखादया महापालिकेनी पॉलीसी डिसीजन केल नसेलतर आणि ते टेंडर जर फ्लोट होत असेलतर जे याला रिस्पॉन्सीबल अधिकारी आहेत ते घरी जायला पाहीजे असे ठाम मत आहे. याबाबतीत खुलासा आयुक्त साहेबांनी दयावा. मी स्वतः संजय कुलकर्णीकडे गेलो होतो परंतु उडवाउडवीचे उत्तर मिळाले. पक्षाच्या बैठकीमध्ये त्यांना बोलावल तेंव्हा पण उडवाउडवीचे उत्तर मिळाले. हे जर टेंडर एप्रिल- २०१८ मध्ये फ्लोट होवून जर ऑर्डर दिल असेलतर काय. या विषयाच्या संदर्भात आयुक्त साहेबांनी खुलासा दयावा.

**मा.संगीता (नानी) ताम्हाणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज स्पाईन रोड सारखा असा उत्तम रोड आहे पण तीथ जो राडारोडा टाकलेला आहे हे कोण टाकत आणि काय टाकत हे अजून आम्हांला समजलेल नाही. जो रोड करायचा राहीलेला आहे त्याठिकाणी दगड, मातीचे ढिग भरपूर प्रमाणात आहेत. राडारोडा कुणी टाकलेला आहे ते काही अजून आम्हांला माहिती झालेल नाही. स्पाईन रोडला राडारोडा आणून टाकतात प्रत्येकवेळेस तो मी उचलायला सांगते. एवढा सुशोभीत रोड करुन त्या रोडचा काही उपयोग नाही. तो रोड आता वापरण्या योग्य सुध्दा राहीला नाही एवढी बेकार परिस्थिती त्या रोडची केलेली आहे. माझी एवढीच विनंती आहे की एवढया चांगल्या रोडला तीथ ज्यांनी राडारोडा टाकलेला आहे तो कोण टाकत त्याची तुम्ही चौकशी करावी आणि तो राडारोडा तीथ न टाकता आता नवीन रोड झालेला आहे, तीथ मुल खेळतात अशा ठिकाणी राडारोडा टाकला असेलतर तो उचलण्यास सांगावा किंवा त्याची चौकशी करावी. एवढीच माझी विनंती आहे.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर हा विषय सगळया सदस्यांना समजणं गरजेच आहे. आताच आमचे सहकारी बाबू नायर यांनी विषय मांडलेला आहे त्याचा पहील्यांदा खुलासा करावा. तो खुलासा झाल्यानंतर पुढे आपण विषय घेवू. ही चर्चा भरकटण्यापेक्षा बाबू नायर यांनी जो खुलासा विचारलेला आहे तो करावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आताचा जो विषय चर्चेमध्ये आहे त्याच्यामध्ये काही क्लेरीफिकेशन सभागृहात अपेक्षीत आहेत ते मी आपल्या समोर सादर करतो आहे. शहरामध्ये एकंदरीत विवीध गृह प्रकल्प किंवा अन्य कुठलेही प्रकल्प ज्यावेळेला

स्थापन्न होतात, जुने घर किंवा कार्यालय, अस्थापना यांचा ज्यावेळेला पुर्नविकास होतो अथवा कुठलाही विकास प्रकल्प होत असतो मनपाच्या मार्फत असो किंवा अन्य कुठल्याही व्यक्तीच्या मार्फत असेल त्यावेळेला मोठया प्रमाणात राडारोडयाची निर्मीती शहरामध्ये होत असते. एमएसडब्ल्यू २०१६ रुल्स हे केंद्रशासनाकडन स्थापन्न करण्यात आलेले आहेत याच्या अनुषंगाने शहरात निर्माण होणा-या सर्व प्रकारच्या घनकच-याच व्यावस्थापन करणं हे आज कायदेशिर पध्दतीने बंधनकारक सर्व महानगरपालिका, नगरपालिका, मंडळे यांच्या सर्वच आस्थापनेवरती करण्यात आलेले आहे. एमएसडब्ल्यू २०१६ रुल्सचा एक भाग म्हणजे C & D Waste Rule 2016 हा आहे. म्हणजेच राडारोडयावरती प्रक्रीया करणं हा घनकचरा व्यावस्थापन प्रक्रीयेचाच एक भाग असल्याने त्याचेवर देखील प्रक्रीया करणे हे महानगरपालिकाना बंधनकारक करण्यात आलेले आहे आणि त्यामुळे या विषयाची जबाबदारी ही महानगरपालिकेची असल्यामुळे त्याची अंमलबजावणी महानगरपालिकेनी यापुर्वीच सन्मा.सभागृह, सन्मा.स्थायी समिती यांच्या मंजुरीने, पुर्वमान्यतेनीच सुरु केलेली आहे. त्यामुळे सभागृहाची पुर्वपरवानगी न घेता ही निवीदा प्रक्रीया केलेली नसून सभागृहाची मान्यता घेवूनच ही प्रक्रीया पुर्ण करण्यात आलेली आहे. यापुर्वी ठराव क्र.१८१ दि.२०/४/२०१८ अन्वये, सदर प्रक्रीया करण्यासाठी एमएमसी ऍक्टचे कलम ७२ ब नुसार एफओटी तत्वावरती ही संपुर्ण प्रक्रीया करण्याची असल्याने रितसर विषय सभागृहाच्या पटलावरती आणण्यात आलेला होता त्यावेळेला सभागृहामध्ये चर्चा हावून या विषयाला मंजूरी मिळालेली आहे. या संपुर्ण निवीदा प्रक्रीयेमध्ये कुठल्या प्रकारच्या अटी शर्ती त्याच्यामध्ये राहणार आहेत कुठल्या प्रकारे कच-याच संकलन होणार आहे, घनकच-यावरती प्रक्रीया करुन त्याचा निपटारा कसा होणार आहे, त्याला दयावयाच शुल्क या सर्व बाबीवरती मंजूरी घेतल्यानंतर निवीदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आलेली आहे. निवीदा प्रक्रीया पुर्ण केल्यानंतर सन्मा. स्थायी समितीकडन प्राप्त झालेल्या दराना देखील मान्यता घेण्यात आलेली आहे. सर्वाच्या समोर एक प्रश्न आहे की पॉलीसी निवीदा प्रक्रीया केल्याच्यानंतर का आणली त्याचा खुलासा मी आपल्यासमोर देत आहे. सध्या सादर केलेली पॉलीसी ही आपल्या इथे कचरा संकलनासाठी म्हणजे जो राडारोडा संकलीत होणार आहे याच्या संकलनासाठी कुठल्याही प्रकारचे दर अदयापपर्यंत निश्चित करण्यात आलेले नाहीत. त्याच्यासाठीचे कुठलेही बॉयलॉज आपल्या महानगरपालिकेच्या वतीने यापुर्वी कधीही तयार केलेले नाहीत आणि हे दर निश्चित करण्याचा अधिकार हा या सदनाचा असल्यामुळे ही पॉलीसी करुन आपण सभागृहाच्या समोर

आणलेली आहे. या सभागृहाकडन आता जी अपेक्षा आहे की हे दर निश्चित करत असताना जसे आता अनेकांनी प्रश्न विचारले की एखादा गृह प्रकल्प बांधकाम होत असेल किंवा नवीन कुठलही कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट येत असेल त्यांच्या राडारोडयाच काय करणार, कोण वहन करणार, कुठे वहन करणार प्रक्रीया कोण करणार, त्याच पेमेंट कस वसुल करणार किती पेमेंट होणार या सगळया बाबी आपण या पॉलीसीमध्ये नमुद केलेल्या आहेत. हे होत असतानाच जसं की आता एक प्रश्न ठेवला की नदीपात्रामध्ये पडलेला राडारोडा जर असेलतर त्याची जबाबदारी कोणावर ठेवणार. त्याची प्रॉपर वसुली असेल किंवा त्याच वहन करण्याच असेलतर हा सगळा निर्णय प्रक्रीया करण्यासाठी ही आपण आजची पॉलीसी तयार केलेली आहे. या पॉलीसीमध्ये अदयापही काही त्रुटी जर असतीलतर त्या आज सभागृहाला चर्चा करुन त्याच्यामध्ये अंतर्भाव त्याचा करता येवू शकेल. आजच्या स्थितीमध्ये आपण दोन कॅटॅगरीज या पॉलीसीमध्ये केलेल्या आहेत. पण जसं आता चर्चा केल्याप्रमाणे नदीपात्रामध्ये पडलेला जो काही भराव असेल आणि त्याचा अंतर्भाव या पॉलीसीमध्ये जर करायचा असेलतर तो देखील या पॉलीसीमध्ये करता येवू शकेल. पण सभागृहाची मान्यता घेतल्यानंतरच निवीदा प्रक्रीया पुर्ण केलेली आहे. निवीदा प्रक्रीया करण्याच्या मागची कारणमीमांसा करताना मी यापुर्वी म्हणल्याप्रमाणे कायदयाने आपल्याला महानगरपालिकेला हे काम बंधनकारक करण्यात आलेलं आहे. जशा पध्दतीन आपण कच-याच्या प्रोसेसिंगची निवीदा केली त्याच पध्दतीने ही प्रक्रीया देखील आपण पुर्ण केलेली आहे. आता पॉलीसीच्या माध्यमातून आपल्याला याच दर ठरवणं, वहन कसं करायच कुठल्या कच-याच कशा पध्दतीनं वहन करायचं ही पॉलीसी ठरवण्यासाठी आता विषय सभागृहासमोर आणलेला आहे. म्हणून निवेदन सादर.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपण जो आता खुलासा केला ते एकतर बीओटीवर आणले दि. २९/२/२०१८ ला येथे मान्यता दिली. आज तुम्ही जी पॉलीसी आणली, आज तुम्ही म्हणता तुमच्या याच्यामध्ये काही सुचना असतीलतर आपण त्याचा अंतर्भाव करु. ज्यावेळेस हे टेंडर आणल त्यावेळेस स्थायी समितीन त्याला मान्यता दिली. त्याच्या अगोदरच सभागृहा समोर हे आणायला पाहीजे होतं. असे विषय होत असताना कुठलीही गोष्ट जर तुम्हांला केंद्राकडन किंवा राज्याकडन आले असतीलतर आपण ती काहीही करुन सभागृहात आणली पाहीजे.

याच्यामध्ये मोनोपॉली व्हायला नको. ते उचलायचे दर, घेवून जायचे दर परत महापालिका २० टक्के काहीतरी आहे. म्हणजे कुठेतरी आपण मोनोपॉली करतोय असं नाही का होणार. टेंडरला नंतर मान्यता दिली असतीतर बरं झाल असतं. माझी अशी विनंती आहे की हा विषय करत असताना परत सभागृहाची सुचना घ्यायची असेलतर पुन्हा याच तुम्ही टेंडर करु शकणार का.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाच्या संदर्भात साहेबांनी सांगीतल २०१८ मध्ये सभागृहाची मान्यता घेतली. तुम्ही मला सांगा तुम्ही पर टनाला २४५.७० पै.हे दर तुम्ही फायनल केले. दहा टनाची गाडी मोशीमध्ये गेली म्हणजे २४५७ रु. त्याचे एका गाडीला झाले. समजा पिंपरी मधुन किंवा लांबून न्यायच म्हणलेतर त्याचे किलोमीटरप्रमाणे रेट वाढतील. आज नदीमध्ये जो राडारोड टाकला गेला, नदीच्या पात्रात राडारोडा, नदीच पात्र बारीक केलं. आता दोनवेळा पुरपरिस्थिती निर्माण झाली, आता हा नदीतला राडारोडा कोण उचलून नेणार व त्याचे पैसे कोण देणार. कुलकर्णी साहेबांनी चांगला शोध लावलाय, २८ कोटीची संस्था टेंडर घेते ती इन्व्हेस्टमेंट करणार आणि आपण डिस्पॅच करणार. ते वीट तयार करतील किंवा त्याचे ब्लॉकेज तयार करतील किंवा बाकीचे उदयोग. मग महापालिका त्याला याचे पैसे देणार तुम्ही २८ कोटीचा प्रोजेक्ट लावणार, आपण जागा देतो. मग हे महापालिकेला अगोदरच कळत नव्हतं की जर आपण हे डील केल आणि राडारोडा आपल्या माध्यमातून उचलला आज १९० हेक्टर मोशीमध्ये खाणी आहेत. तुम्हांला आता पर्यटनस्थळ तयार करायच आहे. साहेब, कुठलही धोरण आणत असताना त्याचा विचार करुन आणल असतंतर महापालिकेचा पण फायदा झाला असता. म्हणजे महापालिका क्षेत्रामध्ये राहणा-या लोकांचा. आता समजा २५ टक्के तुम्ही ती बिल्डर कडून भरुन घेणार समजा मी स्वत: बिल्डर आहे माझ्या बांधकामाचा राडारोडा आहे तो मी तीथच निर्मुलन करुन टाकलातर मला २५ टक्के तुम्ही भरायला लावणार, हे चुकीच धोरण आहे. संजय कुलकर्णी साहेबांनी नऊ वर्षात मला वाटत पहील्यांदा प्रेझेंटेशन करताना आम्हांला सगळया सदस्यांना वाटतय की अरे, हां पिक्चर चांगला आहे. ते ट्रेलरमध्येच आख्ख पिक्चर संपवून टाकतात. साहेब, नऊ वर्षे झाल ही व्यक्ती त्या पोस्टवरती आहे. ती पोस्ट त्यावेळेला सभागृहाने क्रिएट केली नऊ वर्षात या माणसाने खरच काही काम केल आहे का पर्यावरणासाठी. एकतरी काम केलेल यांनी दाखवाव. की हे काम मी केलेल आहे आणि याच्यामुळ पर्यावरण सुधारलेल आहे. आज २००६ पासून नदी सुधारचा प्रोजेक्ट तो शासनाकडे

गेला, साडेतीनशे कोटी आले आणि आता आपण बॉण्ड काढलेले आहेत. साहेब, हे शहर सुधारायच असेलतर आपल्याला अधिकारी चांगले पाहीजेत. ती क्रिएट केलेली जी पोस्ट आहेना तुम्ही आज मी सभागृहाला विनंती करतो की ती पोस्ट आपण खरच बरखस्त करुन चांगले अधिकारी आता तीथ निकम सह शहर अभियंता चांगल काम करतात. अशा माणसाच्या हातात हे सगळ जर प्रकरण दिलतर चांगल होईल. मागच्यावेळेला पण सांगीतल होत आयुबखान पठाण आपल्या इथन रिटायर्ड झालेले आहेत त्या माणसला जरी आपण मानधनावर नियुक्त केल आणि त्यांना पर्यावरणाच सांगीतलतर चांगल होईल. त्यांनी चिंचवडमध्ये त्याकाळात जे काम केल होत दहा पंधरा वर्षापुर्वी चिंचवडे ताईच्या वॉर्डमध्ये, चिंचवडे ताईपण सभागृहात आहेत, ताई त्यावेळेला त्यांनी चांगल काम केल होतनां. अशा माणसाकडून काम करुन घ्या की ज्यांची त्याच्यामध्ये स्पेशालीटी आहे. कोण पुस्तक वाचून परिक्षा देवून कोर्स पास झाले म्हणून त्या माणसाला त्यातली शंभर टक्के आक्कल येते असं काही नाही, आंगठेबहादुर पण माणुस हुशार असु शकतो. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, ते चौथी पास होते. त्यांनी पण त्यावेळेला चांगल काम केलनां. शिक्षणामध्ये काही नसतं माणसाला अनुभव आणि अभ्यास लागतो. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला विनंती करतो कुलकर्णी साहेबांनी जे आजपर्यंत नऊ वर्षात काम केलीत त्याची खातेनिहाय चौकशी लावा आणि हा विषय परत एकदा सभागृहापुढे मांडा, त्याच प्रेझेंटेशन व्यवस्थित ठेवा आणि त्याच्यानंतरच याला मंजूरी दया तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवा, एवढ बोलून थांबतो जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय आहे मुळात याच टेंडर झाल्यानंतर सभागृहात यायलाच नको होता परंतु आता विषय आणला आणि याला सभागृहाने मान्यता दिलीतर त्याला वर्क ऑर्डर देणार का. माझा हाच प्रश्न आहे तुम्ही चर्चा करणार ठिक आहे आणि आम्ही जर फेटाळला तर काय करणार. उदया तुम्ही पॉलीसी ठरवली ठिक आहे, उदया तो ठेकेदार तुमच्या पॉलीसी प्रमाणे नाही तयार झालातर आणि उदया कोर्टात गेलातर तुम्ही काय करणार.

**मा.संजय कुलकर्णी** (कार्य. अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह.आता जी पॉलीसी आणलेली आहे C & D Waste  बाबत त्याबाबतच प्रेझेंटेशन देण्यात येत आहे.

(C & D Waste बाबतच्या पॉलीसीच प्रेझेंटेशन देण्यात आलं व विषयपत्राचे वाचन केले)

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयामध्ये पॉलीसी डिसीजन जे आहे ते वेस्टच्या संदर्भात आहे. घनकचरा तुम्ही कसा कलेक्ट करणार आणि त्याचे दर निश्चित करण्यासाठी आपण ही पॉलीसी आणली. मला सांगा हा उलटा प्रवास कसा काय सुरु झाला. तुम्ही फॅक्टरी निर्माण केली, बीओटी तत्वावर ऑर्डर दिली आणि ज्याच्यासाठी रॉ-मटेरीअल लागत ते किती टन आहे या शहरामध्ये किती घनकचरा निर्माण होणार आहे. त्याच कॉस्ट काय आहे, त्याच ट्रान्सपोर्टेशन कॉस्ट काय होणार आहे आणि त्याच्यानंतर मॅन्युफॅक्चरींग कॉस्ट ठरतं. नवीन काही पॉलीसी तुम्ही निर्माण केली का. इथ फॅक्टरी निर्माण झालेली आहे त्याच दर ठरणार २५ टक्के आपल्याला मोफतलाल किंवा पीसीएमसीला देणार आहेत तुम्ही असा बीओटी तत्वावर आपल्याला फायदा होणार आहे. आता उलट झाल आहे आपल्याला रॉ मटेरीअलची कॉस्ट माहित नाही, त्याच ट्रान्सपोर्टेशनची कॉस्ट माहित नाही, त्याच प्रोडक्शन कॉस्ट माहित नाही. आणि ते फॅक्टरीला आपण टेंडर फ्लोट करुन त्यांना ऑर्डर दिलेलं आहे आणि जागा दिलेली आहे त्या जागेच काही मुल्यमापन होणार नाही का. ती कंपनी काही चॅरीटीवर सुरु करणार आहेत का. त्यांन मॅन्यूफॅक्चरींग करुन या शहराला काय फायदा होणार आहे. याबाबतीत पिंपरी चिंचवड महापालिकेचा खुलासा कुठेही  नाही. म्हणून या विषयाच्या संदर्भात आयुक्त साहेब माझी विनंती आहे सभागृहाच्या वतीने की कम्प्लेटली या विषयावर तुम्ही कॅलक्यूलेट करा आणि तो प्रोजेक्ट जर योग्य नसेलतर त्याबाबतीत पुर्नविचार करावा अशी मी विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर या विषयाच्या संदर्भामध्ये २००८ ला ज्यावेळेस टेंडर झाल, खारतर या विषयावर सभागृहामध्ये ज्यावेळेस चर्चा होते आणि ज्या पध्दतीन राडारोडा असेल किंवा पर्यावरण असेल सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना या तीव्र आहेत. एखादा विषय सभागृहात मांडत असताना, कुलकर्णी माझी तुम्हांला सूचना आहे त्या विषयावर सभागृहातील वातावरण गढूळ होईल अशा पध्दतीचे ज्यावेळेस विषय सभागृहामध्ये एखादया पॉलीसीच्या संदर्भामध्ये आपण आणतो त्यावेळेस सगळे पदाधिकारी, सगळे गटनेते यांच्या बरोबर कधी कधी चर्चा केली पाहीजे. म्हणजे आपण सहज सभागृहामध्ये विषय आणतो आणि सभागृहामध्ये विषय आणल्याच्यानंतर माझी मा.महापौर साहेब या निमीत्तान विनंती आहे कुणीतरी एका सदस्यांनी म्हणल परंतु माझ्या सारख्या पदाधिका-यांनी अशाप्रकारच वक्तव्य करु नये परंतु ही वस्तूस्थिती आहे. हे शहर खरतर पर्यावरण पुरक चांगल्या पध्दतीच झाल पाहीजे.

पर्यावरणाची दिशा चांगल्या पध्दतीने चालली पाहीजे. खरतर पर्यावरणाचे सभापती माझ्या शेजारी आहेत जे सभापती पर्यावरणाचे आहेत त्या सभापतींच्या बरोबर तरी आपण चर्चा करता का. ही वस्तुस्थिती आहे प्रशासनान आणलेला विषय मंजूर केला जातो अशाही प्रकारचा गृह कुलकर्णी तुम्हांला झाला की काय मला शंका वाटते. म्हणजे ही परिस्थिती आहे हे लक्षात ठेवा. त्यामुळे एखादा विषय सभागृहामध्ये आणत असताना या महापालिकेच्या सगळया पदाधिका-यांच्या बरोबर पॉलीसीच्या संदर्भामध्ये चर्चा केली त्याचे रेटस किती ठेवायचे, उचलायचा किती, कठून कुठ उचलायचा, कशा पध्दतीने न्यायचा आहे या सभागृहामध्ये आम्ही समजून घ्यायच खरतर अशा पध्दतीची भावना आहे. कुठलाही विषय प्रशासन सभागृहासमोर आणण्याची प्रक्रिया करते मग तो चुकीच्या पध्दतीचा विषय आहे की बरोबर आहे, एखादी पॉलीसी जर आपण धोरण ठरवायच म्हणजे संजय कुलकर्णीना या महापालिकेच धोरण ठरवण्याचा अधिकार कुणी दिलेला नाही. धोरण ठरविण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. अशा पध्दतीचे जे अधिकारी आहेत जे स्वतःला ओव्हरस्मार्ट समजतात. अशा पध्दतीच्या अधिका-यांवर आम्हांला पुढच्या काळामध्ये लक्ष ठेवाव लागेल की खरच चांगल काम करतात का. २००८ मध्ये अशाच पध्दतीची चर्चा झाली. या निमीत्तान माझी मा.महापौर साहेब आपणाला विनंती आहे की अशा पध्दतीच्या अधिका-यावर पण आपण नियंत्रण ठेवण्याची गरज आहे, आयुक्त साहेब तुम्हांला पण माझी विनंती आहे की जे जे विषय संजय कुलकर्णीच्या माध्यमातून या सभागृहात आणले जातात त्या विषयाचा साहेब आपण अभ्यास करावा. या विषयाच्या संदर्भामध्ये सर्व गट नेते असतील पदाधिकारी असतील यांच्या बरोबर चर्चा करुन याच्यामध्ये निश्चित धोरण आपण करु. कुठला रेट किती केला जातो त्याचा अभ्यास करायची संधी देवू मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की हा विषय तहकूब करुन पुढच्या विषयाला सुरवात करावी, धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला आश्चर्य वाटतय की पहील्यांदाच साक्षात्कार झाला पक्षनेत्यांना. या सभागृहात गटनेते आहेत या महापालिकेत नगरसेवक पण आहेत. आयुक्त साहेबांनी सांगीतल याला सभागृहाने मंजूरी दिली. ज्यावेळेस हे केलं त्यावेळेस आपण सभागृहाला कळवल नाही का. मला वाटत इथ कैलास पण आहे, सचिन पण आहे, नाना पण आहेत. कधी तुम्ही आम्हांला आजपर्यंत विश्वासात घेतलं तुम्ही आज लागले सांगायला. तहकूब करायचा असेलतर नंतर मांडवली करायची नाही. एकतर फेटाळून लावा, आज तहकूब करुन नंतर मांडवली करत बसणार का तुम्ही, हे चालणार नाही,

एकतर मंजूर करा नाहीतर तहकूब करा. म्हणजे जस येईल तस वागायच जस करेल तस करायच, कोण मालक नसल्यासारख. आज तुमचे पण सगळे सदस्य बोलतात. सगळया पक्षाचे नगरसेवक याठिकाणी बोलतात, का बोलतात. आता कंट्रोल सुटलाना सगळयांना कळायला लागल काय चालल ते. इथ सभापती आहेत, मुंढे ताई तुम्हांला घेतल का विश्वासात. हा तुमचा अहवाल आहे, आहे का याच्यावर चेअरमनचा फोटो. काय चालल आणि कोण करतय, कशासाठी चालल हे. मी आडीच वर्षापासून सांगतो फक्त ठेके काढायला महापालिका नाही. मी पण स्टॅण्डींगमध्ये आहे मी पण सगळ पाहतो. परंतु हे करत असताना आज सगळे बोलायला लागले म्हणून तुम्हांला, पक्षनेत्यांना साक्षात्कार झाला अस आता वाटायला लागल आहे. इतके दिवस आम्ही सगळे बोलत होतो आम्ही नगरसेवक नव्हतो. आज स्वत:च्या पक्षाचे नगरसेवक बोलायला लागले, का नाही बोलायच त्यांनी पण. त्यांना पण मतदार संघात नागरीकांना सांगायच आहे ना की आम्ही काय आडीच वर्षात दिवे लावले ते आणि पुढच्या आडीच वर्षात आम्ही काय दिवे लागवणार आहेत. मी त्यादिवशी स्टॅण्डींगला आल्यानंतरही आयुक्त साहेबांना विचारलतर आयुक्त साहेब दिल्लीला होते, ज्यादिवशी हा विषय स्टॅण्डींगला आला त्या दिवशी. माझी मा.महापौर साहेब तुम्हांला विनंती आहे विषय तहकूब करायचा नाही आणि तहकूब करायचा असेलतर सरळ दप्तरी दाखल करुन टाका. परत विषय सभागृहात आला नाही पाहीजे. जाऊ दया त्या ठेकेदाराला कोर्टात जाऊ देत त्यांनी कोर्टाकडन ऑर्डर आणू देत. आता तुम्ही ॲग्रीमेंट करुन दिलय सगळ करुन दिलय. माझा वॉर्ड आहे, माझा राडारोडा आहे, माझ्याकड जागा आहे कशाला येवू तुमच्याकड मी. आज सर्वसामान्य माणसाची बिल्डींग पाडायची म्हणलनातर राडारोडा पण विकत घेतात. इथ आम्ही तुम्हांला चार्ज देवून विकत घेणार का. म्हणजे पॉलीसी करताना किती अभ्यास केला पाहीजे. तुम्ही या सगळयाशी चर्चा करानां. हे वाचलनातर इथच सगळया प्रश्नांची उत्तर आहेत. दुसर काहीच करायची गरज नाही. तुम्ही पहीलच वाक्य बघा, बांधकाम व्यवसायाचा वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. मग आता तीन वर्षात बांधकाम क्षेत्र खाली आलं. सगळ लिहील आहे याच्यात, भारत देशातील बांधकाम व्यवसायाचा वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. पुढील वर्षात ते अजून वाढतील. बरं झाल आम्हांला पण कळाल मंदी देशात आहे पिंपरी चिंचवड महापालिकत नाही. आहो, उद्धाटन झालेल कळत नाही, की बस आणली, पावणेनऊच उद्धाटन १७ ऑगष्टच आम्ही नऊला आलोतर संपल. कधी कधी आपण दोन दोन, चार चार दिवस लेट करतो, घेत नाहीत. आम्ही पण तुमच्या बरोबर आहेतनां. मा.महापौर

साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की हा विषय तहकूब केलातर परत सभागृहात नाही आला पाहीजे. नाहीतर तो तहकूब करणार चार दोन दिवसानी परत येणार यांची मनधरणी होणार परत सभागृहात येणार हे असं नाही चालणार, धन्यवाद.

**मा.उपमहापौर –** विषय क्रमांक ३ कच-या संदर्भात आणि पर्यावरण संदर्भात मिनलताई यादव, बाबू नायर, ताम्हाणेताई, नाना काटे, संदिपभाऊ वाघेरे, पक्षनेते सर्वाच्या बोलण्यातून एकच गोष्ट बाहेर येते या विषयामध्ये चुकीच्या दृष्टिने टेंडरींग झाल आहे. या संदर्भात आयुक्त खुलासा करतील.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आता C & D Waste च्या पॉलीसी संदर्भामध्ये चर्चा सुरु आहे आणि काही महत्वाचे प्रश्न या संबंधाने पुढे आलेले आहेत. पुनश्च मी सभागृहाच्या समोर काही बाबी उद्दक करु इच्छतो. C & D Waste अंतर्गत काही बाबी सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणजे महानगरपालिका आपल्या बाबतीमध्ये आणि मनपाचे जे कंत्राटदार हे अंमलबजावणी करतील किंवा स्वतः मनपा अंमलबजावणी करणार असेलतर स्वतः मनपा यांनी करावयाच्या काही जबाबदा-या मुळ एमएसडब्ल्यू २०१६ रुल्स मध्ये नमुद आहे. या जबाबदा-या मध्ये पुढील जबाबदा-यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. महत्वाची जबाबदारी अशी आहे की शहरात निर्माण होणा-या एकंदरीत राडारोडयाच स्वरुप आणि त्याच प्रमाण किती असणार आहे याचा एक अंदाज तयार करण. त्या अंदाजानुसार या राडारोडयाच जागच्या जागी म्हणजे जिथ निर्माण होतो तीथेच जर तो निचरा करणे शक्य असेलतर तेही होवू शकतो आणि जो तीथे निचरा होवू शकत नाही असा राडारोडा कुठे वहन करायचा, कशा पध्दतीने वहन करायचा आणि तो त्याठिकाणी वहन केल्यानंतर त्याचा पुनर्वापर करायचा असेलतर पुनर्वापर कसा करायचा याच्या अनुषंगाने नियमावली निश्चित केलेली आहे. आपण या नियमावलीला बांधील असल्याने या नियमावलीन काम करणं आपल्याला अपेक्षीत आहे. केंद्रशासनान जी नियमावली केलेली आहे त्याच्यामध्ये आतापर्यंत केवळ आपण डंपींग म्हणजे जो काही राडारोडा तयार होतो तो कुठेना कुठेतरी वहन करुन डंप करणे एवढयाच तत्वाचा अवंलब आजपर्यंत करत आलेलो आहोत आणि त्याचाच परिणाम म्हणून अनेक ठिकाणी खोलगट भाग असतीलतर खोलगट भाग भरुन घेणं हा एक भाग झाला. पण ज्या ठिकाणी खोलगट भाग नाही अशा ठिकाणी मात्र तुंम्हांला उपलब्ध जागा ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी त्याचा भराव घालताना आपल्याला दिसून आलेलं आहे आणि त्यामुळे अनेक वर्षापासून जर आपण पाहीलतर नदीपात्र किंवा जुन्या खानी आणि ज्याठिकाणी या दोन्ही

उपलब्ध नसतील त्याठिकाणी मोकळे प्लॉट याठिकाणी सगळया प्रकारचा राडारोडा डंप होताना दिसतो आहे. यामुळेच जबाबदारी आपल्यावर असल्यान याची विल्हेवाट लावण हे आपल्या सर्वासाठी बंधनकारक आहे. त्यामुळे ही विल्हेवाट कशी लावयाची याच शास्त्रोक्त पध्दतीन जी गोष्ट सांगीतलेली आहे तीच पध्दती आपण अवलंबून संपुर्ण निवीदा प्रक्रीया आपल्या सर्वाच्या अनुमतीन आपण पुर्ण केलेली आहे. ही संपुर्ण प्रक्रीया डीबीएफओटीन करावी का स्वतः राबवावी या निर्णयासाठी आपण सभागृहासमोर आलेलो होतो. जर डीबीएफओटी वर करायच असेलतर त्याच्या अटी-शर्ती काय राहतील या सर्व बाबींसगट आपण सभागृहाची मान्यता घेतल्यानंतर ते दर आले. त्याच योग्य पध्दतीन विश्लेषण करुन ते दर कसे योग्य आहेत, वाजवी आहेत याची पडताळणी केल्यानंतरच स्थायी समितीची मान्यता घेवून ही निवीदा अंतीम केली. एक विषय जो आता चर्चा केली जाती की ही पॉलीसी आदि का नाही आणली आणि नंतर का आणली, दर निश्चित करायला तुम्ही निवीदेच्या आदि का आलात. याच्याबाबतीत मी एकच खुलासा करु इच्छितो, निश्चितपणे आपण ही पॉलीसी आदि आणायला हावी होती आणि तीच बाब रास्त राहीली असती. मात्र पुर्वपिठाका जर संपूर्ण देशातली लक्षात घेतलीतर या स्वरुपाची ज्यावेळेला आपण निवीदा प्रक्रीया सुरु केली त्यावेळेला देशामध्ये केवळ दिल्लीचा एकमेव प्रकल्प आपल्या पाहणीमध्ये होता. त्याची पाहणी आपण केली आपल्या टिमने केली त्याचा अनुभव अन्य ठिकाणी कुठे नसल्याने आपल्याला याची कल्पना नव्हती की आपल्या इथे ज्यावेळेला निवीदा प्रक्रीया केली जाईल त्यावेळेला कशाप्रकारचा रिस्पॉन्स आपल्या निवीदेला राहणार आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की ही निवीदा प्रक्रीया करत असताना जर आपण डीएसआर रेट, नॉर्मल पीडब्ल्यूडीमध्ये देखील राडारोडा तयार होतो त्याचा वहनाचा दर काय असतो याची जर आपण पडताळणी केलीतर डिएसआर रेट खुप वेगळे आहेत आणि खुप जास्त आहे. आणि त्यामुळे त्या पध्दतीने जर आपण खर्च गृहीत धरला असतातर आपल्याला त्या पध्दतीन कधीही न परवडणारी गोष्ट राहीली असती. आणि त्यामुळे जोपर्यंत निर्माण होणा-या राडारोडयावरती पुर्नप्रक्रीया करुन तो पुर्नवापरामध्ये आणला जात नाही, कारण हा जो संपुर्ण राडारोडा आहे त्याच जे कंपोजीशन आहे हे जर आपण पाहीलतर ज्याच्यामध्ये सिमेंट आहे, काँक्रीटेड काही भाग त्याचा तुकडा केलेला आहे, वीटकर आहे, दगडाचा काही भाग आहे, मुरुमाचा काही भाग आहे, मातीचा काही भाग आहे आणि इतर चिखलाचा काही भाग आहे. या सगळयाचाच वेगळया पध्दतीने जर आपण पुर्नवापर करायचे ठरवलेतर त्याच्यापासून पुर्नवापर

करण्यायोग्य जस  पेव्हींग ब्लॉक, स्टोन अशा स्वरुपाच्या गोष्टी पुर्ननिर्माण होवू शकतात की ज्या आपल्या विकासाच्या प्रक्रीयेमध्येच वापरण्यात येवू शकतील. हेच बाबी जर आपण नुसते डम्प करीत गेलोतर आता शहरात निर्माण होणा-या राडयारोडयाचे जर आपण प्रमाण पाहीलतर आपल्याला कधीही या जागा पुरेशा पडणार नाहीत. खोलगट जागा पुरेशा पडणार नाहीत आणि शेवटी नदीचा आज पर्यावरणीय –हास होतो आहे तो निरंतर पणे आबाधीत पणे नदी पुर्णपणे नष्ट होईल, सगळे नाले नष्ट होतील आणि त्या पध्दतीपर्यंत तो चालू राहील. याच्यावरती आपण नियंत्रण ठेवण गरजेच आहे आणि ही आपली भूमीका आहे आणि हे नियंत्रण ठेवण्यासाठी आपण कितीही पथक निर्माण केलीतरी तीथ आपण कमी पडतोच. याच्यामध्ये आपण सुधारणा करतो आहोत त्याठिकाणी आपल्याला अधिकाधिक पथक निर्माण करावे लागतील आणि त्यातूनच आपल्याला पर्यावरणाचा होणारा –हास रोखता येणार आहे. पण ही जर प्रक्रीया आपण रितसर कायदेशिर पध्दतीने जर करत असूतर त्याच्यासाठी जे काही मुल्य येणार आहे ते निवीदा प्रक्रीयातन निश्चित केल्यानंतरच आज आपण दर ठरवण्यासाठी आणि त्याची पॉलीसी ठरविण्यासाठी सभागृहासमोर आलो आहोत. निश्चितपणे आपल्या मनात जो संदेह आहे तोच संदेह प्रशासनाच्या समोर देखील आहे आणि म्हणूनच सभागृहात चर्चेसाठी हा विषय आहे. याच्यामध्ये महत्वाचे जे दोन घटक आहेत ते खुप सोपे आहेत  की जे कंत्राटदार पीडब्ल्यूडीचे असतील किंवा आपल्या महानगरपालिकेचे असतील, पाणीपुरवठयाचे असतील की जे काम करतात त्यांच्यामधन निर्माण होणारा राडारोडा आहे हा आपल्याला वहन करायचा आहे ही आपली जबाबदारी आहे आणि त्याच्यावरती सोल्यूशन काढण हे आम्हांला निश्चित शक्य आहे. दुसरा जो घटक आहे तीथ जो प्रकल्प निर्माण करतात जे प्रायव्हेट डेव्हलपमेंटच्या माध्यमातून जो राडारोडा निर्माण होतो त्याच काय करायच ही देखील हॅण्डल करण्यासारखी गोष्ट आहे. मात्र तीसरा भाग आहे की जो आज अस्तित्वात असलेल्या नदीच्या पात्रामध्ये जर राडारोडा पडला असेलतर तो जर काढून आपल्याला नदी पुर्नजीवीत करायची वेळ आलीतर त्याच्यासाठी खर्च कोणी बेअर करायचा. कारण त्याच्यावरती वहनाचा खर्च आहे तो वहनाचा खर्च घ्यायचा की नाही का त्याच्यामध्ये काही सुधारणा करायच्या, त्याच्यामध्ये दंडात्मक कारवाई कोणावर करायची, जबाबदारी कोणावर निश्चित करायची कारण पुर्वी पडलेला कचरा आहे मुळ मालकावर जबाबदारी निश्चित करताना त्याच्यामध्ये आपल्याकडे पुरावे नसतीलतर पुराव्यांअभावी त्याच्यावरती कारवाई करुनही तो त्याच्यामधुन सुटणार आहे आणि यामुळे पॉलीसी आपल्याला निश्चित करावी

लागेल. जर हे शुल्क आपण ज्याच्याकडे कचरा निर्माण होतो आहे, राडारोडा निर्माण होतो आहे त्या नागरीकांवर त्या उत्पादकांवरती जर नाही टाकला तो कदाचित महानगरपालिकेला बेअर करावा लागेल आणि जर महानगरपालिकेनी तो बेअर केला नाहीतर, तो घनकचरा आपण उचलला नाहीतर तो त्यांच्यावरच सोडला तुम्ही कुठे टाकायचा आहेतर जिकडे मोकळा प्लॉट मिळेल, जिकडे जागा मिळेल त्याठिकाणी तो डिस्पोज करत राहतील व ही प्रक्रीया निरंतर चालू राहील. त्यामुळे शेवटी आपल्या सभागृहाची जी आवश्यकता आहे ते आपणच शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे. आज आपण निवीदा प्रक्रीया आदि पुर्ण केलेली असल्याने आपल्याला खर्च किती येतो हे निश्चिपणे माहिती आहे आणि हा निश्चितपणे माहिती असलेला खर्चच आपण वसुल करण्याच प्रस्तावित करतो आहोत. आपण याच्यामध्ये सुट दयायची असेलतर ते धरु शकतो. त्याच्यावर जास्त घ्यायचा असेल आणि येणारा जो काही पैसा महापालिकेकडे वाचेल त्याच्या माध्यमातून जो राडारोडा पडलेला आहे तो जर वहनासाठी करायचा असेलतर तो निर्णय आपण घेवू शकतो. या पध्दतीचा निर्णय घेण्यासाठीच विषय सभागृहाच्या पटलावरती आता आणलेला आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की अत्यंत महत्वाचा विषय आहे, पर्यावरणाच्या रक्षणासाठी अत्यंत आवश्यक असा विषय आहे. विभागाकडन सर्व सदस्यांना विश्वासात घेण्यामध्ये जर काही चुक राहीली असेलतर निश्चितपणे विभागाची ती चुक आहे आणि त्याबद्दल विभागप्रमुख या नात्यान संजय कुलकर्णी यांना मी समज देतो. जर ते त्याच्यात कुठे दोषी आढळलेतर त्यांच्यावरती तशी कारवाईची तजवीज देखील ठेवतो. तथापि सभागृहाने या वरती योग्य पध्दतीने ऊहापोह विचार करुन जे काही निश्चिती करायची असेल, जे काही अशा केसेस आहेत की आपल्याला त्याच्यामध्ये आज सांगता येत नाही की पुर्वी पडलेला राडारोडा कोणी टाकलेला आहे आजही उचलायची वेळ आलीतर तो कशा पध्दतीने उचलावा, त्याच्यासाठी लागणारा दर कोणी दयावा, कसा दयावा, कसा रिकव्हर करावा याचा निर्णय सभागृहाने दयावा जेणेकरुन चांगल्या प्रकारचा एक प्रकल्प आपण या शहरामध्ये राबवू शकतो, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर आयुक्त साहेबांनी पहील्याच स्पष्टीकरणामध्ये हे स्पष्टीकरण दिल असतंतर बर झाल असत, या संदर्भामध्ये कशा पध्दतीने ठरवायच, पॉलीसी चांगल्या पध्दतीने होण्यासाठी थोडासा वेळ लागू शकेल. त्यामुळ पुढच्या जीबी पर्यंत हा विषय गेलातर मला वाटत नाही की अडचण

होईल. त्यामुळे मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उपमहापौर-** या विषयावर बरीचशी चर्चा झाली आणि आयुक्तांनी पण स्पष्टीकरण दिल आहे. या विषया संदर्भात आपण सर्वजण, शहरातले सर्वच नगरसेवक अभ्यासू आहेत त्याबद्दल कुठली शंका नाही. परंतु येथून पुढे कुठल्याप्रकारच असो म्हणजे कच-याच्या संदर्भात असो, रस्त्याच्या किंवा पाण्याच्या संदर्भात आता यातून एक गोष्ट बाहेर आलेली आहे ती म्हणजे सर्वांना विश्वासात न घेता किंवा सर्वांना त्या गोष्टीची माहिती नसते आणि विषय मंजूर केले जातात किंवा सभागृहाच्या पुढे येतात तरी येथून पुढे त्याची पध्दत बदलण्यात यावी आणि चुकीच्या पध्दतीने जर कुठल्या गोष्टी होत आहेत असं जर सन्मा.नगरसेवकांना वाटत असेलतर सर्वांनी आपआपल्या गटनेत्यांकड त्याची तक्रार करुन सर्व गटनेत्यांनी एकत्रीत येवून त्याच्या संदर्भात एक बैठक घेवून त्या बाबतीतला निर्णय घेण्यात यावा. मागच्या पंधरा दिवसापुर्वी मी गुजरात मध्ये जावुन आलो होतो. देसाई म्हणून एक व्यक्ती तीथे कार्यरत आहे, सायकलमॅन म्हणून त्याची ओळख आहे. वेस्ट पासून बेस्ट हे बनवण्याच काम त्यांच गुजरातमध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने चालू आहे. आपल्यालाही वेगवेगळया गोष्टीची माहिती आपल्या सगळयाना असते. ती मांडण्याची संधी सर्वांनाच मिळत नाही. म्हणून आपले चांगले विचार आपल्या शहरासाठी उपयोगी ठरत नाहीत. अशा ब-याचशा गोष्टी आपल्या सभागृहात कशा आणता येतील याचा विचार पुढच्या काळात करुन सगळयांनी एकत्रीत काम करण्याची गरज आहे आणि पर्यावरणासंदर्भात कुलकर्णींचं काम निश्चितच समाधानकारक नाही. नदी नाले असतील शहरामध्ये विवीध ठिकाणी काम चालू आहेत त्याकडे त्यांचे पुर्णपणे दुर्लक्ष होतय. त्यांची रितसर चौकशी करुन त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी असे मी आयुक्तांना आदेश देतो आणि सदरचा विषय तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ४२९ विषय क्रमांक- ३

दिनांक – ७/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९ दि.२९/०५/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५१
दि.१२/०६/२०१९

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.उपमहापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ४

दिनांक – ७/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.पापु/बक्षेका/कावि/३०/२०१९ दि.०६/०६/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५६
दि.१२/०६/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे JNNURM अंतर्गत पवना धरणातून से.क्र.२३, जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत थेट पाईपलाईनने पाणी आणणे या प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. या कामास मनपा हद्दीबाहेर पवना धरणग्रस्तांनी, स्थानिक शेतक-यांनी, तसेच भारतीय किसान संघ व इतर यांनी मोठ्या प्रमाणात विरोध केलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने दि.१९/१०/२०१० रोजी सदर जनहित याचिका फेटाळली होती. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, भारतीय किसान संघ व इतर यांनी, मा.मुख्य अभियंता तथा मा.प्राथमिक विवाद निवारण अधिकारी यांनी दि.२७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाचे विरोधात, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांचेकडे अपिल केले होते. सदर अपिलाची सुनावणी होऊन, MWRRA ने

दि.१६।०५।२०१२ रोजी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार काही निर्देश देऊन पवना धरणातुन थेट पाईपलाईन प्रकल्प राबविणेस मान्यता देऊन, भारतीय किसान संघ व इतर यांचे अपिल फेटाळले आहे. पवना थेट पाईपलाईनचे काम तत्कालीन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे आदेशानुसार जैसे थे परिस्थितीत आहे. त्यामुळे अद्यापही पवना थेट पाईपलाईनचे काम बंद आहे. यासाठी मनपा तर्फे काम चालू करणेबाबत वारंवार पाठपुरावा करणेत आलेला आहे. याबाबत मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०१/२०१९ व ०४/०२/२०१९ रोजी बैठक झाली आहे. सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वरच्या भागातील (Up Stream) सिंचनासाठी तसेच बिगर सिंचनासाठी थेट पाईपलाईनने पाणी पुरवठा करणेकामीच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल जलसंपदा विभागाने करावा. तसेच सदर प्रकल्पाचा खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने करावा असे निर्देश देणेत आले आहेत. (याबाबत मा.कक्ष अधिकारी यांचे कडील पत्र क्र.ममुंस/प्रशासन कक्ष/पत्र, जा.क्र.५७/२०१९ दि.११/२/२०१९ व मा.मुख्यामंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.४/२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचा अहवाल इतिवृत्तांताचे अवलोकन होणेकामी सादर.) त्यास अनुसरुन उप कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.खपावि/प्रशा-३/२९८७/२०१९ दि.३०/४/२०१९ “सदर प्रकल्पाची मा.मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी दि.३०/०१/२०१९ व ०४/०२/२०१९ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये पवना प्रकल्प सिंचन क्षेत्रास बंदीस्त पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करणेबाबत दिलेल्या सुचनेनुसार सदर प्रकल्पाची अंदाजित एकूण किंमत कळण्यासाठी व त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण, संकलन, अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे गरजेचे आहे” असे कळवून या कामीचा खर्च र.रु.७९.३० लक्ष निधीची तरतूद करणेकामी विंनती केलेली आहे. मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांचे बैठकीतील निर्देशांप्रमाणे तसेच उप कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, यांचे मागणीस अनुसरुन प्रथमत: सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी र.रु.७९.३० लाखाच्या रकमेची तरतूद असणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकातील पानांक ५०७, अनु.क्र.६/१ नुसार असलेल्या, “पवना धरणातून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे,” या कामाच्या तरतूदीमधून विषयांकीत कामाचा खर्च करता येईल. तसेच, सदरचा प्रकल्प महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर आहे. सबब,सदर कामासाठी रक्कम रू.७९.३० लक्ष जलसंपदा विभागास देणेसाठी मा. महापालिका सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. तरी पवना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये पाईपलाईनद्वारे सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणीपुरवठा करणेच्या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण, संकलन, अंदाजपत्रक

तयार करणे या कामी येणा-या खर्चास र.रु.७९.३० लाखास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच सदरचे काम हद्दीबाहेर असलेने मा. महापालिका सभेची मान्यता मिळणेसाठी तसेच, सदरची रक्कम जलसंपदा विभागास देण्यासाठी सन २०१९-२० या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील,' पाणीपुरवठा टप्पा-१' या लेखाशिर्षांतर्गत, "पवना धरणातून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे," या कामाच्या तरतूदीमधून (अंदाजपत्रकातील पानांक ५०७, अनु.क्र.६/१, र.रू.३२०.४६ कोटी) सदर कामापोटी र.रु.७९.३० लक्ष अदा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सन २०१९-२० च्या मुळ अंदाजपत्रकात खालील कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरच्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| **अनु.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय लेखाशिर्षक** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **सन २०१९-२० ची एकूण आवश्यक तरतूद** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ मधील रावेत औंध पुलाजवळील रस्त्यावर ग्रेड सेपरेटर बांधणे. | विशेष योजना | २५०००००० | ० |
| २ | प्रभाग क्र.१६ मधील रावेत भागातील स.नं. १०३ ते १४७ पर्यंतचा २४.०० मी डी.पी रस्ता, सदर रस्त्याला जोडणारे १८.०० मी , १२.००मी डी.पी व इतर रस्ते विकसित करणे. | विशेष योजना | ३५०००००० | ० |

तरी वरील नमुद केलेप्रमाणे सन २०१९-२० च्या मुळ अंदाजपत्रकात समावेश होणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणेसाठी शासन पत्र क्र.बिसिआ २०१८/(३९१/१८) सि.व्य.(धो), दि.२४/१०/२०१८ नुसार आंद्रा धरणात १०० एम.एल.डी. पाण्याचे आरक्षण मंजूर असून सदर पाणी देहू बंधारा येथून उचलणेस मंजूरी मिळालेली आहे. सदर योजना राबविणेसाठी देहू बंधा-याच्या बाजूला जॅकवेल पंप हाऊससाठी एक एकर जागा आवश्यक आहे. सदर जागा म.न.पा. हद्दीबाहेर आहे. सदर प्रकल्प राबविणेसाठी या ठिकाणी जागेची आवश्यकता लक्षात घेता सदर बंधा-याच्या बाजूची सर्वे नं.९८/३ येथील योग्य जागा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागामधील खालील नमुद कामासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कम कमी असुन सदरच्या रकमेमध्ये प्रशासकीय मान्यता मिळणेकामी वाढ करणे आवश्यक आहे. सबब खालील नमुद कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्षक | पान क्र | अनु क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १८ मधील मोरया हॉस्पीटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणे | विशेष योजना | ४९ | ३७ | ३००००००० | २०००००००० | |
| २ | सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती (स्वच्छ भारत अभियान) | स्वच्छ भारत अभियान | ५१३ | १७-३ | ० | ७५०००००० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण | | | ३००००००० | २७५०००००० | |

वरील नमुद कामासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका "ब" क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विशेष योजना लेखाशिर्षा मधील मनपाचे सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामधील पान क्र.४८, अ.क्र.१३ वरील "प्रभाग क्र.१८ मध्ये चापेकर चौकात पादचा-यांसाठी भुयारी मार्ग विकसीत करणे" हे काम प्रस्तावित करणेत आले होते. सदरचे कामाचे ठिकाण वाहतुक तसेच चौकामधील सेवावाहीन्यांचे जाळे, यामुळे करता येणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदरचे ठिकाण वाहतुकीचे योग्य पध्दतीने नियोजन करुन पादच्या-यांसाठी चौकातील रस्ता ओलांडणे तसेच पादचा-याना जा-ये करणे सुकर होईल या पध्दतीने अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार काम करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त नमुद कामाचे नावात बदल करुन त्याकामाची प्रशासकीय मान्यता देणेत यावी व सन २०१९-२० मधील तरतुद या मधून काम केल्यास मुळ कामाचे प्रस्तावानुसार काम करणे शक्य होईल. त्यामुळे मनपाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षावरील पान क्र. ४८, अ.क्र. १३ चे नावा मध्ये "प्रभाग क्र.१८ मध्ये चापेकर चौक ते मोरया हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणे" असा बदल करुन त्याकामाची प्रशासकीय मान्यता व तरतुद वापरणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिकेमध्ये प्र.क्र. १८ मधील चिंचवडगाव येथे मनपा मार्फत विकास आराखड्यातील ९ मी. ते १८ मी. पर्यंत रूंदीचे रस्ते विकसीत करणेचे काम हाती घेणेत आली आहेत. सदर रस्त्याने बाधीत जागा अद्यापी पुर्णतः मनपाचे ताब्यात आली नसल्याने रस्ते विकसीत करणेकामी अडथळा येत आहे.

चिंचवडगाव येथील ९ मी ते १८ मी. रूंदीच्या डी.पी. रस्त्यांचे प्रयोजनाने बाधित जागा भूसंपादीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार रस्त्याची आवश्यकता व निकड लक्षात घेता रस्त्याने बाधीत जागा भुसंपादनाने ताब्यात घेणेबाबत मा. उपसंचालक नगररचना यांचेमार्फत

कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे. सदरचे भुसंपादन कार्यवाही सुरू करणेस मान्यता देणेत यावी.

त्यानुसार प्रभाग क्र १८ मधील डि.पी. रस्ते विकसीत करणेकामी रस्त्याने बाधीत जागा भुसंपादनाने ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी. तसेच खालील नमूद केलेल्या विकास कामांचा समावेश सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षकात करुन आवश्यक तरतूद मिळणेस मान्यता देणेत यावी.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतूद रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | थेरगाव येथील सर्व्हे नं. ०९ मधील नियोजित कॅन्सर हॉस्पीटल साठी बंकर व इतर अनुषंगिक कामे करणे. | १५००००००० | १०००००००० |

तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन आवश्यक तरतुदीस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१९-२० एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ मोशी येथील गट क्र. ६९१,६९२,६९३ येथील नाला बंदिस्त करुन रस्ता विकसित करणे | | | २००००००००० | ० | १०००००००० | ० | १०००००००० |
| २ | महापौर विकास निधी | ५० | १८ | ० | ५०००००००० | ० | १०००००००० | ४०००००००० |
| | एकुण | | | २००००००००० | ५०००००००० | १०००००००० | १०००००००० | ५०००००००० |

तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१९-२० एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १अ) | प्रभाग क्र. ३ च-होली येथील संत ज्ञानेश्वर महाराज यांचे भेटीवर आधारित समूहशिल्पच्या परिसरात संत ज्ञानेश्वर सृष्टी तयार करणे. | ५५ | १०६ | १००००००००० | १५००००००० | ० | ५०००००० | १०००००००० |
| ब | प्रभाग क्र. ३ च-होली येथील संत ज्ञानेश्वर व संत नामदेव महाराज यांचे भेटीवर आधारित समूहशिल्पच्या परिसरात संत ज्ञानेश्वर सृष्टी उभारणे करीता स्थापत्य विषयक कामे करणे. | | | १००००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| | एकुण | | | | १५००००००० | ५०००००० | ५०००००० | १५००००००० |

तसेच भोसरी परिसरातील मुलांची सोय होण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक शाळा भोसरी येथील इमारतीच्या परिसरात तात्पुरत्या पत्र्याच्या वर्ग खोल्या करणे व प्रभाग अंतर्गत स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. प्रस्तुत काम स.न. १ मधील खेळाचे मैदानासाठी प्रेक्षक गॅलरी उभारणे (निविदा क्र. ०२/०३/२०१८-१९ निविदा र.रु. १२,१८,१८,६५२/-) या कामातुन करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच २०१८-१९ चे सुधारीत २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकात खालील कामाचा समावेश करून सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील खालील नमुद कामांना पुरेशी तरतूद नसल्याने अखर्चित रकमेमधुन वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखा शिर्षक | पान क्र | अनु क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | २०१८-१९ मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१८-१९ ची एकूण आवश्यक तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकर वाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रक करणे. | विशेष योजना | २७ | २२ | २०००००००० | ५०००००० | २००००००० | ० | २५०००००० | |
| २ | प्रभाग क्र.१६ वाल्हेकर वाडी येथे प्राधिकरणकडून आलेल्या जागेवर सल्लागार नेमणे व शाळा इमारत बांधणे. | विशेष योजना | ४९ | २५ | २०००००००० | ७५००००० | १२५००००० | ० | २००००००० | |
| | एकुण | | | | ४०००००००० | १२५००००० | ३२५००००० | ० | ४५०००००० | |

वरील सर्व कामासाठी सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये उपरोक्त नमुद केले प्रमाणे त्या त्या कामांचे समोरील रकान्यामध्ये दर्शविलेली तरतूद उपलब्ध करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगर पलिकेमध्ये प्र.क्र. २५ येथे पुनावळे व ताथवडे येथे जेयुएनएनयुआरएम अंतर्गत मलनिःसारण प्रकल्पासाठी आरक्षित जागेवर मैलाशुध्दीकरण प्रकल्प बांधणेसाठी भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. ताथवडे येथील आरक्षण क्र.६ स.नं. १९ येथील भूसंपादनाबाबत पशुसंवर्धन विभागाकडे महानगरपालिकेकडून शासन स्तरावर पाठपुरावा करणेत येत आहे.

पुनावळे येथील आरक्षण क्र. ४/७४अ मैलाशुध्दीकरण प्रकल्प या प्रयोजनाने बाधित जागेपैकी आवश्यक क्षेत्र खासगी वाटाघाटीने भूसंपादीत करणेबाबत मा. उपसंचालक नगररचना यांचेमार्फत कार्यवाही चालू आहे. पुनावळे येथील आरक्षण क्र.४/७४अ येथे १५

दशलक्ष लिटर्स क्षमतेचा मैलाशुध्दीकरण प्रकल्प बांधणे या कामाच्या नावाचा समावेश महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये करणेस मान्यता देणेत यावी.

त्यानुसार खालील तक्त्यानुसार कामाचे नांव समाविष्ट करून अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मंजूरी व अंदाजपत्रकीय तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

**केंद्र शासन पुरस्कृत योजना**

| पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९ - २० चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०१९-२० साठी लागणारी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५०९ | १० | जलनिःसारण नविन काम १)जे.एन.एन.यू.आर.एम योजने अंतर्गत ताथवडे गावात वाकडकडील क्षेत्रात जलनिःसारण नलिका टाकणे. (नि. नो. क्र. १८/२-२०१३/१४) | ४१४९००००० | १५०००००० | -- | १०००००००| ५००००००|
| | | २)जे.एन.एन.यू.आर.एम योजने अंतर्गत ताथवडे गावात पुनावळेकडील क्षेत्रात जलनिःसारण नलिका टाकणे. (नि. नो. क्र. १८/१-२०१३/१४) | | १५०००००० | -- | १०००००००| ५००००००|
| नवीन काम | | ३)जे.एन.एन.यू.आर.एम योजने अंतर्गत पुनावळे सं. नं. ४ व ५ (पैकी) आरक्षण क्र. ४/७४(अ) येथे १५ दशक्षल लिटर्स क्षमतेचा मैलाशुद्धिकरण प्रकल्प बांधणे. | २५०००००००| -- | २०००००००| -- | २०००००००|
| | | एकुण | | ३०००००००| | | ३०००००००|

तसेच खालिल नमुद प्रमाणे नवीन कामांसाठी सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षाअंतर्गत नवीन कामाचा समावेश करणेस व त्याकरीता प्रशासकिय मान्यता व तरतुद करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राधिकरण अग्रसेन महाराज उद्यानात अग्रसेन महाराज यांचा पुतळा बसविणे व अनुषंगिक सुशोभिकरण करणे. | | | विशेष योजना | २०००००० | ० | २५००००० | ० | २५००००० | **नवीन काम** |
| २ | प्रभाग क्र. १५ आकुर्डी सब डिस्ट्रिक्ट सेंटर भागातील आरक्षित भुखंडांच्या स्थापत्य विषयक कामे करणे. | ५३ | ६७ | विशेष योजना | १०००००००० | १०००००० | ० | २५००००० | ७५००००० | |
| | | | | | **एकुण** | १०००००० | २५००००० | २५००००० | १०००००० | |

तसेच प्रभाग क्र. ८ येथे वैष्णव माता शाळे शेजारील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या वर्ग खोल्या बांधणे आवश्यक असल्याने सन २०१९-२० मधील अंदाजपत्रकामध्ये खाली नमुद केलेल्या कामाचा समावेश व तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | मुळ प्रशासकीय मान्यता | सुधारीत प्रशासकीय अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० ची मुळ तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | प्रभाग क्र. ८ येथील वैष्णव माता शाळे शेजारील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या वर्ग खोल्या बांधणे | विशेष योजना (नविन काम) | - | ७५००००० | - | ५०००००० | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील संक्षिप्त गोषवारा मधील अखेरची शिल्लक | पान क्र. १ | - | - | ३०२४१२६०० | - | ५०००००० |
| **एकूण** | | | | | | ५०००००० | ५०००००० |

उपरोक्त प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता व नवीन कामासाठी तरतुद वर्गीकरण, सुधारीत प्रशासकीय मान्यता व नवीन कामाचा सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात समावेश करुन  मान्यता देणेत यावी.

तसेच मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत  सन २०१९-२० चे अंदाज पत्रकात समाविष्ट असलेल्या कांही कामां करीता तरतूद अपुरी आहे, त्यामुळे सदर कामांच्या पुर्णत्वाकरीता सन २०१९-२० मध्ये पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे, तरी खालील प्रमाणे वाढ घट करून अंतर्गत तरतूद वर्गीकरण सुचविणेत येत आहे, तरी खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्र. क्र. | लेखा शिर्ष | अंदाज पत्रका तील | | सन २०१९-२० मुळ तरतूद | तरतूद वर्गीकरण व करावयाची | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानांक | अ.क्र. | | वाढ | घट |
| १ | प्रभाग क्रमांक 31 मधिल पिंपळे गुरव व नवि सांगवी येथील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती चे  जुने खांब बदलणे | ३१ | सार्वजनिक सुरक्षीतता | ३१९ | ५ | ५०१०००० | १२३००००० | ० |
| २ | नविन प्रभाग क्र.२० येथील आरक्षण क्र।५३ मध्ये व्यापारी संकुल विकसित करणे.(भुमीगत उच्चदाब विजवाहिन्या हलविणे) | २० | स्थापत्य प्रकल्प विषयक कामे, ह मुख्यालय | ३६० | १ | २०००००० | ० | २०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सांगवी उपविभागामध्ये विविध चौकांमध्ये मागणी नुसार सीसीटिव्ही यंत्रणा उभारणे. | 31, 32 | सार्वजनिक सुरक्षितता - ह मुख्यालय | ३१९ | ७ | २०००००० | ० | २०००००० |
| ४ | ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत अचानक उद्भवनारी तातडीची विद्युत विषयक कामे कोटेशन पद्धतीने करणे. | 20, 30, 31, 33 | सार्वजनिक सुरक्षितता - ह मुख्यालय | ३१९ | १४ | ५००००० | ० | ५००००० |
| ५ | ह क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत रस्त्यांमध्ये अडथळा ठरणारे म.रा.वि.वि.कं.लि. चे उच्च, लघुदाब पोल तारा व फिडरपिलर हलविणे. | 20, 30, 31, 32 | उच्च व लघुदाब पोल व तारा हलविणे. | ३६६ | १ | ५०००००० | ० | ५०००००० |
| ६ | कला व सांस्कृतिक धोरण | | अंदाजपत्रक क्र.२. | १०० | १२ | ११७५०००० | | २८००००० |
| | | | | एकुण | | २६२६०००० | १२३००००० | १२३००००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र १२ मध्ये प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने, त्यामधील काही विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करून, निविदा कार्यवाही करणेसाठी, प्रथम प्राधान्याने करावयाचे कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असल्याने त्यासाठी खालीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पा. क्र | अ क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | एकूण आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळवडे गाव येथील गायराणास सिमाभिंत बांधणे व खेळाचे मैदान विकसीत करणे | | | ७०००००००० | ० | २०९६४१४ | ० | २०९६४१४ |
| २ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | २३ | १२७ | २०००००००० | ३४०००००० | ० | ११९१३६ | ३२८०८६४ |
| ३ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथील रस्ते खडीमुरूमाचे करणे | २०४ | १७ | ९००००००० | ५३४००० | ० | १५३४३९ | ३८०५६१ |
| ४ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | २०५ | १९ | ८४०००००० | २६३६००० | ० | ७६८६९ | २५५९१३१ |
| ५ | प्रभाग क्र 12 तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे | २०७ | २३ | ९००००००० | १६३८००० | ० | १४२६३४ | १४९५३६६ |
| ६ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे स्थापत्यविषयक कामे करणे | २११ | २३ | ७५०००००० | ३१०१००० | ० | २२११९ | ३०७८८८१ |
| ७ | प्रभाग क्र 12 तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे स्थापत्यविषयक | २१३ | ७१ | ९९००००० | ३०३००० | ० | १९९८५ | २८३०१५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कामे करणे | | | | | | | |
| ८ | प्रभाग क्र १२ येथे भाजी मंडई करीता व्यवस्था करणे | २१४ | ९८ | १०००००० | ६५०००० | ० | ६५०००० | ० |
| ९ | प्रभाग क्र १२ येथील तळवडे ज्योतीबानगर भागातील रस्त्यांची आकस्मिक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ५७० | ६ | २४०००००० | १२१७००० | ० | ९१२२३२ | ३०४७६८ |
| | एकूण | | | १२८२९०००० | १३४७९००० | २०९६४१४ | २०९६४१४ | १३४७९००० |

एकूण र.रू २०,९०,४१४/- (अक्षरी र.रू. वीस लाख नव्वद हजार चारशे चौदा फक्त वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु काम करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन तरतुद वर्गीकरण करणेस प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

| अ.क्रं. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | लेखाशिर्ष | सन 2019-20 ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन 19-20 साठी एकूण आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मधील यशवंतराव चवाहाण स्मृती रूग्णालया मधील स्थापत्य विषयक कामे करणे सन 2017-18 | 494 | 1 | प अंदाजपत्रक | - | 710,000 | - | 710,000 | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मधील वाय सी एम हॉस्पीटल मध्ये रंगरंगोटीचे व स्थापत्य विषयक कामे करणे सन 2017-18 | 494 | 2 | प अंदाजपत्रक | - | 580,000 | - | 580,000 | |
| **3** | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मधील वाय सी एम हॉस्पीटल मध्ये लिकेजस व वॉटरप्रुफिंग व इतर स्थापत्य विषयक कामे करणे सन 2017-18 | 494 | 3 | प अंदाजपत्रक | - | 660,000 | - | 660,000 | |
| 4 | अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे प्रेक्षक गॅलरी बांधणे, हॉस्टेल बिल्डींग बांधणे, व मैदाने विकसीत करणे | 14 | 1 | विशेष योजना | - | 1,200,000 | | 1,200,000 | |
| **5** | प्रभाग क्र. 40 खराळवाडी येथील विविध ठिकाणचे पावसाळा गटर्स (सरफेस गटर्स) करणे. | | | | - | 240,000 | - | 240,000 | |
| 6 | प्रभाग क्र. 40 येथील मुख्य रस्ते व | | | | - | 230,000 | - | 230,000 | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मासुळकर कॉलनी येथील पाथवेंचे पेव्हींग ब्लॉक दुरूस्ती करणे. | | | | | | | | |
| **7** | प्रभाग क्र. 40 मध्ये किरकोळ दुरूस्तीची व देखभालींची कामे करणे. | | | | - | 320,000 | - | 320,000 | |
| 8 | महापौर विकास निधी | 50 | 18 | | 50,000,000 | - | 3,940,000 | 46,060,000 | |
| | एकूण | | | | 50,000,000 | 3,940,000 | 3,940,000 | 50,000,000 | |

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु काम करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करून तरतुद वर्गीकरण करणेस प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

| अ.क्रं. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | लेखाशिर्ष | सन 2019-20 ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन 19-20 साठी एकूण आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | प्रभाग क्र. २५ मधील प्रमुख जिल्हा मार्ग ३१ रस्त्यावरील भूमकर चौक येथे सब वे / उड्डाणपूल बांधणे | | | UTF | 0 | २००००००० | - | ० | |
| **२** | प्रजिमा ३१ या रस्त्यावर भुमकर चौकाजवळ वाय जक्शंन येथे सब | ५०६ | २१ | UTF | ३००००००० | | **२०००००००** | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वे बांधणे | | | | | | | | |

तसेच मनपाचे भोसरी प्रभाग क्र. ३५ येथील स.नं.१ मधील आरक्षण क्र. ४३१ मध्ये बांधणेत आलेल्या अदयावत रुग्णालयाचे इमारतीमध्ये (१०० खाटांचे) तसेच पिंपरी येथील नव्याने बांधण्यात आलेल्या जिजामाता रुग्णालयात (१०० खाटांचे) करावयाचे मडिकल गॅस पाईप लाईनचे कामा संदर्भात निविदा काढून दोन्ही रुग्णालयातील मेडीकल गॅस पाईप लाईनचे चलन चलनसहीत संबंधित ठेकेदारांकडून ८ वर्षाकरीता कामकाज करुन घेणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार असल्याने भोसरी व जिजामाता रुग्णालयात मेडिकल गॅस पाईप लाईनचे कामा संदर्भात ई निविदा प्रसिध्द करुन सदरचे कामकाज करुन घेणेस मान्यता देणेत यावी. तसेच स्थापत्य ड क्षेत्रीय कार्यालयाकडील सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामांकरीता वाढ/घट करुन तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पा.क्र./ अ.क्र. | सन 2019-20 | घट र.रु. | वाढ र.रु. | सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर येथे ठिकठिकाणी पाण्याचा निचरा होणेकरीता आर.सी.सी. पाईप टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे (सन 2018-19 | सरफेस गटर्स | 153/8 | 12,00,000 | 0 | 4,00,000 | 16,00,000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करीता) | | | | | | |
| 2 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर मधील रामनगर व परिसरातील भागात पेव्हींग ब्लॉक व स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे (सन 2018-19 करीता) | डांबरी रस्ते पथ दुरुस्ती व देखभाल | 554/24 | 19,36,000 | 0 | 1,80,000 | 21,16,000 |
| 3 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर गावठाणामधील दवाखान्याचे नुतणीकरण व स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे (सन 2018-19 करीता) | किरकोळ दुरुस्ती देखभाल | 560/66 | 2,10,000 | 0 | 5,30,000 | 7,40,000 |
| 4 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर परिसरात अतिक्रमण विरोधी कारवाई करीता ट्रक, क्रेन, जे.सी.बी., डंपर, ट्रॅक्टर इत्यादी मशिनरी पुरविणे (सन 2018-19 करीता) | किरकोळ दुरुस्ती देखभाल | 560/65 | 5,25,000 | 0 | 1,90,000 | 7,15,000 |
| 5 | महापौर विकास निधी | | 50/18 | 5,00,00,000 | 13,00,000 | | |
| | | | | 5,38,71,000 | 13,00,000 | 13,00,000 | |

तसेच स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामांकरीता वाढ / घट करुन तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पा.क्र./अ.क्र. | सन 2019-20 | घट र.रु. | वाढ र.रु. | सन 2019-20चे सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.३ मोशी येथील ताब्यात आलेले रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम. पध्दतीने करणे | खडी मुरुमाचे रस्ते | 177/6 | 42,50,000 | 0 | 5,50,000 | 48,00,000 |
| 2 | प्रभाग क्र.३ च-होली येथील ताब्यात आलेले रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम. पध्दतीने करणे | खडी मुरुमाचे रस्ते | 177/5 | 42,50,000 | 0 | 5,50,000 | 48,00,000 |
| 5 | महापौर विकास निधी | | 50/18 | 5,00,00,000 | 11,00,000 | | |
| | | | | 5,85,00,000 | 11,00,000 | 11,00,000 | |

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता:

ठराव क्रमांक – ४३० विषय क्रमांक – ४

दिनांक – ७/९/२०१९ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.पापु/बक्षेका/कावि/३०/२०१९ दि.०६/०६/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५६
दि.१२/०६/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे JNNURM अंतर्गत पवना धरणातून से.क्र.२३, जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत थेट पाईपलाईनने पाणी आणणे या प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. या कामास मनपा हद्दीबाहेर पवना धरणग्रस्तांनी, स्थानिक शेतक-यांनी, तसेच भारतीय किसान संघ व इतर यांनी मोठ्या प्रमाणात विरोध केलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने दि.१९/१०/२०१० रोजी सदर

जनहित याचिका फेटाळली होती. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, भारतीय किसान संघ व इतर यांनी, मा.मुख्य अभियंता तथा मा.प्राथमिक विवाद निवारण अधिकारी यांनी दि.२७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाचे विरोधात, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांचेकडे अपिल केले होते. सदर अपिलाची सुनावणी होऊन, MWRRA ने दि.१६।०५।२०१२ रोजी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार काही निर्देश देऊन पवना धरणातुन थेट पाईपलाईन प्रकल्प राबविणेस मान्यता देऊन, भारतीय किसान संघ व इतर यांचे अपिल फेटाळले आहे. पवना थेट पाईपलाईनचे काम तत्कालीन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे आदेशानुसार जैसे थे परिस्थितीत आहे. त्यामुळे अद्यापही पवना थेट पाईपलाईनचे काम बंद आहे. यासाठी मनपा तर्फे काम चालू करणेबाबत वारंवार पाठपुरावा करणेत आलेला आहे. याबाबत मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०१/२०१९ व ०४/०२/२०१९ रोजी बैठक झाली आहे. सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वरच्या भागातील (Up Stream) सिंचनासाठी तसेच बिगर सिंचनासाठी थेट पाईपलाईनने पाणी पुरवठा करणेकामीच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल जलसंपदा विभागाने करावा. तसेच सदर प्रकल्पाचा खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने करावा असे निर्देश देणेत आले आहेत. (याबाबत मा.कक्ष अधिकारी यांचे कडील पत्र क्र.ममुंस/प्रशासन कक्ष/पत्र, जा.क्र.५७/२०१९ दि.११/२/२०१९ व मा.मुख्यामंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.४/२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचा अहवाल इतिवृत्तांताचे अवलोकन होणेकामी सादर.) त्यास अनुसरुन उप कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.खपावि/प्रशा-३/२९८७/२०१९ दि.३०/४/२०१९ “सदर प्रकल्पाची मा.मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी दि.३०/०१/२०१९ व ०४/०२/२०१९ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये पवना प्रकल्प सिंचन क्षेत्रास बंदीस्त पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करणेबाबत दिलेल्या सुचनेनुसार सदर प्रकल्पाची अंदाजित एकूण किंमत कळण्यासाठी व त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण, संकलन, अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे गरजेचे आहे” असे कळवून या कामीचा खर्च र.रु.७९.३० लक्ष निधीची तरतूद करणेकामी विंनती केलेली आहे. मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांचे बैठकीतील निर्देशांप्रमाणे तसेच उप कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, यांचे मागणीस अनुसरुन प्रथमत: सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी र.रु.७९.३० लाखाच्या रकमेची तरतूद असणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकातील पानांक ५०७, अनु.क्र.६/१ नुसार असलेल्या, “पवना धरणातून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे,” या कामाच्या तरतूदीमधून विषयांकीत कामाचा खर्च करता येईल. तसेच, सदरचा प्रकल्प

महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर आहे. सबब,सदर कामासाठी रक्कम रू.७९.३० लक्ष जलसंपदा विभागास देणेसाठी मा. महापालिका सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. तरी पवना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये पाईपलाईनद्वारे सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणीपुरवठा करणेच्या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्पाचे सखोल सर्वेक्षण, संकलन, अंदाजपत्रक तयार करणे या कामी येणा-या खर्चास र.रु.७९.३० लाखास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच सदरचे काम हद्दीबाहेर असलेने मा. महापालिका सभेची मान्यता मिळणेसाठी तसेच, सदरची रक्कम जलसंपदा विभागास देण्यासाठी सन २०१९-२० या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील,' पाणीपुरवठा टप्पा-१' या लेखाशिर्षांतर्गत, "पवना धरणातून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे," या कामाच्या तरतूदीमधून (अंदाजपत्रकातील पानांक ५०७, अनु.क्र.६/१, र.रू.३२०.४६ कोटी) सदर कामापोटी र.रु.७९.३० लक्ष अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१९-२० च्या मुळ अंदाजपत्रकात खालील कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरच्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| **अनु.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय लेखाशिर्षक** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **सन २०१९-२० ची एकूण आवश्यक तरतूद** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ मधील रावेत औंध पुलाजवळील रस्त्यावर ग्रेड सेपरेटर बांधणे. | विशेष योजना | २५०००००० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र.१६ मधील रावेत भागातील स.नं. १०३ ते १४७ पर्यंतचा २४.०० मी डी.पी रस्ता, सदर रस्त्याला जोडणारे १८.०० मी , १२.००मी डी.पी व इतर रस्ते विकसित करणे. | विशेष योजना | ३५००००००० | ० |

तरी वरील नमुद केलेप्रमाणेसन २०१९-२० च्या मुळ अंदाजपत्रकात समावेश होणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणेसाठी शासन पत्र क्र.बिसिआ २०१८/(३९१/१८) सि.व्य.(धो), दि.२४/१०/२०१८ नुसार आंद्रा धरणात १०० एम.एल.डी. पाण्याचे आरक्षण मंजूर असून सदर पाणी देहू बंधारा येथून उचलणेस मंजूरी मिळालेली आहे. सदर योजना राबविणेसाठी देहू बंधा-याच्या बाजूला जॅकवेल पंप हाऊससाठी एक एकर जागा आवश्यक आहे. सदर जागा म.न.पा. हद्दीबाहेर आहे. सदर प्रकल्प राबविणेसाठी या ठिकाणी जागेची आवश्यकता लक्षात घेता सदर बंधा-याच्या बाजूची सर्वे नं.९८/३ येथील योग्य जागा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागामधील खालील नमुद कामासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कम कमी असुन सदरच्या रकमेमध्ये प्रशासकीय मान्यता मिळणेकामी वाढ करणे आवश्यक आहे. सबब खालील नमुद कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्षक | पान क्र | अनु क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १८ मधील मोरया हॉस्पीटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणे | विशेष योजना | ४९ | ३७ | ३००००००० | २०००००००० | |
| २ | सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती (स्वच्छ भारत अभियान) | स्वच्छ भारत अभियान | ५१३ | १७-३ | ० | ७५०००००० | |
| एकूण | | | | | ३००००००० | २७५०००००० | |

वरील नमुद कामासाठी सन २०१८-१९ च्या सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका "ब" क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विशेष योजना लेखाशिर्षा मधील मनपाचे सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामधील पान क्र.४८, अ.क्र.१३ वरील "प्रभाग क्र.१८ मध्ये चापेकर चौकात पादचा-यांसाठी भुयारी मार्ग विकसीत करणे" हे काम प्रस्तावित करणेत आले होते. सदरचे कामाचे ठिकाण वाहतुक तसेच चौकामधील सेवावाहीन्यांचे जाळे, यामुळे करता येणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदरचे ठिकाण वाहतुकीचे योग्य पध्दतीने नियोजन करुन पादच्या-यांसाठी चौकातील रस्ता ओलांडणे तसेच पादचा-याना जा-ये करणे सुकर होईल या पध्दतीने अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार काम करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त नमुद कामाचे नावात बदल करुन त्याकामाची प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व सन २०१९-२० मधील तरतुद या मधून काम केल्यास मुळ कामाचे प्रस्तावानुसार काम करणे शक्य होईल. त्यामुळे मनपाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षावरील पान क्र. ४८, अ.क्र. १३ चे नावा मध्ये "प्रभाग क्र.१८ मध्ये चापेकर चौक ते मोरया हॉस्पिटल पर्यंतचा

रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणे" असा बदल करुन त्याकामाची प्रशासकीय मान्यता व तरतुद वापरणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिकेमध्ये प्र.क्र. १८ मधील चिंचवडगाव येथे मनपा मार्फत विकास आराखड्यातील ९ मी. ते १८ मी. पर्यंत रूंदीचे रस्ते विकसीत करणेचे काम हाती घेणेत आली आहेत. सदर रस्त्याने बाधीत जागा अद्यापी पुर्णतः मनपाचे ताब्यात आली नसल्याने रस्ते विकसीत करणेकामी अडथळा येत आहे.

चिंचवडगाव येथील ९ मी ते १८ मी. रूंदीच्या डी.पी. रस्त्यांचे प्रयोजनाने बाधित जागा भूसंपादीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार रस्त्याची आवश्यकता व निकड लक्षात घेता रस्त्याने बाधीत जागा भुसंपादनाने ताब्यात घेणेबाबत मा. उपसंचालक नगररचना यांचेमार्फत कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे. सदरचे भुसंपादन कार्यवाही सुरू करणेस मान्यता देणेत येत आहे.

त्यानुसार प्रभाग क्र १८ मधील डि.पी. रस्ते विकसीत करणेकामी रस्त्याने बाधीत जागा भुसंपादनाने ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच खालील नमूद केलेल्या विकास कामांचा समावेश सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षकात करुन आवश्यक तरतूद मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतूद रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | थेरगाव येथील सर्व्हे नं. ०९ मधील नियोजित कॅन्सर हॉस्पीटल साठी बंकर व इतर अनुषंगिक कामे करणे. | १५००००००० | १०००००००० |

तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन आवश्यक तरतुदीस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१९-२० एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ मोशी येथील गट क्र. ६९१,६९२,६९३ येथील नाला बंदिस्त करुन रस्ता विकसित करणे | | | २०००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० |
| २ | महापौर विकास निधी | ५० | १८ | ० | ५००००००० | ० | १००००००० | ४००००००० |
| | एकुण | | | २०००००००० | ५०००००००० | १०००००००० | १०००००००० | ५०००००००० |

तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अनु. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१९-२० तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१९-२० एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १अ) | प्रभाग क्र. ३ च-होली येथील संत ज्ञानेश्वर महाराज यांचे भेटीवर आधारित समूहशिल्पच्या परिसरात संत ज्ञानेश्वर सृष्टी तयार करणे. | ५५ | १०६ | १००००००००० | १५००००००० | ० | ५०००००० | १०००००००० |
| ब | प्रभाग क्र. ३ च-होली येथील संत ज्ञानेश्वर व संत नामदेव महाराज यांचे | | | १००००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भेटीवर आधारित समूहशिल्पच्या परिसरात संत ज्ञानेश्वर सृष्टी उभारणे करीता स्थापत्य विषयक कामे करणे. | | | | | | | |
| | एकुण | | | | १५०००००० | ५०००००० | ५०००००० | १५०००००० |

तसेच भोसरी परिसरातील मुलांची सोय होण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक शाळा भोसरी येथील इमारतीच्या परिसरात तात्पुरत्या पत्र्याच्या वर्ग खोल्या करणे व प्रभाग अंतर्गत स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. प्रस्तुत काम स.न. १ मधील खेळाचे मैदानासाठी प्रेक्षक गॅलरी उभारणे (निविदा क्र. ०२/०३/२०१८-१९ निविदा र.रु. १२,१८,१८,६५२/-) या कामातुन करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच २०१८-१९ चे सुधारीत २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकात खालील कामाचा समावेश करून सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील खालील नमुद कामांना पुरेशी तरतूद नसल्याने अखर्चित रकमेमधुन वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखा शिर्षक | पान क्र | अनु क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | २०१८-१९ मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०१८-१९ ची एकूण आवश्यक तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकर वाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रक करणे. | विशेष योजना | २७ | २२ | २०००००००० | ५०००००० | २०००००००० | ० | २५०००००० | |
| २ | प्रभाग क्र.१६ वाल्हेकर वाडी येथे प्राधिकरणकडून आलेल्या जागेवर सल्लागार नेमणे व शाळा इमारत बांधणे. | विशेष योजना | ४९ | २५ | २०००००००० | ७५००००० | १२५००००० | ० | २०००००००० | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | | | ४०००००००० | १२५००००० | ३२५००००० | ० | ४५००००००० | |

वरील सर्व कामासाठी सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये उपरोक्त नमुद केले प्रमाणे त्या त्या कामांचे समोरील रकान्यामध्ये दर्शविलेली तरतूद उपलब्ध करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगर पलिकेमध्ये प्र.क्र. २५ येथे पुनावळे व ताथवडे येथे जेयुएनएनयुआरएम अंतर्गत मलनिःसारण प्रकल्पासाठी आरक्षित जागेवर मैलाशुध्दीकरण प्रकल्प बांधणेसाठी भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. ताथवडे येथील आरक्षण क्र.६ स.नं. १९ येथील भूसंपादनाबाबत पशुसंवर्धन विभागाकडे महानगरपालिकेकडून शासन स्तरावर पाठपुरावा करणेत येत आहे.

पुनावळे येथील आरक्षण क्र. ४/७४अ मैलाशुध्दीकरण प्रकल्प या प्रयोजनाने बाधित जागेपैकी आवश्यक क्षेत्र खासगी वाटाघाटीने भूसंपादीत करणेबाबत मा. उपसंचालक नगररचना यांचेमार्फत कार्यवाही चालू आहे. पुनावळे येथील आरक्षण क्र.४/७४अ येथे १५ दशलक्ष लिटर्स क्षमतेचा मैलाशुध्दीकरण प्रकल्प बांधणे या कामाच्या नावाचा समावेश महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पामध्ये करणेस मान्यता देणेत येत आहे.

त्यानुसार खालील तक्त्यानुसार कामाचे नांव समाविष्ट करून अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मंजूरी व अंदाजपत्रकीय तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

**केंद्र शासन पुरस्कृत योजना**

| पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९ - २० चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०१९-२० साठी लागणारी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५०९ | १० | जलनिःसारण नविन काम १)जे.एन.एन.यू.आर.एम योजने अंतर्गत ताथवडे गावात वाकडकडील क्षेत्रात जलनिःसारण नलिका टाकणे. (नि. नो. क्र. १८/२-२०१३/१४) | ४१४९००००० | १५०००००० | -- | १००००००० | ५०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २)जे.एन.एन.यू.आर.एम योजने अंतर्गत ताथवडे गावात पुनावळेकडील क्षेत्रात जलनिःसारण नलिका टाकणे. (नि. नो. क्र. १८/१-२०१३/१४) | | १५०००००० | -- | १००००००० | ५०००००० |
| नवीन काम | | ३)जे.एन.एन.यू.आर.एम योजने अंतर्गत पुनावळे सं. नं. ४ व ५ (पैकी) आरक्षण क्र. ४/७४(अ) येथे १५ दशक्षल लिटर्स क्षमतेचा मैलाशुद्धिकरण प्रकल्प बांधणे. | २५००००००० | -- | २००००००० | -- | २००००००० |
| | | एकुण | | ३००००००० | | | ३००००००० |

तसेच खालिल नमुद प्रमाणे नवीन कामांसाठी सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षाअंतर्गत नवीन कामाचा समावेश करणेस व त्याकरीता प्रशासकिय मान्यता व तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राधिकरण अग्रसेन महाराज उद्यानात अग्रसेन महाराज यांचा पुतळा बसविणे व अनुषंगिक सुशोभिकरण करणे. | | | विशेष योजना | २००००००० | ० | २५००००० | ० | २५००००० | **नवीन काम** |
| २ | प्रभाग क्र. १५ आकुर्डी सब डिस्ट्रिक्ट सेंटर भागातील आरक्षित भुखंडांच्या स्थापत्य विषयक कामे करणे. | ५३ | ६७ | विशेष योजना | १०००००००० | १००००००० | ० | २५००००० | ७५००००० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | १००००००० | २५००००० | २५००००० | १००००००० | |

तसेच प्रभाग क्र. ८ येथे वैष्णव माता शाळे शेजारील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या वर्ग खोल्या बांधणे आवश्यक असल्याने सन २०१९-२० मधील अंदाजपत्रकामध्ये खाली नमुद केलेल्या कामाचा समावेश व तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | मुळ प्रशासकीय मान्यता | सुधारीत प्रशासकीय अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० ची मुळ तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ८ येथील वैष्णव माता शाळे शेजारील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या वर्ग खोल्या बांधणे | विशेष योजना (नविन काम) | - | ७५००००० | - | ५०००००० | - |
| २ | सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील संक्षिप्त गोषवारा मधील अखेरची शिल्लक | पान क्र. १ | - | - | ३०२४१२६०० | - | ५०००००० |
| **एकूण** | | | | | | ५०००००० | ५०००००० |

उपरोक्त प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता व नवीन कामासाठी तरतुद वर्गीकरण, सुधारीत प्रशासकीय मान्यता व नवीन कामाचा सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात समावेश करुन मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सन २०१९-२० चे अंदाज पत्रकात समाविष्ट असलेल्या कांही कामां करीता तरतूद अपुरी आहे, त्यामुळे सदर कामांच्या पुर्णत्वाकरीता सन २०१९-२० मध्ये पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे, तरी खालील प्रमाणे वाढ घट करून अंतर्गत तरतूद वर्गीकरण सुचविणेत येत आहे, तरी खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्र. क्र. | लेखा शिर्ष | अंदाज पत्रका तील | | सन २०१९-२० मुळ तरतूद | तरतूद वर्गीकरण व करावयाची | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानांक | अ. क्र. | | वाढ | घट |
| १ | प्रभाग क्रमांक 31 मधिल पिंपळे गुरव व नवि सांगवी येथील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती चे जुने खांब बदलणे | ३१ | सार्वजनिक सुरक्षीतता | ३१९ | ५ | ५०१०००० | १२३००००० | ० |
| २ | नविन प्रभाग क्र.२० येथील आरक्षण क्र।५३ मध्ये व्यापारी संकुल विकसित करणे.(भुमीगत उच्चदाब विजवाह्न्यिा हलविणे) | २० | स्थापत्य प्रकल्प विषयक कामे, ह मुख्यालय | ३६० | १ | २०००००० | ० | २०००००० |
| ३ | ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सांगवी उपविभागामध्ये विविध चौकांमध्ये मागणी नुसार सीसीटिव्ही यंत्रणा उभारणे. | 31, 32 | सार्वजनिक सुरक्षितता - ह मुख्यालय | ३१९ | ७ | २०००००० | ० | २०००००० |
| ४ | ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत अचानक उद्भवनारी तातडीची विद्युत विषयक कामे कोटेशन पद्धतीने करणे. | 20, 30, 31, 33 | सार्वजनिक सुरक्षितता - ह मुख्यालय | ३१९ | १४ | ५००००० | ० | ५००००० |
| ५ | ह क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत रस्त्यांमध्ये अडथळा ठरणारे म.रा.वि.वि.कं.लि. चे उच्च, लघुदाब पोल तारा व फिडरपिलर हलविणे. | 20, 30, 31, 32 | उच्च व लघुदाब पोल व तारा हलविणे. | ३६६ | १ | ५०००००० | ० | ५०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | कला व सांस्कृतिक धोरण | | अंदाजपत्रक क्र.२. | १०० | १२ | ११७५०००० | | २८००००० |
| | | | | एकुण | | २६२६०००० | १२३००००० | १२३००००० |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र १२ मध्ये प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने, त्यामधील काही विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करून, निविदा कार्यवाही करणेसाठी, प्रथम प्राधान्याने करावयाचे कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असल्याने त्यासाठी खालीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पा. क्र | अ क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | एकूण आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळवडे गाव येथील गायराणास सिमाभिंत बांधणे व खेळाचे मैदान विकसीत करणे | | | ७०००००००० | ० | २०९६४१४ | ० | २०९६४१४ |
| २ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | २३ | १२७ | २०००००००० | ३४००००० | ० | ११९१३६ | ३२८०८६४ |
| ३ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथील रस्ते खडीमुरूमाचे करणे | २०४ | १७ | ९०००००० | ५३४००० | ० | १५३४३९ | ३८०५६१ |
| ४ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथील | २०५ | १९ | ८४००००० | २६३६००० | ० | ७६८६९ | २५५९१३१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | | | | | | | |
| ५ | प्रभाग क्र 12 तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे | २०७ | २३ | ९०००००० | १६३८००० | ० | १४२६३४ | १४९५३६६ |
| ६ | प्रभाग क्र १२ तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे स्थापत्यविषयक कामे करणे | २११ | २३ | ७५००००० | ३१०१००० | ० | २२११९ | ३०७८८८१ |
| ७ | प्रभाग क्र 12 तळवडे रूपीनगर त्रिवेणीनगर येथे स्थापत्यविषयक कामे करणे | २१३ | ७१ | ९९०००० | ३०३००० | ० | १९९८५ | २८३०१५ |
| ८ | प्रभाग क्र १२ येथे भाजी मंडई करीता व्यवस्था करणे | २१४ | ९८ | १०००००० | ६५०००० | ० | ६५०००० | ० |
| ९ | प्रभाग क्र १२ येथील तळवडे ज्योतीबानगर भागातील रस्त्यांची आकस्मिक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ५७० | ६ | २४००००० | १२१७००० | ० | ९१२२३२ | ३०४७६८ |
| | एकूण | | | १२८२९०००० | १३४७९००० | २०९६४१४ | २०९६४१४ | १३४७९००० |

एकूण र.रू २०,९०,४१४/- (अक्षरी र.रू. वीस लाख नव्वद हजार चारशे चौदा फक्त वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु काम करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन तरतुद वर्गीकरण करणेस प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | लेखाशिर्ष | सन 2019-20 ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन 19-20 साठी एकूण आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मधील यशवंतराव चवाहाण स्मृती रूग्णालया मधील स्थापत्य विषयक कामे करणे सन 2017-18 | 494 | 1 | प अंदाजपत्रक | - | 710,000 | - | 710,000 | |
| 2 | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मधील वाय सी एम हॉस्पीटल मध्ये रंगरंगोटीचे व स्थापत्य विषयक कामे करणे सन 2017-18 | 494 | 2 | प अंदाजपत्रक | - | 580,000 | - | 580,000 | |
| 3 | प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर मधील वाय सी एम हॉस्पीटल मध्ये लिकेजस व वॉटरप्रुफिंग व इतर स्थापत्य विषयक कामे करणे सन 2017-18 | 494 | 3 | प अंदाजपत्रक | - | 660,000 | - | 660,000 | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे प्रेक्षक गॅलरी बांधणे, हॉस्टेल बिल्डींग बांधणे, व मैदाने विकसीत करणे | 14 | 1 | विशेष योजना | - | 1,200,000 | | 1,200,000 | |
| **5** | प्रभाग क्र. 40 खराळवाडी येथील विविध ठिकाणचे पावसाळा गटर्स (सरफेस गटर्स) करणे. | | | | - | 240,000 | - | 240,000 | |
| 6 | प्रभाग क्र. 40 येथील मुख्य रस्ते व मासुळकर कॉलनी येथील पाथवेंचे पेव्हींग ब्लॉक दुरूस्ती करणे. | | | | - | 230,000 | - | 230,000 | |
| **7** | प्रभाग क्र. 40 मध्ये किरकोळ दुरूस्तीची व देखभालींची कामे करणे. | | | | - | 320,000 | - | 320,000 | |
| 8 | महापौर विकास निधी | 50 | 18 | | 50,000,000 | - | 3,940,000 | 46,060,000 | |
| एकूण | | | | | 50,000,000 | 3,940,000 | 3,940,000 | 50,000,000 | |

तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु काम करणे आवश्यक असलेली विकास कामे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करून तरतुद वर्गीकरण करणेस प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्रं. | लेखाशिर्ष | सन 2019-20 ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन 19-20 साठी एकूण आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. २५ मधील प्रमुख जिल्हा मार्ग ३१ रस्त्यावरील भूमकर चौक येथे सब वे / उड्डाणपूल बांधणे | | | UTF | 0 | २००००००० | - | ० | |
| २ | प्रजिमा ३१ या रस्त्यावर भुमकर चौकाजवळ वाय जक्शंन येथे सब वे बांधणे | ५०६ | २१ | UTF | ३००००००० | | २००००००० | | |

तसेच मनपाचे भोसरी प्रभाग क्र. ३५ येथील स.नं.१ मधील आरक्षण क्र. ४३१ मध्ये बांधणेत आलेल्या अदयावत रुग्णालयाचे इमारतीमध्ये (१०० खाटांचे) तसेच पिंपरी येथील नव्याने बांधण्यात आलेल्या जिजामाता रुग्णालयात (१०० खाटांचे) करावयाचे मडिकल गॅस पाईप लाईनचे कामा संदर्भात निविदा काढून दोन्ही रुग्णालयातील मेडीकल गॅस पाईप लाईनचे चलन चलनसहीत संबंधित ठेकेदारांकडून ८ वर्षाकरीता कामकाज करुन घेणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार असल्याने भोसरी व जिजामाता रुग्णालयात मेडिकल गॅस पाईप लाईनचे कामा संदर्भात ई निविदा प्रसिध्द करुन सदरचे कामकाज करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्थापत्य ड क्षेत्रीय कार्यालयाकडील सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामांकरीता वाढ/घट करुन तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पा.क्र./ अ.क्र. | सन 2019-20 | घट र.रु. | वाढ र.रु. | सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर येथे ठिकठिकाणी पाण्याचा निचरा होणेकरीता आर.सी.सी. पाईप टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे (सन 2018-19 करीता) | सरफेस गटर्स | 153/8 | 12,00,000 | 0 | 4,00,000 | 16,00,000 |
| 2 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर मधील रामनगर व परिसरातील भागात पेव्हींग ब्लॉक व स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे (सन 2018-19 करीता) | डांबरी रस्ते पथ दुरुस्ती व देखभाल | 554/24 | 19,36,000 | 0 | 1,80,000 | 21,16,000 |
| 3 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर गावठाणामधील दवाखान्याचे नुतणीकरण व स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे (सन 2018-19 करीता) | किरकोळ दुरुस्ती देखभाल | 560/66 | 2,10,000 | 0 | 5,30,000 | 7,40,000 |
| 4 | नवीन प्रभाग क्र.28 पिंपळे सौदागर परिसरात अतिक्रमण विरोधी कारवाई करीता | किरकोळ दुरुस्ती देखभाल | 560/65 | 5,25,000 | 0 | 1,90,000 | 7,15,000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ट्रक, क्रेन, जे.सी.बी., डंपर, ट्रॅक्टर इत्यादी मशिनरी पुरविणे (सन 2018-19 करीता) | | | | | | |
| 5 | महापौर विकास निधी | | 50/18 | 5,00,00,000 | 13,00,000 | | |
| | | | | 5,38,71,000 | 13,00,000 | 13,00,000 | |

तसेच स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असलेल्या कामांकरीता वाढ / घट करुन तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पा.क्र./अ.क्र. | सन 2019-20 | घट र.रु. | वाढ र.रु. | सन 2019-20चे सुधारित अंदाजपत्रक र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.३ मोशी येथील ताब्यात आलेले रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम. पध्दतीने करणे | खडी मुरुमाचे रस्ते | 177/6 | 42,50,000 | 0 | 5,50,000 | 48,00,000 |
| 2 | प्रभाग क्र.३ च-होली येथील ताब्यात आलेले रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम. पध्दतीने करणे | खडी मुरुमाचे रस्ते | 177/5 | 42,50,000 | 0 | 5,50,000 | 48,00,000 |
| 5 | महापौर विकास निधी | | 50/18 | 5,00,00,000 | 11,00,000 | | |
| | | | | 5,85,00,000 | 11,00,000 | 11,00,000 | |

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ५

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सागर आंगोळकर, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८६१
दि.१२/०६/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय व महापालिकेच्या इतर रूग्णालयात रूग्ण उपचाराकरिता दाखल केले जातात. महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील तसेच इतर ग्रामीण भागातून व शहरांमधून रूग्ण उपचाराकरिता येत असतात. त्यामधील बहुतांशी रूग्णांची आर्थिक परिस्थिती बेताची असते, ब-याच रूग्णांचे पिंपरी चिंचवड शहरामध्ये नातेवाईकही नसतात. महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये उपचाराकरिता सामान्य दर आकारले जात असले तरी खूपदा उपचाराचे बील हे रूग्णाचे आर्थिक कुवतीपेक्षा अधिक असते. ही बाब विचारात घेता बहुतांशी रूग्णांची बेताची आर्थिक परिस्थिती व मानवतेच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह मनपाच्या सर्व रूग्णालयात उपचाराकरिता दाखल झालेल्या रूग्णांचा उपचार चालू असताना किंवा रूग्णालयात दाखल असतांना मृत्यु झाल्यास सदर रूग्णाचे मृत्यु समयी असणारे सर्व थकीत बील माफ करणेस मान्यता देणेत यावी. यामुळे सदर मृत रूग्णाचे नातेवाईकांना महापालिकेकडून एक प्रकारे दु:खात मदत होणार असल्याने सदर विषयास मान्यता देणेत यावी.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या, नागरवस्ती विभाग योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी योजने अंतर्गत ‘मनपाच्या हद्दीतील दिव्यांगांना मा.प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजने अंतर्गत घर खरेदीकामी र.रु. १,००,०००/- अर्थसहाय्य देणे’ या उपलेखाशिर्षावर र.रु. १,००,००,०००/-

(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी फक्त) तरतुद सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत लाभार्थी निश्चितीकामी निकष निश्चित करणे आवश्यक आहे.

तरी पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागामार्फत महापालिका हद्दीतील दिव्यांगांना घरकुल मंजूर झाल्यानंतर त्यांनी घर खरेदीकामी बँकांकडील कर्ज घेतले असल्यास अथवा मनपा कोषागारात घरकुलाबाबतची रक्कम जमा करुन घरकुलाचा ताबा घेतला असल्यास अशा लाभार्थीची झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील दिव्यांग लाभार्थी यादी प्राप्त करुन घेऊन अशा दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी र.रु. १,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) अर्थसहाय्य त्यांच्या बँकेतील कर्ज खात्यावर अथवा बचत खात्यावर ECS द्वारे जमा करण्याबाबतच्या धोरणास मान्यता देण्यात यावी. सध्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील घरकुलाचा ताबा घेतलेल्या १०२ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना प्राप्त यादीनुसार प्रत्येकी र.रु. १,००,०००/- अर्थसहाय्य अदा करण्यास आणि भविष्य काळात घरकुलाचे प्राप्त होणा-या लाभार्थी यादीनुसार नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. पदाधिकारी यांना महापालिकेचे वाहन चालकासह वाहन अनुज्ञेय आहे मा. महापालिका सभेच्या मान्यतेने प्रशासन विभागाकडील दि. ४/१२/२०१७ च्या आदेशान्वये महापालिकेने मा. पदाधिकारी, अधिकारी यांचे खाजगी वाहन वापरा संदर्भात धोरण निश्चित केलेले आहे. धोरणातील अट क्र. २ अन्वये मनपाचे कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे मा. पदाधिकारी/अधिकारी यांच्या स्वतःच्या अथवा कुटूंबातील (पती/पत्नी/अविवाहीत मुलगा/अविवाहीत मुलगी/आई/वडील) सदस्यांचे नावांवर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. यामध्ये खाजगी वाहन वापर धोरणांत अंशतः बदल करुन मा. पदाधिकारी यांना स्वतःचे अथवा कुटूंबियाच्या मालकीच्या वाहनाशिवाय खाजगी कंपनी / मित्र अथवा त्रयस्त व्यक्तीकडून वापराकामी वाहन भाड्याने घेता येईल व त्याबाबतचा नोटरीकडील नोंदणीकृत (Noterised) करारनामा त्यांनी सादर करणे आवश्यक राहील अशी बाब सध्याच्या धोरणात समाविष्ठ करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता:

ठराव क्रमांक- ४३१ विषय क्रमांक – ५
दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सागर आंगोळकर, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८६१ दि.१२/०६/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय व महापालिकेच्या इतर रूग्णालयात रूग्ण उपचाराकरिता दाखल केले जातात. महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील तसेच इतर ग्रामीण भागातून व शहरांमधून रूग्ण उपचाराकरिता येत असतात. त्यामधील बहुतांशी रूग्णांची आर्थिक परिस्थिती बेताची असते, ब-याच रूग्णांचे पिंपरी चिंचवड शहरामध्ये नातेवाईकही नसतात. महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये उपचाराकरिता सामान्य दर आकारले जात असले तरी खूपदा उपचाराचे बील हे रूग्णाचे आर्थिक कुवतीपेक्षा अधिक असते. ही बाब विचारात घेता बहुतांशी रूग्णांची बेताची आर्थिक परिस्थिती व मानवतेच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह मनपाच्या सर्व रूग्णालयात उपचाराकरिता दाखल झालेल्या रूग्णांचा उपचार चालू असताना किंवा रूग्णालयात दाखल असतांना मृत्यु झाल्यास सदर रूग्णाचे मृत्यु समयी असणारे सर्व थकीत बील माफ करणेस मान्यता देणेत येत आहे. यामुळे सदर मृत रूग्णाचे नातेवाईकांना महापालिकेकडून एक प्रकारे दु:खात मदत होणार असल्याने सदर विषयास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या, नागरवस्ती विभाग योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी योजने अंतर्गत 'मनपाच्या हद्दीतील दिव्यांगांना मा.प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजने अंतर्गत घर खरेदीकामी र.रु. १,००,०००/- अर्थसहाय्य देणे' या उपलेखाशिर्षावर र.रु. १,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी फक्त) तरतुद सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी निश्चितीकामी निकष निश्चित करणे आवश्यक आहे.

तरी पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागामार्फत महापालिका हद्दीतील दिव्यांगांना घरकुल मंजूर झाल्यानंतर त्यांनी घर खरेदीकामी बँकांकडील कर्ज घेतले असल्यास अथवा मनपा कोषागारात घरकुलाबाबतची रक्कम जमा करुन घरकुलाचा ताबा घेतला असल्यास अशा लाभार्थीची झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील दिव्यांग लाभार्थी यादी प्राप्त करुन घेऊन अशा दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी र.रु. १,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) अर्थसहाय्य त्यांच्या बँकेतील कर्ज खात्यावर अथवा बचत खात्यावर ECS द्वारे जमा करण्याबाबतच्या धोरणास मान्यता देण्यात येत आहे. सध्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील घरकुलाचा ताबा घेतलेल्या १०२ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना प्राप्त यादीनुसार प्रत्येकी र.रु. १,००,०००/- अर्थसहाय्य अदा करण्यास आणि भविष्य काळात घरकुलाचे प्राप्त होणा-या लाभार्थी यादीनुसार नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. पदाधिकारी यांना महापालिकेचे वाहन चालकासह वाहन अनुज्ञेय आहे मा. महापालिका सभेच्या मान्यतेने प्रशासन विभागाकडील दि. ४/१२/२०१७ च्या आदेशान्वये महापालिकेने मा. पदाधिकारी, अधिकारी यांचे खाजगी वाहन वापरा संदर्भात धोरण निश्चित केलेले आहे. धोरणातील अट क्र. २ अन्वये मनपाचे कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे मा. पदाधिकारी/अधिकारी यांच्या स्वतःच्या अथवा कुटूंबातील (पती/पत्नी/अविवाहीत मुलगा/अविवाहीत मुलगी/आई/वडील) सदस्यांचे नावांवर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. यामध्ये खाजगी वाहन वापर धोरणांत अंशतः बदल करुन मा. पदाधिकारी यांना स्वतःचे अथवा कुटूंबियाच्या मालकीच्या वाहनाशिवाय खाजगी कंपनी / मित्र अथवा त्रयस्त व्यक्तीकडून वापराकामी वाहन भाड्याने घेता येईल व त्याबाबतचा नोटरीकडील नोंदणीकृत (Noterised) करारनामा त्यांनी सादर करणे आवश्यक राहील अशी बाब सध्याच्या धोरणात समाविष्ठ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ६

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र
क्र.भूजि/०६/कावि/१८५/२०१९ दि.०६/०६/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८७९
दि.१९/०६/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक, पर्यटक यांचेसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कार्याचा, विचारांचा प्रचार व प्रसारकरणेकामी शहरामध्ये स्मारक असणे आवश्यक आहे. त्यासाठी आदित्य बिर्लाग्रुपचे डायरेक्टर श्रीम.राजश्री बिर्ला यांनी महानगरपालिकेच्या ताब्यातील (किमान ०२ एकर जागा) पिंपरी येथील स.नं.२६/१,/२, २७/१अ/,२८/१अ,/१ब,/२,३०/१,/२ पै. सि.स.नं.४६९४ पै.मधील मंजूर बांधकाम रेखांकनातील सुविधा भुखंड व आरक्षण क्र.१२४ (MSEB SUBSTATION ) करीता आरक्षित असलेले क्षेत्र ६८०६.५८ चौ.मी. उपलब्ध करून दिल्या नंतर आदित्य बिर्ला ग्रुपच्या वतीने संपूर्ण बांधकाम खर्च व देखभाल दुरुस्ती केली जाईल. जागेचा व स्मारकाचा ताबा मनपाकडे राहील. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९(क) नुसार त्यास मान्यता देणेत यावी.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये (जी.बी. हॉल) मध्ये थोर महापुरुषांची तैलचित्र लावणेत आलेली आहेत. डॉ.शामाप्रसाद मुखर्जी, पंडीत दिनदयाळ उपाध्याय, डॉ. केशव हेडगेवार, श्री.माधव गोळवलकर गुरुजी, प्रमोदजी महाजन, लोकनेते गोपीनाथजी मुंडे, विलासराव देशमुख, आर. आर. पाटील यांनीही महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिलेले आहे. तरी त्यांच्या कामाचा गौरव म्हणून त्यांची तैलचित्रे यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये (जी.बी. हॉल) मध्ये लावणेस मा. मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील शाहुनगर येथे असलेल्या कै. सदाशिव बहिरवाडे क्रिंडागणासंबधी ऑगस्ट २०१७ पुर्वीचे नामकरणाचे सर्व ठराव रद्द करणेत यावेत. तसेच अ प्रभाग समितीमध्ये मंगळवार दि. १२/०९/२०१७ रोजी मंजुर

झालेल्या ठराव क्र. ७० नुसार राजर्षी शाहु महाराज क्रिंडागण व व्यायामशाळा असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच एन.यु.एच.एम. अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील सर्व कामगार व कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या किमान वेतन अधिनियमाप्रमाणे वेतन पुर्वलक्षी प्रभावाने लागु करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मोशी प्राधिकरण मध्ये सेक्टर नं. ४ मध्ये आजही गट क्रमांक नवीन ५१५, ५१७, ५०५ व जुना ८०८, ८८२ या गटातील विहीर व आंब्याची झाडे शिल्लक आहेत प्लॉट नंबर १११, ११२, १४५ व १४६ च्या बाजूला विहीर व मोकळी जागा शिल्लक आहे ही जागा बालसंस्कार करण्यासाठी, मनशक्ती बालसंस्कार केंद्र मोशी या संस्थेला ही जागा भाडेतत्वावर देण्यास मान्यता देणेत यावी. सदर जागे वरील जे झाडे असतील त्या झाडांना संस्थेकडून कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही तरी सदर संस्थेस नियमानुसार सदर जागा देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ४३२ विषय क्रमांक – ६
दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र
क्र.भूजि/०६/कावि/१८५/२०१९ दि.०६/०६/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८७९
दि.१९/०६/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक, पर्यटक यांचेसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कार्याचा, विचारांचा प्रचार व प्रसारकरणेकामी शहरामध्ये स्मारक असणे आवश्यक आहे. त्यासाठी आदित्य बिर्लाग्रुपचे डायरेक्टर श्रीम.राजश्री बिर्ला यांनी महानगरपालिकेच्या ताब्यातील (किमान ०२ एकर जागा) पिंपरी येथील स.नं.२६/१,/२,२७/१3अ/,२८/१3अ,/१ब,/२,३०/१,/२पै. सि.स.नं.४६९४ पै.मधील मंजूर बांधकाम रेखांकनातील सुविधा भुखंड व आरक्षण क्र.१२४ (MSEB SUBSTATION ) करीता आरक्षित

असलेले क्षेत्र ६८०६.५८ चौ.मी. उपलब्ध करून दिल्या नंतर आदित्य बिर्ला ग्रुपच्या वतीने संपूर्ण बांधकाम खर्च व देखभाल दुरुस्ती केली जाईल. जागेचा व स्मारकाचा ताबा मनपाकडे राहील. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९(क) नुसार त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये (जी.बी. हॉल) मध्ये थोर महापुरुषांची तैलचित्र लावणेत आलेली आहेत. डॉ.शामाप्रसाद मुखर्जी, पंडीत दिनदयाळ उपाध्याय, डॉ. केशव हेडगेवार, श्री.माधव गोळवलकर गुरुजी, प्रमोदजी महाजन, लोकनेते गोपीनाथजी मुंडे, विलासराव देशमुख, आर. आर. पाटील यांनीही महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिलेले आहे. तरी त्यांच्या कामाचा गौरव म्हणून त्यांची तैलचित्रे यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये (जी.बी. हॉल) मध्ये लावणेस मा. मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील शाहुनगर येथे असलेल्या कै. सदाशिव बहिरवाडे क्रिंडागणासंबधी ऑगस्ट २०१७ पुर्वीचे नामकरणाचे सर्व ठराव रद्द करणेत यावेत. तसेच अ प्रभाग समितीमध्ये मंगळवार दि. १२/०९/२०१७ रोजी मंजुर झालेल्या ठराव क्र. ७० नुसार राजर्षी शाहु महाराज क्रिंडागण व व्यायामशाळा असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच एन.यु.एच.एम. अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील सर्व कामगार व कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या किमान वेतन अधिनियमाप्रमाणे वेतन पुर्वलक्षी प्रभावाने लागु करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मोशी प्राधिकरण मध्ये सेक्टर नं. ४ मध्ये आजही गट क्रमांक नवीन ५१५, ५१७, ५०५ व जुना ८०८, ८८२ या गटातील विहीर व आंब्याची झाडे शिल्लक आहेत प्लॉट नंबर १११, ११२, १४५ व १४६ च्या बाजूला विहीर व मोकळी जागा शिल्लक आहे ही जागा बालसंस्कार करण्यासाठी, मनशक्ती बालसंस्कार केंद्र मोशी या संस्थेला ही जागा भाडेतत्वावर देण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर जागे वरील जे झाडे असतील त्या झाडांना संस्थेकडून कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही तरी सदर संस्थेस नियमानुसार सदर जागा देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ४३३ विषय क्रमांक – ७

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वैद्य/१३/कावि/१९६/२०१९ दि.१८/०६/२०१९

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४९१९ दि.२७/०६/२०१९

शासन प्रतिनियुक्तीवर असलेल्या ज्या अधिका-यांनी धन्वंतरी स्वास्थ योजना धोरण २०१३ नुसार सदर योजनेत सहभागी होणेस संमतीपत्र सादर केले आहे त्यांना धन्वंतरी स्वास्थ योजनेच्या धोरणानुसार तसेच मान्य दरानुसार वैद्यकीय बीलांची प्रतीपुर्ती करणेबाबत व शासन प्रतिनियुक्तीवर असलेल्या ज्या अधिका-यांनी धन्वंतरी स्वास्थ योजनेत सहभागी होणेस असंमती दर्शवली आहे त्यांना शासनाकडील प्रतिपुर्तीचे नियमानुसार म्हणजेच महाराष्ट्र राज्य) वैद्यकीय देखभाल (नियम १९६१ मधील तरतुदीनुसार व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय बीलांची प्रतिपुर्ती करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद बाबींचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ८

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१२/१५/२०१९ दि.२४/०६/२०१९
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५
दि.१०/७/२०१९ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/३०९६/१८०१/ सीसर-२६१/नवि-२२, दि.११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टिएमपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०५/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी/नवि-१३ दि. ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे दापोडी येथील स.नं ०५ पै जागामालक श्री चंद्रकांत सोपान काटे व इतर यांनी टाऊन हॉल व बस टर्मिनस ने बाधित क्षेत्र नविन भूसंपादन अधिनियमाद्वारे मनपाचे ताब्यात देणेकामी अर्ज या विभागाकडे सादर केलेला आहे. तरी मौजे दापोडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शविल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.०३/२४ | टाऊन हॉल | ५ पै | ५०००.०० चौ.मी |
| २ | आरक्षण क्र .०३/२५ | बस टर्मिनस | ४ पै, ०५पै व ०६ पै | २९६०० चौ.मी |
| ३ | नियोजित रस्ता | १२.०० मी | | |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा. महापालिका

सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनार्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील गट ११७४ मध्ये मंजुर विकास योजनेत माध्यमिक शाळेचे (आ.क्र. १/११६) आरक्षण प्रस्तावित केलेले आहे. सदर आरक्षणाच्या जवळ खाजगी शाळा विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे सदर शाळेची आवश्यकता नाही. त्यामुळे वरील आरक्षणाचे फेरबदल करुन सदर अरक्षित जागेचा समावेश रहिवास विभागात प्रस्तावित करणेच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहित कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मौजे थेरगाव येथील थेरगाव ते काळेवाडी फाटा या ४५.०० मी. रस्त्यावरील स.न. १४ मधील (आनंद टिंबर्स) पासुन ते बहिरट यांच्या घरापर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अंतर्गत ९.०० मी. रस्ता घोषित करणेबाबत- मौजे थेरगाव स.न. १४ येथील नागरिकांना सद्यस्थितीत असलेला रस्ता अरुंद पडत असल्याने सदरचा रस्ता ९.०० मी. चा आवश्यक आहे. सबब मौजे थेरगाव येथील थेरगाव ते काळेवाडी फाटा या ४५.०० मी. रस्त्यावरील स.न. १४ मधील (आनंद टिंबर्स) पासुन ते बहिरट यांच्या घरापर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अंतर्गत ९.०० मी. रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत यावी. मौजे दापोडी येथील स.नं.४,५ व ६ पैमधील मंजूर विकास आरखडयातील आ.क्र. ३/२५ बस टर्मिनस, आ.क्र. ३/२४ टाऊन हॉल व १२.०० मी.रस्ता या प्रयोजनाखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना

अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी तसेच मौजे च-होली येथील मंजूर विकास योजनेतील ९०.०० मी. रस्ता या प्रयोजनाखालील तसेच मौजे चोविसावाडी व च-होली शिवेवरील १८ मी.रस्ता या प्रयोजनाखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दापोडी येथील स.नं. ५ मधील विवीध आरक्षणाचा भूसंपादनाचा विषय आहे. सदरच्या जागा मालकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केलेला असून तो अजून निकाली लागलेला नाही. त्यामुळे सदरचा विषय केल्यास न्यायालयाचा अवमान होवू शकतो. त्यामुळे हा विषय दसरी दाखल करावा. आता मगाशी केशव घोळवे यांनी जी उपसूचना मांडली ती आम्हांला दाखवण्यात यावी कारण त्यांनी काहीतरी क्रिडांगणाचे नाव चेंज करायचे ठरवलेल आहे तरी ते आम्हांला कळाव. केशव घोळवे यांनी जी उपसूचना वाचली ती सविस्तर आम्हांला कळावी, ती उपसूचना परत वाचावी.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने आज सगळे नगरसेवक एकदम जागृक असल्यासारख वाटायला लागले. आजपर्यंत अनेकदा सभागृहात विषय आणतो आणि कदाचित आमच्या सगळयांच्या दुर्लक्षामुळे आम्हांला विषय माहिती होत नाही असं काहीतरी कामकाज चालू असताना आज मात्र सगळयांच्यामध्ये सगळेजण अभ्यासपुर्ण विषयापर्यंत येतात. मगाशी सी ॲण्ड डीवेस्टच्या विषयावर चर्चा झाली आज सगळेचजण अत्यंत अभ्यासपुर्ण विषय याठिकाणी करतात. सन्मा.महापौर साहेब, हा जो ८ नंबरचा विषय आहे टाऊन हॉल आणि त्याच बरोबर बसटर्मिनल हे दोन्ही विषय माझ्या दापोडीतले आहेत. माझ्या दापोडीत दोन्ही आरक्षण आहेत त्याच्यापैकी एकही आरक्षण आजपर्यंत विकसीत नाही. मोजके दोन चार आरक्षण आपल्यापर्यंत येत आहेत हा जो विषय आहे त्याच पुर्ण आपल्याकड पेनोट जागामालकानी दिली ती आपण स्विकारली

नाहीतर, महापालिकेनी ती जागा घेतली नाही ताब्यात तर त्याच कदाचित आरक्षण निघुन जाईल असंही होणेची शक्यता आहे. आजपर्यंत जे काही बारा तेरा आरक्षण आहेत त्यातील एकही आरक्षण विकसीत नाही. तरी विनंती आहे की हा विषय मंजूर झाला पाहीजे मला वाटत आपल्या महापालिकेनी देखील बस टर्मिनलच आरक्षण हाव आहे का अस पीएमपीएमएलला मागणी केल्यानंतर त्यांनी सुध्दा आम्हांला आरक्षण हव आहे अशाप्रकारची सुचना त्यांच्याकडन आपल्याकड आलेली आहे. त्यामुळे आपल्याला विनंती आहे की हा विषय आपण मंजूर करावा.

यानंतर उपसुचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता

ठराव क्रमांक – ४३४ विषय क्रमांक – ८
दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१२/१५/२०१९ दि.२४/०६/२०१९
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५
दि.१०/७/२०१९ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/३०९६/१८०१/ सीसर-२६१/नवि-२२, दि.११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टिएमपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०५/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी/नवि-१३ दि. ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे दापोडी येथील स.नं ०५ पै जागामालक श्री चंद्रकांत सोपान काटे व इतर यांनी टाऊन हॉल व बस टर्मिनस ने बाधित क्षेत्र नविन भूसंपादन अधिनियमाद्वारे मनपाचे ताब्यात देणेकामी अर्ज या विभागाकडे सादर केलेला आहे. तरी मौजे दापोडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शविल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>आरक्षण क्रमांक</th><th>आरक्षणाचे प्रयोजन</th><th>स.नं</th><th>बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी</th></tr>
<tr><td>१</td><td>आरक्षण क्र.०३/२४</td><td>टाऊन हॉल</td><td>५ पै</td><td>५०००.०० चौ.मी</td></tr>
<tr><td>२</td><td>आरक्षण क्र .०३/२५</td><td>बस टर्मिनस</td><td rowspan="2">४ पै, ०५पै व ०६ पै</td><td rowspan="2">२९६०० चौ.मी</td></tr>
<tr><td>३</td><td>नियोजित रस्ता</td><td>१२.०० मी</td></tr>
</table>

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा. महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनार्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील गट ११७४ मध्ये मंजुर विकास योजनेत माध्यमिक शाळेचे (आ.क्र. १/११६) आरक्षण प्रस्तावित केलेले आहे. सदर आरक्षणाच्या जवळ खाजगी शाळा विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे सदर शाळेची आवश्यकता नाही. त्यामुळे वरील आरक्षणाचे फेरबदल करुन सदर अरक्षित जागेचा समावेश रहिवास विभागात प्रस्तावित करणेच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहित कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे थेरगाव येथील थेरगाव ते काळेवाडी फाटा या ४५.०० मी. रस्त्यावरील स.न. १४ मधील (आनंद टिंबर्स) पासुन ते बहिरट यांच्या घरापर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अंतर्गत ९.०० मी. रस्ता घोषित करणेबाबत- मौजे थेरगाव स.न. १४ येथील नागरिकांना सद्यस्थितीत असलेला रस्ता अरुंद पडत असल्याने सदरचा रस्ता ९.०० मी. चा आवश्यक आहे. सबब मौजे थेरगाव येथील थेरगाव ते काळेवाडी

फाटा या ४५.०० मी. रस्त्यावरील स.न. १४ मधील (आनंद टिंबर्स) पासुन ते बहिरट यांच्या घरापर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अंतर्गत ९.०० मी. रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे दापोडी येथील स.नं.४,५ व ६ पैमधील मंजूर विकास आरखडयातील आ.क्र. ३/२५ बस टर्मिनस, आ.क्र. ३/२४ टाऊन हॉल व १२.०० मी.रस्ता या प्रयोजनाखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मौजे च-होली येथील मंजूर विकास योजनेतील ९०.०० मी. रस्ता या प्रयोजनाखालील तसेच मौजे चोविसावाडी व च-होली शिवेवरील १८ मी.रस्ता या प्रयोजनाखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणा-या प्रत्यक्ष खर्चास व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४३५ विषय क्रमांक – ९

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/१२५/२०१९ दिनांक ४/०७/२०१९

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु. ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु. १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदाकरणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०६/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज | १७२८१ | |

| | | | |
|---|---|---|---|
| केलेल्या कुटुंबांची संख्या | | | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १७२८१ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १४९७८ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१४५१४ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ९८८४<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४६३० |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १०३१३ लाभार्थी | GOI+GOM=६१८.७८ लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २०६.२६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८२५.०४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ९५१०लाभार्थी | GOI+GOM=५७०.६०लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१९०.२०लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७६०.८० लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**(मा.महापौर- मा.राहुल जाधव सभागृहात आले व सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

**मा.राजेंद्र गावडे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४३६ विषय क्रमांक – १०
दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

## विधी समिती

अ) दिनांक १५/०३/२०१९, ५/०४/२०१९ व २०/०४/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.राजेंद्र गावडे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४३७ विषय क्रमांक – ११

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक ८/०३/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १४/०६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.राजेंद्र गावडे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४३८ विषय क्रमांक – १२

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक ०९/०१/२०१९, २३/०१/२०१९, १३/०२/२०१९ व २७/०२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २३/०१/२०१९, १३/०२/२०१९ व दिनांक २७/०२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक २७/०२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दिनांक १३/०३/२०१९, २७/३/२०१९, १०/४/२०१९, २४/४/२०१९ व २६/६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

इ) दिनांक १४/०६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

फ) दिनांक २६/०६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.राजेंद्र गावडे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४३९ विषय क्रमांक – १३

दिनांक – ७/९/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) दिनांक ०८/०३/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १४/०६/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. महापौर** – सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

------

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/२०/२०२०
दिनांक - २४/१/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.